# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक ०४-१२-१९९७ ते ३१-०३-१९९८**
**प्रस्ताव क्र. ११३/१ ते १९५/१ पर्यंत**
**रजिष्टर क्र. ०५**

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक ०४-१२-९७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**गुरुवार दि. ४/१२/९७ रोजी सकाळी ११.०० वा. मा. महापौर श्री. अब्दुल रशिद खान (मामु) यांचे अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभा संपन्न झाली. सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गीताने झाली. सभेत अधिकारी तथा खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स. श्री. करवेंदरसिंह धिल्लन उप महापौर
२) स.स. श्री. प्रभाकर सिताराम विधाते स. सदस्य
३) स.स. श्री. सुदाम सोनवणे
४) स.स. सौ. रुखमनबाई लोखंडे
५) स.स. श्री. अफसरखाँ यासिनखाँ
६) स.स. सौ. साजेदा बेगम
७) स.स. श्री. गौतम भागाजी खरात
८) स.स. सौ. रजनी रमेश जोशी
९) स.स. सौ. उषाबाई दिलीप गायकवाड
१०) स.स. सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक
११) स.स. सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे
१२) स.स. श्री. गौतम लिंबाजी लांडगे
१३) स.स. श्री. महादेव पुंडलिकराव सुर्यवंशी
१४) स.स. श्री. अभिमन्यु रामभाऊ भालेराव
१५) स.स. श्री. नरेंद्र यादवराव पाटील
१६) स.स. श्री. काशिनाथ हरिभाऊ कोकाटे
१७) स.स. श्री. रविंद्र बाबुराव इंगळे
१८) स.स. सौ. पद्मा बाबुराव शिंदे
१९) स.स. श्री. सुभाष भिगाज टाकळकर
२०) स.स. श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ
२१) स.स. सौ. धनश्री अशोक विसपुते
२२) स.स. श्री. फजलउल्लाखाँ अजमलउल्लाखाँ
२३) स.स. श्री. अजिजखाँ गणीखाँ
२४) स.स. श्रीमती आबेदाबेगम मो. मुस्तफा
२५) स.स. श्री. मुश्ताक अहेमद
२६) स.स. श्री. वसंत विनायकराव देशमुख
२७) स.स. श्री. हाजी मोहसिन अहेमद हाजी बशीर अहेमद
२८) स.स. सौ. मोहसिना बिल्कीस विश्वारोद्दीन
२९) स.स. श्री. अ. जावेद रज्जाक
३०) स.स. श्रीमती जाहेदा बेगम म. जमीर
३१) स.स. श्री. त्रिंबक गणपत तुपे
३२) स.स. सौ. यशोदा धनंजय वाडेकर
३३) स.स. श्री. किशोर बाबुलाल तुळशीराम बागवाले
३४) स.स. श्रीमती पुष्पाताई सुरेशचंद्र गंगवाल

३५) स.स. श्री. हमीदउद्दीन ताबा
३६) स.स. श्री. म.अ. रऊफ म.अ. माबुद
३७) स.स. श्री. स.अ. इकबालोद्दीन स.मो. कुतुबउद्दीन
३८) स.स. श्री. सैय्यद अली मिरांसलामी
३९) स.स. श्री. संजय किसनराव केनेकर
४०) स.स. सौ. मुक्ताबाई सुदाम वाघमारे
४१) स.स. सौ. लता श्रिनिवास दलाल
४२) स.स. श्री. जयवंत केशवराव ओक
४३) स.स. श्रीमती अलका रमेश पाटील
४४) स.स. सौ. शकुंतला हरिदास धांडे
४५) स.स. कु. माया लिंबाजी लाडवाणी
४६) स.स. डॉ. भागवत किशनराव कराड
४७) स.स. सौ. सविता संजय आव्हाड
४८) स.स. सौ. निर्मला विठ्ठल कांबळे
४९) स.स. श्री. अ. रशिद अ. सत्तार
५०) स.स. श्री. विखारोद्दीन वि. खुदबेद्दिन
५१) स.स. श्री. विकास रतनलाल जैन
५२) स.स. श्री. गंगाधर सुखदेव गाडे
५३) स.स. श्री. गजानन रामकिसन बारवाल
५४) स.स. श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय
५५) स.स. श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे
५६) स.स. श्री. संजय रामदास जोशी
५७) स.स. श्री. अविनाश लक्ष्मण कुमावत
५८) स.स. सौ. ज्योत्सना दौलतराव हिवराळे
५९) स.स. श्री. राजकुमार उर्फ सांडू बचाटे
६०) स.स. सौ. राधाबाई तळेकर
६१) स.स. श्री. नरसिंग मुरलीधर ढगे
६२) स.स. श्री. विठ्ठल किसन जाधव
६३) स.स. श्री. विजयकुमार गजानन मेहेर
६४) स.स. सौ. सुनंदा उत्तम कोल्हे
६५) स.स. श्री. बन्सी तुळशीराम गांगवे
६६) स.स. श्री. भगवान देविदास घडामोडे

**मा. महापौर :** सभेत कोरम अभावे सभा २० मिनिट तहकुब करण्यात येते. (११:३२ वा. सभेला सुरुवात १२:००)

**श्री. मोहसीन अहमद :** माजी मंत्री व लोकमत वर्तमान पत्राचे संस्थापक कै. जवाहरलाल दर्डा यांचे दु:खद निधनाने सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**श्री. गंगाधर गाडे :** यांस माझे अनुमोदन आहे.

**श्री.सुदाम सोनवणे :** ज्याप्रमाणे स.स. श्री. कचरु नवपुते यांचे काकू.... यांचेही दु:खद निधनाने सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**मा. महापौर :** ठिक आहे. सभागृहात १ मिनिट श्रध्दांजली वाहण्यात येते.
(सभागृहात १ मिनिट स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात आली.)

**मा. महापौर :** विषय क्र. १ वर चर्चा व्हावी.

**श्री. अफसरखॉं :** अगोदर स. सदस्य यांच्या विविध तक्रारीबाबत सभागृहात चर्चा व्हावी.

**मा. महापौर :** सुरुवातीस चर्चा करावयाची झल्यास किती कालावधीपर्यंत चर्चा करावी याचा वेळ निश्चित ठरवावा.

**श्री. गजानन बारवाल :** अगोदर इतिवृत्त कायम करुन नंतर चर्चा करावी.

**श्री. अफसर खॉं :** मी या वार्डातील मो. जयसिंगपुरा आणि बेगमपुरा येथील उर्दु शाळेतील दयनिय अवस्था व काही अपुऱ्या फर्निचर व साहित्याबाबत गेले कित्येक दिवसापासून शिक्षणाधिकारी यांना भेटून सुचना दिलेल्या असतानाही शिक्षणाधिकारी यांना भेटूनही सुचना दिलेल्या असतांनाही शिक्षणाधिकारी यांनी उर्दु शाळांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. यावरुन ते जातीयवादी आहेत हे सिध्द होते. त्यांच्या अकार्यक्षमतेने महानगरपालिकेच्या शैक्षणिक ढाचा खिळखिळा झालेला आहे. त्यामुळे अशा अकार्यक्षम अधिकाऱ्याची या मनपातून बदली तातडीने करावी अशी सभागृहास विनंती करतो.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** महानगरपालिकेच्या शाळातील शिक्षक व विद्यार्थी त्यांच्यात ताळमेळ नाही. महानगरपालिकेतील काही शिक्षकांच्याबदल्या मा. आयुक्त यांचेवर दबाव आणून केल्या जाते ही बाब गंभीर होय. शिक्षणाधिकारी ह्यांच्या महानगरपालिकेतील प्रत्येक शाळांवर जवळपास ४.५ वेळीस भेटी झालेल्या आहेत. त्यामुळे त्यांना शिक्षकांवर अकुंष नाही. हे म्हणणे योग्य नाही. माझ्या वार्डातील नारेगाव शाळेत जवळपास ८४९ विद्यार्थी गण आहेत. शिक्षक मात्र ११ आहेत आणि काही शाळांतील स्थिती व विद्यार्थ्यांची संख्या ३०० तर शिक्षक शिकविण्यासाठी २३ अशा आहेत. या बाबतचा तफावत शिक्षणाधिकारी यांना प्रत्यक्षात पाहणी करुनच कार्यवाही करायची असते. अशाच प्रकारची स्थिती पडेगाव महानगरपालिकेच्या शाळातसुध्दा आहेत. त्या ठिकाणी शिक्षकाची संख्या अपुरी आहे.

**मा. महापौर :** शिक्षण व विद्युत विभागाच्या कामकाजाच्या संदर्भात येत्या ११/२/९७ रोजी विशेष सभा आयोजीत करण्यात येणार आहे. त्यावेळी सविस्तर चर्चा व्हावी.

**श्री. स. अली मिरा सलामी :** शहरातील जी अतिक्रमण हटाव मोहीम जी चालू करण्यात आली आहे ती योग्यरित्या हाताळणे आवश्यक आहे. शासनाचे धोरणानुसार सन १९९६ पूर्वी ज्या टपऱ्या अस्तित्वात होत्या ह्या सर्वांना नियमीत करावे. ह्या व्यतिरिक्त जी अनधिकृत घरे/टपऱ्या आहेत त्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी. परंतु आतापर्यंत प्रशासनाने गेल्या १२-१२ वर्षापासून गरीब व होतकरु लोक आपले धंदा करुन पोट भरीत आहेत. ह्यांच्या टपऱ्या हटविल्या आहेत व ते उच्चभ्रू आणि गर्भश्रीमंत व्यक्ती आहेत. त्यांच्या अनधिकृत टपऱ्या हटविण्याचे धाडस प्रशासनाने केलेले नाही. अशाप्रकारचा दुजाभाव करणे योग्य नसून गरिबांच्या टपऱ्या हटविल्या त्यांचेवर अन्याय करु नये. आतापर्यंत प्रशासनाने किती टपऱ्या हटविल्या याची माहिती द्यावी. ह्याशिवाय मागे असे ठरलेले होते की, ज्या ठिकाणच्या टपऱ्या हटविण्याची कार्यवाही होईल त्यासंबंधीत नगरसेवकास कल्पना देण्यात येईल परंतु तशा सुचनाही मिळालेल्या नाहीत. माझ्या माहितीप्रमाणे काही ॲन्टीकरप्शनचे अधिकाऱ्याचे नातेवाईक व मनपातील अधिकाऱ्याचे जवळचे नातेवाईकांना

नवीन टपऱ्या बसविण्याची परवानगी दिलेली आहे. त्याबाबतची माहिती द्यावी. तसेच अनधिकृत टपऱ्या बऱ्याचशा बसलेल्या आहेत. त्यावर महानगरपालिकेचे दुर्लक्ष असते. आणि त्यामुळे रस्ता अरुंद होत जातो याकडे प्रशासनाने खबरदारी घ्यावी.

**श्री. गजानन बारवाल** : प्रशासनाची अतिक्रमण हटाव मोहीम अतिशय चांगल्या प्रकारची चालती असून, कोणत्याही प्रकारची नोटीसा न देता अनधिकृत टपऱ्या हटविण्याचे धोरण शासनाचे आदेशान्वये राबविण्यात येत आहेत. शहरातील बऱ्याच भागातील व्ही.आय.पी. रोडवरील अतिक्रमणे जी कायदेशीर असतील त्यांना महानगरपालिके तर्फे योग्य ती व्यवस्था करावी.

**श्री. हमीद उद्दीन बाबा** : माझ्या माहितीप्रमाणे एका मंत्री महोदयाचे पत्रान्वये एकास टपरी परवानगी दिलेली आहे.

१) शहरातील अतिक्रमणात येणाऱ्या टपऱ्या हटवितांना गरिबांच्या टपऱ्या तातडीने हटविण्यात आलेल्या आहेत. ज्यामुळे त्यांचा रोजी रोटीचा प्रश्न तयार झाला आहे. शहरातील रोड रुंदीकरण करीत असतांना दोन्हीही बाजूचे मोजमाप करुनच प्रशासनाने कार्यवाही करावी गेल्या ३० वर्षापूर्वी महानगरपालिकेने कार्यवाही केलेली दिसत नाही. ती आज होत आहे. रंगारगल्ली रुंदीकरणाचा प्रस्ताव गेल्या कित्येक दिवसापासूनचा प्रलंबत प्रस्ताव होय. बरेचसे असे काही रस्ते आहेत की, मनपातर्फे कार्यवाही न होता प्रलंबीत आहेत. काही कोर्ट प्रकरणे झालेली आहे. प्रशासनातील काही अधिकारी ह्या प्रकरणी चालढकल करीत आहेत.

२) शिक्षक भरती व महानगरपालिकेतील २० खाटांचा दवाखाना बांधकाम प्रकरणी चौकशी अहवाल अद्यापही प्रशासनातर्फे प्रलंबीत आहे. अजून किती कालावधी लागतो याचा काहीही तपास नाही.

३) शिक्षण विभागातील सेविकांचा प्रश्न कित्येक दिवसापासून प्रलंबीत आहे. स्वच्छता निरीक्षक नवीन घ्यावयाचे ठरले होते तो ही प्रश्न प्रलंबीत आहे. असे कितीतरी प्रश्न आहेत की, प्रशासन तातडीने योग्य ती कार्यवाही करत नाही.

**श्री. सुदाम सोनवणे** : सभागृहात स. सदस्य अधिकाऱ्यांच्या बाबतीत आरोप करीत असल्यास तशी स्पष्टपणे माहिती द्यावी.

**मा. महापौर** : मा. माने साहेब मंत्री महोदय महाराष्ट्र राज्य यांच्या सुचनेप्रमाणे टपरी परवानगी दिलेली आहे ते खरे आहे काय? याची माहिती द्यावी.

**मालमत्ता अधिकारी** : मा. माने साहेब मंत्री महोदय यांचे शिफारस पत्र टपरीसाठी आलेले आहे. परंतु त्याबाबत अद्याप कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही.

**श्री. अ. जावेद रज्जाक** : स. मंत्री महोदय श्री. माने साहेब यांच्या शिफारशीनुसार टपरी परवानगीची अंमलबजावणी केलेली आहे काय? मागील वेळेस शहरातील अनधिकृत टपऱ्या हटविण्याची मोहिम चालू होती ती बंद का पाडण्यात आली. आतापर्यंत किती अनधिकृत टपऱ्या हटविण्यात आल्या याची माहिती द्यावी. ज्या टपऱ्या हटविल्या त्यापैकी बऱ्याचशा टपऱ्या गरीबांच्या हटवितांना अक्षरशः चुराज करून टाकलेला आहे. बऱ्याचशा टपऱ्या जालना रोडवर विनापरवानगी बसलेल्या आहे. त्या प्रशासनातर्फे हटविल्या जातात मात्र पुन्हा बसतात ह्या बाबत महानगरपालिकेने खबरदारी घ्यावी. आतापर्यंत

महानगरपालिका प्रशासनात टपऱ्यामुळे किती पैशाचे उत्पन्न प्राप्त झाले याची माहिती द्यावी.

**श्रीमती मोहसिना बिल्कीस :** शहरातील बऱ्याच भागात ज्या अनधिकृत टपऱ्या बसतात त्याचवेळेस प्रशासनाने पायबंद घालणे जरुरीचे आहे. प्रशासनामार्फत स्वच्छते मोहीम अंतर्गत जी "सुरत पॅटर्न" राबविल्या जात आहे. याबाबत झोन - १ ची मोहीम चांगली वाटते परंतु झोन - ३ ची स्वच्छतेची मोहीम फारशी चांगली नाही कारण स्वच्छते बाबत एका वार्डात चांगली वाटते तर दुसऱ्या भागात दुर्लक्ष केल्याचे आढळते. यासाठी प्रशासनाने याकडे बारकाईने लक्ष द्यावे.

**श्रीमती आबेदा बेगम :** माझ्या वार्डात स्वच्छता मोहीम गतीने राबविण्यासाठी झोन अधिकाऱ्यांनी सतत पाहणी करावी.

**श्री. नरेंद्र पाटील :** अनधिकृत टपऱ्या हटविण्याच्या मोहीमेचे प्रशासनाने अभिनंदन परंतु ज्यावेळी अनधिकृत टपऱ्या बसतात त्याच वेळेस प्रशासकीय विभागातील कर्मचाऱ्यांनी झोन निहाय प्रतिबंध घालावे. परंतु तसे होत नाही. ज्यामुळे अतिक्रमणे सर्वत्र जास्त प्रमाणात झालेली आहेत. जालना रोडवर अनेक ट्रान्सपोर्ट गाड्या उभ्या राहतात त्यामुळे वाहतुकीस अडथळे तयार होतात. परंतु सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेशी संपर्क साधुन मनपाने जालना रोडवरील अतिक्रमणे व रस्त्यावरील वाहने यांच्याबाबत कडक प्रतिबंध करावा जेणे करुन मनपास आळा बसेल. याचे उदा. द्यावयाचे झाल्यास जवाहर कॉलनीकडे जातांना चौकात अतिशय गर्दी असते. त्यामुळे वाहतुकीस अडथळे निर्माण होतात. बऱ्याच ठिकाणचे सिग्नलचे लाईट नादुरुस्त आहेत. सिडकोमध्ये संत एकनाथ नाट्यगृहाच्या धर्तीवर नाट्यगृह बांधण्याचे आश्वासन मा. मंत्री महोदय यांनी दिलेले होते. २१.१.०० कोटीचे अनुदान देवून पैकी रु. २१,२५०० लाख महानगरपालिकेने द्यावेत असे आदेश असतानाही महानगरपालिकेने सिडकोकडे अद्यापही दिलेले नाही. जर नाट्यगृह बांधकामासाठी महानगरपालिका रु. २१,२५०० लाख दिलेले नाही तर, सिडकोतील १४ नगरसेवक "उपोषणास" बसतील याची नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे मालमत्ता कराचे नोटीसा सिडको वासियांना महानगरपालिका देत आहे. ते योग्य नसून जोपर्यंत सिडको हस्तांतर होत नाही तोपर्यंत सिडकोतील नागरिकांना मालमत्ता कराच्या नोटीसा पाठविण्यात येवू नये.

**सौ. राधाबाई तळेकर :** टपरी हटविण्याची मोहीम अभिनंदनास पात्र आहे. परंतु हटविण्यापूर्वी नागरीकांना दोन दिवस अगोदर पूर्व कल्पना देणे आवश्यक होते. अशा काही गरीब लोकांच्या टपऱ्या ओढून ताणून हटविल्या गेल्या की, ज्यामुळे टपऱ्यांचे तुकडे होवून मोडकळीस आले. आता नव्याने टपरी बनविणे त्या लोकांना शक्य आहे काय? माझ्या मते या ठिकाणी पक्षपात झालेला आहे. जवाहरनगर येथील रहदारीत अडथळा असतांनाही हटविला गेला नाही. मात्र गरिब लोक लहानशा टपऱ्यावर व्यवसाय करुन पोट भरतात. त्यांच्या टपऱ्या हटविल्या गेल्या ही बाब योग्य नाही. या बाबतची चौकशी व्हावी.

**श्री. संजय जोशी :** शहरातील अनधिकृत टपऱ्या प्रशासनाने हटविण्याची मोहीम सुरु केली त्याचे अभिनंदन करुन आभार मानतो. कारण या मोहिमेत प्रशासनातील

कर्मचारी/अधिकारी काम करीत असतांना कित्येकदा नागरिकांच्या शिव्या व दगडांचे मार खावा लागतो. त्यांना बहुतेक वेळा पोलीस संरक्षणही मिळत नाही. अशा वेळी कर्मचाऱ्यांच्या बाजूने आपण काही उपाययोजना केली काय? रंगारगल्लीतील रस्ता रुंदीकरणाचे अर्धवट काम झालेले काय? रंगारगल्लीतील रस्ता रुंदीकरणाचे अर्धवट काम झालेले आहे. उरलेले काम कधी पूर्ण करणार याची माहिती द्यावी. शहरातील बऱ्याचशा शाळा व महाविद्यालये, नाट्यगृह आणि सार्वजनिक ठिकाणी अनधिकृत टपऱ्यावाले आपआपले व्यवसाय करतात. त्यांचेमुळे काही गुंड व हुल्लड मुले रस्त्यावरील बहिणीचे व मुलीचे छेडछाड व अश्लील भाषा उद्गारतात यासाठी अशा टपरी धारकांसाठी प्रशासनाने विशिष्ट प्रकारे शिस्त लावणे व शाळा महाविद्यालयाशेजारी अनधिकृत टपऱ्या न बसविणेबाबत प्रशासनाने उचित कार्यवाही करावी.

**डॉ. विजयकुमार मेहेर** : गेल्या कित्येक वेळा मी प्रश्न विचारणा केलेली आहे की, मध्यवर्ती जकात नाक्याजवळील ३५ ते ४० टपऱ्या रोड लगत बसलेल्या आहेत व त्या टपऱ्या पक्या स्वरुपात शेड बांधून उभ्या आहेत. त्यांचेकडून मनपा किती प्रमाणात भाडे आकारणी करते व ह्यांना नियमाप्रमाणे टॅक्स आकारणी करते काय? याची माहिती द्यावी.

**श्री. काशीनाथ कोकाटे :** अतिक्रमण हटविण्याच्या मोहीमेबाबत एका बाजुला आपण हटवावे असा तर दुसऱ्या बाजुला प्रोत्साहन करतो ही बाब योग्य नाही. माझ्या वॉर्डाकडे जाधववाडी मसनतपूर येथे एन.ए ले आऊट न झालेले प्लॉट विक्री करुन अनधिकृत घरे सरास तयार होतील व पुढे नागरी समस्यांसाठी मनपाकडे नागरीक धाव घेतील त्यावेळेस महानगरपालिकेला पर्याय राहणार नाही. यासाठीच अगोदरच उपाययोजना आखावी व कार्यवाही करावी. याबाबतीत प्रशासनाचे मुळीच अंकुष नाही ही बाब गंभीर असून प्रशासनाला पुढील धोका टाळणेसाठी कठोर उपाय योजना कसे करणे आवश्यक आहे. ह्याचप्रमाणे सिडको हस्तांतर झाल्यानंतरच महानगरपालिकेने टॅक्स नोटीस सिडको नागरीकांना वाटण्यात याव्या असे असतांनाही जोपर्यंत हस्तांतर होत नाही तोपर्यंत सिडको नागरिक मालमत्ता कर भरणा करणार नाहीत.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** ज्या वॉर्डात अनधिकृत टपऱ्या आहेत व त्या हटविण्याची प्रक्रीया करावयाची आहे त्यावेळी संबंधीत वार्डातील नगरसेवकांना याबाबतची माहिती देवूनच कार्यवाही करावयाची असे मागील सर्वाधारण सभेत ठरलेले आहे. त्याप्रमाणे पुर्वसुचना देवूनच कार्यवाही करावी. माझ्या वार्डात तीन (३) प्रकारचे टपऱ्या अनधिकृतरित्या बसल्या असून मी मालमत्ता अधिकारी यांना गेले कित्येक दिवसापासून सुचना देवूनही कार्यवाही केली नाही. कारण त्या टपऱ्या बसविल्या आहेत त्या अनधिकृत टपरीमुळे बाजुवाल्याला जाण्या येण्यास जागा व मोकळी हवा मिळत नाही. त्यांनी पक्की शेडचे बांधकाम केले त्यांचेवर नियमाप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे. याबाबत मा. आयुक्त यांनी मी सांगितलेले आहे. अद्यापही कार्यवाही का झाली नाही?

**मा. महापौर :** याबाबत संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**श्रीमती अलका पाटील :** मध्यवर्ती बस स्थानकासमोर ज्या काळ्या पिवळ्या जीप प्रवासी वाहणासाठी उभ्या राहतात त्या जागेचे भाडे महानगरपालिकेने आकारावे.

**सौ. लता दलाल :** अनधिकृत टपऱ्यांची मोहिम अभिनंदनास पात्र परंतु झोन - २ अंतर्गत बऱ्याचशा भागातील अनधिकृत टपऱ्या हटविण्यात आल्या परंतु काही टपऱ्या कुणाच्या दबावामुळे हटविण्यात आल्या नाहीत हे सांगता येत नाहीत. उदा. कुंभारवाडा या भागातील संपुर्ण रस्त्यावर हात गाड्या व अनधिकृत टपऱ्या मुळे रस्त्यावरुन चालणे अवघड होते. तेथील टपऱ्या प्रशासनाने हटविल्या नाहीत. निराला बाजार येथील दुकानासमोरील अनधिकृत शेड काढण्यात आले परंतु काही प्रतिष्ठित लोकांचे काढलेले नाही. नेमक्या लोकांचेच काढले आहे. असा भेदभाव होवू नये. शहरात सन १९८५ पासून टपऱ्यांना परवानगी दिलेली नसतांनाही प्रत्येक ठिकाणी टपऱ्या थाटात सजलेल्या दिसतात. म्हणजे मागील दाराने प्रशासनातील अधिकारी परवानगी देते काय? शहरातील मोठमोठ्या लोकांचे अनधिकृत घरे आहेत त्याकडे प्रशासनाने डोळेझाक करु नये.

**डॉ. भागवत कराड :** बऱ्याचशा भागातील अनधिकृत टपऱ्यामुळे रहदारीस अडथळे निर्माण होतात यासाठीही मोहीम चालूच रहाणे आवश्यक आहे. परंतु टपऱ्या हटवित असतांना संबंधीत वार्डातील नगरसेवकांना पूर्वीच कल्पना द्यावी. म्हणजे त्यांचेकडूनही सहकार्य मिळेल.

**श्री. मोहसिन अहमद :** इतिवृत्तातील ऐनवेळचे प्रस्तावातील पृष्ठ क्र. २१ मध्ये अतिक्रमणबाबत चर्चा केलेली आहे. त्यात असे नमुद केलेले आहे की, माझ्या वार्डातील जियाउद्दीन ले आऊट मनपाच्या खुल्या जागेवरील अतिक्रमण एका व्यक्तीने करुन त्यांन त्यांचे स्वतर:चे नावावर पी.आर. कार्ड केलेले आहे व त्यामुळे वारंवार मी प्रशासनास सुचना देवूनही प्रशासनाने कार्यवाही केलेली नाही. उलट कोर्टात प्रकरण गेल्याने जवळपास २१.१०.०० लाखाच्या महानगरपालिकेची खुली जागा प्रायव्हेट व्यक्तीने बळकावल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. याकडे प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी.

**श्री. अफसरखॉंन :** अनधिकृत टपऱ्या जागोजागी बसत आहेत त्याचप्रमाणे शहरात अनधिकृत रित्या पल्लेदार बांधकाम करुन बसल्या जात आहेत त्या बाबत प्रशासनाने इमारत बांधकामावरती कार्यवाही करावी. नसता अशा अनधिकृत घराचे बांधकामाबाबत इमारत निरीक्षकांना जबाबदार धरावे.

**श्री. गौतम लांडगे :** माझ्या वार्डालगत जाधववाडी/मिसारवाडी या ठिकाणी फार मोठ्या प्रमाणात अनधिकृत घर बांधकाम होवून वस्त्या होत आहे याकडे प्रशासनाने वेळीच दखल घ्यावी.

**श्री. भगवान घडामोडे :**ज्या अनधिकृत टपऱ्या मोठमोठ्या व्यावसायिक धारकांच्या आहेत. त्या प्रशासनाने तातडीने हटवाव्यात त्याचप्रमाणे शहरात २०X३० चे प्लॉटिंग पाडून बांधकामे होत आहेत. त्यांचेवर अंकुष ठेवावे. जी अनधिकृत बांधकामे ले आऊट मधील असतील त्यांचेवर प्रशासनाने कार्यवाही करावी. याकामी महानगरपालिकेतील काही अधिकारी व स. नगरसेविकांचे नातेवाईक यांनी जे अशा अनधिकृत बांधकामाचे कामे करीत आहेत त्यांचेवरही प्रशासनाने कार्यवाही करावी.

**श्री. सुदाम सोनवणे :** शहरातील अतिक्रमण हटाव मोहिमेचे अभिनंदन. परंतु प्रशासनाने अतिक्रमण हटवित असताना कोणत्याही प्रकारचा भेदभाव करु नये. शहरात २०X३० चे अनधिकृत प्लॉटवर बांधकामे होत असतात त्याकडे

महानगरपालिकेतील इमारत निरीक्षक प्रत्यक्ष जावून कुणाच्याही नावावरती पैसे घेतात त्यांचेवर प्रशासनाने अकुष ठेवून कार्यवाही करावी. याबाबतचे उदा. द्यावयाचे झाल्यास एका मोरे नावाच्या व्यक्तीने महानगरपालिकेकडे अधिकृतरित्या बेटरमेंट चार्जेसचे पैसे भरावयाचे असतात ते भरण्यासाठी महानगरपालिकेकडे जात असतांना आपल्या संबंधीत इमारत निरीक्षकाने त्यांचेकडे जाऊन मी स्वत: बेटरमेंट चार्जेसचे पैसे भरतो म्हणून पैसे घेतले व पैसे मात्र भरलेले नाही. अशी परिस्थिती आहे. याकडे प्रशासनाने कर्मचाऱ्यांवर अंकुश ठेवणे आवश्यक आहे. यासाठीच नगररचना विभागाचे दोन भाग करुन एका भागाचे मनपाचे सहाय्यक संचालक पद निर्मिती करुन पद भरावे.

**श्री. प्रकाश निकाळजे :** कार्यालयात मा.आयुक्त नसल्यास संबंधीत विभागाचे कोणतेही अधिकारी ३.०० नंतरही साईटवर गेल्याचे सांगितले जाते यावरुन प्रशासनाचे अंकुश नसून प्रशासन खिळखिळे झालेले आहे असे वाटते. बरेचशे अधिकारी यांना काम संदर्भात विचारणा केली असता अरेरावीची भाषा वापरतात याकडे प्रशासनाने दखल घ्यावी. अतिक्रमण हटवित असताना पूर्व कल्पना द्यावयास पाहिजे. कुणाही गरीब व्यक्तीच्या पोटावर पाय देवू नये. महानगरपालिकेच्या बऱ्याचशा खुल्या आरक्षीत जागांवर अतिक्रमण झालेले आहेत व काहींनी तर पी.आर. कार्डही तयार केलेले आहेत. याकडे प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी. याशिवाय २०X३० चे अनधिकृत प्लॉटधारकही पक्के घर बांधून राहण्याचा प्रयत्न करता त्यांना महानगरपालिकेतर्फे रितसर परवानगी द्यावी.

**श्री. गौतम खरात :** बऱ्याचशा डीपी सेलमध्ये गेल्या कित्येक दिवसापासून जवळपास १२०० ते १४०० अनधिकृत टपऱ्या बसलेल्या आहेत. टपरी समिती या संदर्भात नेमलेली होती. टपरी समितीने सर्व्हे करुन अहवाल दाखल केलेला आहे. टपरी समितीच्या अहवाला प्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करावी नसता पूर्वीच प्रशासनाने आळा घातला असता तर आज अनधिकृत टपऱ्यांची ही परिस्थिती वाढली नसती याची जाणीव प्रशासनाने ठेवावी. अशाच प्रकारे शहरातील बऱ्याच भागात झोपडपट्टी संबोधून अनधिकृत घरे मात्र पक्क्या स्वरुपात बांधल्या जात आहेत. असे सर्वच अनधिकृत घरे झाल्यास शहरातील अशा वसाहतींना नागरी सुविधा देणे बाबत प्रशासनावर वारंवार दबाव येत राहील यासाठी आताच प्रशासनाने तातडीने करणे आवश्यक आहे व प्रशासनाचा अंकुष अधिकारी/कर्मचाऱ्यांवर या कामी असणे आवश्यक आहे बऱ्याच वेळा स. नगरसेवक कामे घेवून काही संबंधीत अधिकाऱ्यांकडे जातात त्यावेळी त्या विभागाचे अधिकारी बजेटमध्ये तरतुद नाही. बजेट संपले आहे. असे सांगतात. मात्र प्रशासन दुसरीकडे इतर काही प्रस्तावावर जाणीवपुर्वक मंजुरी देऊन कामे करवून घेते ही बाब स. नगरसेवकांना खटकणारी वाटते.

**मा. महापौर :** जवळपास दिड तासापासून सततची चर्चा सभागृहात चालू आहे. स. सदस्यांनी विविध वार्डातील आपआपल्या तक्रारीवर नाराजीचा सुर सभागृहात उमटविला. बरेचसे अधिकारी जागेवर नसतात. काही अधिकारी कामाचे अंदाजपत्रकात तरतुद नाही तर तरतुद केलेली संपल्याचे सांगतात. बरेचसे अधिकारी/कर्मचारी साईटवर जातात तेव्हा कार्यालयात हलचल रजिस्टरवरती नोंद दिसत नाही. याकडे प्रशासनाने बारकाईने लक्ष ठेवावे.

२) स. सदस्य श्री. किशोर तुळशीबागवाले यांनी सुचित केल्याप्रमाणे त्यांच्या वार्डातील ह्या तीन टपऱ्या अनधिकृत रित्या बसल्या आहेत त्याबाबत मालमत्ता अधिकारी प्रशासकीय अधिकारी व उप आयुक्त-१ यांनी सविस्तर माहिती द्यावी.

**मालमत्ता अधिकारी :** स. सदस्य श्री. किशोर तुळशीबागवाले यांनी विचारलेल्या प्रश्नासंदर्भात एक टपरी झुणका भाकर केंद्र महाराष्ट्र शासन अधिकृत असून दुसरी श्री. शेख रफिक यांना पर्यायी जागा म्हणून मा. स्थायी समितीच्या परवानगीने दिलेली आहे.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** तेथील ज्या व्यकतीला पर्यायी जागा म्हणून ती जागा दिलेली आहे. ती स्थायी समितीकडे कोणत्या कारणास्तव प्रस्ताव ठेवला होता. त्यांना पर्यायी जागा देण्याची आवश्यकता होती काय? संबंधीताने अनधिकृत जागा बळकावून पक्के बांधकामचे शेड उभारले आहे व तेथील जाण्यायेण्याचा रस्ताही त्यामुळे बंद झालेला आहे. याकडे मालमत्ता अधिकाऱ्यांनी लक्ष देणे आवश्यक होते. जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन प्रशासनाने दिशाभुल केलेली आहे व स्थायी समितीची दिशाभुल केलेली आहे. याबाबत मा. आयुक्त यांनी कार्यवाही करावी व तेथील अनधिकृत बांधकाम पाडून कार्यवाही करावी.

**मा. महापौर :** संबंधीत ठिकाणी विना परवानगी टपरीचे बांधकाम झालेले असल्यास व आजुबाजुच्या लोकांना रस्ताही न ठेवल्यास तेथील रस्ता मोकळा करणे बाबत स. सदस्य मागणी करीत आहेत त्याप्रमाणे तेथील अनधिकृत बांधकाम तोडणे आवश्यक आहे.

**मालमत्ता अधिकारी :** स. सदस्य श्री. अशफाक सलामी यांनी सुचना केल्याप्रमाणे सन १९९३ मध्ये टपऱ्या गार्डनमध्ये ट्रान्सफर करुन दिलेल्या आहेत व टपरी समितीचा अहवाल आहे. परंतु त्यात असे नमुद केले नाही की, टपरीसाठीचा फार्म कशा प्रकारचा व कोणत्या कारणास्तव कसे द्यावे याचा उल्लेख यात नसल्याने प्रशासनाने अद्यापपर्यंत कार्यवाही केलेली नाही.

**श्री. स. अली मिरोसलामी :** शासनाच्या धोरणानुसार सन १९९६ च्या पूर्वीच्या ज्या टपऱ्या आहेत त्यांना रेगुलराइज्ड कार्यवाही केलेली नाही. प्रशासनाने कार्यवाही करावी. शहरात आतापर्यंत किती झुणका भाकर केंद्राचे बांधकाम किती अंतरापर्यंत परवानगी आहे व संबंधीतानी किती अंतारापर्यंत बांधकाम केले याची माहिती द्यावी झुणका भाकर केंद्राच्या बांधकाम किती साईजची आवश्यकता आहे याची माहिती द्यावी.

**मालमत्ता अधिकारी :** शहरात एकुण २५ झुणका भाकर केंद्रास महानगरपालिकेने परवानगी दिलेली आहे व त्याची साईज १५X८ ची आहे.

(यावेळी सभागृहात दोन्ही पक्षाचे वतीने एकच आवाज होतो काहीही ऐकु येत नाही.)

**मा. महापौर :** सभागृहात शांतता भंग होवू नये म्हणून सभा २० मिनिटे तहकुब करण्यात येते.

(वेळ अंदाजे १-४५ वाजता सभेलासुरुवात २-२५ वाजता.)

**विषय क्र. ११३/१ :** दिनांक ५/११/९७ आणि १०/११/९७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

<u>संवाद</u>

**श्री. मोहसीन अहमद :** पृष्ठ क्र. २१ मध्ये मो. कैसर कॉलनी येथील विविध समस्या व ३/४ मुद्दे मी चर्चेद्वारे मांडले होते. त्याबाबत संबंधीत अधिकारी यांनी पुढील बैठकीत माहिती द्यावी असे सभागृहात सुचविले त्याबाबत काय झाले?

**मा. महापौर :** ठिक आहे मी पुन्हा आदेशित करतो की, मागील इतिवृत्तील पृष्ठ क्र. २१ मधील स. सदस्य श्री. मोहसीन अहमद यांनी सुचविलेल्या चार मुद्द्याबाबत प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

**श्री. हमीद ताबा :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र. १९ मध्ये दि. १९/७/९७ च्या सर्वसाधारण सभेमध्ये तीस खाटांचा दवाखाना बांधणेच्या कामासाठी दोन कनिष्ठ लिपीकांना निलंबीत करण्यात आले होते व इतर तीन अधिकाऱ्यांची चौकशी अशा एकुण पाच कर्मचारी/अधिकारी ह्यांच्या चौकशीचा अहवाल एका महिन्यात देण्यात येईल असे सभागृहात सांगितले होते. त्याबाबतचा अहवाल उद्यापही का मांडला गेला नाही. प्रशासन तातडीने निर्णय घेणार नाही काय? दोषी अधिकाऱ्यावर कार्यवाही करणार नाही काय?

**उप आयुक्त :** माहे डिसेंबर ११ अखेरपर्यंत तीस खाटांचा दवाखाना बांधकाम प्रकरणी पाच कर्मचारी/अधिकारी यांची चौकशी अहवाल देणार असे मी म्हटलेले आहे. तेव्हा पुढील सर्वसाधारण सभेसमोर चौकशी अहवाल सादर करण्यात येईल.

**श्री. हमीद उद्दीन ताबा :** मागील सर्वसाधारण सभेमध्ये एका महिन्यात अहवाल सादर करण्यात येईल असे सांगितले होते. तेव्हा किती कालावधी अजून लागणार याची माहिती द्यावी.

**मा. महापौर :** पुढील सर्वसाधारण सभेत उप आयुक्त - १ यांनी पाच कर्मचारी/अधिकारी यांचा चौकशी अहवाल सादर करावा.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ८ व विषय क्र. १०६/३ हा विषय मंजुर कसा झाला याची माहिती द्यावी.

**मा. महापौर :** सदरील विषय स्लम भागाचा असून नाला ट्रेनिगच्या कामामुळे प्रस्तावास मंजुरी देण्यात आली आहे.

**श्री. हमीद ताबा :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ६ मधील ठरावातील मुद्दा क्र. ४ मधील ठरावात एकुण किती रकमेसह मंजुरी प्रस्तावात द्यावी असा उल्लेख आलेला नाही तेव्हा मागील इतिवृत्तातील ठराव क्र. ९६/८ दि. ५/११/९७ च्या ठरावात एकुण भूसंपादनाचा शासकीय खर्च रु. ५,७३,१२६/- ह्या सर्व खर्चास प्रस्तावात नमुद करुन भूसंपादनाची कार्यवाही त्वरीत करावी अशी दुरुस्ती व्हावी.

**मा. महापौर :** ठिक आहे. स. सदस्यांनी सुचित केल्यानुसार इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ६ च्या मुद्दा ४ मध्ये प्रस्तावातील भुसंपादनाच्या प्रक्रीयेस लागणारा एकुण खर्च रजिस्ट्रीसहीत रक्कम रु. ६,२६,१२६/- च्या खर्चास प्रस्तावात नमुद करुन दुरुस्ती ठरावात मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्र. ११३/१ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर विकास योजनेनुसार १५ मीटर (५० फुट) रुंद रस्ता सिटी चौक ते हेड पास्ट ऑफीस जुनाबाजार चौकापर्यंत आहे.

ह्या रस्त्यात एकुण ९७ मिळकती बाधीत होतात. त्यांचे अंदाजे क्षेत्रफळ ३००० चौ. मी. आहे. पैकी १४ मिळकती म.न. पालिकेने ताब्यात घेतल्या आहेत. त्याचे बाबतीत क्षेत्र ५७८.८७ चौरस मिटर आहे. उर्वरित ८३ मिळकती ताब्यात घ्यावयाच्या आहेत त्याचे क्षेत्र २४२१.१३ चौरस मीटर आहे. ह्या रस्त्यातील बाधीत मिळकती ३३१५ व ३४४१ याचे मिळकत धारकांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना दिली आहे. सदर नियमान्वये भुसंपादनाची कार्यवाही सहा महिन्याचे आत सुरु करणे म.न. पालिकेस बंधनकारक आहे. नसता आरक्षण जमीन विकास योजनेतील सदर प्रस्तावातून वगळली जाते. आणि लगतच्या वापरानुसार विकास परवानगी मिळकत धारकास देणे भाग पडते. सदरील रस्ता महत्त्वाचा असून पुर्ण विकसीत करणे महत्वाचा आहे. करीता अर्जदाराच्या दोन्ही मिळकतीचे क्षेत्र ६०.७५ इतके आहे. अर्जदाराचे हे क्षेत्र संपादन करुन म.न. पालिकेचा उद्देश सफल होणार नसल्याने रस्ता पुर्ण करणे साठी सर्व मिळकतीचे संपादन विहीत मुदतीत सुरु करणेसाठी भुसंपादन करणेसाठी सी.एस. क्रमांक ३३१५ व ३४४१ चे अर्जदारांना शासकीय दराने २१,५,७३१२६/-व रजिष्ट्रीचा खर्च रु. ५३०००/- असे एकुण रु. ६,२६,१२६/- (अक्षरी रु. सहा लाख सव्वीस हजार एकशे सव्वीस फक्त) मोबदला म्हणून महानगरपालिकेने अदा करणेस व भूसंपादनाची कार्यवाही त्वरीत करणेस ह्या दुरुस्तीसह सर्वानुमते मजुरी देण्यात येते.

**श्री. महादेव सुर्यवशी :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ६ मधील ठरावातील मुद्दा क्र. १,२ व ३ बाबत संबंधित विभागांनी काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी.

**मा. सचिव :** पृष्ठ क्र. ६ मधील ठरावातील मुद्दा क्र. २ बाबत नगर रचनाव आरोग्य विभाग यांनी दिलेला अभिप्राय वाचून दाखविला.

**मा. महापौर :** मुळ विषय ९८/२ दि. ४/१०/९७ चा विषय असा आहे. प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेतील जे कर्मचारी अधिकारी सेवानिवृत्त होत राहतील अशा कर्मचारी अधिकारी यांना स्वत:चे नावावर घर बांधणे आहे. अशा अधिकारी कर्मचाऱ्यांकडून मनपाने परवानगी देतांना डिपॉझीट (अनामत) रक्कम ठेवण्याची माफी द्यावी व त्याचबरोबर त्यांना आरोग्य लाभणेसाठी महानगरालिकेच्या दवाखान्यामधून विना फिस आरोग्य सेवा त्यांचे पत्नीसह व त्यांचेवर अवलंबून असलेल्या मुलाबाळांना देण्यात यावी.

या विषयाबाबत सहा. संचालक नगररचना व आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचा अभिप्राय मागविला असता त्यांनी तो सभागृहात सादर केला आहे. त्यांचे अभिप्राय नुसार हा धोरणात्मक निर्णय घेण्याचे मा. सभागृहापुढे सादर केला आहे.

**श्री. संजय जोशी**

**श्री. गौतम लांडगे :** सेवा निवृत्तीनंतर कर्मचारी/अधिकारी यांना इतर कार्यालये उदा. एम.एस.ई.बी., एस.टी. महामंडळे वगैरे ठिकाणी ज्या सवलती मिळतात त्याप्रमाणे मनपातील कर्मचारी/अधिकारी यांना बांधकाम परवाना वेळेस डिपॉझीट फिस व आरोग्य सेवेबाबत सवलती देणेसाठी नियमाप्रमाणे कायवाही व्हावी. बांधकामची अनामत रक्कम मनपाचे काम पूर्ण झाल्यानंतर तपासणी अंती परत करणे. त्यामुळे निवृत्त कर्मचाऱ्याची अधिकाऱ्याची अनामत रक्कम न ठेवल्याबद्दल माफी देण्यास हरकत नसावी.

**श्री. प्रभाकर विधाते :** स. सदस्यांनी केलेल्या मताशी सहमत आहे.

**श्री. विजयकुमार मेहेर :** बांधकामाची अनामत रक्कम नियमाप्रमाणे ठेवावी लागते.

**मा. महापौर :** मा. सभागृहाचा कौल लक्षात घेता हा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेतील जे कर्मचारी/अधिकारी सेवा निवृत्त होत राहतील अशा कर्मचाऱ्यांची नावे बांधकाम परवानगी द्यावयाची असल्यास त्यांचेकडून अनामत रक्कम माफी देण्यात येते. तसेच निवृत्त कर्मचाऱ्यास व त्यांचेवर अवलंबून असलेल्या मुलाबाळास महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रातून मोफत औषधी पुरविण्याची सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ९, १०, ११, १२ व १३ व १४ विषय क्र. १०९/६ बाबतीत सभागृहात प्रशासकीय टप्पा -३ बाबत सखोल चर्चा झाली याबाबत संबंधीत विभागाने माहिती दिलेली नाही.

**मा. महापौर** : मॉडेल तयार करुन पाहणीसाठी ठेवलेले आहे.

**अति. शहर अभियंता :** मॉडेल तयार करुन सर्वसाधारण सभेमध्ये पाहणीसाठी ठेवलेले आहे.

**श्री. गौतम लांडगे :** या विषयाच्या ठरावात काय नमुद केले आहे त्याचे पूर्णपणे वाचन करावे, त्यात नमुद केले आहे की, प्रशासकीय इमारतीचा टप्पा-३ ह्या बांधकामाबाबत इमारतीचा नकाशा, डिझाईन बांधकामासाठी कितीही कालावधी लागल्यास एकाच एजन्सीकडून ठरलेल्या अंदाजपत्रकात व तेवढ्याच रक्कमेत काम करावे आणि वास्तु विशारदाला दिड टक्का फिस देण्याची आवश्यकतानाही ही सर्व माहिती सभागृहात सादर केलेली आहे काय?

**मा. महापौर :** ठिक आहे. सर्व माहिती संबंधीत विभागाने दि. ११/१२/९७ च्या विशेष सर्वसाधारण सभेत ठेवावे त्यावेळी सभागृहात निर्णय घेण्यात येईल.

**कु. माया लाडवाणी :** इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ६ मधील ठरावातील मुद्दा क्र. ३ विषय क्र. ९७/१ बाबत संबंधीत शिक्षण विभागाने माहिती सादर केलेली नाही काय? जर प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जिल्हा परिषदेतील तीन शाळा मनपाकडे हस्तांतरीत करावयाच्या झाल्यास त्या तीनही शाळांतील एकुण कर्मचारी वर्ग किती आहेत. त्यांच्यावर पुर्ण वर्षभराचा खर्च किती आहे त्यांच्या शाळेतील काही अडचणी आहेत काय? शासनाकडें काही ह्या तीनही शाळांमधील प्रश्न प्रलंबीत आहेत काय? स. सर्व माहिती स्पष्टपणे प्रशासनाने नमुद करावे तरच विचार व्हावा.

**मा. महापौर :** दि. ११/१२/९७ च्या विशेष सर्वसाधारण सभेत याबाबत धोरणत्मक निर्णय घेण्यात येईल. तेव्हा विषय क्र. १ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

१) प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि. ११/१२/९७ रोजी शिक्षण व विद्युत विभागासंदर्भात एक विशेष सर्वसाधारण सभा घेण्यात येईल असे सर्वानुमते ठरले.
२) मागील इतिवृत्तातील पृष्ठ क्र. २१ मध्ये स. सदस्य श्री. मोहसीन अहेमद यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत संबंधीत विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी.
३) तीस खाटांचा दवाखाना बांधकाम प्रकरणी दोन लिपीक व तीन अधिकारी यांची चौकशी करुन सर्वसाधारण सभेत ठेवावा.
४) मागील इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ६ मधील ठरावाच्या व मुद्दयात खर्चाचा तपशील दाखविलेला नाही त्याची दुरुस्ती व्हावी.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर विकास योजनेनुसार १५ मीटर (५० फुट) रुंद रस्ता सिटी चौक ते हेड पोस्ट ऑफीस जुनाबाजार चौकापर्यंत आहे. ह्या रस्त्यात एकुण ९७ मिळकती बाधीत होतात. त्याचे अंदाजे क्षेत्रफळ ३००० चौरस मीटर आहे पैकी १४ मिळकती मनपाने ताब्यात घेतल्या आहेत. त्याचे बाधीत क्षेत्र ५७८.८७ चौरस मिटर आहे. उर्वरित ८३ मिळकती ताब्यात घ्यावयाच्या आहेत. त्याचे क्षेत्र २४२१.१३ चौरस मिटर आहे. ह्या रस्त्यातील बाधीत मिळकती ३३१५ व ३४४१ याचे मिळकत धारकांना महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना दिली आहे. सदर नियमान्वये भुसंपादनाची कार्यवाही सहा महिन्याचे आत सुरु करणे मनपालिकेस बंधनकारक आहे. नसता आरक्षण जमीन विकास योजनेतील सदर प्रस्तावातून वगळली जाते. आणि लगतच्या वापरानुसार विकास परवानगी मिळकत धारकास देणे भाग पडते. सदरील रस्ता महत्त्वाचा असून पुर्ण विकसीत करणे महत्वाचा आहे. करीता अर्जदाराच्या दोन्ही मिळकतीचे क्षेत्र ६०.७५ इतके आहे. अर्जदाराचे हे क्षेत्र संपादन करुन मनपालिकेचा उद्देश सफल होणार नसल्याने रस्ता पुर्ण करणेसाठी सर्व मिळकतीचे संपादन विहित मुदतीत सुरु करणे साठी भुसंपादन करणेसाठी सिटीएस क्र. ३३१५ व ३४४१ चे अर्जदाराना शासकीय दराने रु. ५७३१२६/- व रजिस्ट्रीचा खर्च रु. ५३०००/- असे एकुण रु. ६२६१२६/- (अक्षरी रु सहा लाख सव्वीस हजार एकशे सव्वीस फक्त) मोबदला म्हणून महानगरपालिकेने अदा करणेस व भुसंपादनाची कार्यवाही त्वरित करणेस या दुरुस्तीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

५) इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ६ मधील विषय क्र. १०४/१ ठरावातील मुद्दे १, २, ३ बाबत प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही व्हावी.
६) इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ९, १० , ११, १२, १३ व १४ विषय क्र. १०९/६ बाबतचा निर्णय दि. ११/१२/९७ च्या विशेष सर्वसाधारण सभेत सविस्तर माहितीसह निर्णय घेण्यात येईल.

या व इतर दुरुस्तीसह दि. ५/११/९७ व दि. १०/११/९७ च्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त दुरुस्त्यासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११४/२ :** शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की पदमपुरा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यावर छत बसविणे करिता स. सदस्या सौ. निर्मला कांबळे यांच्या विनंतीनुसार सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. १३४१५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरचे काम हे स्वेच्छा निधीतुन करावयाचे आहे.

परंतु स्वेच्छा निधी हा खाजगी निधी असल्यामुळे खाजगी पुतळ्यास महानगरपालिकेतर्फे खर्च करता येणार नाही. मा. आयुक्त महोदय यांचे दि. ६/१०/९७ च्या आदेशानुसार या संदर्भाने धोरणात्मक निर्णय घेण्यात मा. सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद**

**श्री. गजानन बारवाल :** सदरील प्रस्ताव सर्वसधारण सभेपुढे का आला याची माहिती द्यावी.

**श्री. हमीद ताबा :** ह्या प्रस्तावात जसा उल्लेख आहे त्याप्रमाणेच शहरातील सर्व पुतळ्यांचे बाबतीत विचार करावा लागेल ह्याची माहिती प्रशासनाने द्यावी.

**मा. आयुक्त :** कोणताही प्रशासकीय प्रस्तावास रु. १०.०० लाखापर्यंतचे मंजुरीचे अधिकार स्थायी समिती सभेला आहेत व त्यावरील खर्चास मा. सर्वसाधारण सभेला आहेत सदरील प्रस्ताव सभागृहासमोर मांडण्याचा प्रशासनाचा काही तरी उद्देश असेल हे लक्षात घ्यावे. ह्या शहरात एकुण ५२ स्लम झोपडपट्ट्या आहेत. प्रत्येक ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे पुतळे उभारलेले आहेत. त्या प्रमाणे इतरही पुतळा छत्रपती शिवाजी महाराज यांचाही बऱ्याच भागात बसविलेले आहेत. ह्या सर्व पुतळ्यांची निगा व त्यावरील खर्च करण्याची मनपाने कार्यवाही केल्यास भविष्यात मनपावर फार मोठ्या प्रमाणात जबाबदारी येईल तेव्हा कोणत्याही चांगल्या कामाच्या बाबतीत स. स्वेच्छा निधीचा उपयोग खर्च करण्यासाठी मा. सभागृहाने धोरणात्मक निर्णय द्यावा. म्हणून प्रस्ताव सादर झालेला आहे. याबाबत निर्णय घ्यावा.

**श्री. महादेव सुर्यवंशी** : सन १९८२ ला मनपा अस्तित्वात आली या ठिकाणी ५२ झोपडपट्ट्या आहेत. व १८ खेड्याचा यात समावेश करण्यात आला आहे. बऱ्याच भागात मनपाने लाखो रु. चे वॉल कंपाऊंड केलेले आहेत तेव्हा ह्या छोट्याशा खर्चाचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर न मांडता प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावयास पाहिजे होती व यापुढे मनपाने जबाबदारी घ्यावी.

**श्री. गजानन बारवाल :** गेल्या एक वर्षापासून स. स. श्रीमती कांबळे या पत्रव्यवहार करुन सार्वजनिक ठिकाणच्या डॉ. आंबेडकर पुतळ्याच्या ठिकाणी छत बसविणे बाबत मनपाने कार्यवाही करावी व प्रस्ताव मंजुर करावा.

**मा. आयुक्त :** महानगरपालिकेने ज्या काही भागात स्वतः पुतळे उभारले असतील तर त्याबाबतचा खर्चाची जबाबदारी महानगरपालिका होईल परंतु खाजगी रित्या असलेल्या कोणत्याही पुतळ्याची खर्चाची जबाबदारी महानगरपालिका घेणार नाही याबाबत स. सदस्याच्या स्वेच्छा निधी देणगी म्हणून घ्यावी.

**श्री. हमीदउद्दीन ताबा :** अशा प्रकारच्या प्रस्तावास मंजुरी दिल्यास उद्या दरगाह वगैरेया ठिकाणाच्या संरक्षणासाठी मंजुरी द्यावी लागेल.

**श्री. डॉ. भागवत कराड :** वार्डातील जे काही शुल्लक कामे आहेत ते स. सदस्यांच्या स्वेच्छा निधीतुन करणे योग्य.

**श्री. गौतम खरात :** ह्या प्रस्तावाबाबत सभागृहात चर्चा व्हावी. हा प्रस्ताव सभागृहासमोर प्रशासनाने का मांडला याचे कारण काय? या बाबत सविस्तर चर्चा होणे आवश्यक आहे.

**मा. महापौर :** सदरचा प्रस्ताव विशेष बाब मंजुर करण्यात येते.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. पदमपुरा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यावर छत बसविणे करिता सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. १३४६५/- च्या खर्चास स. सदस्य सौ. निर्मला कांबळे यांच्या स्वेच्छा निधीतून रक्कम रु. १३४६५/- च्या खर्चास स. सदस्या सौ. निर्मला विठ्ठल कांबळे यांच्या स्वेच्छा निधीतुन "विशेष बाब" खर्च करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ११५/३ :** : मो. खोकडपुरा हनुमान मंदीरासमोरील मंजुर विकास योजनेव्यतिरिक्त रस्ता रुंदी करणासाठी भुसंपादन व रस्ता पैठणगेट वाहतुक बेटापासून खोकडपुरा मार्गे पी.एस. पाटील दवाखाना पर्यंतचा मंजुर विकास योजनेव्यतिरिक्त रस्ता असून त्या रस्त्याची

रुंदी १०० मीटर आहे. परंतु खोकडपुरा हनुमान मंदीरासमोर व रस्ता ७ मीटर रुंद आहे. मिळकत क्रमांक न.भु. क्रमांक १३८४३ व १३८४४ ह्या दोन मिळकतीमुळे ह्या ठिकाणी रस्त्याची रुंदी कमी झालेली आहे. ह्या मिळकतीचे मागे व पुढे रस्त्याची रुंदी १० मिटर आहे.

तरी ह्या दोन मिळकती नगर भुमापन क्र. १३८४३ व १३८४४ संपादित केल्यास हा रस्ता पुर्ण १० मिटर रुंद होवून वाहतुकीस मोकळा होईल करिता भुसंपादन प्रस्ताव भुसंपादनासाठी लागणाऱ्या खर्चासह मंजुरीस्तव सादर.

<u>**संवाद**</u>

**मा. महापौर :** मंजुर

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. खोकडपुरा हनुमान मंदिरासमोरील मंजुर विकास योजनेव्यतिरिक्त रस्ता रुंदीकरणासाठी भुसंपादन हा रस्ता पैठणगेट वाहतुक बेटापासून खोकडपुरा मार्गे पी.एस. पाटील दवाखा ाना पर्यंतच मंजुर विकास योजने व्यतिरिक्त रस्ता असून ह्या रस्त्यांची रुंदी जवळपास १० मिटर आहे. परंतु खोकडपुरा हनुमान मंदिरासमोर हा रस्ता ७ मीटर रुंद आहे. मिळकत नगर भुमापन क्र. १३८४३ व १३८४४ ह्या मिळकतीची रुंदी कमी झालेली आहे. ह्या मिळकतीच्या मागे व पुढे रस्त्याची रुंदी १० मिटर आहे. ह्या दोन मिळकती नगर भुमापन क्र. १३८४३ व १३८४४ संपादित करुन लागणाऱ्या शासकीय दराने ठरलेल्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११६/४ :** उद्यान अधिक्षक यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरातील वृक्ष लागवड व संवर्धनाच्या नियोजनाकरीता वृक्ष प्राधिकरण समितीने महाराष्ट्र (नागरी) वृक्ष संवर्धन व जतन अधिनियम १९७५ (सुधारित १९९६) नुसार दोन वर्षाकरिता समिती गठीत करणे आवश्यक आहे.

त्याकरिता सन्माननिय सदस्यातून कमीतकमी ५ व जास्तीत जास्त १५ वर्षापर्यंत सदस्यांची मा. सभागृहाने नियुक्ती करावयाची आहे. तसेच या क्षेत्रातील संबंधीतातून तीन व्यक्तींना नाम निर्देशन सदस्य म्हणून घेता येईल करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**मा. महापौर :** ह्या प्रस्तावाबाबत मा. सभागृह नेता विपक्ष नेता व स. सदस्य श्री. संजय जोशी यांनी मिळुन स. सदस्यांची नावे द्यावीत प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील वृक्ष लागवड संवर्धनाच्या नियोजनाकरिता वृक्ष प्राधिकरण समितीचे महाराष्ट्र (नागरी) वृक्ष संवर्धन व जतन अधिनियम १९७५ (सुधारित १९९६) नुसार खालीलप्रमाणे समिती दोन वर्षाकरिता गठित करण्यात येते.

१) श्री. अब्दुल रशिद खान (मामु) मा. महापौर
२) श्री. मोहसीन अहमद
३) सौ. साजेदा बेगम
४) श्री. प्रकाश निकाळजे
५) श्री. किशोर तुळशीबागवाले
६) श्री. अजिज खान
७) सौ. शकुंतला धांडे

८) कु. माया लाडवाणी
९) श्री. नरसिंग ढगे
१०) सौ. मंदा काळुसे
११) श्री. रविन्द्र इंगळे
१२) श्री. राजकुमार बचाटे
१३) श्री. महादेव सुर्यवंशी

यांचा समावेश राहील. यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११७/५ :** महानगरपालिकेचे कर्मचारी सेवा भरती नियम ९ जुन १९९४ रोजी राजपत्रात प्रसिध्द झालेले आहेत व त्यात शासनाने मंजुरी दिलेली आहे. या सेवाभरती नियमाअंतर्गत कलम ५ अ व ब नुसार कर्मचाऱ्यांस समयश्रेणी व निवडश्रेणी देणे बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या शिफारशीनुसार दिनांक ३०/१०/१९९९ च्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्रमांक १३५/६ सादर करण्यात आला होता. सर्वसाधारण सभेमध्ये या विषयावर चर्चा होवून प्रस्तावा संदर्भात व मा. आयुक्त यांनी तपासणी करुन व त्यानंतर या विषयाबाबत विशेष सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्ताव ठेवावा असा ठराव पारित झालेला आहे.

तदनंतर पालिका कर्मचारी महासंघाचे प्रतिनिधी व मा. महापौर तथा अन्य पदाधिकारी व मा. आयुक्त व अन्य अधिकारी ह्यांचे समवेत दि. १३/११/९७ रोजी विविध मागण्यांच्या संदर्भाने चर्चा झाली त्यात वरील मागणीवर चर्चा सर्व साधारण सभेत प्रस्ताव ठेवावा. ह्या संदर्भाने चर्चेमध्ये वर्ग ३ व ४ च्या सर्व कर्मचाऱ्यांना सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार समय श्रेणी जुन १९९४ पासून सरसकट लागू करण्यात येईल असे ठरले. निवड श्रेणीची अंमलबजावणी बाबत १५ वर्षाऐवजी १२ वर्ष अशी दुरुस्ती करुन प्रशासनाने कार्यवाही करावी व शासनाकडे पाठविण्याची आवश्यकता आहे किंवा नाही हे तपासावे असे ठरले.

त्यानुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेचे कर्मचारी सेवा भरती नियम ९ जून १९९४ रोजी राजपत्रात प्रसिध्द झालेले आहेत व त्यास शासनाने मंजुरी दिलेली आहे. या सेवाभरती नियमाअंतर्गत कलम ५ अ व ब नुसार ज्या कर्मचाऱ्यास सतत ७(सात) वर्ष एकाच पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना समयश्रेणी देण्यास मान्यता दिलेली आहे. त्यासाठी वेतन श्रेणीचे परिशिष्ठ व नियम तयार करुन स्थायी समितीच्या शिफारशीनुसार सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यात येत आहे.
त्याच्या अटी व शर्ती शासन निर्णय व स्थायी समिती ठरावानुसार खालीलप्रमाणे राहतील.

१) शासन निर्णय क्रमांक एस. आर. व्ही १०९५/ प्र.क्र. १/९५/बारा दि. ८ जुन १९९७.
२) शासन निर्णय क्र. ए.एम.सी. १८९३/१२/९ प्र.क्र.९७नावे-२४ दि. १६ मे १९९४
३) स्थायी समिती ठराव क्र. ११५/३१ दि. ११/०९/१९९५
४) स्थायी समिती ठराव क्र. १२१/१ आयटम क्र. ४ दि. ३०/७/९६ याची तपशीलवार योजना खालीलप्रमाणे आहे.

गट "क" व "ड" पुर्वीचे वर्ग -३ व ४ मधील पद धारकांना ७ वर्षाच्या नियमीत सेवेनंतर त्यांच्या पदोन्नती साखळीतील वरच्या पदावरील वेतनश्रेणी देण्यात येईल. ज्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीसाखळीतील पदावर पदोन्नतीसाठी पद अस्तित्वात नाही अशा कर्मचाऱ्यांना ह्या निर्णयासोबतच्या परिशिष्ठामध्ये दर्शविण्यात आल्यानुसार वरिष्ठ श्रेणी

देण्यात येईल. या योजनेची इतर प्रमुख वैशिष्टे व अंमलबजावणीची कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.

अ) ही योजना ९ जून १९९४ पासून अंमलात येईल.

ब) ह्या योजने अंतर्गत वरिष्ठ श्रेणी मिळण्यासाठी व पदोन्नतीसाठी विहित कार्यपध्दती जेष्ठता, पात्रता अर्हता, विभागीय परिक्षा ह्या बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

क) सरळ सेवेने प्रविष्ट झालेल्या अथवा पदोन्नतीने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत एकवेळ ह्या योजने अंतर्गत ७ वर्षानंतरच्या नियमीत सेवेनंतर वरिष्ठ वेतनश्रेणी अनुज्ञेय असेल.

ड) ज्या कर्मचाऱ्यांना ह्यापूर्वी दोन पेक्षा जास्त पदोन्नती मिळाल्या आहेत अशा कर्मचाऱ्यांना ह्या योजने अंतर्गत गट "क" मधील वेतनश्रेणी म्हणजे रु. ९५०-१४०० दिली तरी त्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० हेच असेल मात्र गट "क" मधील अन्य वरिष्ठ पदांवर त्यांना पदोन्नती मिळाल्यास त्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ राहील गट "क" मधील पद धारकांना गट "ब" मधील राजपत्रीत पदावर पदोन्नती ह्या योजने अंतर्गत विचार केला जाणार नाही.

म) ह्या पदोन्नतीमुळे जबाबदारी आणि कर्तव्ये यात वाढ होत नसली तरी नियमीत पदोन्नती प्रमाणे वेतन निश्चतीत लाभ देण्यात येईल मात्र वेतन निश्चितीत मिळालेला लाभ त्याच वेतनश्रेणीत कार्यात्मक (पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा देय होणार नाही.)

न) जर कर्मचाऱ्यांस विशेष वेतन मिळत असेल तर या योजनेखालील पदोन्नतीनंतर कर्मचाऱ्यास मुळ वेतन श्रेणीतील विशेष वेतन अनुज्ञेय राहणार नाही.

प) या योजनेअंतर्गत पदोन्नती मिळाली तरी कर्मचाऱ्याचे नाव कनिष्ठ (मुळ) संवर्गाच्या जेष्ठता सुचीत राहील आणि सेवा प्रवेश नियमातील तरतुदीनुसार उपलब्ध रिक्ततेत योग्य वेळी नियमीत (पदोन्नतीसाठी ह्याचा विचार करण्यात येईल.) नियमीत पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यास ह्या योजनेचा लाभ मिळणार नाही. त्याचप्रमाणे नियमीत पदोन्नती नाकारलेल्या कर्मचाऱ्यास देखील ह्या पदोन्नती नाकारलेल्या कर्मचाऱ्यास देखील ह्या पदोन्नतीचा लाभ मिळू शकणार नाही. या आधीच त्यांना पदोन्नती दिली असल्यास मुळच्या पदावर पदावनत करण्यात येईल. तशा आशयाचे बंधपत्र कर्मचाऱ्यांना लिहून द्यावे लागेल. मात्र देण्यात आलेल्या आर्थिक लाभाची वसुली केली जाणार नाही.

१) समय श्रेणीचा फायदा कर्मचाऱ्यांना दिनांक ९ जून १९९४ पासन शासन राजपत्रात प्रसिध्द झालेल्या तारखेपासून मिळेल.

२) महानगरपालिकेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना चटोपाध्याय आयोगानुसार समसयश्रेणी लागू केली असल्यामुळे त्यांना ही वेतनश्रेणी देतायेणार नाही.

३) कनिष्ठ अभियंता यांना शासन नियमाप्रमाणे ५ वर्षानंतर सुधारित वेतनश्रेणी देण्यात येते. त्यामुळे त्यांना ही समयश्रेणीचा फायदा देता येणार नाही.

४) महानगरपालिकेतील शासन अनुदानीत पदासाठी त्यांचे संचालकामार्फत मान्यता मिळाल्याशिवाय समयश्रेणीचा फायदा घेता येणार नाही.

५) समयश्रेणीचा फायदा वर्ग ३ व ४ चे कर्मचाऱ्यांनाच शासन नियमाप्रमाणे देता येतो, त्यामुळे वर्ग १ व २ चे अधिकाऱ्यांना समय श्रेणीचा फायदा मिळणार नाही.

६) समयश्रेणी दि. ९ जून १९९४ पासून देण्यात येईल त्याची सेवा सलग ७ वर्ष पूर्ण झाली आहे. त्याच फायदा मिळेल तसेच त्यापुर्वीचा जास्तीचा सेवेचा कालावधी

विचारात घेतला जाणार नाही. दि. ९ जून ९४ रोजी ७ वर्षे सलग सेवागृहीत धरुनच समयश्रेणीचा लाभ दिल्या जाईल.

७) शासनाने ज्या अटी समयश्रेणी लागू करताना दिलेल्या आहेत त्याच अटी महानगरपालिकेने ही लागू कराव्यात फक्त १२ वर्षाऐवजी कालावधी ७ वर्षाचा असेल.

८) वर्ग ३ व ४ कर्मचाऱ्यांना समयश्रेणी मंजुर केल्यास महानगरपालिकेस प्रत्येक महिन्यास अंदाजे ३ लक्ष रुपये आर्थिक भार पडेल.

९) कनिष्ठ लिपीक संवर्गातील कर्मचाऱ्यांना शासननिर्णय क्र. एएमसी/१२९१/९३८/सीआर-३१/९२नवि-२५ दि. १७ जून १९९३ अन्वये वरिष्ठ लिपीक कर्मचाऱ्यांना देण्यात येणारी वेतनश्रेणी रुपये १४००-४०-१८०० दक्षतारोध ५०-२३०० ही देण्यात यावी.

करिता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**शासन निर्णय क्रमांक : एस आर व्ही १०९५/प्र.क्र. १/९५/बारा**
**दिनांक ८ जून १९९५ सोबतचे परिशिष्ट**

| | **विद्यमान वेतन श्रेणी** | **पदोन्नतीची वेतनश्रेणी** |
|---|---|---|
| १. | ७५०-१२८७०-द.शे.-१४-९४० | ७५०-१२-९५५-द.शे.१५-१०३०-२०-११५० |
| २. | ७७५-१२-९५५ द.शे. १५-१०३०-२०-११५० | ९५०-२०-११५० द.शे. २५-१४०० |
| ३. | ८२७-१५-९०० द.शे. २०-१२०० | ९५०-२०-११५० द.शे. २५-१५०० |
| ४. | ९५०-२०-११५० द.शे. २५-१४०० | १२००-३०-१४४० द.शे. ३०-१८०० |
| ५. | ९५०-२०-११५० द.शे. २५-१५०० | १२००-३०-१५६० द.शे. ४०-२०४० |
| ६. | ९७५-२५-११५० द.शे. ३०-१५४० | १२००-३०-१५६० द.शे. ४०-२०४० |
| ७. | ९७५-२५-११५० द.शे. ३०-१६६० | १३२०-३०-१५६० द.शे. ५०-२२०० |
| ८. | १२००-३०-१४४० द.शे. ३०-१५०० | १३५०-३०-१४४० द.शे. ५०-२२०० |
| ९. | १२००-३०-१५६० द.शे. ३०-१८०० | १३५०-३०-१४४० द.शे. ५०-२२०० |
| १०. | १३२०-३०-१५८० द.शे. ४०-२०४० | १४००-४०-१८०० द.शे. ५०-२३०० |
| ११. | १३५०-३०-१४४० द.शे. ५०-२२०० | १६००-५०-२३०० द.शे. ६०-२६६० |
| १२. | १४००-४०-१८०० द.शे. ५०-२३०० | १६४०-६०-२६०० द.शे.७५-२९०० |
| १३. | १४००-४०-१६००-५०-२३०० द.शे. ६०-२६०० | १६५०-६०-२६०० द.शे. ७५-२९०० |
| १४. | १६००-५०-२३०० द.शे. ६०-२६६० | २०००-६०-२३०० द.शे. ७५-३२०० |
| १५. | १६४०-६०-२६०० द.शे. ७५-२९०० | २०००-६०-२३०० द.शे. ७५-३२००-१००-३५०० |
| १६. | २०००-६०-२३०० द.शे. ७५-३२०० | २०००-६०-२३०० द.शे. ७५-३२००-१००-३५०० |

**श्री. हमीदउद्दीन ताबा :** सदरील प्रस्ताव स. सदस्यांना वाचण्यासाठी स्थगित ठेवण्यात यावा.
**श्री. सै. अली मिरासलामी :** प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे पाठवावा.

**मा. महापौर:** प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. परिशिष्टातील अ.क्र. १६ मध्ये वेतनश्रेणी रु. २०००-३२०० व पदोन्नतीची वेतनश्रेणी रु. २०००-३५०० आहे. ह्या वेतनश्रेणीची पदोन्नतीची पुढील वेतनश्रेणी रु. २३७५-३७०० किंवा २२००-३७०० आशी दुरुस्ती करावी.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रशासनामार्फत ठेवण्यात आलेल्या अटी व शर्तीनुसार दिनांक ९ जून १९९४ पासून महानगरपालिकेतील वर्ग ३ व ४ संवर्गातील कर्मचाऱ्यांना समयश्रेणी शासन मान्यतेनुसार लागू करण्यास मान्यता देण्यात येते. यामधील परिशिष्ठातील दर्शविलेले अनु. क्र. १६ मधील वेतनश्रेणी रु. २२००-२३०० या पदोन्नतीची वेतनश्रेणी रु. २०००-३५०० अशी आहे. या ऐवजी २३७५-३७०० किंवा रु. २३००-३७०० अशी दुरुस्ती व्हावी. यासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११८/६ :** औरंगाबाद शहर दक्षिण अमेरिकेमधील पेरु देशातील "कुस्को" शहराचे जुळे शहर (टिविनिंग ऑफ सिटी) म्हणून घोषित करण्याबाबत केंद्रशासनाचा निर्णय झाला असल्याचे केंद्र शासनाचे पत्र क्र. /एन११०२५/४७/९६ युसीडी दि. २९/१०/९७ महाराष्ट्र शासनास कळविले आहे. याबाबत अधिकृत घोषणा लवकरच परराष्ट्र खात्याच्या राज्यमंत्री त्यांचे कुस्को (पेरु) शहर भेटी वेळी करणार आहे.

"कुस्को" शहर अमेरिकेची आर्कियॉलॉजीकल्स राजधानी असून ह्या शहरास मानवतेच्या संस्कृतीचा वारसा लाभलेला आहे. पेरु सरकारने अशा ह्या प्राचीन व सांस्कृतीक वारसा लाभलेल्या शहराशी भारतातील तसेच प्राचीन व सांस्कृतीक वारस लाभलेले शहर जुळणी करुन जुळे शहर म्हणून आपसातील संबंध विकसीत करण्याचे ठरविलेले आहे. ह्या अंतर्गत आपल्या औरंगाबाद शहराचा विचार करण्यात आलेला आहे. "जुळी शहरे" ह्या संकल्पने मागील प्रमुख उद्देश आपसातील सामंजस्य व उपयुक्त माहिती/साहित्य व विचारांची देवाणघेवाण हा आहे. त्यामध्ये खालील बाबींचा समावेश होतो.

१) दोन देशामधील दोन शहरांमधील मैत्री संबंध स्थापित करुन ते दृढ करणे.
२) कला, साहित्य, संस्कृती भाषा इथे अभ्यासासाठी त्या त्या शहरातील नागरिकांना प्रोत्साहित करणे. जेणे करुन जुळ्या शहरातील नागरिकांचे संबंध चांगले व सामजस्य पूर्ण राहतील.
३) जुळ्या शहरातील नागरीकांना/कुटुंबाना आमंत्रीत करुन एकमेकांचे राहणीमान, दैनंदिन जीवन, एकमेकांचे कॉमन प्रश्न समस्या समजावून घेवून इ. बाबत माहिती घेवून त्याबाबत उपाय योजना करण्याबाबत चर्चा करणे.
४) वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक, प्रशासकीय तसेच साहित्य क्रिडा व सांस्कृतीक क्षेत्रातील विविध संकल्पना नवीन विचार इतरांचे अनुभव इ. बाबत वैचारिक देवाण घेवाण करणे.
५) युवा संघटना व्यापारी/औद्योगिक प्रतिष्ठाने समाजसेवा संघटना इ. चे जुळ्या शहरातील समकक्ष संघटनाशी संबंध प्रस्थापित करुन ते विकसीत करणे.
६) शहर विकास नागरी सुविधा विकसीत करणे नागरी समस्या सोडविणे उदा. निवारा परिवहन व दळणवळण जमीनीचा वापर इ. तज्ञाचे मार्गदर्शन सेवा उपलब्ध करणे इ.

ह्या जुळी शहर संकल्पनेमध्ये दोन शहरातील नागरकांच्या वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांच्या भेटी आयोजना द्वारे वैचारिक देवाणघेवाण करणे, याचा प्रामुख्याने समावेश होतो. त्यानुसार ह्या दोन शहरातील नागरीकांना स्वखर्चाने जुळ्या शहरात भेट द्यावयाची असून त्यांची राहण्याची व इतर व्यवस्था त्या त्या शहरातील नागरिकांनी त्यांना

आपल्या कुटुंबात सामावून घेवून करणे अपेक्षीत आहे ज्यामुळे समाजव्यवस्था समाजाचे अंतरंग सहज जवळून पाहणे शक्य होईल.

करीता शासन निर्देशनुसार वरील जुळ्या शहराबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

प्रस्ताव मान्यतेनंतर पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल व इतर सोपस्कार व अपेक्षीत खर्चाबाबत सविस्तर माहिती घेवून अंदाजपत्रकीय तरतुद करण्यात येईल. तुर्त मा. महापौर व मा. आयुक्त यांचे "कुस्को" भेटीकरीता रु. दोन लक्ष खर्च अपेक्षीत असून त्यासही मंजुरी द्यावी.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर दक्षिण अमेरिकेतील पेरु देशातील "कुस्को" शहराचे जुळे शहर म्हणून घोषीत केल्याचे केंद्र शासनाने त्यांचे पत्र क्र. एन-११०२५/४७/९६युसीडी दि. २९/१०/९७ ने महाराष्ट्र शासनास कळविले आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने त्यांचे पत्र क्र. एएमसी१४९७/७२५/प्र.क्र.५६/९७नावि-२४ नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई दि. १०/११/९७ ने पत्र देवून "कुस्को" शहराचे जुळे शहर म्हणून औरंगाबाद शहराचा निवड करण्याचे प्रस्तावाबाबत महानगरपालिकेने ठराव करण्याचे नमुद केले आहे.

जुळे शहर ह्या संकल्पनेमागील प्रमुख उद्देश आपसातील सामंजस्य व उपयुक्त माहिती विचाराची देवाणघेवाण असून त्यामध्ये खालील बाबींचा समावेश होतो.

१) दोन देशामधील दोन शहरांमधील मैत्री संबंध स्थापित करुन ते दृढ करणे.
२) कला, साहित्य, संस्कृती भाषा इथे अभ्यासासाठी त्या त्या शहरातील नागरिकांना प्रोत्साहित करणे. जेणे करुन जुळ्या शहरातील नागरिकांचे संबंध चांगले व सामजस्य पूर्ण राहतील.
३) जुळ्या शहरातील नागरीकांना/कुटुंबाना आमंत्रीत करुन एकमेकांचे राहणीमान, दैनंदिन जीवन, एकमेकांचे कॉमन प्रश्न समस्या समजावून घेवून इ. बाबत माहिती घेवून त्याबाबत उपाय योजना करण्याबाबत चर्चा करणे.
४) वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक, प्रशासकीय तसेच साहित्य क्रिडा व सांस्कृतीक क्षेत्रातील विविध संकल्पना नवीन विचार इतरांचे अनुभव इ. बाबत वैचारिक देवाण घेवाण करणे.
५) युवा संघटना व्यापारी/औद्योगिक प्रतिष्ठाने समाजसेवा संघटना इ. चे जुळ्या शहरातील समकक्ष संघटनाशी संबंध प्रस्थापित करुन ते विकसीत करणे.
६) शहर विकास नागरी सुविधा विकसीत करणे नागरी समस्या सोडविणे उदा. निवारा परिवहन व दळणवळण जमीनीचा वापर इ. तज्ञाचे मार्गदर्शन सेवा उपलब्ध करणे इ.

ह्या जुळी शहर संकल्पनेमध्ये दोन शहरातील नागरिकांची वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांच्या भेटी आयोजनाद्वारे वैचारिक देवाण घेवाण करणे याचा प्रामुख्याने समावेश होतो. त्यानुसार ह्या दोन शहरातील नागरिकांना स्वखर्चाने जुळ्या शहरास भेट द्यावयाची असून त्यांची राहण्याची व इतर व्यवस्था त्या त्या शहरातील नागरिक त्यांना आपल्या कुटुंबात सामावून घेवून करणे अपेक्षीत आहे. त्यामुळे समाजव्यवस्था समाजाचे अंतरंग सहज व जवळून पाहणे शक्य होईल.

वरील प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खालीलप्रमाणे ठराव मंजुर करण्यात येतो.

१) वर दर्शविल्यानुसार जुळ्या शहराबाबतचा प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.
२) सदरल जुळ्या शहर योजनेबाबत केंद्र शासनाची योजना प्रभावितपणे व यशस्वीरित्या राबविण्यासाठी "कुस्को" शहरास भेट देवून तेथील नागरिक/पदाधिकारी यांचेशी

चर्चा करण्यासाठी मा. महापौर मा. आयुक्त यांना "कुस्को" शहरास भेट देण्यास व दौऱ्यास होणारा प्राथमिक खर्च अंदाजे रु. दोन लाख खर्च करण्यास मंजुरी देण्यात येते व ठरावास सर्वानुमते कायम करण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११९/७ :** औरंगाबाद शहराचे मंजुर विकास योजनेतील चौराहा ते जाधवमंडी ४० फुट रुंद रस्त्याचे रुंदीकरण करणे आवश्यक आहे. सदर रस्ता हा चौराहा ते जाधवमंडी जोडणारा रस्ता आहे. किराणाचावडी पोलीस स्टेशन ते मोतीकारंजा हा रस्ता विकसीत आहे. ह्यात सोना मंगल कार्यालयाची इमारत संपादीत केली आहे. यामुळे चौराहा जाधवमंडी हा रस्ता जवळजवळ ३० टक्के संपादीत झालेला आहे. उर्वरित ७० टक्के रस्ता संपादन केल्यास अंगुरीबाग चौराहा ते जाधवमंडी जोडणारा सरळ रस्ता तयार होवून वाहतुकीस खुला होईल. ह्या दृष्टीने विचार करता विकास योजना प्रस्तावानुसार रुंदीकरण करणे आवश्यक असल्याने त्या संदर्भात सदर रस्ता विकसीत करणे करीता सररस्ता रुंदीकरणाने बाधित होणारी जागा संपादीत करण्यासाठीचा भुसंपादना करिता लागणाऱ्या खर्चाच्या सह प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

<u>संवाद</u>

**श्री. हमीद ताबा :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रस्ताव तयार होणार काय याची माहिती द्यावी. कारण प्रस्तावात असे नमुद केले आहे क,ी चौराहा ते जाधवमंडी व किराणा चावडी पोलीस स्टेशन ते मातीकारंजा हा रस्ता रुंदीकरणाची कार्यवाही झ ाालेली आहे. असे म्हटले आहे तर पोलीस चौकी त्या ठिकाणाहून का हटविण्यात आली नाही.

**सहा. संचालक नगररचना :** चौराहा ते जाधवमंडी हा ४० फुट रुंद रस्त्याचे रुंदीकरण करणे आवश्यक आहे. यातील चौराहा ते जाधवमंडी हा रस्ता जवळजवळ रस्ता वाहतुकीस खुला होईल. ह्या प्रस्तावास मंजुरी दिल्यास पुढील कार्यवाही प्रशासनामार्फत करण्यात करण्यात येईल.

**श्री. हमीद ताबा :** गेल्या २० वर्षापासून ह्या रस्त्याबाबतचा प्रश्न प्रलंबीत आहे. सभागृहाची दिशाभूल संबंधीत अधिकारी करीत आहे.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** चौराहा पोलीस चौकीस जागा देवून प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी ह्याबाबत किती खर्च येतो याची सभागृहाला माहिती द्यावी.

**मा. महापौर :** सदरच्या प्रस्तावास स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत दोन वेगवेगळे रस्त्याचा प्रस्ताव एकत्रीत केलेला आहे. ते सविस्तर खर्चासह ठेवावे.

**श्री. गजानन बारवाल :** शहर विकास कार्यक्रमाअंतर्गत डी.पी. रोडमध्ये हे रस्ते येतात काय याची माहिती द्यावी व पुढील खर्चासह माहिती ठेवावी.

**मा. महापौर :** चौराहा ते जाधवमंडी या रस्त्याचे रुंदीकरण करण्याच्या प्रस्तावास फक्त मंजुरी देण्यात येते बाकीचा प्रस्तावातील माहिती व खर्च यासह नंतर विचार करण्यात येईल.

**श्री. कोकाटे काशिनाथ :** रस्ता रुंदीकरण करणेच्या प्रस्तावानुसार मी चर्चा करु इच्छितो की, सिडको ते रोषनगेट येथील रस्ता रुंदीकरण प्रक्रिया थांबलेली आहे. ह्या रस्त्यात बाधीत होणारे ५-६ व्यक्तींनी भुसंपादनाच्या प्रक्रीयेला होकार दिलेला आहे. बाकी या प्रक्रीयेसाठी दोन तीन महिन्याचा कालावधी झ

ालेला असून तातडीने प्रशासकीय कार्यवाही व्हावी जेणे करुन रस्ता रुंदीकरण होवून वाहतुकीस अडथळे निर्माण होणार नाहीत.

**मा. महापौर :** स. संचालक नगररचना ह्यांनी माहिती घ्यावी.

**स. संचालक नगर रचना :** सदरील भुसंपादनाच्या प्रक्रीयेत असून सदरील रस्त्याबाबत मंजुरी घेवून मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवावा लागेल आणि नंतर खाजगी वाटाघाटीद्वारे भुसंपादानाची कार्यवाही प्रशासकीय पातळीवर करावी लागेल. सन १९९२ च्या प्रस्तावासंदर्भात कार्यवाही केलेली होती. नंतर स्थगित होती. सध्या याबाबत कार्यवाही चालू आहे.

**श्री. जावेद रज्जाक :** सन १९९२-९३ मध्ये रोशनगेट ते गणेश कॉलनी येथील रस्ता रुंदीकरण करण्याची मंजुरी मिळूनही प्रशासनाने अद्यापही कार्यवाही केलेली नाही.

(ह्याचवेळी पायातली पांढरी शुभ्र चप्पल काढून टेबलावर ठेवून म्हणतात) आता यापुढे अशाच प्रकारचे उत्तर द्यावे लागणार. (असे उद्‌गारतात व मा. महापौर यांचेकडे पाहतात)

यावेळी सभागृहात दोन्ही पक्षाच्या काही स.स. ह्या विधानावर आक्षेप घेतात व अशा प्रकारचे स. सदस्य श्री. जावेद रज्जाक यांचे सभागृहातील कृत्य निंदनीय असल्याचे जोरजोरात सांगतात यावेळी काहीही ऐकु येत नाही सर्व सदस्य मा. महापौरांच्या डायसजवळ जमा होतात.

**मा. महापौर :** स. सदस्य श्री. जावेद रज्जाक आपणास विनंती करण्यात येते की, अशाप्रकारचे अशोभनीय कृत्य सभागृहात अशांतता होईल असे न करण्याचे यावेळीही सुचित करण्यात आलेले होते. कृपया आपण उद्‌गारलेले शब्द मागे घ्यावे व माफी मागावी.

**श्री. जावेद रज्जाक :** मी जे बोललेलो आहे ते अशाच प्रकारे उत्तरे देवून विचारणा करावी लागेल.

**श्री.संजय जोशी:** स. स. श्री. जावेद रज्जाक यांचे सभागृहातील कृत्य यापुर्वीही दोन तीन वेळेस आलेले असून तीन चार वेळा त्यांना सभागृहातनू निलंबीत केलेले आहे. तेव्हा आजच्या अशोभनीय कृतीस त्यांचे पूर्ण सभासदत्व रद्द करावे.

(या मागणीस बरेचसे स. सदस्य बाके वाजवून स. सदस्य श्री. जावेद रज्जाक यांचे सभासदत्व रद्द करण्याचे आवाज देतात.)

**मा. महापौर :** स. सदस्य श्री. जावेद रज्जाक आपणास पुन्हा एकदा सूचना करण्यात येते की, आपण आपले शब्द मागे घ्यावे व सभागृहात अशांतता होणारी कुठलेही कृत्य करु नये याबाबत सभागृहाची माफी मागावी व सभागृहाबाहेर जावे.

(यावेळी काही आघाडीचे स. स. श्री. जावेद रज्जाक यांना सभागृहाबाहेर घेवून जातात वेळ अंदाजे ४:१५ वाजता)

**श्री. जोशी व इतर सदस्य :** (स.स.श्री. जावेद रज्जाक यांचे सभागृहातील पायातील चप्पल काढून टेबलवर ठेवून काढलेल्या उद्‌गाराबाबत नाराजी व्यक्त करुन या कृत्याचा निषेध करतात व सभासदत्व रद्द करण्याची मागणी करतात.

**मा. महापौर :** मी सभागृहाला विनंती करतो की, सभागृहात शांतता राखावी कोणत्याही प्रकारचे अशोभनीय व शांतता भंग होणार नाही असे कृत्य करु नये. स.स. श्री. जावेद रज्जाक यांनी आजच्या सभागृहात व ह्यापूर्वीही सभागृहात गैरकृत्य व अशांतता भंग केल्यावरुन दोनतीन सर्वसाधारण सभेतून बाहेर काढून त्यांचे सभासदत्व निलंबीत केलेले होते. बऱ्याचवेळा कार्यालयातील

अधिकारी/कर्मचारी यांचेशी विविध कारणावरुन भांडणे केलीत त्यामध्ये उपअभियंता विद्युत श्री. बनसोडे यांचेशी व त्यांनी भांडण केलेले आहे व कार्यालयीन कामात अनेकदा अडथळे आणलेले आहे. दोन वेळा १-१ दिवसाचे सभासदत्व निलंबन केले आहे. जर एकदा पुन्हा १५ दिवसासाठीचे सभासदत्व निलंबन केलेले होते. आजच्या सर्वसाधारण सभेतही अशाच प्रकारे अशांतता भंग होणारे गैरकृत्य संबंधीत स. सदस्य यांनी केल्याने त्यांचे बाबतीत कोणती कार्यवाही करावी ह्याबाबत सभागृहाने निर्णय घ्यावा.

(यावेळी सभागृहात दोन्हीही बाजुचे स. सदस्य हात उंचावून १५ दिवसाचे सदस्यतव निलंबन करावे व शासनाकडे त्यांचे कायमचे बाबतीत मा. आयुक्त यांनी कार्यवाही करावी असे उद्‌गारले.)

**मा. महापौर :** ठिक आहे. स. सभागृहाच्या भावना लक्षात घेता स.सदस्य श्री. जावेद रज्जाक ह्यांच्या सभागृहातील वेळोवेळी होत असलेल्या गैरकृत्याबाबत सभागृहात अशांतता भंग होण्याची संभावना असते. यासाठी सभागृहात सर्व स. सदस्यांनी हात उंचावून स. सदस्य श्री. जावेद रज्जाक यांचे पंधरा दिवसासाठीचे निलंबन करावे असा निर्णय दिला सोबत त्यांचे बाबतीत मा आयुकत यांनी शासनाकउे स. सदस्य श्री. जावेद रज्जाक यांचे कामाचे संदर्भात कार्यवाही करणेसाठी कळवावे. असे सभागृहात सर्व संमतीने जाहीर करतो.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहराचे मंजुर विकास योजनेमधील चौराहा ते जाधवमंडी या ४० फुट रुंद रस्त्याचे रुंदीकरण प्रस्तावास फक्त मंजुरी देण्यात येते व इतर रस्ता चौराहा ते जाधवमंडी या ४० फुट रुंद रस्त्याचे रुंदीकरण प्रस्तावास फकत मंजुरी देण्यात येते व इतर रस्ता चौराहा ते जाधवमंडी व किराणाचावडी ते अंगुरीबाबत नंतर चर्चा करुन खर्चाबाबत निर्णय घेण्यात येईल असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२०/८ :** शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. मोगलपूरा स्लम येथे संरक्षित भिंत बांधणेबाबतच्या कामाकरिता सा.बा. खाते ह्यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसूचीनुसार रु. ३७०१२७०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम संरक्षित भिंत बांधणेच्या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी सर्वसाधारण सभेची मंजुरी घ्यावी असे आदेशित केले आहे. तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रु. ३७०१२७०/- यास मान्यतेचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. मोगलपुरा स्लम येथे संरक्षीत भिंत बांधणेबाबतच्या कामाकरिता सा.बा. खाते ह्यांच्या ९५-९६ च्या दरसुची नुसार रु. ३७०१२७०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. सदरील काम "संरक्षित भिंत बांधणे" ह्या लेखाशिर्षातून सन १९९८-९९ ह्या वर्षाच्या अंदाजपत्रकात तरतुद करुन तातडीने काम करुन खर्च करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२१/९ :** एन-७ येथील जलकुंभाच्या पश्चिम बाजूस असलेल्या जागेमध्ये एन-५ येथून येणाऱ्या पाण्याचा साठा करण्यासाठी व पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी २० लाख लिटर क्षमेतेचे (पंप) जी.एस.आर. बांधणेच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रुपये ४५०००००/- चे तयार करण्यात आलेले आहे.

सध्या एन-७ येथे तीन जलकुंभ आणि एन-५ येथे तीन जलकुंभ आणि एक जी.एल.आर. आहे एन-५ येथील जी.एस.आर. पंम्प) मध्ये पाणी साठवून एन-७ आणि एन-५ येथील जलकुंभात भरले जाते. एन-५ एन-७ येथे २० लाख लिटर क्षमतेचे जी.एस.आर. (पंप) बांधणे गरजेचे व तातडीचे आहे. विद्युत पुरवठा बंद असेल त्यावेळेस सिडको भागाचा संपूर्ण पाणी पुरवठा बंद असतो. पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी व पाण्याची साठवणूक करण्यासाठी पंप बांधणे आवश्यक आहे.

सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. ४५०००/- चे परिसर अभियांत्रिकीच्या सन १९९६-९७ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून होणारा खर्च शासकीय अनुदान ४ कोटी (रु. चार कोटी) मधून करण्याचे प्रस्तावित आहे.

तरी एन-७ येथे संम्प (जी.एस.आर) बांधणे व पंप हाऊस तसेच ६० एच.पी. चे दोन व्हि.टी. पंप ह्या कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रुपये ४५०००००/- चे सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मंजुरीसाठी सादर.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-७ येथील जलकुंभाच्या पश्चिम बाजूस असलेल्या जागेमध्ये एन-५ येथून येणाऱ्या पाण्याचा साठा करण्यासाठी व पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी २० लाख लिटर क्षमतेचे (पंप) च्याकामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४५०००००/- चे रीतसर अभियांत्रिकी चे सन १९९६-९७ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून होणारा खर्च शासकीय अनुदान रु. ४ कोटी मधून खर्च करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

## "पुरवणी विषयपत्रिका"

**विषय क्र. १२२/१० :** औरंगाबाद शहरात अमेरिकेचे प्रसिध्द प्लॉस्टिक सर्जन डॉ. शरदकुमार दिक्षित व त्यांच्या बरोबर ५ (पाच) प्लास्टिक सर्जन दिनांक १२ डिसें. ९७ ला येत आहेत. व येथे आपल्या शहरात दरवर्षीप्रमाणे ५०० शस्त्रक्रिया करणार आहेत व या सर्व शस्त्रक्रिया त्यासाठी लागणारी भूल सर्व औषधे व राहणे मोफत आहे. हे सर्व लॉयन्स क्लब चिकलठाणा च्या मार्फत आयोजीत केलेले आहे. अशा प्रकारची शस्त्रक्रिया फक्त पुणे, मुंबई, औरंगाबाद अशा मोठ्या ठिकाणी च होवू शकतात व प्रत्येक शस्त्रक्रियेस साधारण रु. ५००००/- पर्यंत खर्च येतो. म्हणून सदरील लायन्स क्लब तर्फे २५.०० लाखापर्यंतचे काम होत आहे. औरंगाबाद शहर व मराठवाड्यातील जनतेला त्याचा फायदा होणार आहे. तरी महानगर शहर व मराठवाड्यातील जनतेला ह्याचा फायदा होणार आहे. तरी महानगरपालिकेतर्फे १०००००/- रुपयाची मदत लायन्स क्लब चिकलठाणा यांना देण्यात यावी.

सुचक : श्री. हमीदउद्दीन ताबा, श्री. बी.के. कराड,
श्री. भगवान घडामोडे
अनुमोदक : श्री. गजानन बारवाल
श्री. म.अ. रऊफ म.अ. माबुद.

**ठराव :**

**मा. महापौर :** यासाठी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विशेष बाब म्हणून मंजुरी देण्यात येते. परंतु याबाबत "एक दिवसाचे शिबीर आयोजीत करण्यात आले" असे संबोधावे व बोर्ड लावावा.

**विषय क्र. १२३/११ :** औरंगाबाद नगर परिषदेचे औरंगाबाद महानगरपालिकेत रुपांतर झाल्यानंतर घोषीत झोपडपट्याच्या संख्येत ही लक्षणीय वाढ झाली असून आता सुमारे ५४ घोषीत झोपडपट्ट्या असून शहराच्या विविध भागात व सिडको भागातही आहेत. यात नवीन

१८ खेडी गावाचा देखील समावेश आहे. अशा परिस्थितीत झोपडपट्टीचा विकास करण्यासाठी त्यांचेकडे विशेष लक्ष देवून त्यांचे समस्यांचा विचार करणे, तेथील अडी अडचणी समजावून घेणे, विविध प्रकारचे विकास कामे जसे गटार, रस्ते, इमारती, विद्युतीकरण पथदिवे कल्याणकारी योजना राबविणे इत्यादी कामासाठी औरंगाबाद महानगरपालिकेने अर्थसंकल्पात झोपडपट्टी सुधारणा, अठरा खेडी विकास गलीच्छ वस्ती श्रेणीवाढ ५% कमकुवत घटकांसाठी तरतुद शिवाय म्हाडा अनुदान व शासकीय अनुदान आणि विद्युत विभागसाठी विविध सदराखाली अर्थ संकल्पीय तरतुद ठेवली आहे ही तरतुद सुमारे रु. ८.०५ कोटी इतकी होते. व या वर्षात आतापर्यंत ३०% इतका खर्चही खर्ची पडलेला नाही व इतक्या मोठ्या प्रमाणावर कामे करण्यासाठी झोपडपट्टी व विद्युत कामासाठी योग्य प्रकारे कामे करता यावी आर्थिक तरतुदीचा वापर करता यावा म्हणून आणि शासकीय म्हडा अनुदानाचा पुरेपुर विकासाच्या कामात उपयोग व्हावा म्हणून एक कार्यकारी अभियंता (झोपडपट्टी विकास) म्हणून नवीन पद निर्माण करणे आवश्यक आहे. त्यांना आवश्यकते अधिकारी व कर्मचारी देवून एक स्वतंत्र विभागाची स्थापना करणे आवश्यक आहे. तरी हे पद निर्माण करुन शासनाची मंजुरी घेणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदीप्रमाणे नियुक्ती करणे संबंधी कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरी सादर.

सुचक - श्री. सुदाम सोनवणे<br>
श्री. प्रदीप जैस्वाल<br>
अनुमोदक - श्री. गौतम खरात<br>
श्री. संजय जोशी<br>
श्री. प्रभाकर विधाते<br>
श्री. फैय्याज कुरैशी

<u>**संवाद**</u>

**मा. महापौर :** दि. ११/१२/९७ च्या विशेष सर्वसाधारण सभेच्यावेळी सदरील प्रस्ताव ठेवावा.

**ठराव :** दिनांक ११/१२/९७ च्या विशेष सर्वसाधारण सभेच्या दिवशी प्रस्ताव ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १२५/१३ :** महानगरपालिकेने मंजुर विकास योजनेअंतर्गत आरोग्य केंद्र स्टेडीयम, वाचनालय, शाळांसाठी जागा विकत घेतली परंतु पैसे देवूनही त्या जागाचे पी.आर. कार्ड त्या इसमाचे नावाचे आहे. तरी सदर जागाचे पी.आर. कार्ड त्वरीत महानगरपालिकेच्या नावाचे तयार करुन घेण्यात यावे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. मोहसीन अहमद<br>
अनुमोदक : श्री. फैय्याज कुरैशी

**ठराव :** दिनांक ११/१२/९७ च्या विशेष सर्वसाधारण सभेच्या वेळी प्रस्ताव ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १२६/१४ :** महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६ अन्वये भूतपुर्व नगर पालिकेच्या मंजुर विकास योजनेतील (१९७५) "नाविकास क्षेत्र वगळून व शासनाने सिडको अधिसुचना (नवीन औरंगाबाद) क्षेत्रातून वगळलेल्या क्षेत्राकरिता प्रारुप विकास योजना औरंगाबाद (सुधारित) प्रसिध्द केला आहे. ह्या प्रारुप विकास योजनेत औरंगपुरा भागातील नगर भुमापन क्रमांक ४७९९ व ४७९६ च्या मिळकतीवर आरक्षण क्रमांक

६८ "क्रिडांगण"यांचे नियोजन केलेले आहे. ह्या वर्षाच्या अंदाजपत्रकात विशेष बाबींमध्ये क्रिडा संकुलाचा अंतर्भाव केलेला आहे. तरी सदरील ठिकाणीवरील तीन आरक्षणे वगळून त्या ऐवजी "महानगरपालिकेचे क्रिडा संकुल" असे एकच नवीन आरक्षण ठेवण्याचा बदल करण्यात यावा. शासनास प्रारुप विकास योजना सादर करण्यापुर्वी वरील प्रमाणेआरक्षणाच्या वापरातील बदल करुनच शासनास प्रारुप विकास योजना मंजुरीसाठी सादर करण्यात यावा अशी शिफारस उपसंचालक नगर रचना विकास योजना (विशेष घटक) औरंगाबाद यांच्याकडे करण्यात यावी.
प्रस्तवास मान्यता झाल्यानंतर पुढील वैधानिक कार्यवाही करण्यात येईल.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधि. १९६६ चे कलम २६ अन्वये भूतपुर्व औरंगाबाद नगरपालिकेच्या विकास योजनेतील (१९७५) ला विकास क्षेत्र वगळून शासनाचे सिडको अधिसुचीत (नवीन औरंगाबाद) क्षेत्रातून वगळलेल्या क्षेत्राकरिता प्रारुप विकास योजना औरंगाबाद (सुधारित) प्रसिध्द कला आहे. ह्या प्रारुप विकास योजनेतून औरंगपूरा भागातील नगर भूमापन क्र. ४७९९ व ४७९६ या मिळकतीवर आरक्षण क्र. ६७ बस स्टँड आरक्षण क्र. ६९ महाराष्ट्र राज्य निवड विकास मंडळ व आरक्षण क्र. ६८ क्रिंडागण यांचे नियोजन केले आहे. ह्या वर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये विशेष बाबीमध्ये क्रिडासंकुलाचा अंतर्भाव केलेला आहे. तरी सदरील ठिकाणी वरील तीन आरक्षणे वगळून त्याऐवजी "महानगरपालिकेचे क्रिडा संकुल" असे एक नवीन आरक्षण ठेवण्याचा बदल करण्यात यावा. शासनास प्रारुप विकास योजना सादर करण्यापूर्वी वरील प्रमाणे आरक्षणाच्यावापरातील बदल करुनच शासनास प्रारुप विकास योजना मंजुरीसाठी सादर करण्यात यावा. अशी शिफारस उपसंचालक नगर रचना विकास योजना (विशेष घटक) यांच्याकडे करण्यात यावी. याबाबत स. सभागृहाचे सर्व संमतीने मंजुरी घेवून शासनाकडे प्रस्ताव अग्रेषित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२७/१५ :** नगरसचिव गोविंद मगरे हे डिसेंबर ९७ मध्ये सेवा निवृत्त होत आहे त्यांना ६ महिन्यासाठी सेवाकाल वाढवून द्यावा. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| | | |
|---|---|---|
| सुचक | - | श्री. गौतम खरात, श्री. नरेंद्र पाटील |
| अनुमोदक | - | श्री. गंगाधर गाडे, श्री. काशिनाथ कोकाटे, |
| | | श्री. गौतम लांडगे, श्री. एस.ए. सलानी, |
| | | श्री. बी.के. कराड, श्री. भगवान घडामोडे, |
| | | श्री. संजय जोशी, श्री. संजय केनेकर, |
| | | श्री. गजानन बारवाल, श्री. प्रकाश निकाळजे. |

**मा. महापौर :** दि. ११/१२/९७ च्या विशेष सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यप्रमाणे दिनांक ११/१२/९७ च्या विशेष सर्वसाधारण सभेत प्रस्ताव ठेवावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १२८/१६ :** औरंगाबाद या शहरातील झोपडपट्टी असलेल्या मिलिंदनगर, कबीरनगर, गाडगेनगर ह्या वस्तीत प्रामुख्याने दलित मागासवर्गीय मोलमजूरी करणारे हजारो लोक रहातात ह्या भागातील जनतेसाठी शाळेची सुविधा नाही.

तेव्हा या भागातील मुलांच्या शिक्षणासाठी शाळा चालविण्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीने ह्या भागातील रिकामी असलेली नागसेननगर व मिलिंदनगर वसाहतीत ५१X३८ मीटर ही रिकामी जागा मागीतलेली आहे. तेव्हा विनंती करुन वरील जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीस देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

सुचक - श्री. हमीद ताबा
अनुमोदक - श्री. अभिमन्यु भालेराव
श्री. एस.ए. सलानी,

**मा. महापौर :** दिनांक दि. ११/१२/९७ च्या विशेष सर्वसाधारण सभेत प्रस्ताव ठेवावा असे सर्वानुमते ठरले.

**ठराव :** दि. ११/१२/९७ च्या विशेष सर्वसाधारण सभेत सदरील प्रस्ताव ठेवावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र १२९/१७ :** वरील विषयास अनुसरुन माझे वार्ड क्रमांक ४६ तसेच माझ्या वार्डाला लागून असलेले वार्ड पैठणगेट, खोकडपूरा, सब्जीमंडी, दलालवाडी, बापुनगर, गांधीनगर, राधामोहन कॉलनी, कामगार हौसींग सोसायटी, अटु मोहल्ला, जरीपुरा, फकीरवाडी असे अनेक वस्ती आहे. ज्यामध्ये इथल्या नागरिकांना लग्न समारंभासाठी तसेच सांस्कृतिक कार्यक्रमासाठी रस्त्यावर मंडप बांधावे लागतात ज्यामुळे त्यांना खुप त्रास होतो. करीता सादिया टॉकीज पाठीमागे जे व्यापारी संकुल बांधण्यात आले आहे. त्यांच्या पहिल्या मजल्यावर आपण एक कम्युनिटी हॉल चांगल्या प्रकारे बांधू शकतो व खालील दुकानदारांना त्रास होवू नये म्हणून या संकुलनाच्या पाठीमागून दलालवाडी मधून येण्याजाण्यासाठी रस्ता आहे. जेणे करुन तेथील नागरिकांच्या भावना लक्षात घेवून व त्रास लक्षात घेवून तसेच महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल या दृष्टीने कम्युनिटी हॉल बांधणे करिता सर्वासाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक - सौ. मोहसिना बिल्कीस
अनुमोदक - श्री. मोहसीन अहमद
श्री. सुदाम सोनवणे

**मा. महापौर :** दि. ११/१२/९७ च्या विशेष सर्वसाधारण सभेत प्रस्ताव ठेवावा असे ठरले.

**ठराव :** दिनांक ११/१२/९७ च्या विशेष सर्वसाधारण सभेत प्रस्ताव ठेवावा असे सर्वानुमते ठरले.

**संवाद**

**मा. आयुक्त :** महानगरपालिका औरंगाबाद वर्धापन दिनानिमित्ताने दि. ८ डिसेंबर १९९७ पासून महापौर चषक व विविध क्रिडा स्पर्धा आयोजित केलेल्या आहेत. त्या स्पर्धास सर्वांनी सहकार्य करावे. पल्स पोलिओ ह्या राष्ट्रीय कार्यक्रमा अंतर्गत दि. ७ डिसेंबर ९७ व दि. १८ जाने. ९८ रोजी या दोन दिवशी पल्स

पोलिओ कार्यक्रम आयोजिला आहे. त्यास सर्वांचा सहभाग महत्वाचा आहे. व दि. ७ डिसेंबर ९७ ला या संदर्भात महानगरपालिका कार्यालयातून रॅली काढण्यात येणार आहे त्या साठीही सर्वांनी सहकार्य करावे.

**मा. महापौर :** वर्धापन दिनानिमित्ताने महापौर चषक विविध क्रिडा स्पर्धा आयोजिण्यात आलेल्या आहेत. ह्या बाबत वेगवेगळ्या स्पर्धासाठी सर्व मंत्री महोदय यांना पाचारण करावे लागणार आहे. त्याच प्रमाणे शहरातील झोपडपट्टीत जे गरिब व होतकरु महिला उद्योजक आहेत त्यांना महानगरपालिकेतर्फे काही बक्षीस देवून प्रोत्साहित करण्याचा एक स्मल कार्यक्रम महानगरपालिकातर्फे घेण्यात येईल.

या बरोबरच "जन गन मन" या राष्ट्रगीताने सभा संपली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक १५/१२/९७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**दि. ११/१२/९७ रोजी तहकुब करण्यात आलेली सभा सोमवार १५/१२/९७ रोजी दुपारी ३ वाजता मा. महापौर श्री. अब्दुल खान (मामु) त्यांचे अध्यक्षतेखाली "कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृहात "वंदेमातरम्" या राष्ट्रगीताने सुरु झाली ह्या सभेस प्रशासकीय अधिकाऱ्यासह खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स. श्री. तरवेंद्रसिंह धिल्लन
२) स.स. श्री. सुदाम सोनवणे
३) स.स. श्री. प्रभाकर सिताराम विधाते
४) स.स. श्री. फैय्याज अहमद कुरैशी
५) स.स. सौ. रुखमनबाई लोखंडे
६) स.स. श्री. अफसरखाँ यासिनखाँ
७) स.स. सौ. साजेदा बेगम
८) स.स. म.सलिम म. हनीफ कुरैशी
९) स.स. सौ. रजनी रमेश जोशी
१०) स.स. सौ. उषाबाई दिलीप गायकवाड
११) स.स. सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक
१२) स.स. सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे
१३) स.स. श्री. गौतम लिंबाजी लांडगे
१४) स.स. श्री. महादेव पुंडलिकराव सुर्यवंशी
१५) स.स. श्री. अभिमन्यु रामभाऊ भालेराव
१६) स.स. श्री. नरेंद्र यादवराव पाटील
१७) स.स. सौ. पद्मा बाबुराव शिंदे
१८) स.स. श्री. सुभाष भिकाजी टाकळकर
१९) स.स. श्री. प्रफुल्ल लालचंद मालानी
२०) स.स. श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ
२१) स.स. सौ. धनश्री अशोक विसपुते
२२) स.स. श्री. फजलउल्लाखाँ अजमलउल्लाखाँ
२३) स.स. श्री. अजिजखाँ गणीखाँ
२४) स.स. श्रीमती आबेदाबेगम मो. मुस्तफा
२५) स.स. श्रीमती नुरजहाँ बेगम अ. रहेमान
२६) स.स. श्री. वसंत विनायकराव देशमुख
२७) स.स. श्री. हाजी मोहसिन अहेमद हाजी बशीर अहेमद
२८) स.स. श्री. मुजीब आलमशा खान
२९) स.स. सौ. मोहसिना बिल्कीस विश्वारोद्दीन
३०) स.स. श्रीमती जाहेदा बेगम म. जमीर
३१) स.स. श्री. त्रिंबक गणपत तुपे
३२) स.स. सौ. यशोदा धनंजय वाडेकर

३३) स.स. श्री. किशोर बाबुलाल तुळशीराम बागवाले
३४) स.स. श्रीमती पुष्पाताई सुरेशचंद्र गंगवाल
३५) स.स. श्री. हमीदउद्दीन ताबा
३६) स.स. श्री. म.अ. रऊफ म.अ. माबुद
३७) स.स. श्री. स.अ. इकबालोद्दीन स.मो. कुतुबउद्दीन
३८) स.स. श्री. प्रदिप शिवनारायण जैस्वाल
३९) स.स. श्री. सैय्यद अली मिरांसलामी
४०) स.स. श्री. रमेश दिपचंद लाहोट
४१) स.स. सौ. मुक्ताबाई सुदाम वाघमारे
४२) स.स. सौ. लता श्रिनिवास दलाल
४३) स.स. श्री. जयवंत केशवराव ओक
४४) स.स. श्रीमती अलका रमेश पाटील
४५) स.स. सौ. शकुंतला हरिदास धांडे
४६) स.स. श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
४७) स.स. कु. माया लिंबाजी लाडवाणी
४८) स.स. सौ. सविता संजय आव्हाड
४९) स.स. श्री. अ. रशिद अ. सत्तार
५०) स.स. श्री. विकास रतनलाल जैन
५१) स.स. श्री. गंगाधर सुखदेव गाडे
५२) स.स. श्री. गजानन रामकिसन बारवाल
५३) स.स. श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे
५४) स.स. श्री. संजय रामदास जोशी
५५) स.स. श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
५६) स.स. श्री. अविनाश लक्ष्मण कुमावत
५७) स.स. सौ. ज्योत्सना दौलतराव हिवराळे
५८) स.स. श्री. राजकुमार उर्फ सांडू बचाटे
५९) स.स. सौ. राधाबाई तळेकर
६०) स.स. श्री. नरसिंग मुरलीधर ढगे
६१) स.स. श्री. विठ्ठल किसन जाधव
६२) स.स. श्री. विजयकुमार गजानन मेहेर
६३) स.स. सौ. मंदा धनंजय काळुसे
६४) स.स. सौ. सुनंदा उत्तम कोल्हे
६५) स.स. श्री. बन्सी तुकाराम गांगवे
६६) स.स. श्री. भगवान देविदास घडामोडे

**मा. महापौर :** मा. आयुक्त हे पुण्याला गेलेले होते त्यांना लहानशी दुखापत झाल्या कारणाने ते सभेला उपस्थित राहू शकत नाही. त्याचबरोबर उप आयुक्त -१ हे सुध्दा हायकोर्टात कॅव्हेट दाखल करण्यासाठी गेलेले असल्यामुळे तेही आजच्या सभेला उपस्थित राहू शकत नाही. मा. आयुक्त यांचे पदस्थान उप आयुक्त-२ हे स्विकारतील.

**विषय क्र. १३०/१ :** दि. ४/१२/९७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**श्री. मुजीब आलमशा खान :** मागील इतिवृत्तातील ठराव क्र. ११७/५ पृष्ठ क्र. २५च्या ठरावात परिशिष्टातील दर्शविलेले अनु.क्र. १६ मधील वेतनश्रेणी रु. २००० ते ३२०० यांना पदोन्नतीचा वेतनश्रेणी रु. २०००-३५०० अशी आहे. या ऐवजी रु. २३७५-३७०० अशी दुरुस्ती करावी असे लिहिलेले आहे. ही केलेली दुरुस्ती रद्द करावी व प्रशासनाने ठेवलेला जसा तसा प्रस्ताव आहे त्याचप्रमाणे प्रस्तावातील ठरावात नमुद करावे. कोणत्याही प्रकारचे वेतनश्रेणी वाढ करु नये.

**मा. महापौर :** ठिक आहे. तशी दुरुस्ती करण्यात यावी व इतिवृत्तास मंजुरी द्यावी.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इतिवृत्तातील ठराव क्र. ११७५ मधील पृष्ठ क्र. २५ वर मा. महापौर यांच्या वाक्यात व ठरावात परिशिष्टातील दर्शविलेले अनुक्रमांक १६ मधील वेतनश्रेणी रु. २०००-३२०० यांना पदोन्नतीचा वेतन श्रेणी रु. २०००-३५०० अशी आहे. या ऐवजी रु. २२००-३७०० किंवा ३२००-३७०० अशी दुरुस्ती करावी असे लिहिलेले आहे. सदरील वरीलप्रमाणे वाक्य रद्द करुन प्रशासनाने जो मुळ प्रस्ताव ठेवलेला आहे तो जशास तसाच मंजुर करण्यात येते. या व इतर दुरुस्त्यासह दिनांक ४/१२/९७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३१/२ :** महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचा शैक्षणिक दर्जा आणि शाळांचा दर्जा सुधारणे बाबत विचार विनिमय करणे.

<u>संवाद</u>

**श्री. सैय्यद अली मीरासलामी :** शिक्षण विषयावर चर्चा करतांना माझा आरोप आहे की, शिक्षण विभागात कोणत्याही प्रकारचे नितीनियम व त्या विभागात येणाऱ्या नागरीकांच्या तक्रारीवर उपाय योजनांची अंमलबजावणी होत नाही. त्यात काही मुद्दे मी आपणास समोर मांडू इच्छितो.

१) महानगरपालिकेच्या शाळेत एकुण शिक्षक किती व कोणकोणत्या शाळेत शिक्षकांची संख्या किती व त्या शाळेत मुले किती याचा खुलासा करावा.

२) बऱ्याच ठिकाणी (वार्डात) महानगरपालिकेच्या स्वत:च्या मालकीच्या बिल्डींग नाही. नवीन इमारती होण्यासाठी व ज्या आहेत त्यांच्या दुरुस्ती करुन घेण्यासाठी बऱ्याच वेळेस प्रशासनाकडे पत्राद्वारे कार्यवाही करण्यासाठीसुचना देवूनही काहीही झालेले नाही. माझ्या वार्डातील शाळा बऱ्याच ठिकाणी नादुरुस्त झालेली आहेत. शिक्षणाधिकारी यांना बऱ्याच वेळा पत्र देवूनही त्याबाबत कार्यवाही केलेली नाही. यामुळे शाळेतील शिक्षकांना मुलांना त्रास होतो आहे. मनपाच्या शाळेसाठी ज्या बिल्डींग खाजगी घेतलेल्या आहेत त्याचा (किराया) मनपाकडून जास्त प्रमाणे जात असून मनपाच्या स्वत:च्या मालकीच्या इमारती असल्यास मनपास एवढा मोठा

आर्थिक तोटा सहन करावा लागणार नाही. मनपातील खाजगी इमारतीतील शाळांचा किराया का थांबविल्या जातो. याची माहिती द्यावी. यासाठी मनपाने सर्वच ठिकाणी स्वत:च्या इमारती होण्यासाठी विविध वार्डनिहाय प्रस्ताव ठेवावा.

३) शाळेत शिक्षक जास्त तर मुले कमी व मुले जास्त तर तेथे शिक्षक कमी याचा काही ताळमेळ मनपास लागत नाही. शिक्षणाधिकारी हे शिक्षक व शाळेतील मुले यांचे प्रमाण समोर ठेवून नेमणूक करीत नाही. वाटेल त्या व्यक्तीच्या सुचनेनुसार बदल्या करतात हे योग्य नसून त्यांची सुपर्ण जबाबदारी शिक्षणाधिकारी यांनी ठेवली पाहिजे. शाळेतील शिक्षकांना मनपा वेतनश्रेणी वर पगार देते. तरीही शिक्षक व्यवस्थित शिकवत नाही. वेळेच्या आत शाळा बंद करतात असे निदर्शनास आलेले आहे. शिक्षणाधिकारी यांनी उर्दु माध्यमाच्या शाळा किती व मराठी माध्यमाच्या शाळा किती व उर्दु शाळेत शिक्षक किती व मुले किती व प्रत्येक शाळेत मुले किती याची माहिती द्यावी. पुणे/मुंबई या ठिकाणी मनपाच्या शाळेत विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी रिघ लागते मग औरंगाबादेतील शाळांतून शाळा सोडून जाणेसाठी पालक आमच्याकडे शिफारशी घेवून येतात. यासाठी शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे.

**श्री. महादेव सुर्यवंशी** : महानगरपालिकेच्या संपूर्ण शाळांतील एकुण विद्यार्थी संख्या २७००० आहेत या विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी ६०० शिक्षक आहेत. ६०० शिक्षक २७००० विद्यार्थ्यांना शिकविण्याचे काम करीत आहेत. प्रमाणकानुसार ४५ विद्यार्थ्यांना एक शिक्षक शिकविण्यासाठी असावेत. मनपाच्या ७०० विद्यार्थ्यांच्या वर संख्या असणाऱ्या ११ शाळा आहेत. त्यात (१) के.प्रा. शाळा, किराडपूरा १०४८ विद्यार्थी, २० शिक्षक (२) के.प्रा. शाळा बन्सीलाल नगर, ८२५ विद्यार्थी, २२ शिक्षक (३) एन-७ शाळा, ७२७ विद्यार्थी, १९ शिक्षक (४) एकनाथ नगर शाळा, ७८४ विद्यार्थी, १३ शिक्षक (५) के.प्रा. शाळा, एन-७, ७५९ विद्यार्थी, १९ शिक्षक (६) के.प्रा. शाळा नारेगाव, ८२५ विद्यार्थी, १३ शिक्षक (७) मुकुंदवाडी ८२५ विद्यार्थी, १३ शिक्षक.

जेथे ८२५ विद्यार्थी आहेत तेथे १३ शिक्षक व जेथे ७२७ विद्यार्थी संख्या आहे तेथे १९ शिक्षक हे कुठल्या नियमाप्रमाणे बसते? किराडपूरा येथील शाळा नं. ३ येथे ४१३ विद्यार्थी संख्या आहे तेथे १६ शिक्षक ही विभागणी माझ्या मते चुकीची आहे.

३) ५ वी ते ७ वी पर्यंत शिक्षक असलेल्या विद्यार्थ्यांसाठी अनुभवी व टेक्नीकल दृष्टीने शिकवण देत असलेल्या शिक्षकाची त्या ठिकाणी नेमणुक द्यावयास पाहिजे.

४) मनपात ११ क्रिडा शिक्षक आहे जेथे मुले कमी तेथे या शिक्षकाची नेमणुक करण्यात आलेली आहे. ते योग्य नसून मुलांच्या संख्येच्या प्रमाणकानुसार क्रिडा शिक्षकाची नेमणुक द्यावयास पाहिजे. जेथे ७०० च्या वर विद्यार्थी संख्या आहे तेथे क्रिडा शिक्षक द्यावेत अशी माझी विनंती आहे.

५) मनपाच्या १० पेक्षा जास्त शिक्षक असणाऱ्या शाळा २५ आहेत. २५ शाळा असतांना ११ क्रिडा शिक्षक आहेत. राहिलेल्या उर्वरित शाळेवर क्रिडा शिक्षक देण्यात यावे.

६) नारेगाव येथील शाळेत श्री.आर.बी. शेख, शिक्षक दि. १४/८/९७ रोजी नव्याने नेमणूक केली व २९/१०/९७ रोजी परत त्याच शिक्षकाची बदली करण्यात आली. अवघ्या दिड महिन्याच्या कालावधीत बदली करण्यात आली जे शिक्षक तेथे १०-१० वर्षापासून एकाच जागेवर काम करतात त्यांची बदली का करण्यात येत नाही. नवीन येणऱ्या शिक्षकाची कमीत कमी १ वर्ष तरी त्याची बदली होवू नये अशी माझी विनंती आहे. शिक्षणाधिकारी हे कुणाच्या दबावाखाली येवून ह्या बदल्या करतात याचा खुलासा करावा. नारेगाव येथे विद्यार्थी संख्या विचरात घेता १९ शिक्षकांची आवश्यकता आहे. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**सौ. मोहसिना बिल्कीस :** १) बऱ्याच इमारती मनपा ने शाळा चालविण्यासाठी भाडेतत्वावर खाजगी मालकाकडून घेतलेल्या असून त्या पडझडीला आलेल्या असून त्या ठिकाणी शिक्षक व विद्यार्थी यांची मृत्यू हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी मनपाच्या स्वतऱ्च्या मालकीच्या इमारती शाळेसाठी बांधण्यास कार्यवाही करावी.

२) डी.पी.ई.पी. च्या १२ शाळांमध्ये शिक्षक कामे करतात व हे सर्व शिक्षक जिल्हा परिषदेच्या शाळेत कामे करीत आहे.

३) शिक्षण विभागात उप शिक्षणाधिकारी व मराठी/उर्दु माध्यमाचे सुपरवायझर त्याच खालोखाल केंद्र प्रमुख अशा पदांची निर्मिती करावी. म्हणजे शिक्षण विभागाची प्रगती होईल व शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी मनपाने प्रयत्न करावेत.

**श्रीमती आबेदा बेगम :** वार्ड क्र. २६ मध्ये मनपाच्या शाळेवर शिक्षक कमी तर मुले जास्त असा प्रकार झालेला आहे. मुलांना बसण्यासाठी (सतरंजी) पट्टया नाही व शाळेच्या इतर इमारतीचे साहित्य व्यवस्थित राहिलेले नाही. त्यामुळे त्रास होतो व मुलांनाही योग्य रित्या बदल घडवून आणता येत नाही. त्याबद्दल मी शिक्षणाधिकारी यांना पत्र दिलेले होते. परंतु काहीही कार्यवाही आजपर्यंत केलेली नाही.

**श्री. गजानन बारवाल :** १) शाळेवर जेथे जेथे शिक्षकांची संख्या अपुरी आहे त्याबाबतचा आढावाघेवून एक समिती गठित करावी. त्यानंतर हा प्रश्न सुटेल असे माझे मत आहे.

२) शाळेमध्ये साहित्य पुरवठा होण्याबाबत चे वेळेवर व व्यवस्थित नसते त्याची पुर्तता करावी व खेळाचे साहित्य अपुरे आहे असे मला वाटते. त्यामुळे मुलांना त्याचा फायदा घेता येत नाही. खेळांच्या साहित्याबाबत जिल्हा क्रिडा अधिकारी यांच्याकडून योग्य ती माहिती घेवून पुर्तता करावी.

३) बऱ्याच शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय नाही. संडास, बाथरुम मुलांना खेळण्यासाठी पुरेपुर जागा नाही. ज्या शाळेच्या हद्दीत असणारी जागा त्याला तार कुंपन नाही. मोकळी जागा असल्यामुळे जनावरे जावून त्या ठिकाणी बसतात. तसेच इतर शाळेच्या व्यतिरिक्त खेळ खेळणारे मुले क्रिकेट कबड्डी इतर खेळ शाळा बंद झालेल्या नंतरच्या वेळात त्याठिकाणी खेळतात. याकडे शिक्षण विभागाचे दुर्लक्ष आहे.

४) शहरात काही संस्था मनपाच्या शाळा चालविण्यासाठी दत्तक ह्या धर्तीवर घेण्यास तयार आहेत. तशी सभागृहाचे संमतीने देण्याची तयारी

असेल तर आपण संस्थेकडे मनपाच्या शाळा देऊ शकतात. दिल्यास नक्कीच मुलांच्या भविष्यात प्रगती होईल.

५) आदर्श शाळांची काय प्रगती आहे. याची माहिती द्यावी व जास्त शाळांच्या विकासासाठी मनपाने बजेट नेहमी जास्तीत जास्त लक्ष ठेवावे अशी माझी विनंती आहे.

६) जिल्हा परिषदेच्या काही शाळा हस्तांतर करण्याबाबतचा जो प्रस्ताव मागे ठेवलेला होता तो सविस्तर माहितीसह ठेवावे.

**श्रीमती अलका पाटील** : शहरातील प्रभाग क्र. ५३ येथील मनपाच्या शाळेची पाहणी करुन मा. आयुक्तांनी "आदर्श शाळा" म्हणून निवड केलेली आहे. शाळेत १ हजार विद्यार्थी आहेत परंतु शाळेवर शिक्षक कमी आहेत. त्यामुळे मुलीच्या शिक्षकाची हेळसांड होते. यामध्ये उर्दु, माध्यम ही असून येथील शिक्षकांच्या संख्या कमी आहे. येथील शाळेमध्ये विद्यार्थी संख्येच्यामानाने शारीरीक शिक्षकाची आवश्यकता आहे. आदर्श मानल्या गेलेल्या या शाळेत येथील विद्युत लाईट बंद आहेत येथील शाळेच्या आवारात इतर बाहरील मुले शाळा बंद असल्यास क्रिकेट व इतर खेळ खेळतात याकडे याचे दुर्लक्ष आहे.

**श्री. गंगाधर गाडे** : १) शिक्षण घेणे महत्वाचे आहे याबाबत प्रशासन व केंद्र शासनाने ही याबाबत पाठपुरावा केलेला आहे. महानगरपालिका ज्या शाळा चालवित आहेत. त्या ठिकाणी नागरीकांची पाल्यांना ज्या अपेक्षा (सुविधा) असतात त्या मिळत नाही. स.स. सुर्यवंशी यांनी सुचना केल्याप्रमाणे २७००० हजार विद्यार्थी महानगरपालिकेच्या शाळेत शिक्षण घेतात. या शाळेत कामगार व बहुजन समाजातील गोरगरीबांची मुले शिक्षण घेतात मोठ्या मोठ्या व्यापारी अधिकारी याची मुले या शाळेत शिक्षण घेत नाही असा माझा आरोप आहे.

२) शाळेवर शिक्षकाच्या बदल्या नेहमी करणे हे मुलांच्या शिक्षणावर अपायकारक आहे व ज्या शिक्षकाला एकाच शाळेवर खुप कालावधी झाला असेल अशा शिक्षकाची बदली करणे योग्य आहे परंतु शिक्षणाधिकारी हे कुणाच्यातरी सुचनेनुसार बदल्या करतात हे योग्य नाही. परीक्षेच्या वेळी ज्या परीक्षा घेतल्या जातात एक पेपर वर दोन विषयाचे प्रश्नपत्रिका छापलेल्या आढळून आले हे कुठल्या नियमात बसते. मनपाच्या एवढा मोठा खर्च होतात व शाळेसाठी एवढी चिकाटी का दाखवता येत नाही.

३) येत्या १५ ऑगस्ट दिनानिमित्त मुलांना ड्रेस देण्यात आलेले नाही जे ड्रेस दिले ते व्यवस्थित शिवलेले नाही. एक समान माप घेवून हे ड्रेस शिलेले आहेत मुलांच्या उंची वयोमर्यादा या बाबीचा विचार करुन हे ड्रेस वाटप करण्यात आलेले नाही ही मनपाच्या बाबत नागरीकांच्या मनात उदासिनता झाली आहे.

४) सावित्रीबाई फुले दत्तक योजना आपल्याकडे शासनाने दिलेली आहेत. विद्यार्थ्यांकडून रु. १०/- परिक्षा फिस घेतली जाते. असे एकुण ४० हजार जमा झालेले आहे. त्या परिक्षा फिसची जबाबदारी कोण घेणार याचा संबंधीत अधिकारी याचा यापुढे विचार पुर्वक शिक्षण विभागाचे कार्य करावे.

५) दि. २७/११/९७ रोजी एका विषयाचा पेपर होतो आणि त्याच विषयाचा पेपर परत १/१२/९७ घेण्यात येतो असे माझ्या निदर्शनास आलेले आहे. हे अशा गलथान कारभारामुळे मुले शिक्षणापासून वंचित राहत आहे. याची जबाबदारी शिक्षणाधिकारी यांनी घ्यावी.

६) गरवारे क्रिडा संकुलात जे व्यवस्थापक पद निर्माण केले त्या पदावर उच्च शिक्षण घेतलेले उमेदवार त्याची निवड करण्यात आली नाही जे शिक्षणाधिकारी यांच्या संबंधीत आहेत. त्यांची त्या ठिकाणी निवड करण्यात आली. कोणत्याही पदावर नेमणूक करताना पात्रता व जेष्ठता पाहुन नेमणूक करावी असे प्रशासनाने करावे. तसे या ठिकाणी झालेले दिसत नाही उलट शिक्षणाधिकारी यांच्या गलथान कारभारामुळे या करिता शिक्षणाधिकारी यांची बदली झाली पाहिजे व दुसरी बाब म्हणजे जे शिक्षक मनपाच्या वाटेवर आहेत त्याची मुले ही मनपाच्या शाळेतच शिक्षण घेत असलेले पाहिजे म्हणजे शिक्षक वर्गही काळजीपुर्वक इतर विद्यार्थ्यांना खात्रीदायक शिकवण देईल.

**श्री. हमीदउद्दीन ताबा :** १) शिक्षण विभाग हा एक प्रकारचा राजकारणाचा अड्डा बनलेला आहे जे की शाळेतील शिक्षक हे नेहमी मनपाच्या शिक्षकी कार्यालयात व आवारात फिरताना दिसतात आदर्श शिक्षक निवडण्यात फार मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे.

२) मनपाच्या या शाळेवर केंद्र प्रमुख व त्यावरचे पद म्हणजे सुपरवायझर हे पद उपलब्ध करुन तसेच उप शिक्षणाधिकारी हे पद निर्माण करावे.

३) उर्दु माध्यमातील जे आदर्श शिक्षक आहेत त्याचे पदोन्न व नष्ट करण्याचे या शिक्षण विभागाचे धोरण आहे असे वाटते.

४) किराडपूरा येथील शाळेत शिक्षक दिले आहेत ते योग्य प्रमाणात नसून इतर दुसऱ्या शाळेवर असे दिसून येते की, मुले जास्त ते शिक्षक कमी जेथे शिक्षक जास्त तर प्रमाणकानुसार मुले कमी हे होवू नये यासाठी शिक्षणाधिकारी यांनी जबाबदारी ने काम करावयास पाहिजे.

**श्री. संजय जोशी :** १) मनपातील शिक्षण विभागाचा दर्जा खालावलेला आहे ही बाब मान्य आहे. परंतु शाळेचा दर्जा व सुधारावयाचा असेल तर त्यास प्रशासनाचे जेव्हढे काम आहे तेवढेच काम तेथील मुख्याध्यापक व शिक्षक यांचेही आहे.

२) स. सदस्य यांनी सुचविल्याप्रमाणे की आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला तेव्हा भ्रष्टाचार झाला परंतु अद्यापपर्यंत आदर्श शिक्षक पुरस्कार दिलेला नाही दुसरी बाब शिक्षणाचा दर्जा सुधारावयाच्या दृष्टीने जे शिक्षक संघटक असतात ते कार्यालयाशी संपर्क साधून प्रशासनाच्या कामात अडथळा आणून प्रशासनाला दबावाखाली आणतात त्याबाबत कार्यवाही झाली पाहिजे.

३) शहरात बालकामगार हे बरेचशे झालेले आहे त्यासाठी शैक्षणिक दर्जा सुधारेल असे मनपाने काहीतरी सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजे.

४) शहरातील ज्या उर्दु माध्यमाच्या शाळा आहेत त्याचा शैक्षणिक दर्जा सुधारावेत महत्त्वाचे असून शिक्षणाधिकारी यांना या सर्व बाबीकडे जातीने लक्ष दिले पाहिजे.

**श्री. मुजीब आलमशा खान :** शिक्षणाधिकारी हे शिक्षण क्षेत्रात येणाऱ्या कर्मचारी व इतर बाबीवर त्यांचा अंकुश नाही शिक्षकाच्या बदल्या करताना ते कुणाच्या तरी दबावाखाली येवून बदल्या करतात. कमीत कमी एका शिक्षकाची नेमणूक एका ठिकाणी केल्यानंतर १ वर्षापर्यंत त्याची बदली न झाली पाहिजे माजी आयुक्त श्री. भोगे साहेब असतांना शिक्षण विभागाची एक तक्रार नव्हती परंतु शिक्षणाचा दर्जा सुधारावयाचा असेल तर हे आयुक्त या ठिकाणी नको आहे व माझा आरोप आहे. विभागा वाईज कामाचा जास्त व्याप वाढलेला असेल तर आणखी एक उप आयुक्त हे पद निर्माण करावे त्याचबरोबर इतर विभागात अंदाधुंदी कार्यभार होत आहेत असे दिसून येते.

**श्री. अकसरखाँ :** प्रशासनाने शिक्षण विभागाच्या शैक्षणिक दर्जा कसा सुधारिल व मुलांच्या पुढील भविष्यात काहीतरी सुधारणा होईल ह्या दृष्टीने काम करावे.

**श्री. घडामोडे :** १) शैक्षणिक दर्जा सुधारावा ही काळाची गरज आहे परंतु लोकप्रतिनिधी हे शिक्षणाधिकाऱ्यावर दबाव आणून प्रशासनाच्या कामात अडथळा निर्माण करतात त्यामुळे अशा बाबी जो पर्यंत बंद होत नाही तोपर्यंत शैक्षणिक दर्जा सुधारेल असे माझे मत आहे.

२) ज्या खाजगी शैक्षणिक संस्था आहे त्यामध्ये ज्या प्रकारचे प्रशासकीय शिक्षण दिले जाते त्याचप्रमाणे मनपा शैक्षणिक दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने अशा प्रकारचे प्रयत्न करावे.

**श्री. अभिमन्यु भालेराव :** प्रभाग क्र. १४ मध्ये मनपा शाळेत ८०० विद्यार्थी संख्या असताना तेथे शिक्षकाची संख्या कमी आहे. स. सदस्याचे म्हणणे संबंधीत अधिकारी यांच्यावर दबाव आणतात कोणते लोकप्रतिनिधी दबाव आणतात त्याचा खुलासा करावा ८०० विद्यार्थी असून १० शिक्षक आहे व त्या शिक्षकानी नवीन नेमणूक झाली त्याच्याच २-३ महिन्यात बदल्या करण्यात आल्या जे १०-१० वर्षापासून एकाच जागेवर असताना त्याच्या बदल्या का होत नाही. याबाबतीत कोणी दबाव आणत असतील तर त्याच्यावर कार्यवाही झाली पाहिजे.

**श्री. देशमुख :** १) स.स. श्री. गाडे यांनी सभागृहात शिक्षण विषयक जे आरोप केले आहेत ते खरे ओहत काय? दुसरी बाब शिक्षण व विद्युत विभागावर चर्चा करण्यासाठी स्पेशल मिटींग ठेवण्याचे म्हणजे मनपा शिक्षण विभागाचा शैक्षणिक दर्जा ढासळलेला आहे हे उघड होते. शाळेवर ५००-३०० विद्यार्थी असताना तेथे ५ शिक्षक पुरे होते परंतु त्यातील २ शिक्षकाची दुसरीकडे नेमणूक करुन त्या शाळेवर ३ शिक्षक आहे हे योग्य नसून मुलाच्या शिक्षणावर भविष्यात त्याचा परिणाम होतो आहे.

२) शिक्षक गैरहजर असल्यास त्या ठिकाणी संबंधीत अधिकारी याची दखल घ्यावी कारण मुलांची संख्या जास्त व शिक्षक कमी असल्यास शिक्षकाचे त्या संपुर्ण मुलांवर नियंत्रण नसते म्हणून बऱ्याच वेळेस असे दिसून येते की मुले ही शाळेच्या ओट्यावर फिरताना दिसतात त्यामुळे शाळेचा शैक्षणिक दर्जा खालावतो.

३) शैक्षणिक दर्जा सुधारणे हे महत्त्वाचे असून शिक्षणाधिकारी याची आज बदली होणे बाबत सभागृहातील स. सदस्यांनी बोलू नये आज त्याची बदली केली तर मुलांचे आतोनात नुकसान होईल याची स.स. समजून घ्यावे प्रत्येक शाळेत बहुजन समाजाचे विद्यार्थी शिक्षण घेतात याची

दक्षता स.स. घ्यावी. त्याचप्रमाणे शाळेतील मुलाना गणवेश वाटप करताना त्यांच्या वयोमर्यादाची विचारात घेतली गेलेली नाही. सर्व समान ड्रेस वाटप करण्यात आलेले आहे या व इतर सर्व बाबीमुळे मनपातील शाळांचा दर्जा खालावतो व शिक्षक पदाची ही नालस्ती होत जाते याचा विचार शिक्षणाधिकारी यांना करावयास पाहिजे अधिकारी जर बेजबाबदारपणे वागत असेल तर त्यावर ही कार्यवाही झाली पाहिजे.

४) शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी क्रिडा संकुल पाहिजे ही बाब महत्त्वाची असून त्यामुळे शैक्षणिक दर्जा सुधारण्यास मदत होईल.

**श्री. जयवंत ओक** : शैक्षणिक दर्जा सुधारावयाचा असेल तर प्रत्येक शाळेतील मुख्याध्यापक हे हलगर्जपणाने कामे करत असेल तर त्याच्यावर कार्यवाही झाली पाहिजे मनपाच्या शाळेतील १ ते ४ वर्गातील विद्यार्थ्यांना १ ते १५ पर्यंत उजळणी लिहीता येत नाही याला जबाबदार शिक्षकवर्ग व नंतर मुख्याध्यापक आहे. शाळेवर जर शिक्षक कमी पडत असेल तर मा. महापौर यांनी प्रशासनाला शिक्षक भरती करण्यास आदेश देणे व शिक्षक भरती करतांना ती टेक्नीकली ती पदवी परिक्षा पास व शक्यतो अनुभवी शिक्षकाची निवड करावी. सभागृहात चर्चा होते परंतु प्रशासन त्याची अंमलबजावणी करीत नाही. करीता पहिलंदा शिक्षक भरती केली पाहिजे आहे त्या परिस्थितीत शिक्षण विभागावर संबंधीत अधिकारी याचे वचक नसेल तर त्याच्यावर ही प्रशासनामार्फत कार्यवाही केली पाहिजे. परंतु सध्याच त्याची बदली करणे योग्य नसून मुलांचे नुकसान होईल याची जाणीव स.स. नी ठेवावी प्रत्येक शाळेवर भेटी देवून शालेय साहित्य व क्रिडा साहित्य आहे किंवा नाही याची पाहणी करावी.

**श्री. मोहसीन अहमद** : सभागृहात गेल्या ५ वर्षापुर्वी ठराव पास झालेला होता की, शाळेतील सोयी सुविधा कशा असाव्या परंतु संबंधीत अधिकारी हे दुर्लक्ष करतात.

१) प्रत्येक शाळेवर एका चौकीदाराची नितांत गरज आहे.

२) शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी क्रिडा सांस्कृतीक अधिकारी याचा दैनंदिन काय कार्यक्रम असतो याची माहिती द्यावी.

३) नवीन शाळा उघडावयाच्या ठरल्यास त्या ठिकाणी सर्व सोयी सवलती देता येईल याची खबरारी संबंधीत विभागाने घ्यावी.

४) महानगरपालिकेत शालेय साहित्य मागविले जाते ते चांगल्या प्रतीचे नसते त्यासाठी एक चौकशी समिती असल्यास (बोगस) डुप्लीकेट साहित्य खरेदी केली जाणार नाही.

५) महानगरपालिकामार्फत ४ थी ते ७ वी वर्गातल्या मुलांच्या ज्या स्कॉलरशीप परीक्षा घेतल्या जातात जर विद्यार्थ्यांनी ४ थी ची वर्गात परीक्षा दिली तर ७ वी वर्गात विद्यार्थी जाईपर्यंत त्याचे जे स्कॉलरशीप ४० रु. असते ते मिळत नाही मग तो विद्यार्थी ७ वीच्या स्कॉलरशीप परीक्षा कसा बसू शकेल तर ती स्कॉलरशीप जे ४० रु. मिळतात ते विद्यार्थ्यांना मिळाले पाहिजे.

६) शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या हजेरीपटावर उपस्थिती जास्त दाखविण्यात येते याचे कारणे काय?

७) विद्यार्थी दररोज शाळेत येत नाही याची जबाबदारी शिक्षकाची ही असून त्याच बरोबर मुख्याध्यापक ही जबाबदार आहेत विद्यार्थी वेळेवर शाळेत येत नसेल तर त्याच्या आईवडीलांना तसे मुख्याध्यापकाने कळवले पाहिजे.

८) ज्या ज्या महानगरपालिकाच्या शाळामध्ये सोयी सवलती द्यावयास पाहिजे त्या महानगरपालिका व्यवस्थितपणे दिल्याच जात नाही. त्याच वेळात स.स. एक १२ महिन्याचे चक्र असलेले एक चित्र दाखवितात व दुसरे चित्र असते ते घड्याळाचे तिसरे चित्र असते ते नैसर्गिक क्षेत्राचे आकारले असते सभागृहात दाखवतात. माझ्या बोलण्याचा उद्देश हा की, शिक्षणाधिकारी ह्यांना माहित आहे. या शहरात उर्दु माध्यमाच्या शाळा आहेत हे माहित असूनही त्यांनी मराठी माध्यमाच्या मुलाच्या शैक्षणिक दर्जा सुधारण्याच्या दृष्टीकोनातून हे चित्र मुलांना वाटप केलेले आहे. यावरुन ते जातीयवादी आहे असे दिसून येते. त्याच्यावर कार्यवाही झाली पाहिजे सध्या थंडीचे दिवस आहेत व सकाळची वेळ ७-२० वा. आहे ती वाढवून ८-२० वा. करावी विद्यार्थ्यांच्या बोगस हजेरीपट असू नये. मनपाच्या शाळाजवळ इतर कोणत्याही संस्थांना ना हरकत प्रमाणपत्र देवू नये.

**मा. महापौर:** स.स. श्री. मोहसिन अहमद आपणास सुचना देण्यात येते की, महानगरपालिकेचा शैक्षणिक दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने सभागृहात निदर्शनास आणून देण्यासाठी आपण जे साहित्य सभागृहात आणले त्याची पुर्वपरवानगी न घेता सभागृहात आणले ही आपली पहिल्यांदा चुक झाली यापुढे असे होणार नाही याची खबरदारी आपण घ्यावी.

**सौ. लता दलाल :** १) महानगरपालिकेच्या शाळेमध्ये जे विद्यार्थी आहे ते गोरगरीबाचे आहे याचा विचार करावा व ते कोणत्या जातीचे आहे याचा विचार सभागृहात करु नये.

२) ज्या शिक्षकांना एकाच शाळेवर १०-१० १२-१२ वर्ष झालेले असतील अशा शिक्षाकांच्या बदल्या करण्यात याव्या त्यासाठी कोणीही प्रशासनावर दबाव आणू नये.

३) शालेय समितीचे कोणते निर्णय सुचवलेले आहेत व शिक्षणाधिकारी यांनी किती निर्णयावर अंमलबजावणी केली आहे याचा खुलासा करावा.

४) उप महापौर यांच्या वार्डातील शाळेवर बोगस हजेरीपट दाखवलेले आहेत याबाबत तेथील मुख्याध्यापक ह्यांच्यावर कार्यवाही केली पाहिजे कारण त्या शाळेजवळ एक खाजगी शाळा आहे त्या शाळेला ना हरकत प्रमाणपत्र द्यावयास पाहिजे नव्हते ते कसे दिले.

**श्री. गौतम लांडगे :** १) शैक्षणिक दर्जा वाढवण्याचा असेल तर मा. आयुक्त यांचा संबंधीत अधिकाऱ्यावर योग्य ती खबरदारीचे आदेश देवून त्याचे पालन करण्यास सांगणे.

२) महानगरपालिकेच्या शाळेतील शिक्षक व मुख्याधपक हे शाळेच्यावेळात महानगरपालिकेच्या आवारात फिरताना दिसतात यावर शिक्षणाधिकारी ांनी दंडात्मक कार्यवाही करावी.

३) महानगरपालिकेच्या शाळेमध्ये सहामाही परीक्षा ह्या दिवाळीच्या अगोदर घेण्यात याव्यात. शाळेसमोरील परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी तेथील शाळेने प्रयत्न करावे.

४) शिक्षकाच्या बदल्या ह्या त्यांच्या इच्छेनुसार केल्या जातात त्यामुळे शैक्षणिक दर्जा खालावतो याची संबंधीत अधिकारी यांनी दखल घ्यावी. सावित्रीबाई फुले दत्तक योजनेची बैठक एकदाही झालेली नाही.

५) मागच्या वेळेसचे जे शिक्षणाधिकाऱ्या प्रमाणे हे शिक्षणाधिकारी कामकाज करीत नाही याची बदली करण्यात यावी.

**श्री. गौतम खरात :** १) शिक्षण विभागावर स्पेशल मिटींग घेणे जरुरीचे होते काय?

२) बऱ्याच दिवसापासून शिक्षण विभागावर चर्चा करण्याची संधी आज मिळत आहे. आंबेडकर फुले ह्यांच्या काळात बहुजन समाजाला शिक्षण घेण्याची संधी मिळत नव्हती. आजची परिस्थितीचा विचार केला असता ६०% जनता निरक्षर आहे. शैक्षणिक दर्जा सुधारावयाचा असेल तर आपला जातीयोक्त विचार न करता कोणत्याही समाजाच्या विद्यार्थ्याला भेदभाव समोर न ठेवता तेथील शाळेवर योग्य त्या सुविधा उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे.

३) संस्थेच्या शाळेत डोनेशन भरावे लागतात त्यामुळे गरीबांची मुले ही महानगरपालिकेच्या शाळेतप्रवेश घेतात. मागे श्री. पंडीत हे शिक्षणाधिकारी होते. त्याचा शिक्षकावर वचक होता परंतु हे शिक्षणाधिकारी याचा शिक्षकावर कसलाही दबदबा नाही. उलट शिक्षक हे शाळेवर वेळेवर येत नाही. शिक्षणाधिकारी यांनी सुचना देवूनही शिक्षक त्याचे नियम पाळत नाही.

४) शैक्षणिक विकासासाठी शासनाकडून ५०% अनुदान मिळत असते १९८८ पासून शासनाकडून ८४ लाख रु. थकित आहेत ते आपणास मिळावयास पाहिजे परंतु सबंधीत अधिकारी याचा पाठपुरावा करीत नाही. त्यांनी ते मिळण्याची कार्यवाही करावी.

५) शिक्षण व क्रिडा विभागात ९०० कर्मचारी काम करतात त्यामुळे कर्मचाऱ्यावर कामाचा व्याप वाढलेला असून त्यासाठी दोन विभाग करुन एक उपशिक्षणाधिकारी हे पद निर्माण करण्यास हरकत नाही. तसेच सुपर वायझर व वॉचमन यांचे पद निर्माण करावे व सध्याचे असलेले शिक्षणाधिकारी यांची त्वरित बदली करावी अशी माझी विनंती आहे.

**श्री. प्रभाकर विधाते :**

१) मराठी व उर्दु माध्यमासाठी वेगवेगळे दोन सुपरवायझर ठेवावे व कपड्या बाबत सभागृहात चर्चा झाली परंतु कोणताच कपडा हलक्या प्रतीचा नव्हता याची नोंद घ्यावी.

२) विद्यार्थ्यांकडून जी १० रु. फीस घेण्यात आली याची चौकशी व्हावी.

३) शाळेच्या जेथे जेथे दुरुस्तीच्या इमारती असेल ह्या शहर अभियंता यांनी पाहुन नोंद घेवून सर्व शाळेच्या जे जे काम दुरुस्तीचे असेल ते पुर्ण करण्यात यावे.

४) शासनाकडून मिळणारे जे अनुदान आहेत त्यास शिक्षणाधिकारी जबाबदार नसून संपुर्ण प्रशासन जबाबदार आहे. तरी प्रशासनाने जे अनुदान थकित आहे त्याची मागणी शासनाकडे करण्याची शिफारस करावी.

**सौ. रजनी जोशी :** शैक्षणिक दर्जा कसा सुधारेल यासाठी स. सदस्य यांनी सुचना कराव्यात परंतु महानगरपालिकेच्या शाळेत फक्त दलित मुस्लम याचीच मुले येतात हा आरोप चुकीचा असून मी नेहमी शाळेवर भेट देते मला तर असे आढळून

आलेले नाही यासाठी शिक्षणाधिकारी मुख्याध्यापक व शिक्षक पाल्याची एक बैठक घेवून त्यात निर्णय घवून त्याची अंमलबजावणी करावी.

**श्री. सुदाम सोनवणे :**

१) महानगरपालिकेच्या एकुण ८२ शाळा असून त्यात २७ हजार मुले असून ६०० शिक्षक आहेत विद्यार्थी संख्येच्या मानाने शिक्षक कमी पडत असेल तर त्वरित शिक्षक भरती करावी व ८२ शाळांमध्ये प्रत्येक शाळेत क्रिडा शिक्षक व एक शिपाई असा कर्मचारी वर्ग असावा.

२) क्रिडा शिक्षक भरती केले तर त्यांच्या नियंत्रणासाठी एक सुपरवायझर अशी गोष्ट व शिपाई/वॉचमन निर्माण करावे.

३) मुख्याध्यापक हे जर वेळेवर जात नसेल तर त्याच्यावर कार्यवाही झाली पाहिजे कार्यवाही चालू असताना कोणत्याही स. सदस्यांनी कार्यावाहीस विलंब लागेल असे कृत्य करु नये.

४) जे शिक्षक युनियनमध्ये काम करुन प्रशासनावर दबाव आणून होत असलेल्या कार्यवाहीची विलंब लावत असेल तर त्यावर कार्यवाही झाली पाहिजे व त्या ३० सेविका आपल्या शिक्षक विभागात बऱ्याच दिवसापासून काम करतात त्यांना कायम करण्यात यावे. या सर्व बाबीचा शिक्षणाधिकारी यांनी खुलासा करावा.

**मा. महापौर :** शिक्षण विभागावर खुप चर्चा झालेली आहे. स. सदस्यांनी वेगवेगळे असे प्रश्न मांडलेले आहेत तर मा. शिक्षणाधिकारी यांनी या मुद्द्याबाबत सविस्तर माहिती द्यावी.

**शिक्षणाधिकारी :** महानगरपालिकेच्या विद्यार्थी संख्येत जवळजवळ ५५०० ची वाढ झालेली आहे त्यात फक्त १३ शिक्षक भरती केलेली असून २२ शिक्षक सेवानिवृत्त झालेले आहेत त्यामुळे विद्यार्थी व शिक्षक याचे प्रमाणक ठेवण्यास मोठी अडचण निर्माण होत आहेत. उदा. द्यावयाचे झाल्यास एन-७ येथील शाळेत विद्यार्थी संख्या लक्षात घेता या ठिकाणी नेहमी १-२ शिक्षक वाढवून असतात. त्यात अधिकारी यांचा कोणत्याही प्रकारचा स्वार्थ नाही.

महानगरपालिकेच्या उर्दु शाळेमधील एक शाळा अशी आहे की, त्या ठिकाणीचा शाळेचा शैक्षणिक दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने त्या शाळेचे संगन काचे प्रशिक्षण देण्यात येत आहे हे शिक्षण देणारा मी पहिला शिक्षणाधिकारी आहे असे मला वाटते. माझ्या एकंदरीत भेटीबाबत विचार केला असता मराठी माध्यमाच्या शाळेपेक्षा उर्दु माध्यमाच्या शाळेत माझ्या जास्त भेटी झालेल्या आहेत. नारेगाव येथील शाळेत बरीचशी लहान लहान मुले ही उत्कृष्ट दर्जाचे शिक्षण घेत आहेत. ६०० शिक्षक महानगरपालिकेच्या शाळेत शिकवीत असतात परंतु त्याच्या कसल्याही प्रकारची केस शिक्षण विभागावर नाही. शैक्षणिक दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने मुख्याध्यापक शिक्षक व पाल्याचाही समावेश असावयास पाहिजे महानगरपालिका मार्फत घेतल्या जाणाऱ्या संगणकाच्या माध्यमातुन शैक्षणिक दर्जा सुधारण्यात मदत होईल तसेच महानगरपालिकेच्या शाळेमार्फत प्रश्न कसे असावे, इतर प्रथा कशी असावी याबाबत मी माजी शिक्षणाधिकारी यांच्याकडून माहिती मिळविलेली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. शिष्यवृत्ती परिक्षेचे बाबतीत विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका कशी सोडवावी ते समजावून सांगितल्या जाते. त्याचप्रमाणे संगीत शिक्षण शिकविल्या जात आहे.

**श्री. गंगाधर गाडे :** शिक्षणाधिकारी यांनी स. सदस्यांच्या मुद्दयावर खुलासा करावा.

(याच वेळेत अंदाजे ५.५५ वा. स. सदस्य श्री. जयवंत ओक सभागृहात जोरात बोलतात चांगले शिक्षणाधिकारी या मनपामध्ये नको, भ्रष्टाचारी अधिकारी पाहिजे चांगला शिक्षणाधिकारी या कार्यालयात गय नसते ही खेदाची बाब आहे म्हणून सभागृहाबाहेर निघून जातात.)

**मा. महापौर :**

१) शिक्षणाधिकारी यांना पुढील मुदत वाढी बाबत प्रस्ताव प्रशासनाकडून येईल त्यावेळेस मुदतवाढ देवू नये व त्यांना ह्यांच्या विभागाकडे पाठविण्याची शिफारस करण्यात येते.

२) महानगरपालिकेत लवकरच उपशिक्षणाधिकारी हे पद निर्माण करण्यात येईल.

३) सुपरवायझर, उर्दु व मराठी माध्यमाचे ३ दिवसात कार्यवाही करावी व चौकीदार इ. पदाबाबत प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

४) ज्या शाळेत ७०० वर विद्यार्थी असेल तेथे त्वरित शिक्षकाची नेमणूक करावी.

५) स. सदस्य ह्यांच्या सुचनेनुसार ज्या शाळा ७ वाजता भरण्याऐवजी सकाळी ८ वाजता भरण्यात याव्यात.

६) महानगरपालिकेच्या कोणत्याही मराठी/उर्दु माध्यमाच्या शाळेत समान सोयी सवलती उपलब्ध करुन द्याव्यात.

७) नवीन ५५ शिक्षकाची नियुक्ती करण्या संदर्भात सेवायोजन कार्यालय व समाजकल्याण कार्यालयामार्फत कार्यवाही व्हावी.

८) विद्यार्थ्यांकडून १० रु. जी फिस वसूल केलेली आहे त्याबाबत शिक्षणाधिकारी यांनी पुढील मिटींगला खुलासा करावा.

९) शिक्षणाधिकारी यांनी कुणाही स. सदस्य व इतर लोकप्रतिनिधी यांच्या दबावाखाली येवून शिक्षकाच्या बदल्या करु नये. शासनाकडून रु. ८४ लाखाचे अनुदान सन १९८८ पासून थकीत आहे. त्या मागणीचा पाठपुरावा सतत करावा. शाळा बोर्ड बाबत शासनाकडून अपेक्षीत खर्च करावा.

१०) महानगरपालिकेच्या ज्या शाळा दुरुस्तीला असतील त्या संबंधीत अधिकारी यांनी पाहणी करुन त्वरित त्याबाबत कार्यवाही करावी.

११) क्रिडा अधिकारी वर्ग-२ साठी पद निर्माण करावे व प्रशासनाने शासनाकडून प्रतिनियुक्तीवर घ्यावे.

**ठराव :** सर्वानुमते असे ठरले की, महानगरपालिका शिक्षक विभागातील शैक्षणिक आणि शाळांचा दर्जा सुधारणे साठी खालील दर्शविल्याप्रमाणे कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते.

१) शिक्षणाधिकारी यांना पुढील मुदत वाढी बाबत प्रस्ताव प्रशासनाकडून येईल त्यावेळेस मुदतवाढ देवू नये व त्यांना ह्यांच्या विभागाकडे पाठविण्याची शिफारस करण्यात येते.

२) महानगरपालिकेत लवकरच उपशिक्षणाधिकारी हे पद निर्माण करण्यात येईल.

३) सुपरवायझर, उर्दु व मराठी माध्यमाचे ३ दिवसात कार्यवाही करावी व चौकीदार इ. पदाबाबत प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

४) ज्या शाळेत ७०० वर विद्यार्थी असेल तेथे त्वरित शिक्षकाची नेमणूक करावी.

५) स. सदस्य ह्यांच्या सुचनेनुसार ज्या शाळा ७ वाजता भरण्याऐवजी सकाळी ८ वाजता भरण्यात याव्यात.

६) महानगरपालिकेच्या कोणत्याही मराठी/उर्दु माध्यमाच्या शाळेत समान सोयी सवलती उपलब्ध करुन द्याव्यात.

७) नवीन ५५ शिक्षकाची नियुक्ती करण्या संदर्भात सेवायोजन कार्यालय व समाजकल्याण कार्यालयामार्फत कार्यवाही व्हावी.

८) विद्यार्थ्यांकडून १० रु. जी फिस वसूल केलेली आहे त्याबाबत शिक्षणाधिकारी यांनी पुढील मिटींगला खुलासा करावा.

९) शिक्षणाधिकारी यांनी कुणाही स. सदस्य व इतर लोकप्रतिनिधी यांच्या दबावाखाली येवून शिक्षकाच्या बदल्या करु नये. शासनाकडून रु. ८४ लाखाचे अनुदान सन १९८८ पासून थकीत आहे. त्या मागणीचा पाठपुरावा सतत करावा. शाळा बोर्ड बाबत शासनाकडून अपेक्षीत खर्च करावा.

१०) महानगरपालिकेच्या ज्या शाळा दुरुस्तीला असतील त्या संबंधीत अधिकारी यांनी पाहणी करुन त्वरित त्याबाबत कार्यवाही करावी.

११) क्रिडा अधिकारी वर्ग-२ साठी पद निर्माण करावे व प्रशासनाने शासनाकडून प्रतिनियुक्तीवर घ्यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३२/३** : शहरातील विद्युत पुरवठा बाबत चर्चा करणे व निर्णय घेणे.
**मा. महापौर :** शहरातील विज पुरवठा बाबत नंतर चर्चा करण्यात येईल.

**ठराव :** शहरातील विज पुरवठा बाबत नंतर चर्चा करण्यात येईल असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र १३३/४** : पडेगाव कत्तलखान्याकरिता इपयलेंट, ट्रीटमेंट प्लँट बांधणे बाबतचा प्रकल्प अहवालावर विचार विनिमय करणे. "पडेगाव स्लाटर हाऊस दुषीत टाकावू पाण्यावर उपाय योजना करणे."

पडेगाव स्लॉटर हाऊस येथे जनावराची कत्तल करुन विल्हेवाट लावण्याचे काम सन १९८६ पासून अस्तित्वात आलेले आहे. दिवसेंदिवस या ठिकाणी वापरामुळे जमा होणारे दुषीत पाणी यांचे प्रमाण वाढत आहे. यामुळे दुषीत पाण्याचा उपद्रव पुर्णपणे नाहीसा करणे करिता वेळोवेळी ट्रीटमेंट व्यवस्था महाराष्ट्र पोलुशन कंट्रोल बोर्ड यांचे सल्ल्याने करण्यात आलेली होती परंतु ही योजना जास्त प्रभावी व्हावी व त्याचे पासून नागरीकांना उपद्रव होवू नये म्हणून तत्कालिन आयुक्त साहेब यांनी आहे त्या व्यवस्था मध्ये सुधारणा म्हणजे अद्यावत इफ्युलेंट ट्रीटमेंट प्लँट तयार करणे करिता नागपूर येथील "नॅशनल इन्वायरमेंटल इंजिनियरींग रिसर्च इन्स्टीट्यूट (नेरी) ह्या संस्थेला कळविण्यात आले. ह्या संस्थेने पडेगाव येथील महानगरपालिकेच्या कत्तलखाना येथे भेट देवून प्रत्यक्ष सध्याच्या कामाची पध्दतीची पाहणी केली व त्यापासून निघणारे घाण पाण्याचे वेळोवेळी नमुने गोळा करुन नागपूर येथे प्रयोग शाळेत त्याचे विश्लेषण केले. त्यात असे आढळून आले की, सध्या कत्तलखाना येथे दुषीत टाकावू पाण्यावर जी उपाययोजना केली जाते ती अपुरी आहे. त्यामुळे वातावरणावर त्याचा वाईट परिणाम होवून हवेचे प्रदूषण निर्माण होत आहे. आणि म्हणून टाकावू पाण्यावर अद्यावत पध्दतीने उपाययोजना करणे जरुरी आहे. सध्या टाकावू पाण्यावर उपाययोजना करिता जे वेगवेगळ्या प्रकारचे हौदाचे बांधकाम आहे. त्यातून ४०% हद्दी पर्यंतचे उपाय होवू शकतो. म्हणजे ६०% आणखी उपाय योजना करणे जरुरी आहे

आणि म्हणून नवीन अद्यावत पध्दतीने टाकावू पाण्यावर उपाययोजना होणे करिता नेरी ह्या संस्थेने सध्याचे कत्तलखाना इमारतीजवळ सहा वेगवेगळ्या आकारमानाचे हौदाचे बांधकाम करणे व यांत्रिकी साह्याने त्यावर घाणपाणी स्वच्छ करण्याच्या चार उपाययोजना सुचविलेल्या आहे. त्यापैकी एक उपाय योजना हाती घेवू टाकाऊ घाण पाणी महाराष्ट्र पोलुशन नियंत्रण बोर्ड यांचे नियमाप्रमाणे शुध्द व स्वच्छ होवू शकते व हे पाणी कत्तलखाना परिसरात मोकळ्या जागेवर वृक्षारोपन करुन त्या करिता वापरता येऊ शकते ज्यामुळे वातावरणात दुषीतपणा वाढणार नाही व हवामान स्वच्छ राहील. ही उपाययोजना राबविणे करिता ढोबळ माणाने प्रथम टप्प्यात रुपये ३० लाख खर्च अपेक्षीत आहेत. प्रस्तावास मान्यता आल्यास कामाचे अंदाजपत्रके व नकाशे मागविण्यात येतील.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पडेगाव स्लॉटर हाऊस दुषीत टाकावू पाण्यावर उपाययोजना करणेसाठी ढोबळ मानाने रु. ३० लाखाच्या खर्चास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## "पुरवणी विषय पत्रिकेतील विषय"

**विषय क्र १३४/५** : औरंगाबाद नगरपरिषदेचे औरंगाबाद महानगरपालिकेत रुपांतर आल्यानंतर घोषीत झोपडपट्ट्यांच्या संख्येत ही लक्षणीय वाढ झालेली असून आता सुमारे ५४ घोषीत झोपडपट्ट्या असून शहराच्या विविध भागात व सिडको भागातही आहेत. यात नवीन १८ खेडीगावांचा देखील समावेश आहे. अशा परिस्थितीत झोपडपट्टीचा विकास करणेसाठी त्यांचेकडे विशेष लक्ष देवून त्याचे समस्याचा विचार करणे तेथील अडीअडचणी समजावून घेणे विविध प्रकारचे विकास कामे जसे गटार रस्ते इमारती विद्युतीकरण, पथदिवे, कल्याणकारी योजना राबविणे इत्यादी कामासाठी औरंगाबाद महानगरपालिकेने अर्थ संकल्पात झोपडपट्टी सुधारणा १८ खेडी विकास गलिच्छ वस्ती श्रेणीवाढ ५% कमकुवत घटकासाठी तरतुदी शिवाय म्हाडा अनुदान व शासकीय अनुदान आणि विविध सदराखाली अर्थसंकल्पीय तरतुद ठेवलेली आहे. ही तरतुद सुमारे २१८.०५ कोटी इतकी होते व या वर्षात आतापर्यंत ३०% इतका खर्चही खर्ची पडलेला नाही व इतक्या मोठ्या प्रमाणावर कामे करण्यासाठी झोपडपट्टी व विद्युत कामासाठी योग्य स्वतंत्र विभाग निर्माण करणे आवश्यक आहे. झोपडपट्टी व विद्युत कामासाठी योग्य प्रकारे कामे करता यावी व आर्थिक तरतुदीचा वापर करता यावा म्हणून आणि शासकीय व म्हाडा अनुदानाचा पुरेपुर विकासाच्या कामात उपयोग करता यावा म्हणून एक कार्यकारी अभियंता (झोपडपट्टी विकास) म्हणून नवीन पद निर्माण करणे आवश्यक आहे व त्यांना आवश्यक ते अधिकारी व कर्मचारी वर्ग देवून एक स्वतंत्र विभागाची स्थापना करणे आवश्यक आहे. तरी हे पद निर्माण करुन शासनाची मंजुरी घेणे व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदीप्रमाणे नियुक्ती करणे संबंधी कार्यवाही करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.

सुचक - श्री. प्रदिप जैस्वाल.
श्री. सुदाम सोनवणे

अनुमोदक - श्री. गौतम खरात
श्री. संजय जोशी
श्री. फैय्याज कुरैशी.

**संवाद**

**मा. महापौर :** सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. महानगरपालिकेची एकुण ३२ कोटी रुपयाचे अर्थ संकल्पीय तरतुद वेगवेगळ्या भागात वाटणी करुन एका भागासाठी ८ कोटीसाठी "एक कार्यकारी अभियंता" याप्रमाणे समान कामाची वाटणी करुन "एक कार्यकारी अभियंता" पद महानगरपालिकेच्या अस्थापनेवर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या तरतुदीनुसार निर्माण करणे बाबत प्रस्ताव शासनाकडे मंजुरीस्तव पाठवावा व ६ महिन्याच्या कालावधीकरिता मा. आयुक्त यांनी आपल्या अधिकारात सदरील पद तात्पुरते व तातडीने भरुन घेण्याची कार्यवाही करावी. या स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद नगर परिषदेचे औरंगाबाद महानगरपालिकेत रुपांतर झाल्यानंतर घोषीत झोपडपट्टीच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे व सदर विकासाची कामेही वाढलेली आहेत. यात प्रामुख्याने १८ खेडी गावासह ५४ घोषीत झ ोपडपट्टीचा समावेश आहे. विविध कल्याणकारी योजना राबविणे, गटारी, रस्ते, इमारती, उद्याने, पाणीपुरवठा व जलनिस्सारण, विद्युत यांत्रिकी, विभागाची कामे गलिच्छ वस्ती श्रेणीवाढ झोपडपट्टी सुधारण इ. कामांचा समावेश आहे. ही सर्व कामे पार पाडण्याकरिता महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सध्या तीन कार्यकारी अभियंता कार्यरत आहे. उपरोक्त सर्व कामांचा व्याप लक्षात घेता प्रभाविपणे सर्व कामे करणे शक्य होत नाही. शासकीय अनुदान व महानगरपालिकेचा निधी मिळून रु. ३२.७१ कोटीचे विविध विकास कामाकरिता आहेत. शासनाच्या प्रमाणकानुसार रु. ८ कोटीच्या कामाकरिता एक कार्यकारी अभियंता असणे आवश्यक आहे. त्यानुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यकारी अभियंता कमी आहे. करिता उपरोक्त बाबी लक्षात घेता महानगरपालिका अस्थापनेवर "कार्यकारी अभियंता" पदाचे एक पद निर्माण करण्यास मान्यता देण्यात येते. सध्या स्थितीतील कामाचा व्याप लक्षात घेता शासकीय अनुदान म्हाडा अनुदानाचे कामे विहीत मुदतीत पुर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून मा. आयुक्त यांच्या अधिकारात सहा महिने करिता कार्यकारी अभियंता या पदावर नियमानुसार तात्काळ नेमणुक करण्यास स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. प्रस्ताव शासनाकडे मंजुरीस्तव पाठवावे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३५/६ :** महानगरपालिकेने १९९२-९३ साली मंजुर विकास योजनेअंतर्गत ३० फुट रोड काढण्यासाठी जागाचे संबंधीताना पैसे देवून ४ वर्ष झाले. परंतु अद्याप जागा महानगरपालिकेने आपल्या ताब्यात घेतली नाही. नागसेन कॉलनी ते जिन्सी रोडचे पैसे दिले परंतु जागा ताब्यात घेतलेली नाही. तरी सदर जागा त्वरित ताब्यात घेण्यासाठी सहा. संचालक नगर रचना महानगरपालिकेस आदेश देवून रोड सेक्शनच्या ताब्यात सदर जागा देण्यात यावी.

सुचक - श्री. मोहसीन अहेमद
अनुमोदक - श्री. फैय्याज कुरैशी

**मा. महापौर :** मंजुर

**ठराव :** प्रस्तावात दर्शविलप्रमाणे महानगरपालिकेत सन १९९२-९३ साली मंजुर विकास योजने अंतर्गत ३० फुट रोड काढण्यासाठी जागाचे संबंधीताना पैसे देवून ४ वर्ष झाले. परंतु अद्याप जागा मनपाने ताब्यात घेतली नाही. नागसेन कॉलनी ते जिन्सी रोडचे पैसे दिले परंतु

जागा ताब्यात घेण्याबाबत नगर रचना विभागाने कार्यवाही करणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३६/७ :** महानगरपालिकेने मंजुर विकास योजनेअंतर्गत आरोग्य केंद्र, स्टेडीयम, वाचनालाय, शाळासाठी जागा विकत घेतली परंतु पैसे देवून ही त्या जागाचे पी.आर. कार्ड चा इसमाच्या नावाचेच आहे. तरी सदर जागा पी.आर. कार्डस त्वरित महानगरपालिकेचे नावे तयार करुन घेण्यात यावे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. मोहसीन अहमद
अनुमोदक - श्री. फैय्याज कुरैशी
**मा. महापौर:** मंजुर

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेने विकास योजनेअंतर्गत आरोग्य केंद्र, स्टेडीयम, वाचनालय शाळासाठी जागा विकत घेतली परंतु पैसे देवूनही त्या जागेचे पी.आर. कार्ड संबंधीत कार्यालयाकडून महानगरपालिकेच्या नावे करण्याची सर्वानुमते मंजुरी स्विकृतीसह देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा. महापौर :** "मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र" उभारण्यासाठी जागेचा जो वाद आहे त्याबाबत एका समितीचे गठन करण्यात येते. सदरील समितीने सात दिवसात आपला अहवाल सादर करावा. समितीत खालीलप्रमाणे स. सदस्य राहतील.

१) श्री. अलफखान २) नागनाथ फटाले ३) युनुस मोतीवाला ४) श्री. ॲड. अरुणचंद कापडीया ५) श्री. सुतारी आर्किटेक्ट ६) श्री. रिझवान दै. लोकमत पत्रकार ७) श्री. गौतम लांडगे ८) श्री. मुश्ताक अहमद ९) श्री. संजय जोशी १०) श्री. सुदाम सोनवणे ११) उप आयुक्त-१ श्री. कमलाकर फंड.

आजची सभा तहकुब करण्यात येवून उद्या दिनांक १६/१२/९७ रोजी सकाळी ११.३० वा. घेण्यात येईल. असे महापौरांनी घोषीत केले.

"जन गन मन" या राष्ट्रगीताने सभा संपल्याने मा. महापौर यांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक २५/१२/१९९७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**दि. १६/१२/९७ रोजी तहकुब करण्यात आलेली सभा मंगळवार १६/१२/९७ रोजी ११.३० वाजता मा. महापौर श्री. अब्दुल खान (मामु) त्यांचे अध्यक्षतेखाली "कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृहात "वंदेमातरम्" या राष्ट्रगीताने सुरु झाली ह्या सभेस प्रशासकीय अधिकाऱ्यासह खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स. श्री. तरवेंद्रसिंह महेंद्रसिंह धिल्लन
२) स.स. श्री. सुदाम सोनवणे
३) स.स. श्री. फैय्याज अहमद कुरैशी
४) स.स. श्री. प्रभाकर सिताराम विधाते
५) स.स. सौ. रुखमनबाई लोखंडे
६) स.स. श्री. अफसरखाँ यासिनखाँ
७) स.स. सौ. साजेदा बेगम
८) स.स. म.सलिम म. हनीफ कुरैशी
९) स.स. श्री. गौतम भागाजी खरात
१०) स.स. सौ. रजनी रमेश जोशी
११) स.स. सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक
१२) स.स. सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे
१३) स.स. श्री. गौतम लिंबाजी लांडगे
१४) स.स. श्री. महादेव पुंडलिकराव सुर्यवंशी
१५) स.स. श्री. अभिमन्यु रामभाऊ भालेराव
१६) स.स. श्री. इंगळे रविन्द्र बाबुराव
१७) स.स. सौ. पद्मा बाबुराव शिंदे
१८) स.स. श्री. प्रफुल्ल लालचंद मालानी
१९) स.स. श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ
२०) स.स. सौ. धनश्री अशोक विसपुते
२१) स.स. श्री. अजिजखाँ गणीखाँ
२२) स.स. श्रीमती आबेदाबेगम मो. मुस्तफा
२३) स.स. श्रीमती नुरजहाँ बेगम अ. रहेमान
२४) स.स. श्री. वसंत विनायकराव देशमुख
२५) स.स. श्री. हाजी मोहसिन अहेमद हाजी बशीर अहेमद
२६) स.स. सौ. मोहसिना बिल्कीस विश्वारोद्दीन
२७) स.स. श्रीमती जाहेदा बेगम म. जमीर
२८) स.स. श्री. किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
२९) स.स. श्रीमती पुष्पाताई सुरेशचंद्र गंगवाल
३०) स.स. श्री. हमीदउद्दीन ताबा
३१) स.स. श्री. म.अ. रऊफ म.अ. माबुद
३२) स.स. श्री. स.अ. इकबालोद्दीन स.मो. कुतुबउद्दीन

३३) स.स. श्री. सैय्यद अली मिरांसलामी
३४) स.स. श्री. रमेश दिपचंद लाहोट
३५) स.स. सौ. मुक्ताबाई सुदाम वाघमारे
३६) स.स. सौ. लता श्रिनिवास दलाल
३७) स.स. श्रीमती अलका रमेश पाटील
३८) स.स. सौ. शकुंतला हरिदास धांडे
३९) स.स. श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
४०) स.स. कु. माया लिंबाजी लाडवाणी
४१) स.स. सौ. सविता संजय आव्हाड
४२) स.स. श्री. गंगाधर सुखदेव गाडे
४३) स.स. श्री. गजानन रामकिसन बारवाल
४४) स.स. श्री. संजय रामदास जोशी
४५) स.स. श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
४६) स.स. श्री. अविनाश लक्ष्मण कुमावत
४७) स.स. सौ. ज्योत्सना दौलतराव हिवराळे
४८) स.स. श्री. राजकुमार उर्फ सांडू बचाटे
४९) स.स. सौ. राधाबाई तळेकर
५०) स.स. श्री. नरसिंग मुरलीधर ढगे
५१) स.स. श्री. विठ्ठल किसन जाधव
५२) स.स. श्री. विजयकुमार गजानन मेहेर
५३) स.स. सौ. मंदा धनंजय काळुसे
५४) स.स. सौ. सुनंदा उत्तम कोल्हे
५५) स.स. श्री. बन्सी तुळशीराम गांगवे
५६) स.स. श्री. भगवान देविदास घडामोडे
५७) स.स. श्री. कचरु चंद्रभान नवपुते
५८) स.स. श्री. मोहमद मुस्तफा अहमद

**विषय क्र. १३७/१** : शहरातील विद्युत पुरवठा बाबत चर्चा करणे व निर्णय घेणे.

**संवाद**

**श्री. सुदाम सोनवणे :** स. सदस्यांची सभागृहात गणपूर्ती नसल्यामुळे सभा १० मिनीटासाठी तहकुब करण्यात यावी.

**मा. महापौर :** ठिक आहे. सभागृहात गणपूर्ती अभावी सभा १५ मिनीटे तहकुब करण्यात येते. (सभेला सुरुवात ११.५० वाजता)

**श्री. अफसर खान :** आगामी आचारसंहीता लक्षात घेता विद्युत विभागातील शहरातील सर्व कामे मा. आयुक्तांनी एक लाख रुपयापर्यंत करुन घेत जावी. या सुचनेस मा. सभागृहात मान्यता द्यावी ही विनंती.

**मा. महापौर :** सर्वसाधारणपणे विद्युत विभागाची १ लाखाची जी जी कामे असतील त्यास मंजुरी देता येत असेल तर प्रशासनाने ठरवावे.

**उप आयुक्त-२** : ज्या वेळेस तातडीचे काम करावयाचे झाल्यास अधिनियमाचे कलम ७३ ६७ "क" च्या नियमानुसार मा. आयुक्त यांना कायद्याने मंजुरी देण्याचे अधिकार आहेत.

**श्री. मोहसीन अहमद :** संबंधीत विभागातील अधिकारी हे कार्यक्षम नाही हा माझा आरोप आहे. विद्युत विभागात लाईनमन किती, महानगरपालिकेच्या इमारती किती, ह्या संपुर्ण विभागाच्या अंतर्गत किती कर्मचारी काम करतात याची माहिती सभागृहाला द्यावी. एकुण शहरातील १७ हजार लाईटपोल असून त्या अनुषंगाने २ विद्युत उप अभियंता ह्या विभागात काम करतात. हया अंतर्गत लाईनमन २४-२५ आहेत. रोजंदारीवर काम करणारे कर्मचारी २० ते २५ आहेत. माझ्या माहिती प्रमाणे १७ हजार पोलवरील जे कामकाज आहे ते २ इंजिनियर यांना कामाचा व्याप जास्तीचा झालेला आहे असे वाटते. त्यासाठी एका-एका इंजिनियर ह्यांच्या अंतर्गत २ ते ३ उप अभियंता तसेच २ ते ३ सुपरवायझर पाहिजेत. शहरातील पोलाची संख्या विचारात घेता लाईनमन कमी झालेले आहेत. त्यामुळे प्रशासनास काम करण्यास अडचण निर्माण होत आहे. संबंधीत अधिकारी यांनी मनपा विद्युत विभागाअंतर्गत घेतलेले साहित्य किती आहे त्यातील किती साहित्य वापरले ओ. त्यातील किती साहित्य मोडतोड झालेले आहे. व किती साहित्य परत केलेले आहे याची माहिती द्यावी.

**श्रीमती आबेदा बेगम :** सभागृहात चर्चा होवूनही व संबंधीत अधिकारी यांना लेखी तक्रार देवूनही काहीही कार्यवाही होत नाही.

**श्री. संजय जोशी :** सभागृहात या अगोदर विद्युत विभागाबाबत चर्चा झालेली आहे. सदरील विद्युत विभागावर प्रशासन याबाबतीत विचार विनिमय करीत नाही काय? स.सदस्य यांनी संबंधीत विभागाच्या अधिकाऱ्यांना कामाबाबत फोनवर सांगितल्यावर त्याबाबत कार्यवाही होते. ही निंदनीय बाब आहे. लाखो रुपये लाईट विभागावर खर्च केले जातात आणि संबंधीत विभागात कर्मचारी नाही. असे अधिकारी सांगतात बऱ्याच ठिकाणी असे दिसून येते की, एम.एस.ई.बी.चे विद्युत मीटर बसविले जाते व महानगरपालिका आलेले बील (रक्कम) अदाई करते. महानगरपालिकेला ११ लाख रुपये एकुण लाईटबील येते. याबाबत कार्यवाही होवून यापुढे लाईटबाबत कुणाच्याही तक्रारी येणार नाही याची खबरदारी संबंधीत विभागाने घ्यावी अशी माझी विनंती आहे.

**श्रीमती अलका पाटील :** प्रभाग क्र. ५३ येथील वार्डासाठी एम.एस.ई.बी. ने गेल्या २ वर्षापासून १५ पोल लावलेले ओत. त्या पोलवर संबंधीत विभागाला लेखी तक्रार देवूनही आजपर्यंत तार ओढलेली नाही. असे किती ठिकाणचे अर्धवट कामे बाकी आहेत याची सभागृहाला माहिती द्यावी.

**श्री. हमीदोद्दीन ताबा :** महानगरपालिकेच्या विद्युत विभागात कर्मचारी वर्ग कमी असेल तर प्रशासनाने कर्मचारी वर्ग भरती करण्याचे आदेश काढावे. शहरात बऱ्याच ठिकाणी ४-४ दिवस लाईट बंद असतात. एम.एस.ई.बी. अखत्यारित जी जी शहरातील कामे येतात व मनपा संबंधीत विभागाकडून लाईनमनची विद्युत लाईट कामे करण्यासाठी मागणी करुनही कर्मचारी वर्ग मिळत नसेल तर महानगरपालिकेतील कर्मचारी वाढवावा.

**श्री. स. अली मिरा सलामी :** विद्युत विभागात साहित्य मिळते, त्यावर कोणाचेही नियंत्रण नाही. स.स. यांनी विद्युत लाईटबाबत तक्रार करुन विचारणा केली असता लवकरच काम होईल असे सांगितले जाते हे योग्य नसून एम.एस.ई.बी. ने कर्मचारी व आपल्या विभागाचे कर्मचारी मिळून विद्युत लाईट बाबत ज्या

तक्रारी येतात त्या कामासाठी कर्मचाऱ्यांची सांगड घालून योग्य त्या कार्यक्षमतेने संबंधीत अधिकारी यांनी ते काम करुन घेणे आवश्यक असते.

**श्री. वसंत देशमुख :** १) महानगरपालिकेच्या शहरातील अखत्यारित येणाऱ्या बिल्डींग व काही ठिकाणच्या शाळा व इतर इमारती यातील असलेले विद्युत मीटर रिडींग व त्यानुसार महानगरपालिकेला अदा करावे लागणारे बील यांचा काहीही ताळमेळ नाही.

२) शहरातील जेथे जेथे अरुंद रस्ते आहे. तेथे संबंधीत विभागात मागविलेले हैड्रोलिक मशीनची गाडी लाईट दुरुस्ती देखभाल करण्यास अडचण येते. त्यासाठी एम.एस.ई.बी. चे लाईनमन यांनी त्या ठिकाणी काम करावे.

**श्री. भगवान घडामोडे :** १) जालना रोडवर ज्या ठिकाणी लाईट नसेल त्या ठिकाणी लाईटची संबंधीत विभागाने व्यवस्था करावी. दुसरी बाब अशी की ज्यावेळेस स.सदस्य कनिष्ठ अभियंता यांनी लाईट बाबत तक्रार करतात त्या वेळेस त्या ठिकाणचे कामे केली जातात. तर संबंधीत अधिकारी यांना शहरातील अशा कामांची माहिती नसते काय?

२) शहरातील बऱ्याचशा रस्त्यावर टेलीफोन विभागाच्या अखत्यारित कामे चालतात. रस्त्यावर खाचखळगे करुन ठेवतात. त्यामुळे नागरिकांच्या अनेक तक्रारी ज्या ज्या संबंधीत विभागाकडे येतात. त्यासाठी संबंधीत विभागाशी व एम.एस.ई.बी. ह्या विभागाशी मनपालिकेचे संबंधीत विद्युत विभागाचे अधिकारी यांनी नेहमी संपर्क साधून शहरातील कामे करावीत.

**श्री. गंगाधर गाडे :** १) एम.एस.ई.बी. महानगरपालिकेच्या जागेवर पोल बसवले त्याबद्दल महानगरपालिका भाडे आकारते काय? जे लाईट पोलवर लावले जाते त्याची नोंद होते काय?

२) विद्युत विभगासाठी जे साहित्य मागविले जाते त्या साहित्याचे प्रशासनामार्फत तपासणी झाली पाहिजे.

३) विद्युत विभागाच्या तक्रारी संदर्भात मागच्या वेळेस बैठक झाली होती त्या अनुषंगाने काही कार्यवाही केली काय? याची संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

**श्रीमती मोहसीना बिल्कीस :** प्रत्येक वार्डात लाईनमन हे कामाची विभागणी करुन कामे करतात त्यामुळे संबंधीत अधिकारी व स. सदस्य यांनी स्वतः येवून कामाची पाहणी करुन त्या ठिकाणी किती काम झाले आहेत किती बाकी आहेत यांची लेखी नोंद ठेवावी. व त्यावर संबंधीत वार्डातील स. सदस्य यांची स्वाक्षरी असावी. त्यामुळे नागरीकांच्या तक्रारी येणार नाही याची प्रशासनाने दखल घ्यावी. तसेच मागच्या मिटींगमध्ये जी चर्चा झाली होती त्यावर प्रशासनाने कार्यवाही केलेली दिसत नाही.

**सौ. नुरजहाँ बेगम :** विद्युत विभागवर अगोदर एकदा मिटींग झालेली आहेत.झालेल्या चर्चेमधील प्रश्नावर प्रशासनाने अंमलबजावणी केलेली दिसत नाही. माझ्या वार्डात १८ पोल आहेत व ८ पोल तसेच खाली विनाकामाचे आहेत सदरील काम पुर्ण का केले नाही याची माहिती द्यावी.

**श्री. अफसरखाँन :** शांतीनगर भीमपुरा येथील भागात लाईटचे जे काम बाकी आहेत ते येत्या २ महिन्यात पूर्ण झाले पाहिजे अशी माझी मागणी आहे. तसेच कोणत्याही गुत्तेदाराला काम पुर्ण झाल्याच्या अगोदर संबंधीत कामाचे बील देण्यात येवू नये त्यामुळे होणारे काम हे व्यवस्थित होत नाही. शहरात काही ठिकाणी

रात्रीच्यावेळी लाईट बंद असते व दिवसा चालू असते याचे कारण काय? याचा खुलासा करावा.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** १) ज्या नव्याने हैड्रोलिक गाड्या विद्युत लाईटच्या कामासाठी घेण्यात आलेल्या आहेत परंतु त्याचा वापर व्यवस्थित होत नाही.

२) पवननगर येथील डी.पी. रस्त्यात असल्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**श्री. विजयकुमार मेहेर :** १) शहरात लाईट पोल उभे आहेत तेथील पोलवर लवकरात लवकर (लाईट वायर) लावण्यात याव्या.

२) एम.एस.ई.बी. कडून महानगरपालिकेने प्रत्येक पोल मागे भाडे आकारावे असे ठरलेले असतांना सदरील कामाच्या संदर्भाने हजारो रुपये मनपालिकेचे खर्च होतात त्यामुळे महानगरपालिकेला आर्थिक बोजा सहन करावा लागतो.

**सौ. लता दलाल :** १) शहरात बऱ्याच ठिकाणी विद्युत लाईट चोरुन वापरली जात आहे त्यावर कार्यवाही करावी.

२) एम.एस.ई.बी. यांच्याकडून आपल्याला लाईनमन मिळत नाही असे समजते यासाठी मा. महापौर मा. आयुक्त व एम.एस.ई.बी. चे संबंधीत अधिकारी यांच्याशी चर्चा करुन याबाबत कार्यवाही करावी. कारण यामुळे विद्युत विभागची बरीचशी कामे अडकवून राहतात. भाजी मंडई येथील बऱ्याचशा दुकान धारक जास्तीच्या विद्युत लाईटच्या वापर करतात. त्यांच्यावर कार्यवाही झाली पाहिजे.

**मा. महापौर :** संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

**अति. शहर अभियंता :**

१) विद्युत लाईट विभागात कर्मचारी वर्ग कमी असल्यामुळे लाईट विभागातील कामे करण्यास वेग येत नाही. तसेच विद्युत विभागात २५ एकुण लाईनमन असून २ उप अभियंता आहेत, तसेच कनिष्ठ अभियंता आहे. १७ हजार पोल शहरात एकुण आहेत. शहराच्या वाढत्या लोकसंख्या व वाढती प्रभाग यांचा विचार करता नागरीकांच्या सोयी सवलती उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे परंतु कर्मचारी अपुरा असल्यामुळे विद्युत विभागातील कोणतेही कामे व्यवस्थित व लवकरात लवकर होवू शकत नाही. आणखी विद्युत विभागात १ कार्यकारी अभियंता, २ उप अभियंता, ८ कनिष्ठ अभियंता, ८ सुपरवायझर पाहिजे. सुपरवायझर असेल तर कामाची कुठलीही तक्रार येणार नाही. प्रत्येक लाईनमनला ३०० पोलवर काम देण्यास हरकत नाही. आपल्या विद्युत विभागात एकुण २५ लाईनमन २५ असून आणखी लाईनमन कर्मचारी असेल तर ८० ते ९० टक्के कामात वाढ होवू शकते.

२) विद्युत विभागाच्या अंतर्गत पहिल्यांदा ५०० पोल होते. आता पोलीच संख्या एकुण १७ हजार झाली आहे. त्यामुळे कामाचा व्याप लक्षात घेता एम.एस.ई.बी. चे जे लाईनमन आहे. त्यांनी काम करावयास पाहिजे. परंतु काही वेळसे संबंधीत कर्मचाऱ्याची मागणी केल्यानंतर ही कर्मचारी काम करण्यास येत नाही. यासाठी कर्मचारी वर्ग वाढविणे आवश्यक आहे.

३) महानगरपालिकेच्या विद्युत विभागामार्फत जे हैड्रोलिक गाडी मागविली होती त्या गाडीद्वारे फक्त शहरातील जे सोडीयम व्हेपरचे जे दिवे आहेत त्याची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी संपुर्ण वेळ जातो त्यामुळे ह्या हैड्रोलिक गाडीचा वापर इतर विद्युत कामासाठी जास्त प्रमाणात होत नाही.

४) शहरातील संपुर्ण विद्युत बाबतची कामे ही ३० लाख रुपयाचे संबंधीत विभागाला ठरवून दिलेल्याबजेटमध्ये करावी लागतात. यासाठी हया विभागाला ३० लाखाच्या बजेटपेक्षा आणखी बजेट वाढ होणे आवश्यक आहे.

**श्री. गौतम खरात,**

**श्री. फैय्याज कुरैशी,**

**श्री. गौतम लांडगे,**

**श्री. अफसरखाँ :** मागच्या बैठकीत विद्युत विभागावर चर्चा झाली होती. त्याबाबत काय कार्यवाही केलेली आहेत याची माहिती संबंधीत अधिकारी यांनी द्यावी.

**अति. शहर अभियंता :** याबाबत लवकरच कार्यवाही करण्यात येईल याची स.स. यांनी नोंद घ्यावी.

**मा. महापौर :** बेगमपुरा येथील बीबीचा मकबरा रोडवर लाईटबाबत चर्चा होवून ही त्याबाबत काहीही कार्यवाही झालेली नाही ह्याचे कारण काय? ज्या लाइ्रट बाबतच्या फाईल पेंडींगला आहेत त्या लवकरात लवकर मंजुर का होत नाही? याबाबत आपणास नेहमी स. सदस्यांना बोलावे लागते हे योग्य नाही.

**श्री. फैय्याज कुरैशी :** विद्युत विभागामर्फत कोणकोणत्या वार्डात कोणकोणती लाईट बाबतची कामे केलेली आहेत याची संबंधीत अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**श्री. स. अली मिरा सलामी :** महानगरपालिकेमार्फत आतापर्यंत किती पोल आलेले आहेत.

**अति. शहर अभियंता :** एकूण १५०० पोल आहेत त्यात फक्त ६०० पोलचे काम करावयाचे राहिलेले आहे. राहिलेल्या कामाबाबतची कार्यवाही लवकरच करण्यात येईल. (याच वेळी सभागृहात स. सदस्य मोठमोठ्याने बोलतात काहीही ऐकु येत नाही. मा. महापौर सर्व स. सदस्यांना शांतता राखण्याचे शब्दीक करतात.)

**श्री. प्रभाकर विधाते :** विद्युत विभागात कर्मचारी कमी असेल तर प्रशासनाने त्याबाबत कार्यवाही केली पाहिजे.

**श्रीमती अलका पाटील :** माझ्या वार्डातील जे ८ पोलवरचे काम पूर्ण केले नाही, तर मी उपोषणाला बसणार आहे अशी सुचना करते.

**मा. महापौर :** विद्युत (लाईट) विभागावर खूप चर्चा झालेली असून स. सदस्यांनी आपआपल्या वॉर्डातील वेगवेगळ्या प्रकारचे प्रश्न मांडलेले आहे. याबाबत लवकरच कार्यवाही करण्याचे मी संबंधीत अधिकारी त्यांना सुचना करतो.

१) प्रशासनाने पदाधिकाऱ्यामार्फत प्रस्ताव तयार करुन लवकरात लवकर विद्युत विभागाच्या प्रस्तावावर गांभीर्याने विचार करावा.

२) विद्युत विभागाच्या लाईटच्या कामासाठी जे साहित्य मागविले जाते ते चांगल्या प्रतीचे (क्वालिटी) असावे यासाठी त्याची खात्री करुनच साहित्याचा वापर करण्यात यावा.

३) संबंधीत अधिकारी कोणकोणत्या वॉर्डात कोणकोणते काम अपुर्ण राहिलेले व नव्याने करावयाचे आहेत याची माहिती घेवून ते पुर्ण

करण्याची कार्यवाही करावी संबंधीत वार्डातील नगर सेवकांना त्या कामाबाबतची माहिती द्यावी.

४) शहरातील काही ठिकाणचे लाईट रांत्रदिवस चालू असतात याबाबत कार्यवाही करावी.

५) वॉर्डातील महानगरपालिकेच्या ज्या शाळा आहेत त्या शाळेतील लाईटबाबत काय दुरुस्तीला आहे याबाबत माहिती घेवून तेथील कामे पूर्ण करावी. संबंधीताच्यातक्रारी बाबतची दखल घ्यावी.

६) मा. उपमहापौर यांच्या वार्डातील जी.डी.पी. आहेत ती बदलुन त्या ठिकाणी जास्त पावसाची डी.पी. बसविण्यात यावी.

७) प्रत्येक नगरसेवकाच्या तक्रारीची दखल संबंधीत अधिकारी यांनी घ्यावी.

८) विद्युत विभागात जे अधिकारी आहेत त्यांनी ३ वाजेच्या नंतर कार्यालयातील नागरिकांच्या तक्रारी स्विकारण्यासाठी कार्यालयात थांबावे.

९) प्रशासनाने विद्युत कर्मचारी वर्ग भरती करण्याची कार्यवाही करावी व विद्युत विभागातील सुपरवायझर पद त्वरित निर्माण करुन भरण्यात यावे.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अनु. क्र. १ ते ९ मा. महापौर यानी सुचित केल्याप्रमाणे संबंधीत विभागाने आवश्यक टिपणी तयार करुन प्रशासकीय प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे लवकर ठेवण्याची व्यवस्था करावी.

(याच बरोबर मा. महापौर यांनी सुचित केले की, अल्पोपहारासाठी सभा ३० मिनीटे तहकुब करण्यात येते. वेळ अंदाजे १.३० वाजता सभेला सुरुवात २-१५ वाजता)

**विषय क्र. १३८/२ :** औरंगाबाद या शहरातील झोपडपट्टी असलेल्या मिलिंदनगर, कबीरनगर, गाडगेनगर ह्या वस्तीत प्रामुख्याने दलीत मागासवर्गीय मोलमजुरी करणारे हजारो लोक राहतात. ह्या भागातील जनतेसाठी शाळेची सुविधा नाही. तेव्हा या भागातील मुलांच्या शिक्षणासाठी शाळा चालविण्याकरिता डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीने या भागातील रिकामी असलेली नागसेन नगर व मिलिंदनगर वसाहतीतील ५१X३८ मिटर ही रिकामी जागा मागीतलेली आहे. तेव्हा विनंतीवरुन वरील जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीस देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

सुचक - श्री. हमीद ताबा.
अनुमोदक - श्री. अभिमन्यु भालेराव
श्री. एस.ए. जोशी

**संवाद**

**श्री. प्रभाकर विधाते :** सदरील जागा कुणाच्या मालकीची आहे आणि त्या ठिकाणापासून महानगरपालिकेची शाळा किती अंतरावर आहे. याची माहिती द्यावी.

**सहा. संचालक नगररचना :** ह्या प्रस्तावातील जागेची सिटी सर्व्हे नंबर दिलेला नाही त्यामुळे सांगता येणार नाही.

**श्री. कचरु नवपुते :** सदरील जागा कुणाच्या मालकीची आहे याचा स्पष्ट बोध व्हावा आणि जर महानगरपालिकेची असल्यास महानगरपालिकेतर्फ वाचनालय सुरु करावे.

**मा. महापौर :** पुढील बैठकीत तपशीलवार माहिती सह नगररचना विभागाने सादर करावे.

**ठराव :** पुढील बैठकीत तपशिलवार माहितीसह नगररचना विभागाने सादर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## "ऐन वेळचे प्रस्ताव"

**विषय १३९/३ :** मो. उस्मानपुरा येथील गजानन नगर ते श्रेयनगर ५० फुट रुंद रस्ता हा ५०% पर्यंत पुर्ण विकसीत झालेला आहे. तसेच बिजली नगर ते श्रेयनगर हा ५० फुट रुंद रसता विकसीत करणे आवश्यक आहे. ह्या रस्त्यामुळे ज्योतीनगर दशमेशनगर हे भाग श्रेयनगर ला जोडले जातील हा रस्ताही ८०% विकसीत झालेला आहे. उर्वरित जागा संपादीत करुन श्रेयनगरपर्यंत येवून थांबलेला रस्ता पुढे ज्योतीनगरपर्यंत मोकळा होईल व जनतेस त्याचा फायदा होईल करिता प्रस्तुत रस्तासाठी भुसंपादन प्रस्ताव भुसंपादनास लागणाऱ्या खर्चासह मान्यतेस्वत सादर करण्यात येत आहे.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. उस्मानपुरा येथिल गजानन नगर ते श्रेयनगर ५० फुट रुंद रस्ता हा ५०% पर्यंत पुर्ण विकसीत झालेला आहे. तसेच बिजलीनगर ते श्रेयनगर हा ५० फुट रुंद रस्ता विकसीत करणे आवश्यक आहे. श्रेयनगर पर्यंत येवून थांबलेला रस्ता पुढे ज्योतीनगर पर्यंत मोकळा होईल व जनतेस त्याचा फायदा होईल प्रस्तुत रस्त्यासाठी भुसंपादनासाठी लागणाऱ्या खर्चाबाबत शासकीय दराने भुसंपादन करण्यास स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय १४०/४ :** मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेस वेळोवेळी महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पाकरिता निधीची आवश्यकता असते. महानगरपालिकेचे दैनंदिन उत्पन्न व खर्च लक्षात घेता विशेष मोठे प्रकल्प महानगरपालिकेस हाती घेता येत नाहीत. करिता शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानावरच जास्त अवलंबून रहावे लागते. याकरिता महानगरपालिकेतर्फे रोखे उभारल्यास निधी उपलब्ध होवू शकतो. अशा प्रकारचा निधी अहमदाबाद, पुणे ह्या महानगरपालिकांनी उभारला असून नाशिक महानगरपालिकेत अशा प्रकारे निधी उभारणे बाबत कार्यवाही करीत आहे. औरंगाबाद महानगरपालिकेने प्राथमिक स्वरुपात ५० कोटीचे रोखे उभारल्यास महानगरपालिकेस विशेष मोठ्या स्वरुपाची कामे हाती घेता येवू शकतील. यास्तव महानगरपालिकेचे धोरण ठरविल्यास पुढील कार्यवाही करता येईल.

मे. लिझाड क्रेडीट कॅपिटल लि. दिल्ली ही कंपनी अशा प्रकारे रोखे उभारण्याकरिता संस्थानामदत करीत असते यास्तव ते ०.५% उभारण्यात येणाऱ्या रोखे रकमेच्या एवढी किंमत सर्व्हिस चार्ज म्हणून आकारीत असतात. महानगरपालिने सदरील प्रस्तावास मान्यता दिल्यास त्यांच्या मार्फत रोखे उभारण्याकरिता पुढील कार्यवाही करण्यात येईल.

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>संवाद</u>**

**श्री. गौतम लांडगे :** ह्या प्रस्तावाबाबत संपुर्ण माहिती द्यावी.

**मुख्य लेखाधिकारी** : औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पाकरिता निधीची आवश्यकता असते. महानगरपालिकेचे दैनंदिन उत्पन्न व खर्च लक्षात घेता मोठे प्रकल्प महानगरपालिकेस हाती घेता येत नाही. व यासाठी शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानावरच अवलंबून रहावे लागते याकरिता महानगरपालिकेतर्फे रोखे उभारल्यास निधी उपलब्ध होवू शकतो. अशा प्रकारचा निधी अहमदाबाद पूणे या महानगरपालिकांनी उभारला असून नाशिक महानगरपालिकेत या प्रकारचा निधी उभारणेबाबत कार्यवाही चालू आहे. त्याच धर्तीवर औरंगाबाद महानगरपालिकेने प्राथमिक स्वरुपात ५० कोटीचे रोखे उभारल्यास महानगरपालिकेस विशेष मोठ्या स्वरुपाची कामे हाती घेता येवू शकतील. मे. बिझार्ड क्रेडीट कॅपिटल लि. दिल्ली येथील कंपनी अशा प्रकारे रोखे उभारण्याकरिता संस्थांना मदत करीत असते यास्तव ते ०.५% उभारण्यात येणाऱ्या रोखे रकमेच्या एवढी किंमत सर्व्हिस चार्ज म्हणून आकारत असते. यास शासन हमी देते. तेव्हा प्रस्ताव मंजुर झाल्यास पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. मोहसीन अहमद** : ह्या बाबतचा प्रस्ताव सध्या स्थगित ठेवावा. टी.व्ही. वरील सिटी चॅनलवर अधिकाऱ्यांनी याबाबत पुर्वीच मुलाखत दिलेली आहे. तरी चुकीचे असून धोरण ठरल्याशिवाय कोणतीही कार्यवाही प्रशासनाने करु नये. याबाबतची दखल घ्यावी व सदरील प्रस्तावातील संपुर्णपणे माहिती पुढील बैठकीत स. सदस्यांना विचारार्थ ठेवावे.

**मा. महापौर** : प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव** : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेस वेळोवेळी विविध प्रकल्पाकरिता निधीची आवश्यकता असते यासाठी मे. लिझार्ड क्रेडीट कॅपिटल लिमिटेड कंपनी दिल्ली या संस्थेद्वारे रु. ५० कोटीचे प्राथमिक स्वरुपात रोखे उभारुन या कंपनीकडून ०.५% उभारण्यात येणाऱ्या रोखे रकमेच्या एवढी किंमत सर्व्हिसचार्ज म्हणून आकारणी करील ह्या प्रस्तावास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय १४१/५** : सहाय्यक आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासन वित्तीय विभाग शासन निर्णय क्र. स.ले.को./१९९५/प्र.क्र. २६९/९५/कोषागार-१ मंत्रालय मुंबई-३२ दिनांक १५/१/९६ नुसार श्री. म.न. सोनार महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग - १ (क) संवर्गातील अधिकारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी-स्वीयेत्तर सेवा इ.) नियम १९८१ मधील परिशिष्ट-३ मधील सुचना क्र. २ नुसार प्रथमतः दोन वर्षासाठी मुख्य लेखा परिक्षक औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद ह्या सवर्ग पदावर प्रतिनियुक्तीवर पाठविण्यास शासन मंजुरी झालेली आहे.

त्यानुसार महानगरपालिका कडील आदेश क्रमांक/मनपा/अस्था-१/२४१/९६ दिनांक २३/१/९६ नुसार श्री. सोनार यांना दि. २२/१/९६ रोजी मध्यान्हपूर्व मुख्य लेखा परिक्षक या पदावर रुजु करुन घेण्यात आलेले आहे.

महानगरपालिका सर्वसाधारण सभा दि. १२/३/९६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत विषय क्र. १७५/१५ नुसार त्याचे प्रतिनियुक्तीस मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

श्री. सोनार यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि. २१/१/९८ रोजी संमत असल्यामुळे दि. २२/१/९८ पासून पुढील एक वर्षासाठी त्याचा प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढवून देण्याबाबतच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

<u>संवाद</u>

**श्री. कचरु नवपुते :** मुख्यलेखा परिक्षक श्री.एम.एन. सोनार यांची कारकीर्द चांगली असून त्यांचा सेवाकाळ दोन वर्षाचा वाढवून मिळावा.

**मा. महापौर :** प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार महाराष्ट्र शासन निर्णय क्र. स.लो.को./११९५/प्र.क्र. २६९/९५ कोषागार-१ मंत्रालय, मुंबई-३२ नुसार श्री. म.न. सोनार महा.वित्त व लेखा सेवा वर्ग-१(क) संवर्गातील अधिकारी यांना महा. नागरी सेवा महा. वित्त व लेखा संवर्ग-१ (क) संवर्गातील अधिकारी यांना महा. नागरी सेवा (पदग्रहन अवधी-स्वीयेत्तर सेवा इ.) नियम १९८१ मधील परिशिष्ट-३ मधील सुचना क्र. २ नुसार प्रथमतः दोन वर्षासाठी मुख्य लेखा परीक्षक औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद ह्या संवर्ग बाह्य पदावर प्रतिनियुक्तीवर पाठविण्यास शासन मंजुरी झालेली आहे. त्यानुसार महानगरपालिका आदेश क्र. मनपा/अस्था-१/२४१/९६ लेखा परीक्षक ह्या पदावर रुजु करुन घेण्यात आले याबाबतचा महानगरपालिका सर्वसाधारण सभेचा ठराव १७५/१५ नुसार प्रतिनियुक्तीस मंजुरी झालेली आहे.

श्री.एम.एन सोनार मुख्य लेखा परिक्षक यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि. २१/१/९८ रोजी संपत असल्यामुळे दि. २२/१/९८ पासून पुढील एक वर्षासाठी लेखा परिक्षक म्हणून प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढविणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४२/६ :** कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, क्रांतीचौक येथील हॉटेल एलोरा ते पैठणगेट पर्यंत ४०० व २५० मी.मी. व्यासाची सी.आय. जलवाहीनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार रु,१७,२५,६९२/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतुदीमधून पुर्ण करण्यात येईल. तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

<u>संवाद</u>

**श्री. स. अली मिरासलामी :** आचारसंहिता लागू होण्याची शक्यता आहे. तेव्हा तातडीने कामे करावीत.

**मा. महापौर :** ठीक आहे. प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार क्रांतीचौक येथील हॉटेल एलोरा ते पैठणगेट पर्यंत ४०० ते २५० मी.मी. व्यासाची सी.आय. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अंभियांत्रिकी विभागाची सन १९९६-९७ च्या दरसुचीनुसार रु.१७,३५,६९२/- या अंदाजपत्रकास "भांडवली कामाच्या तरतुदी" तून खर्च करण्यास स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय १४३/७ :** मा. श्री. रंगनाथ अप्पर मुख्य सचीव पाण्ीा पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय, मुंबई यांनी पत्र क्र पापु/१०९७/प्र.-१/पापु-२० दि. २०/११/९७ कळविले आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेकडे माहे सप्टेंबर ९७ अखेर विलंब शुल्कासहित एकुण रु. १४,०८,२४,४२७/- इतकी पाणी पुरवठा थकबाकी आहे.

तसेच आदेशीत केले आहे की, नोव्हेंबर ९७ पासून उपरोक्त थकबाकीपोटी दर शासनाकडे वेळोवेळी पाठवावी तसेच त्याची प्रत मा. सचिव नगर विकास विभाग मंत्रालय व मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना देण्यात यावी.

तरी सर्वसाधारण सभेसमोर माहितीस्तव टिपणी सादर.

**श्री. प्रफुल्ल मालानी :** ह्या बाबतच्या प्रस्तावाची माहिती द्यावी.

**कार्यकारी अभियंता (पापु) :** माहे नोव्हे ९७ पासून थकबाकीपोटी दरमहा रु. १५० लक्ष रु १५० लक्ष महाराष्ट्र जीवन प्राधीकरणास देणे बाबत सदरची माहिती सभागृहात देणे बाबत आहे.

**मुख्य लेखाधिकारी :** ह्या प्रस्तावातील शासनाकडून आलेली माहिती मा. सभागृहात माहितीसाठी ठेवलेले आहे.

**मा. महापौर :** ठिक आहे. प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उपरोक्त प्रस्तावाबाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले. हयास स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्र. १४४/८ :** महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागातर्फे औरंगाबाद शहराच्या मुलभूत सेवा सुविधाच्या विकासासाठी रु. १ कोटीचे विशेष अनुदान औरंगाबाद महानगरपालिकेस शासन निर्णय जीईएन-१०९७/११७२//प्र.क्र.२१७/९७ नावि-२४ दिनांक १७/११/९७ वितरीत करण्यास मान्यता प्रदान केली आहे. सोबत शासन निर्णयाची प्रत जोडण्यात आली आहे. मा. सभागृहाच्या माहितीस्तव सादर.

**संवाद**

**श्री. गंगाधर गाडे :** मा. मुख्यमंत्री महोदय यांना पुन्हा एका शिष्टमंडळासह भेटून अनुदानाची मागणी करावी.

**मा. महापौर :** प्रशासनाने योग्य ती कार्यवाही नियमाप्रमाणे करावी.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रशासनाने शासनाने दिलेल्या अटीनुसार नियमाप्रमाणे कार्यवाही करावी ह्या स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्र. १४५/९ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात मागील अनेक वर्षापासून ३० सेविका दरमहा रुपये १०००/- ठराविक वेतनावर काम करीत आहे. शिक्षण विभागात सेविकाच्या जागा रिक्त नसल्यामुळे त्यांना नियमीत सेवेची वेतनश्रेणी व इतर फायदे देता येत नाही. त्यामुळे ठराविक वेतनावरील ३० सेविकांना सेवेत कायम करण्याकरिता ३० सेविकाची पदे निर्माण करुन शासनाची मान्यता देणे आवश्यक आहे.

करिता शिक्षण विभागातील ठराविक वेतनावरील ३० सेविकांना कायम करण्याकरिता ३० सेविकांची पदे वेतनश्रेणी रु. ७५०-१२-८७० दशे-१४-९४० मध्ये निर्माण करण्याकरिता प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शिक्षण विभागात मागील अनेक वर्षापासून ३० सेविका दरमहा रु. १०००/- ठराविक वेतनावर काम करीत आहेत. शिक्षण विभागात सेविकाच्या जागा रिक्त नसल्यामुळे त्यांना नियमीत सेवेची वेतनश्रेणी व इतर फायदे देता येत नाही. त्यामुळे ३० सेविकांना कायम करण्याकरिता ३० सेविकाची पदे वेतनश्रेणी रु. ७५०-९४० मध्ये निर्माण करुन शासनाकडे मंजुरी स्तव पाठविण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४६/१० :** महानगरपालिका हद्दीमधील अनधिकृत वसाहती व (सिडको नोटीफाईड भाग) मध्ये राहणाऱ्या नागरिकांना त्यांचे रहात्या घरात विद्युत पुरवठा घेणेसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून महानगरपालिकेचे नाहरकत प्रमाणपत्र दाखल करणे सक्तीचे केले आहे. त्या शिवाय महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ ग्राहकांना विद्युत पुरवठा करीत नाही. त्यामुळे या भागात राहणाऱ्या असंख्य रहिवाशांची विद्युत पुरवठा अभावी अत्यंत गैरसोय होत आहे. महानगरपालिकेमार्फत पुर्वीप्रमाणे विद्युत पुरवठा होणेसाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे सुरु करावे अशी मागणी केलेली आहे. कारण राज्य शासनामार्फत नुकताच शासकीय आदेश दि. १७/१०/९७ रोजी मंजुर करुन अंमलबजावणीसाठी राज्यातील म.रा.वि. मंडळ कार्यालयांना पाठविला आहे. अनधिकृत वसाहती व सिडको नोटीफाईड भागात राहणाऱ्या रहिवाशांची होत असलेली गैरसोय व नाहरकत प्रमाणपत्र पुर्ववत सुरु करणेची मागणी विचारात घेवून महानगरपालिकेमार्फत विद्युत पुरवठा होणेसाठी ना हरकत प्रमाणपत्र देणेची र्कावाही पुर्ववत सुरु करणेसाठी प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. विठ्ठल जाधव
अनुमोदक - श्री. विकास जैन
श्री. नरसिंग ढगे

**अति. शहर अभियंता** : अनधिकृत वसाहती व (सिडको नोटीफाईड भाग) मध्ये राहणाऱ्या नागरिकांना त्यांचे रहात्या घरात विद्युत पुरवठा करणेबाबत शासनाचे नियमानुसार काही अटी आहेत. त्याप्रमाणे अशा सर्व भागातील राहणाऱ्या लोकांना "ना हरकत प्रमाणपत्र" देता येत नाही. फक्त घोषित झ ोपडपट्टी आहे. त्यांनाच देण्यात येते.

**मा. महापौर :** महाराष्ट्र शासनाचे जी.आर. नुसार व ज्याप्रमाणे मुंबई येथील अनधिकृत वसाहतीमधील नागरिकांना सन १९९५ पासून सुट दिलेली आहे. त्याच अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिकेतील नागरिकांनाही अशाच प्रकारची सवलत देण्यास शासनाकडे कळविले व तीन महिनेपर्यंत याबाबत वाट पहावी आणि त्यानंतर औरंगाबाद मनपाने पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका हद्दीमधील अनधिकृत वासहती (सिडको नोटीफाईड भाग) मध्ये राहणाऱ्या नागरिकांना त्यांचे रहात्या घरात विद्युत पुरवठा घेणेसाठी महा. राज्य विद्युत मंडळाकडून महानगरपालिकेचे नाहरकत प्रमाणपत्र दाखल करुन घेणे सक्तीचे केले आहे. त्याशिवाय महा. राज्य विद्युत मंडळ विद्युत पुरवठा करीत नाही. त्यामुळे नागरिकांची अतिशय गैरसोय होते. यासाठी मुंबई शासनाने ज्याप्रमाणे सन १९९५ पासून सुट दिलेली आहे. त्याचप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिके लाही अशी सवलत देण्यात यावी व तीन महिनेपर्यंत वाट पहावी असा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४७/११ :** माझे वार्ड क्रमांक ४६ तसेच माझ्या वार्डाला लागून असलेले वार्ड पैठणगेट, खोकडपुरा, दलालवाडी, बापूनगर, गांधीनगर, राधामोहन कॉलनी, कामगार हौसींग सोसायटी उटमोहल्ला जरीपुरा, फकीरवाडी असे वस्ती आहे. ज्या मध्ये इथल्या नागरिकांना लग्न समारंभासाठी तसेच सांस्कृतीक कार्यक्रमासाठी रस्त्यावर मंडप बांधावे लागतात त्यामुळे त्यांना खूप त्रास होतो. करीता सादीया टॉकीज पाठीमागचे जे व्यापारी संकलन बांधण्यात आले आहे त्याच्या पहिल्या मजल्यावर आपण एक कम्युनिटी हॉल चांगल्याप्रकारे बांधू शकतो व खालील दुकानदारांना त्रास होवू नये म्हणून या संकुलनाच्या पाठीमागून दलालवाडी मधून येण्याजाण्यासाठी रस्ता आहे जेणे करुन तेथील नागरीकांच्या भावना लक्षात घेवून व त्रास लक्षात घेवून तसेच महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल या दृष्टीने कम्युनिटी हॉल बांधणे करिता सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : कै. सय्यद अली सलामी

अनुमोदक : सौ. मोहसिना बिल्कीस<br>मोहसीन अहमद खाँन<br>श्री. सुदाम सोनवणे

<u>संवाद</u>

**मा. महापौर :** सहा. संचालक नगर रचना विभागाने पाहणी करुन अहवाल सादर करावा.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सहा. संचालक नगर रचना विभागाने पाहणी करुन अहवाल सादर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४८/१२ :** नगर सचीव गोविंद मगरे हे डिसेंबर मध्ये सेवानिवृत्त होत आहे. त्यांना ६ महिन्यासाठी सेवाकाल वाढवून द्यावा.

सुचक : श्री. गौतम खरात, श्री. नरेंद्र पाटील.

अनुमोदक : श्री. गंगाधर गाडे, श्री. काशिनाथ कोकाटे,<br>श्री. गौतम लांडगे, श्री.एस.ए. सलामी,<br>श्री. बी.के. कराड, श्री. बी.डी. घडामोडे,<br>श्री. संजय जोशी, श्री. संजय केनेकर,<br>श्री. सुदाम सोनवणे, श्री. गजानन बारवाल,<br>श्री. प्रकाश निकाळजे

**मा. महापौर :** याबाबत मा. आयुक्त यांनी प्रशासनातर्फे माहिती द्यावी.

**मा. आयुक्त :** शासन नियमाप्रमाणे सेवानिवृत्ती वयोमर्यादा ५८ आहे. आणि त्यानंतर सेवानिवृत्त नियमाप्रमाणे करावे लागते अशा प्रकारची मुदतवाढ देता येत नाही. तथापि मा. सभागृहाच्या मंजुरीने शासनास पाठविणे योग्य राहील.

**मा. महापौर :** सदरील प्रस्ताव शासनाकडे फॅक्सद्वारे महानगरपालिका प्रशासनामार्फत पाठवावे. शासन पातळीवर मंजुरी प्राप्त करण्याचे प्रयत्न करावे त्याचबरोबर त्यांचे मुलास महानगरपालिकेच्या अस्थापनेवर नौकरी देण्याची प्रशासनाने कार्यवाही करावी.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार नगरसचिव श्री. गोविंद विठ्ठल मगरे माहे डिसेंबर ९७ मध्ये सेवानिवृत्त होत आहे. त्यांचा सेवाकाल संपत आल्याने ६ महिन्यासाठी मुदतवाढ देणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा. या व्यतिरिक्त त्याचे मुलास महानगरपालिकेच्या अस्थापनेवर नोकरीमध्ये सामावून घेण्याची कार्यवाही प्रशासनाने करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदरील ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४९/१३ : सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना** उपआयुक्त-२ महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रस्ताव सादर केला आहे केंद्र व राज्य शासनाच्या नवीन धोरणानुसार संपुर्ण देशातील नगरपालिका आणि महानगरपालिकाच्या माध्यमातून दि. १ डिसेंबर १९९७ पासून सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना राबवायची आहे. या योजनेत ७५% केंद्र शासन व २५% राज्य शासनाचा सहभाग असणार आहे. सदर योजना औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील व प्राधान्याने घोषित (५३) झोपडपट्ट्यामधील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील व्यक्तींना (ज्या कुटुंबाचे सर्वमार्गांनी मिळून वार्षिक उत्पन्न रु.१३९९६/- च्या आत आहे) लाभ देण्यात येईल.

**लाभार्थीची निवड पध्दती :** शहरातील (प्राधान्याने घोषीत झोपडपट्ट्यामधील) शासनाकडून प्राप्त झालेल्या विहीत नमुन्याप्रमाणे दारिद्र्य रेषेखालील कुटुबाचे सर्वेक्षणकरुन कुटुंबाचा प्राधान्य क्रम ठरविणे आवश्यक आहे. तसेच शहरी गरिबांसाठी नागरी मुलभूत सेवा योजनेतील मार्गदर्शक तत्वात उल्लेख केल्याप्रमाणे समित्या स्थापनक करुन परिसर विकास समितीच्या साहाय्याने लाभार्थ्यांच्या शिफारशीनंतर शहरासाठी स्थापन "नागरी दारिद्र्य निर्मलून कक्षा" मार्फत राष्ट्रीयकृत बँकाकडे कर्ज प्रकरणे पाठविण्यात येतील. शहरी गरिबांसाठी नागरी मुलभूत सेवा योजनेत नमुद महिलांचे समुह संघटन खालीलप्रमाणे करण्यात येईल.

**शेजार गट :** सलग शेजारी राहणाऱ्या २० ते २५ कुटुंबातील महिलांचा एक रोजगार गट स्थापन करण्यात येवून ह्या गटातील महिला समाजकार्यात रस असणारी दुसऱ्याच्या अडचणी सोडविण्यात धन्यता मानणारी कोणत्याही प्रकारच्या आर्थिक मोबदल्याची अपेक्षा न करणारी समाजासाठी वेग देणाऱ्या समंजस अशा एका महिलेची निवासी वस्तीसेविका (आर.सी.व्ही) म्हणून निवड करतात या गटास शेजार गट संबोधण्यात येते हा अनौपचारिक गट सतो त्या स्वयंसेविकेने दरमहा आपल्या शेजार गटाची बैठक घेवून त्यांच्या गरज ओळखणे त्यांचा प्राध्याप्र ठरविणे आपल्या गटाच्या विकासासाठी त्यांचा वैयक्तीक आणि सार्वजनिक प्रश्नासाठी, आरोग्य रक्षणासाठी नियोजन करावे. उपलब्ध योजनांचा लाभ गरजू महिला बोलके अपंग आजारी व्यक्तीसाठी करुन देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

**शेजार समिती :** साधारण दहा निवासी वस्ती स्वयं सेविकाची मिळून एक शेजार समिती अनौपचारिक पध्दतीने निवडण्यात येते. या समितीत अध्यक्ष सचिव व इतर महिला सभासद असतात ही समिती २०० ते २५० कुटुंबाचे प्रतिनिधित्व करित असते. म्हणजेच दरमहा होणाऱ्या बैठकीत ह्या कुटुंबाचे संकल्प ही समिती करीत असते. कोणत्याही संस्थेकडून मदत मिळविण्याचा समिती प्रयत्न करते.

**परिसर विकास समिती :** वसाहतीमधील निवासी वस्ती स्वयंसेविकामधून महिला मंडळाच्या धर्तीवर युबीएसबीच्या तत्वाशी सुसंगत धोरण असलेली परिसर विकास समिती स्थापन करण्यात येते. ही समिती धर्मादाय आयुक्ताकडे नोंदणी कृत करावी लागते. ह्या समितीकडे शेजारगट शेजार समित्यामार्फत असलेल्या प्रस्तावावर चर्चा करुन प्राधन्यक्रम ठरवून अंतिम निर्णय घेतले जातात. शासकीय योजना युबीएसपी अथवा अन्य संस्थाकडून अर्थसाहाय्य मिळण्यासाठी समितीपात्र असते वरील गट/समित्यांनी दिलेल्या सुविधाच्या प्राधान्य क्रमात

कोणासही बदल करता येणार नाही. त्यांच्या प्रस्तावावर योजनेच्या तरतुदीतून खर्च अनुज्ञेय राहील.

**लाभार्थी प्राधान्य व आरक्षण :** या योजनेचा लाभ देताना ३% आरक्षण अपंग व्यक्तींना राहील तसेच ३०% आरक्षण महिलासाठी व लोकसंख्येच्या प्रमाणात अनु.जाती अनु.जमातीसाठी आरक्षण असेल विशेष विधवा परित्यक्ता, व कुटुंबात एकमेव कमवती महिला असेल तर त्यांना प्रधान्य देण्यात येईल.

**<u>योजना</u>**

**अ) स्वयंरोजगारासाठी कर्ज व अनुदान**

एका लाभार्थीस बँक रु. ५००००/- कमाल मर्यादेपर्यंत कर्ज व १५% कमाल व ७५००/- पर्यंत अनुदान उपलब्ध करुन देवू शकेल. तसेच लाभार्थीचा सहभाग ५% राहील. ही योजना दहावी अनुत्तीर्ण पर्यंत व शिक्षण झालेल्या बेरोजगार व दारिद्र्य रेषेखालील व्यक्तीसाठी लागू आहे.

**ब) अनौपरचारिक महिला गटास सहकारी तत्वावर व्यवसायासाठी कर्ज**

किमान दहा शहरी गरिब महिलांना किमान १ वर्ष यशस्वी रित्या चालविलेल्या सहकारी महिला मंडळास रु. १२५०००/- पर्यंत अथवा प्रकल्प खर्चाच्या ५०% (जी कमी असेल त्याप्रमाणे अनुदान उपलब्ध होवू शकेल. बचत स्थापन करुन यशस्वीरित्या चालवित असलेल्या गटास रु. २५०००/- पर्यंत खेळते भांडवल उपलब्ध करुन देता येईल हा गट सदर रक्कम खालील बाबीसाठी खर्च करु शकेल.

अ) कच्चा माल खरेदी व बाजारपेठ उपलब्धते साठी
ब) व्यवसायासाठी आवश्यक साहित्य व व्यवस्था करणेसाठी
क) ह्या गटास कर्मचाऱ्यांच्या पगारावर खर्च करता येणार नाही.

जर बचत गटातील महिला सदस्याने एक वर्षासाठी रु. ५००/- फिक्स डिपॉझीट ठेवीत असेल तर त्या महिला सदस्याला रु. ३०/- अनुदान तिच्या आजार जीवन अपघात विमापोटी देण्यात येतील. जर अशी सदस्या रु. ७५०/- एका वर्षासाठी फिक्स डिपॉझीट ठेवीत असेल तर तीला रु. ६०/- पर्यंत वरील कारणांसाठी कुटुंबीयाच्या आजार अपघात विमा स्वरुपात अनुदानास पात्र राहील. सदर रक्कम खेळते भांडवल या शिर्षाखाली टाकता येईल. परिसर विकास समितीस विविध वस्त्यामध्ये सेवा केंद्र सुरु करण्यासाठी समाज मंदीर किवा जमीन फर्निचर स्टेशनरी विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात येईल.

**स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण :** स्थानिक दारिद्र्य रेषेखाली बेरोजगार युवक/युवतीसाठी २५ शिक्षणार्थीच्या गटास आय.टी.आय. शासकीय पॉलिटेक्नीक विद्यालय अथवा श्रमिक विद्यापीठातून किंवा शासनमान्य तांत्रिक प्रशिक्षण देणाऱ्यासंस्थामधून देणे आवश्यक आहे. प्रशिक्षण कालावधी किमान दोन महिने (३०० तास) तर कमाल सहा महिने असावा तांत्रिक व्यवसायाचे स्वरुप व कालावधी पाहून किमान रु. १००/- पाठ्यवेतन देण्यात येईल ते वाढीव सुध्दा देता येवू शकेल परंतु एका प्रशिक्षणार्थीवर संपुर्ण प्रशिक्षण कालावधीसाठी रु. २०००/- (संस्थेस द्यावयाच्या खर्चासह) खर्च अनुज्ञेय असेल.

**<u>कर्मचारी वर्गाची आवश्यकता :</u>** वरील योजना औरंगाबाद शहरात लागू करण्यासाठी खालीलप्रमाणे कर्मचाऱ्याची आवश्यकता आहे सधा प्रकल्प विभागात तीन समुह संघटक रु. १६४० ते २९०० या वेतनश्रेणीत १९८३ पासून कार्यरत आहेत व एक पद रिक्त आहे. सध्या

कार्यरत समुह संघटना प्रकल्प अधिकारी हे पदनाम देण्यात यावे व एका रिक्तपद भरण्यात यावे. तसेच २००० कुटुंबासाठी एक शासनाच्या निर्देशाप्रमाणे. मानधनावर १८ पदे निर्माण करणे योग्य रहील. या स्त्री समुह संघटकाना रु. २५००/- मानधन दम. रु. ७५/- प्रवास भत्ता देय राहील. सद्या दोन स्त्री समुह संघटक कार्यरत आहेत. प्रकल्प अधिकारी पदांसाठी अनुज्ञेय प्रत्येकी रु. ३५००-१०० वाहन भत्ता द.म. व २० समुह संघटकांचे मानधन शासनाकडून १००% अनुदान स्वरुपात मागणी करण्यात यावी. प्रस्तावित प्रकल्प अधिकारी पदासाठी सध्याच्या वेतन श्रेणीत समुह संघटक महापालिकेचे कर्मचारी असल्याने शासन अनुदानाव्यतिरिक्त वेतनावरील फरक महानगरपालिका देईल. समुह संघटक पदासाठी वार्षिक वेतनवाढ रु. २५/- देय राहील. ह्या विभागात सध्या एक कनिष्ठ लिपीकाचे पद आहे. योजनेचा व्याप वाढल्यामुळे महानगरपालिका अस्थापनेवर चार लिपीक पदे या कुटुंबाचे सर्व्हेक्षणास येणारा खर्च देखील शासनाकडून अनुदान स्वरुपात मागणी करण्यातयावी. ह्या सर्वेक्षणासाठी १९९१ ची मतदार यादी अथवा जनगणनेची यादी वापरण्यात यावी ह्या सर्वेक्षणासाठी १९९१ ची मतदार यादी अथवा जनगणनेची यादी वापरण्यात यावी असे दि. ८/१२/९७ च्या बैठकीत मा. विभागीय आयुक्तांनी सुचविले आहे. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

<u>संवाद</u>

**श्री. प्रकल्प संचालक :** सदरील प्रस्ताव केंद्र व राज्य शासनाच्या नवीन धोरणानुसार व डिसेंबर १९९७ पासून सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना राबवायची आहे. या योजनेत ७५% केंद्र शासन व २५% राज्य शासनाचा सहाभाग असणार आहे. सदर योजना महानगरपालिकेच्या हद्दीतील प्राधान्याने घोषीत ५३ झ ोपडपट्टीतील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील व्यक्तींना (ज्या कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळून वार्षिक उत्पन्न रु. १३९९६ च्या आत आहे) त्यांना लाभ देण्यात येईल. या योजनेत महिलांचे समुह संघटक असणे आवश्यक आहे. त्यामध्ये १) शेजार गट २) शेजार समिती ३) परिसर विकास समितीच्या योजनेत ४) स्वयंरोजगारासाठी कर्ज व अनुदान ५) अनौपचारिक महिला गटास सहकारी तत्वावर व्यवसायासाठी कर्ज तसेच स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण या योजनेत अनुज्ञेय आहे.

**श्री. संजय जोशी :** या प्रस्तावास कर्मचारी वर्गाची आवश्यकता म्हणून चार लिपीक पदे नव्याने निर्माण करण्याची आवश्यकता आहे का? सदरील प्रस्तावात एकाच वेळी दोन प्रकारचे प्रस्ताव का ठेवण्यात आले?

**श्री. मोहसीन अहमद :** बऱ्याचशा नागरिकांना मागील वेळेत नेहरु रोजगार योजनेअंतर्गत फॉर्म मिळूनही बँकद्वारे कर्जे मिळाले नाही. त्यामुळे लोक नाराजी आहेत.

**मा. महापौर :** ह्या प्रस्तावानुसार महिला व पुरुष उद्योजकांचे बाबतीत एखाद्या ठिकाणी कार्यशाळा असल्यास या ठिकाणी स. सदस्यांना पाठविता येईल.

**सौ. लता दलाल :** महिलांना अशा कोणत्याही कार्यशाळेसाठी पाठविण्यास प्राधान्य द्यावे.

**मा. महापौर:** ठिक आहे. महिलांनी फक्त महिला कार्यशाळेच्या वेळेस सामुहिकरित्या पाठविण्यात येईल.

**प्रकल्प संचालक :** एक समुह संघटकपद १९८३ पासून रिक्त आहे. तसेच २००० कुटुंबासाठी एक शासनाच्या निर्देशाप्रमाणे मानधनावर १८ पदे निर्माण करणे योग्य राहील व स्त्री समुह संघटकाना रु. २५००/- मानधन द.मा. रु. ७५/- प्रवास भत्ता देय राहील चार लिपीक पदे यासाठी नव्याने निर्माण करावे किंवा इतर विभागातून प्रतिनियुक्तीवर घेतल्यास काहीच हरकत नाही. परंतुसदरील योजना अतिशय चांगल्या प्रकारे राबविणे आवश्यक आहे.

**मा. महापौर :** सदरील प्रस्ताव पुढील बैठकीत सविस्तर माहितीसह ठेवावे तो पर्यंत स्थगित ठेवावा.

**ठराव :** सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १५०/१४ :** मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रियदर्शनी इंदीरा नगर येथील स्मशानभूमीमध्ये संरक्षीत भिंत चौकीदारासठी निवासस्थान रेस्टिंग शेड व पाण्याच्या हौद बांधणे बाबतचे अंदाजपत्रक र. रु. १५००००० /- एवढ्याचे तयार करण्यात आले आहे. सदरल अंदाजपत्रक सा.बा. विभागाच्या सन १९९६-९७ च्या तरतुदीनुसार तयार करण्यात आले आहे.

सदरील कामासाठी लागणाऱ्या खर्चहा विशेष शासकीय अनुदान ९७-९ च्या तरतुदी अंतर्गत करणे प्रस्तावित आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रियदर्शनी इंदीरानगर येथील स्मशानभूमीमध्ये संरक्षीत भिंत, चौकीदारासाठी निवासस्थान, रेस्टिंग शेड, पाण्याचा हौद बांधणे बाबतचे अंदाजपत्रक र.रु. १५०००००/- सा.बा. खात्याचे दरसूचीनुसार सन ९६-९७ चे तयार करण्यात आले. सदरील खर्च विशेष शासकीय अनुदान या शिर्षातून सन ९७-९८ च्या तरतुदीतून खर्च करण्यास स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५१/१५ :** कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिस्ससारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दोन कोटी शासकीय अनुदान ९७-९८ मध्ये पाणी पुरवठा व जलनिस्सारणाचे खालीलप्रमाणे कामे करावयाची आहेत.

**अ) पाणी पुरवठा**

१ अ) जयविश्व भारती कॉलनी जलकुंभापासून वितरण व्यवस्थेसाठी विविध व्यासाची जलवाहीनी टाकणे. ५९.५८ लाख.

ब) राजाबाजार कुंवारफल्ली येथे दुषीत पाणी पुरवठा होत असल्यामुळे नवीन सी.आर. जलवाहिनी टाकणे.

क) इंदिरानगर बायजीपुरा येथे विविध व्यासाची जलवाहिनी टाकणे.

**ब) जलनिस्सारण**

१) भावसिंगपुरा ते वडगाव कडे जाणारी मुख्य जलनिस्सारण वाहिनी तिवर "अ" पडेगाव पर्यत टाकणे. - ३.०० लाख

२) ईटखेडा ते गोलवाडी नाल्यालगत ट्रंक सिव्हर "एक" साठी ९०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. जलनिस्सारण वहिनी टाकणे एकुण - ३५.०० लाख

एकुण - १२९.५८ लाख

वरील प्रमाणेच्या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार आहे.

महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय क्र. जी.डी.एन.१०९७/११७२/प्र.क्र. २१७/९७ नवि-२५, मंत्रालय मुंबई दि. १७/११/९७ अन्वये महानगरपालिका सहभाग ५०% व शासनाच्या निधी ५०% असे खर्च करणास शासनाने मान्यता दिलेली आहे.

तरी वरील दर्शविलेल्या कामांच्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळण्यास्तव सादर.

**ठराव :** प्रसतावात दर्शविल्याप्रमाणे शासकीय अनुदानातून ९७-९८ मध्ये उपरोक्त प्रस्तावातील "अ" व "ब" चे कामाचे एकुण रु. १२९.५८ लाखाचे कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची सन ९६-९७ च्या अंदाजपत्रकास स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५२ :** कार्यकारी अभियंता यांनीप्रस्ताव सादर केला की, रु. ४,४० कोटी शासकीय अनुदान अंतर्गत पाणी पुरवठा व जलनिस्सारणाची खालील कामे करावयाची आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | खर्च |
|---|---|---|
| १. | प्रकाशनगर मिसारवाडी नारेगाव स्लम येथे जलनिस्सारण वहिनी टाकणे | ३९ लाख |
| २. | जय भवानीनगर येथे जलनिःस्सारण वाहिनी टाकणे | १२ लाख |

वरीलप्रमाणे कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दरपत्रक ९७-९८ प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहेत. तरी वरील कामाच्या अंदाजपत्रकास मंजरी मिळणे स्तव सादर.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविलेल्या प्रमाणे रु. ४.४० कोटी शासकीय अनुदान अंतर्गत पाणी पुरवठा व जलनिव्सारणाची कामे प्रस्तावानुसार अ.क्र. १ व २ चे एकुण खर्च रु. ५२.०० लाखाचे कामास महा. जिवन प्राधिकरण दरपत्रक ९७-९८ च्या खर्चास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५३/१७ :** अतिरिक्त शहर अभियंता यांनी सुधारित प्रस्ताव सादर केला की, टाऊन हॉल परिसरात नवीन प्रशासकीय इमारत टप्पा-३ च्या बांधकामासाठी सन १९९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डि.एस. आर. दराने अंजदापत्रक रक्कम रु. २२८२५५३४.०० चे तयार करण्यात आले असून त्यास दि. २८/१०/९७ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

औरंगाबाद शहराचा विस्तार पाहता महानगरपालिकेच्या कार्यालयाच्या शाखा बऱ्याच वाढलेल्याआहे. वाढत्या कार्यालयामुळे वाढीव जागा आवश्यक आहे व त्या कार्यालयांसाठी वेगळी इमारत बांधणे जरुरीची असल्यामुळे त्यांसाठी वरीलप्रमाणे प्रस्तावित टप्पा - ३ प्रशासकीय इमारत नगर भवन परिसरात प्रस्तावित आहे. नगर भवन परिसरातील गोदामा सारख्या जुन्या इमारती पाडून त्याजागी एल शेपमधील नवीन प्रशासकीय इमारत टप्पा-३ प्रस्तावित आहे.

तसेच सदरील प्रशासकीय इमारत टप्पा-३ चे बांधकामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रक्कम रु. २,२८,२५,५३४/- (अक्षरी रुपये दोन कोटी अठ्ठाविस लाख पंचवीस हजार पाचशे चौतीस फक्त) व महानगरपालिका वास्तु विशारद कमीटीमध्ये ठरल्यानुसार मे. एस.बी.एच्. असोसिएट यांचे वास्तुविशारद शुल्क १.५% (दिड टक्का) यास मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टाऊनहॉल परिसरात नवीन प्रशासकीय इमारत टप्पा-३ च्या बांधकामसाठी सन १९९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम बांधकाम खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. २,२८,२५,५३४.०० विद्युतीकरण आकस्मिक बाबी वास्तुविशारद मे.एस.बी.एस. असोसिएटस यांच्या फिससह खर्चास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५४/१८ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, विद्युत विभागात लाईनमनचे काम करणाऱ्या दैनिक वेतनावरील कामगारांना दैनिक वेतनाचा दर ठरविण्याकरिता समितीचे गठन करण्यात आले होते. उक्त समितीने सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांनी जानेवारी ९७ पासून सुधारित महागाई भत्त्याच्या दरानुसार ठरविण्यात आलेल्या दैनिक वेतनाच्या दरानुसार देण्याची शिफारस केली आहे. लाईनमन (विद्युती) ह्या नियमीत पदास ९५०-२०-११५० दरा २५-१४०० अशी वेतनश्रेणी असल्यामुळे व सार्वजनिक बांधकाम यांच्या परिपत्रकात औ. बाद शहरासाठी ६०% अशकुल (हलका) कामगारास ९५०/- वेतनश्रेणीत दैनिक वेतनावरील कामगारांना चे कामगार सेवाभरती नियमानुसार शैक्षणिक अर्हता धारण करीत आहे. त्यांना दैनिक वेतनाचा दर रु. ६०/- प्रमाणे देण्याची समितीने शिफारस केली आहे.

करिता विद्युत विभागातील लाईनमनचे काम करणाऱ्या दैनिक वेतनावरील कामगारांना जे सेवाभरती नियमानुसार शैक्षणिक अर्हता धारण करीत आहे. अशा दैनिक वेतनावरील कामगारांना दैनिक वेतनाच्या दर रु. ६०/- प्रमाणे देण्यासाठी प्रस्ताव निर्णयास्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विद्युत विभागात लाईनमनचे काम करणाऱ्या कामगारांना दैनिक वेतनाचा दर वाढविण्याकरिता समितीचे गठन करण्यात आले होते. उक्त समितीने सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांनी जानेवारी ९७ पासून सुधारित महागाई भत्त्याच्या दरानुसार ठरविण्यात आलेल्या दै. वेतनाच्या दरानुसार देण्याची शिफारस केली आहे. सार्वजनिक बांधकाम यांच्या परिपत्रकात औरंगाबाद शहरासाठी ६०% अनुदान (हलका) कामगारास ९५०/- वेतनश्रेणीत दैनिक वेतनाचा दर रु. ६०/- असल्यामुळे विद्युत विभागातील लाईनमनेच काम करणाऱ्या दैनिक वेतनावरील कामगारांना जे कामगार सेवाभरती नियमानुसार शैक्षणिक अर्हता धारण करीत आहे. त्यांना दै. वेतनाचा दर रु. ६०/- प्रमाणे माहे जानेवारी ९७ पासून देण्यास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५५/१९ :** अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, ईटखेडा ते नक्षत्रवाडी ह्या रस्त्यावर वाहनाची गर्दी नेहमी होत असल्यामुळे या रस्त्यावर भरपुर प्रकाश आवश्यक आहे. त्यासाठी एका साईडने पोलसह सोडीयम व्हेपर दिवे बसविण्याचे अंदाजपत्रक र. रु. २१,००,०००/- चे तयार केले आहे. सदरील कामाचा खर्च नवीन वर्षाच्या ९८-९९ या अर्थसंकल्पातून करण्यात येणार आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**मा. महापौर :** मंजुर

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. ईटखेडा ते नक्षत्रवाडी ह्या रस्त्यावर वाहनांची गर्दी नेहमी असते. ह्या रस्त्यावर भरपुर प्रकाश आवश्यक आहे. त्यासाठी एका साईडने सोडीयम व्हेपर बसविण्याचे अंदाजपत्रक रक्कम रु. २१,००,०००/- नवीन वर्षाच्या १९९८-९९ च्या अर्थसंकल्पातून खर्च करण्यास स्विकृती सह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५६/२० :** अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गजानन महाराज मंदिर ते सिडको हद्दी पर्यंत १०० फुट डी.पी. रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या

कामासाठी सन १९९६-९७ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. २८,७१,१००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च सन १९९८-९९ च्या तरतुदीतून करण्यात येईल. करिता प्रसताव मंजुरीस्तव सादर.

**मा. महापौर :** मंजुर

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गजानन महाराज मंदिर ते सिडको हद्दीपर्यंत १०० फुट डी.पी. रस्तचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन १९९६-९७ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक रु. २८,७१,१००/- चे तयार करण्यात आले. सदरचा खर्च सन १९९८-९९ च्या आर्थिक तरतुदीतुन करण्यास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५७/२१ :** अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, क्रांती चौक ते उस्मानपुरा रेल्वेस्टेशन पर्यंतचा १०० फुट विकास रस्त्याच्या रस्ता दुभाजकावर जाळ्या बसविण्याचे कामासाठी सन १९९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रक रक्कम रु. ३५,१९,५०० चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च शासनाकडून मिळालेल्या ४ कोटीच्या अनुदाना अंतर्गत जी काही कामे अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने प्राप्त झाली आहेत त्या बचतीतून रु. १५.०० लाख व महानगरपालिकेच्या स्वत:च्या फंडातून रक्कम रु. २०,१९,०००/- ची तरतुद करुन असे दोन्ही फंडातून एकुण रक्कम रुपये रु. ३५,१९,५०० च्या अंदाजपत्रकाच्या प्रस्तावास सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**मा. महापौर :** मंजुर.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांतीचौक ते उस्मानपुरा रेल्वेस्टेशन पर्यंतच्या १०० फुट विकास रस्त्याच्या रस्ता दुभाजकावर जाळ्या बसविण्याचे कामासाठी सन १९९६-९७ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी.एस.आर. दराने अंदाजपत्रकरक्कम रु. ३५,१९,५००/- चे तयार करण्यात आले असून सदरचा खर्च शासनाकडून मिळालेल्या ४ कोटीच्या अनुदानातून अंतर्गत जी काही कामे अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने प्राप्त झाली आहेत. त्या बचतीतुन रु. १५ लाख व मनपाच्या फंडातून रु. २०,१९,०००/- ची तरतुद करुन असे दोन्ही फंडातून एकुण रु. ३५,१९,५००/- च्या अंदाजपत्रकास स्विकृतीसह सर्वानुंमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५८/२३ :** औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील विनापरवानगी बांधकामे व महानगरपालिकेच्या जमिनीवरील अतिक्रमणे हटविण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम व मुंबई प्रोतिक महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्यासाठी प्रशासकीय अधिकारी यांच्याकडून सहाय्यक संचालक नगररचना महानगरपालिका, औरंगाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली काम केले जाते. सदरील पदाचे काम हे संपुर्णत: तांत्रिक स्वरुपाचे असून प्रशासकीय अधिकारी वगळता इतर सर्व इमारत निरीक्षक हे तांत्रिक कर्मचारी या विभागात काम करतात. प्रशासकीय अधिकारी या पदाचे काम अधिक गतिमान व प्रभावीपणे होण्याच्या दृष्टीने हे पद तांत्रिक स्वरुपाचे करणे गरजेचे आहे. ह्या पदाचे रुपांतर तांत्रिक पदात करुन याचा दर्जा नगररचनाकार वर्ग-२ संवर्गात

करण्यात यावा व या पदावर महानगरपालिकेच्या सेवाभरती नियमानुसार महानगरपालिकेच्या सेवेतील पात्र स्थापत्य अभियंताची पदोन्नतीने अथवा थेट नेमणुकीने पदस्थापना करण्यात यावी.

प्रस्तावात मान्यता झाल्यावर आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

सुचक - १) श्री. नरसिंग ढगे
२) श्री. गौतम लांडगे
३) हमीदउद्दीन ताबा फसियोद्दीन
४) श्री. किशोर तुळशीबागवाले

अनुमोदक - १) श्री. संजय केनेकर
२) श्री. अजिजखान गणीखान
३) श्री.व्ही.व्ही. देशमुख
४) श्री. सुदाम सोनवणे पाटील.
५) श्री. गौतम खरात
६) श्री. सय्यद अहमद इकबालोद्दीन

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानरगपालिका हद्दीतील विनापरवानगी बांधकाम व मनपाच्या जमीनीवरील अतिक्रमणे हटविण्यासाठी महा. प्रादेशिक व नगर रचना अधिकारी मुंबई प्रा. महानगरपालिका अधिनियम तरतुदीनुसार कार्यवाही करण्यास प्रशासकीय अधिकारी यांच्या सहा. संचालक नगररचना यांच्या मार्गदर्शनाखाली कामे केली जाते सदरील पदाचे काम अधिक गतिमान व प्रभावीपणे होणेच्या दृष्टीने हे पद तांत्रिक स्वरुपाचे करणे गरजेचे आहे. तेव्हा ह्या पदाचे रुपांतर तांत्रिक पदात करुन याचा दर्जा नगर रचनाकार वर्ग-२ संवर्गात करण्यास व मनपा सेवा भरती नियमानुसार नगर रचनाकार वर्ग-२ संवर्गात करण्यास व महानगरपालिका सेवा भरती नियमानुसार महानगरपालिकाच्या सेवेतील पाच स्थापत्य अभियंताची पदोन्नतीने अथवा थेट नेमणूकीने पदस्थापना करण्यास स्विकृती सह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५९/२३ :** काबरानगर गारखेडा ही योजना म्हाडाचे १९८७ ते १९८८ या निवारा वर्षात बिडी कामगारासाठी शासनाच्या अनुदानातून गोरगरीबांसाठी बांधून देण्यात आली. परंतु तिथे म्हाडाला मुलभूत सुविधा पुरविणे अशक्य आहे. त्यामुळे तेथील नागरिकांच्या कुचंबना होत आहे. त्यामुळे ही योजना महानगरपालिकेने हस्तांतरित करुन घेण्यासाठी सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक - श्री. नरसिंग ढगे
अनुमोदक - श्री. प्रभाकर विधाते

**मा. महापौर :** सदरील प्रस्ताव विशेष बाब म्हणून मंजुरी देण्यात येते. या बाबतीत शासनाचे रु. १०.०० लाखाचे अनुदान आलेले आहे. त्यातून ड्रेनेज/पाणीपुरवठा/लाईट रस्ते इ.कामे व तेथील नागरिकांना सुविधा पुरविण्याबाबत जसे २५% लोक वर्गणीद्वारे भरुन विकास कामे केली जातात त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे काबरानगर गारखेडा ही योजना म्हडाने १९८७-१९८८ या निवारा वर्षात बिडी कामगारांसाठी शासनाच्या अनुदानातून गोरगरीबांसाठी बांधून देण्यात

आली. परंतु त्या ठिकाणी म्हाडाने मुलभूत सुविधा पुरविणे अशक्य आहे. त्यामुळे या ठिकाणी जसे २५% लोकवर्गणीद्वारे पैसे भरुन मनपाच्या सुविधा पुरविल्या जातात त्याचप्रकारे कार्यवाही करावी व शासनाचे यासाठी रु. १०.०० लाखाचे अनुदान आलेले आहे. त्यातुन सुविधा "विशेष बाब" म्हणून करण्यास स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १६०/२४ :** मौजे कांचनवाडी येथील गट नं. १९ मधील सरकारी गायरानाची जागा "उरली कांचन" ह्या प्रतिष्ठानला देण्यात आलेली होती. परंतु उरली कांचन प्रतिष्ठानाने ज्या उद्देशाने ही जागा शासनाकडून घेतली तो उद्देश सफल झालेला नाही. त्यामुळे प्रतिष्ठानची जागा परत घेवून दुसऱ्या संस्थेस देणे उचित राहील. उरली कांचन प्रतिष्ठानने जागेचा वापर योग्य कारणासाठी केलेला नसुन सदर जागा शासनाचे परत ताब्यात घेण्याबाबत महसुली अधिकाऱ्यांना चौकशी करुन शासनाकडे अहवाल पाठविलेला आहे. तरी ह्या जागेपैकी २५ (पंचवीस) एकर जागा शासनाने महापालिकेला द्यावी या जागेवर महानगरपालिका सुसज्ज दवाखाना व इतर नागरिकांना उपयोगी सुखसोयी देण्याच्या दृष्टीने जागेचा वापर करील.

तरी ठराव मंजुर करुन शासनाकडे शिफारस करण्यास्तव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सार.

सुचक - कु. माया लाडवाणी
अनुमोदक - सौ. रजनी जोशी
श्री. प्रफुल्ल मालानी

**मा. महापौर :** मंजुर.

**ठराव क्र. १६०/२४ :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे कांचनवाडी येथील गट नं. १९ मधील सरकारी गायरानाची जागा शासनाकडून घेतलेली होती तो उद्देश सफल झाला नाही. तेव्हा सदरील जागेची महसुल अधिकाऱ्यांनी चौकशी करुन परत घेण्याबाबत शासनाकडे अहवाल पाठविलेला आहे. या जागेपैकी २५ एकर जागा महानगरपालिकेने घ्यावी व त्या ठिकाणी महानगरपालिकेचा सुसज्ज दवाखाना व इतर नागरिकांना उपयोगी सुखसोयी देण्याची दृष्टीने जागेचा वापर करण्यास शासनाकडे प्रस्ताव स्विकृतीसह पाठविणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६१/२५ :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, औरंगाबाद शहरात आरोग्य सेवा देण्यासाठी दोन लाख वस्तीसाठी एक (४ आरोग्य केंद्रांसाठी) या प्रमाणे २० खाटाचे रुग्णालय प्रस्तावित केले असून दिनांक २०/१२/९५ रोजी सर्वसाधारण सभेने सर्वानुमते या रुग्णालयास मंजुरी दिली असून रुग्णालयाचे बांधकाम होत आहे व रुग्णालय सुरु करणेसाठी आवश्यक असलेला कर्मचारी वृंद खालीलप्रमाणे मंजुरीसाठी प्रस्तावित केला आहे. या जागा निर्माण करण्यासाठी मंजुरी द्यावी.

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी | प्रमाणकानुसार आवश्यकतेनुसार कर्मचारी संख्या | |
|---|---|---|---|---|
| | | | सिल्कमिल कॉलनी | कटकटगेट |
| १. | जेष्ठ वैद्यकीय अधिकारी | २२००-४००० | ०१ | ०१ |
| २. | वैद्यकीय अधिकारी | २०००-३५०० | ०४ | ०४ |
| ३. | मिश्रक | १३५०-२२०० | ०२ | ०२ |
| ४. | स्टाफ नर्स | १३५०-२२०० | ०६ | ०६ |
| ५. | ए.एन.एम. | १२००-१८०० | ०६ | ०६ |
| ६. | पॅथॅलॉजिस्ट | २५०० ठ. वेतन | ०१ | ०१ |
| ७. | विकृतीशास्त्र सहाय्यक | १२००-२००० | ०१ | ०१ |
| ८. | एक्सरे टेक्नीशयन | १४००-२६०० | ०१ | ०१ |
| ९. | एक्सरे असिस्टंट | १२००-२०४० | ०१ | ०१ |
| १०. | नेत्र सहाय्यक | १२००-२०४० | ०१ | ०१ |
| ११. | लॅब टेक्नीशियन | १२००-२०४० | ०१ | ०१ |
| १२. | स्टोअर किपर | ९५०-१५०० | ०१ | ०१ |
| १३. | ड्रेसर | ७५०-९४० | ०२ | ०२ |
| १४. | नोंदणी लिपीक | ७५०-९४० | ०२ | ०२ |
| १५. | सेवक/सेविका | ७५०-९४० | ०४ | ०४ |
| १६. | वॉचमन व स्विपर | ७४०-९४० | ०२ | ०२ |
| १७. | वार्ड बॉय | ७५०-९४० | ०८ | ०८ |

वरील प्रमाणे दोन ठिकाणी २० खाटांचे रुग्णालय सुरु करण्याकरिता रुग्णालयात लागणाऱ्या औषधी व साहित्य यासाठी अंदाजपत्रकात अंदाजीत केल्याप्रमाणे रुपये २५ लाख प्रतयेकी अपेक्षीत असून ह्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यास्तव सादर.

**मा. महापौर :** मंजुर

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरात आरोग्यसेवा देण्यासाठी दोन लाख वस्तीसाठी एक (४ आरोग्य केंद्रासाठी) या प्रमाणे २० खाटाचे रुग्णालय सरु करणेसाठी आवश्यक असलेला कर्मचारी वृंद प्रस्तावित नुसार अनु.क्र. १ ते १७ पर्यंतचा पदनिहाय व त्यांच्या वेतनश्रेणीस २० खाटाच्या रुग्णालय सुरु करण्यासाठी व रुग्णालयात लागणाऱ्या औषणी व साहित्य यासाठी लागणारी अंदाजपत्रकी खर्च रु. २५ लाख प्रत्यक्षी अपेक्षीत यास स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६२/२६ :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, शहरातील ५० हजार वस्तीसाठी एक ह्या प्रमाणे (चार) ४ आरोग्य केंद्र उघडण्यास सर्वसाधारण सभेने दि. २०/१२/९५ रोजी मंजुरी दिली असून आरोग्य केंद्राचे बांधकाम सुरु आहे. यासाठी

लागणारा कर्मचारी वृंद खालीलप्रमाणे प्रस्तावित केला आहे. ही पदे निर्माण करण्यासाठी मंजुरी द्यावी.

मंजुरीस्तव सादर.

| **अ.क्र.** | **पदाचे नाव** | **वेतनश्रेणी** | **प्रमाणकानुसार आवश्यकतेनुसार कर्मचारी संख्या** | |
|---|---|---|---|---|
| | | | **आ.के. जुनाबाजार दादा कॉलनी** | **आ.के. मुकुंदवाडी, मिटमिटा** |
| १. | वैद्यकीय अधिकारी | २२००-४००० | ०१ | ०४ |
| २. | मिश्रक | १३५०-२२०० | ०१ | ०४ |
| ३. | ए.एन.एम. | १२००-१८०० | ०३ | १२ |
| ४. | एम.पी. डब्ल्यू | ९७५-१६६० | ०३ | १२ |
| ५. | नोंदणी लिपीक | ७५०-९४० | ०१ | ०४ |
| ६. | सेविका | ७५०-९४० | ०२ | ०८ |

वरील प्रत्येक आरोग्य केंद्रासाठी औषधी व साहित्य करीता रुपये ३,५०,०००/- (तीन लाख पन्नास हजार) इतका खर्च येणार असून यासाठी प्रशासकीय मंजुरीस्तव सादर.

**मा. महापौर :** मंजुर.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील ५० हजार वस्तीसाठी एक याप्रमाणे (चार) आरोग्य केंद्र उघडण्यास प्रस्तावातील पद व वेतनश्रेणीस आवश्यकतेनुसार कर्मचारी संख्येस व प्रत्येक आरोग्यकेंद्रास औषधी व साहित्य करिता रु. ३५००००/- इतका खर्च करण्यास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६३/२७ :** शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका मार्फत हाती घेण्यात आलेल्या वेगवेगळ्या व्यासाचे पिळदार लोखंड ची आश्यकता आहे. शहर अभियंता अति. शहर अभियंता कार्यकारी अभियंता यांचे विभागसाठी ३२० मे. टन लोखंडाची आवश्यकता आहे. त्याप्रमाणे लोखंड खरेदीसाठी प्रस्ताव सादर केला आहे.

सन १९९६-९७ सालाचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक रु. ५७,४४,०००/- चे तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्त साहेबांनी दि. १६/१२/९७ रोजी मान्यता दिली आहे.

आवश्यक असलेल्या वेगवेगळ्या व्यासाचे लोखंड खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | ६ एम.एम. | ३९.२५ मे.टन |
| २. | ८ एम.एम. | ७४.४५ मे. टन |
| ३. | १० एम.एम. | ५९.७६ मे.टन |
| ४. | १२ एम.एम. | ७८.७८ मे.टन |
| ५. | १६ एम.एम. | ६६.१५ मे.टन |

| | | |
|---|---|---|
| ६. | २० एम.एम. | मे. टन |
| | **एकुण** | **३२० मे.टन** |

वरीलप्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वेगवेगळ्या बांधकामासाठी व्यासाचे पिळदार लोखंडाची आवश्यकता आहे. सन १९९६-९७ चे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु. ५७,४४,०००/- च्या एकुण ३२० मे.टनच्या खर्चास स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६४/२८ :** प्रस्ताव सादर करण्यात येते की, आरोग्य खात्यामध्ये मलेरिया विभागात अस्थायी आणि कायम स्वरुपीचे कर्मचारी औषध फवारणी करतात. उदा. नोव्हाम फिनेल आणि इतर औषध फवारणी मुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होवून काही कर्मचाऱ्यांना दमा नजर कमी होणे अशा प्रकारचे विविध आजार होवून डोळे सुध्दा दृष्टीहीन होण्याची शक्यता आहे असे किती कर्मचारी आहेत. त्याची माहिती देण्यात यावी आणि त्यांना औषध फवारणीसाठी लागणारे साहित्य आणि सुविधा उदा. गम बुट, सॉक्स, हातमोजे इत्यादी आर्णि औषधी सारख्या सुविधा आणि साहित्य देण्यात यावे. तसेच जे कर्मचारी अशा प्रकारे आजारी असतील त्यांच्या आरोग्यास जबाबदार अधिकाऱ्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.

सुचक - श्री. गौतम खरात
अनुमोदक - श्री. गौतम लांडगे

<u>संवाद</u>

**श्री. गौतम खरात :** मलेरिया विभाग गेल्या बऱ्याच दिवसापासून कर्मचारी वर्ग काम करित आहे त्यांना आवश्यक ते वैद्यकीय मुलभूत सुविधा दिल्या जातात काय. माझ्या माहितीप्रमाणे २०% कर्मचारी या ठिकाणचे बांधले होत असून याकडे आरोग्य विभाग जाणीव पुर्वक डोळेझाक करित आहे व कोणत्याही प्रकारचे औषधी व साहित्याचा लागणारा आवश्यक तो पुरवठा करीत नाही. याबाबत आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** मलेरिया विभागात गेली १५-२० वर्षापासून दै. वेतन कर्मचारी काम करित आहेत. त्यांना कायम करण्याची कार्यवाही व्हावी. नसता त्यांनाही कायम न करता या विभागात काम करुन आंधळे होण्याची पाळी येईल यासाठी त्यांनाही आवश्यक औषधी पुरवठा करण्यात यावा व लागणारे साहित्य उदा. बुट सॉक्स स्पंज व वेळोवेळी तपासणी करणे बाबत आरोग्य विभागाने कार्यवाही करित जाणे योग्य राहील.

**श्री. संजय जोशी :** औषध फवारणीच्या दैनंदिन कामामुळे ह्या कर्मचाऱ्यांना अंधत्व येते असेल तर याबाबत चौकशी व्हावी व कर्मचाऱ्यांनी योग्य तपासणी करुन त्यांना लागणारी औषधी व साहित्य देवून नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे आरोग्य विभागात बरेच दैनिक वेतन व मानधनावर डॉक्टर म्हणून कार्यरत आहेत त्यांना कायम स्वरुपी करण्यात यावे.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** स. सदस्य श्री. गौतम खरात यांनी सुचना केल्याप्रमाणे विभागातील कर्मचाऱ्यांना आवश्यक ती लागणारी गम्सबुट हॅन्डग्लोज व

औषधी वेळोवेळी देण्यात येतात व आरोग्याची तपासणी करण्यात येईल तर गम्सबुट घालणेची सक्ती कर्मचाऱ्यावर केली जाईल. याबाबतची कार्यवाही ६ दिवसात करण्यात येईल.

**श्री. गौतम खरात :** कर्मचाऱ्यांना १) गम्सबुट २) हॅन्डग्लोज ३) औषधी ४) वैद्यकीय तपासणी ५) लागणारे औषधांचा खर्च व ६) जे कर्मचारी मानधनावर आहेत त्यांना कायम करावे.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** नाशिक/मुंबई महानगरपालिकेतील कर्मचारी वर्ग याच्या बरोबरच कामे करित असतील तेथील कर्मचाऱ्यांना अशा प्रकारे रोगांनी पछाडलेले आहेत काय? याची पाहणी करावी व कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सुविधा पुरविण्यात याव्यात.

**श्री. मोहसीन अहमद :** औषध फवारणी करित असतांना कर्मचाऱ्याच्या डोळ्यात औषध जावून आंधळे होण्याची शक्यता असते. याकरिता शरीराला इतर ठिकाणी इजा होवू नये यासाठी दर दोन तीन महिन्याने कर्मचाऱ्यांची तपासणी करित जावे व लागणारे औषधी कर्मचाऱ्यांना द्यावे.

**श्री. फैय्याज कुरैशी :** कर्मचाऱ्यांना सर्व आवश्यक त्या सुविधा का पुरविल्या जात नाही.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** कर्मचाऱ्याच्या आजारीपणा बद्दल माहिती दिल्यास आवश्यक त्या उपाय योजना केल्या जातील व कर्मचाऱ्यांना आवश्यक सुविधा वेळोवेळी पुरविण्यात येतील. त्याचप्रमाणे आरोग्याची तपासणी करण्यात येईल व ६ दिवसात माहिती देण्यात येईल.

**मा. महापौर :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी स.सदस्य यांनी मांडलेल्या सुचनाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी व सहा (६) दिवसात माहिती द्यावी आणि जे डॉ. मानधनावर कार्यरत आहेत त्यांना कायम करणेची प्रक्रिया प्रशासनाने करावी.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आरोग्य विभागातील मलेरिया कर्मचारी जे नोव्हान व फिनेल औषध फवारणीचे कामे करतात त्यांच्यावर शारिरीक कामे करतात. त्यांच्यावर शारिरीक अपायकारक हाणी होते. यासाठी महानगरपालिका प्रशासनाने सर्व स्थायी व अस्थायी कर्मचाऱ्यांना आवश्यक ते सुविधा पुरवाव्यात व त्याच्या आरोग्यासाठी दर महिन्यात तपासणी करुन औषधी व साहित्य देण्याची कार्यवाही प्रशासनाने करावी. त्यास स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा. महापौर :** काही स. सदस्यांनी एक सुचना मांडलेली आहे.
श्री. व्ही.व्ही. देशमुख, श्री. मोहसीन अहमद, श्री. अफसरखान यासीन खान, श्री. सय्यद अली मिरासलामी, श्रीमती जाहेदा बेगम, श्रीमती आबेदा बेगम व इतर. कार्यालयामध्ये आणि घरी बऱ्याच अधिकाऱ्यांना फोन केले असता साहेब जागेवर घरी नाहीत अशा प्रकारचे उत्तर मिळतात ते बरोबर नाही तरी अधिकारी व कर्मचाऱ्यांना दुपारी तीन वाजता आपल्या कक्षामध्ये हजर राहण्यास पाबंद करावे आणि स. सदस्यांची गैरसोय होणार नाही याची अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

याचबरोबर "जन गन मन" या राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा. महापौरांनी घोषीत केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.

**दिनांक १/१/१९९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**दि. १/१/९८ रोजी मा. महापौर श्री. अब्दुल खान (मामु) त्यांचे अध्यक्षतेखाली "कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृह येथे दुपारी ३ वाजता "वंदेमातरम्" या राष्ट्रगीताने सुरु झाली ह्या सभेस प्रशासकीय अधिकाऱ्यासह खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स. श्री. तरवेंद्रसिंह महेंद्रसिंह धिल्लन मा. उपमहापौर
२) स.स. श्री. प्रभाकर सिताराम विधाते
३) स.स. श्री. फैय्याज अहमद कुरैशी
४) स.स. श्री. सुदाम सोनवणे
५) स.स. सौ. रुखमनबाई लोखंडे
६) स.स. श्री. अफसरखाँ यासिनखाँ
७) स.स. म.सलिम म. हनीफ कुरैशी
८) स.स. श्री. गौतम भागाजी खरात
९) स.स. सौ. रजनी रमेश जोशी
१०) स.स. सौ. उषाबाई दिलीप गायकवाड
११) स.स. सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक
१२) स.स. सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे
१३) स.स. श्री. गौतम लिंबाजी लांडगे
१४) स.स. श्री. महादेव पुंडलिकराव सुर्यवंशी
१५) स.स. श्री. अभिमन्यु रामभाऊ भालेराव
१६) स.स. श्री. नरेंद्र यादवराव पाटील
१७) स.स. श्री. कोकाटे काशीनाथ हरीभाऊ
१८) स.स. श्री. कवरसिंग किशनसिंग बैनाडे
१९) स.स. सौ. पद्मा बाबुराव शिंदे
२०) स.स. श्री. प्रफुल्ल लालचंद मालानी
२१) स.स. श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ
२२) स.स. सौ. धनश्री अशोक विसपुते
२३) स.स. श्री. फजलउल्लाखान अजमत उल्लाखान
२४) स.स. श्री. अजिजखाँ गणीखाँ
२५) स.स. श्रीमती आबेदाबेगम मो. मुस्तफा
२६) स.स. श्रीमती नुरजहाँ बेगम अ. रहेमान
२७) स.स. श्री. वसंत विनायकराव देशमुख
२८) स.स. श्री. हाजी मोहसिन अहेमद हाजी बशीर अहेमद
२९) स.स. श्री. मुजीब आलमशा खान
३०) स.स. सौ. मोहसिना बिल्कीस विश्वारोद्दीन
३१) स.स. श्री. अ. जावेद रज्जाक
३२) स.स. श्रीमती जाहेदा बेगम म. जमीर
३३) स.स. श्री. त्रिंबक तुपे

३४) स.स. सौ. यशोदा धनंजय वाडेकर
३५) स.स. श्री. किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
३६) स.स. श्रीमती पुष्पाताई सुरेशचंद्र गंगवाल
३७) स.स. श्री. हमीदउद्दीन ताबा
३८) स.स. श्री. म.अ. रऊफ म.अ. माबुद
३९) स.स. श्री. स.अ. इकबालोद्दीन स.मो. कुतुबउद्दीन
४०) स.स. श्री. प्रदिप शिवनारायण जैस्वाल
४१) स.स. श्री. सैय्यद अली मिरांसलामी
४२) स.स. श्री. रमेश दिपचंद लाहोट
४३) स.स. श्री. संजय किसन केनेकर
४४) स.स. सौ. लता श्रिनिवास दलाल
४५) स.स. श्री. जयवंत केशवराव ओक
४६) स.स. श्रीमती अलका रमेश पाटील
४७) स.स. सौ. शकुंतला हरिदास धांडे
४८) स.स. कु. माया लिंबाजी लाडवाणी
४९) स.स. श्री. भागवत किसन कराड
५०) स.स. सौ. सविता संजय आव्हाड
५१) स.स. सौ. निर्मला विठ्ठल कांबळे
५२) स.स.श्री. अ. रशीद अ. सत्तार
५३) स.स. श्री. विश्वारोद्दीन कुतुबद्दीन
५४) स.स. श्री. विकास रतनलाल जैन
५५) स.स. श्री. गंगाधर सुखदेव गाडे
५६) स.स. श्री. गजानन रामकिसन बारवाल
५७) स.स. श्री. मनमोहनसिंग करमसिंग ओबेरॉय
५८) स.स. श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे
५९) स.स. श्री. संजय रामदास जोशी
६०) स.स. श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
६१) स.स. श्री. अविनाश लक्ष्मण कुमावत
६२) स.स. श्री. राजकुमार उर्फ सांडू बचाटे
६३) स.स. सौ. राधाबाई तळेकर
६४) स.स. श्री. नरसिंग मुरलीधर ढगे
६५) स.स. श्री. विजयकुमार गजानन मेहेर
६६) स.स. सौ. मंदा धनंजय काळुसे
६७) स.स. सौ. सुनंदा उत्तम कोल्हे
६८) स.स. श्री. बन्सी तुळशीराम गांगवे
६९) स.स. श्री. भगवान देविदास घडामोडे
७०) स.स. श्री. कचरु चंद्रभान नवपुते

<u>**संवाद**</u>

**श्री. प्रफुल्ल मालानी :** काँग्रेसचे कार्यकर्ते व कन्नड तालुक्याचे आमदार स्व. श्री. रायभान जाधव यांचे नुकतेच निधन झालेले असून सभागृहात त्यांना १ मिनीट श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**मा. महापौर :** ठिक आहे. याच बरोबर "स्वरराज" श्री. छोटा गंधर्व, माननीय श्री. रायभान जाधव यांनाही सभागृहात १ मि. स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात येते.

**मा. महापौर :** सभा सुरु होण्यापुर्वी आपणा सर्वांना नुतन वर्षाच्या व रमजाननिमित्त हार्दिक शुभेच्छा.

**श्री. अफसरखाँन :** १९९८ या नवीन वर्षाला आजपासून सुरुवात झाली आहे. त्यानिमित्त मी सभागृहातील सर्व स. सदस्य अधिकारी वर्ग तसेच कर्मचारी वर्ग यांना माझ्‍ यातर्फे शुभेच्छा देवू इच्छितो.

**विषय क्र. १६५/१** : दिनांक १५/१२/९७ आणि १६/१२/९७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद**

**श्री. गिरजाराम हाळनोर:** दि. १५/१२/९७ च्या इतिवृत्तात पान क्र. १८ वर मौलाना अबुल कलाम आझाद मेमोरियल ट्रस्टच्या जागेसंदर्भात एका समितीचे गठण करण्यात आले होते. त्यास स. अमित फुले संपादक दै. सामना यांचे नाव नजर चुकीचे टंकलिखीत करायचे राहिल्याने.

**मा. महापौर** : ठिक आहे.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दि. १५/१२/९७ च्या इतिवृत्तातील पृष्ठ क्र. १८ मध्ये मौलाना अबुल आझाद मेमोरियल ट्रस्टच्या जागेबाबत सभागृहाची समिती गठीत करण्यात आली त्यात दै. सामना संपादक श्री. अनिल फळे यांचे नाव नजर चुकीने टंकलिखित करण्याचे राहिले ती दुरुस्ती करण्यात येते व दिनांक १५/१२/९७ व १६/१२/९७ च्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तास कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६६/२** : कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. शांतीनाथ हौसिंग सोसायटी शहनुरवाडी येथील नाल्यात संरक्षित भिंत बांधणीचे अंदाजपत्रक रक्कम रु. ११,४३,०००/- तयार करण्यात आले आहे. सदरील अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी विभाग यांच्या सन ९६-९७ च्या दरसूचीनुार तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च हा नाला ट्रेनिंग च्या लेखा शिर्षातून करण्यात येईल करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. शांतीनाथ हौसिंग सोसायटी शहनुरवाडी येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणेच्या अंदाजपत्रकास रक्कम रु. ११,४३,०००/- तयार करण्यात आलेल्या सदरील अंजदापत्रक परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन १९९६-९७ चे दरसूचीनुसार सदरील खर्च नाला ट्रेनिंग च्या लेखाशिर्षातून खर्च करण्यात स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**१६७/३**

**विषय :** शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. घाटी जय भीमनगर स्लम येथे गुलाबवाडी परिसरासाठी जोडरस्ते तयार करणेबाबत कामाकरिता सा.बां. विभागाच्या सन १९९६-९७ च्या दरसुचीनुसार रु. १५,३१,०००/- अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम खडी रस्ते ह्या शिर्षकातून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा.

आयुक्त साहेबांनी दि. १८/१२/९७ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक रुपये १५,३१,०००/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. घाटी जयभीमनगर स्लम येथे गुलाबवाडी परिसरासाठी जोडरस्ते तयार करणेबाबत कामाकरिता सा.बां. खाते यांच्या वर्ष ९६-९७ च्या दरसुचीनुसार १५,३१,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले सदरील काम खडी रस्ते या लेखाशिर्षातून खर्च करण्याचा अंदाजपत्रकास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६८/४ :** उप आयुक्त-२ महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, केंद्र व राज्य शासनाच्या नवीन धोरणानुसार संपुर्ण देशातील नगरपालिका आणि महानगरपालिकाच्या माध्यमातून दि. १ डिसेंबर १९९७ पासून सुवर्णजयंती शहरी रोजगार योजना राबवायची आहे. या योजनेत ७५% केंद्र शासन व २५% राज्य शासनाच्या सहभाग असणार आहे. सदर योजना औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील व प्राधान्याने घोषित (५३) झोपडपट्ट्या भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील व्यक्तींना (ज्या कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळून वार्षीक उत्पन्न रु. १२९९६ च्या आत आहे) लाभ देण्यात येईल.

<u>लाभार्थीची निवड पध्दती :</u> शहरातील (प्राधान्याने घोषित झोपडपट्ट्यांमधील) शासनाकडून प्राप्त झालेल्या विहीत नमुन्याप्रमाणे दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाचे सर्वेक्षण करुन कुटूंबाना प्राधान्य क्रम ठरविणे आवश्यक आहे तसेच शहरी गरिबांसाठी नागरी मुलभूत सेवा योजनेतील मार्गदर्शक तत्वात उल्लेख केल्याप्रमाणे समित्या स्थापन करुन परिसर विकास समितीच्या सहाय्याने लाभार्थ्यांच्या शिफारशीनगर शहरासाठी प्रकल्प संचालक यांचे नियंत्रणाखाली स्थापन नागरी दारिद्र्य निर्मुलन कक्ष मार्फत राष्ट्रीयकृत बँकाकडे कर्ज प्रकरणे पाठविण्यात येतील व योजना राबविण्यात येईल शहरी गरीबांसाठी नागरी मुलभूत सेवा योजनेत नमुद महिलांचे समुह संघटन खालीलप्रमाणे करण्यात येईल.

<u>शेजार गट :</u> सलग शेजारी राहणाऱ्या २० ते २५ कुटूंबातील महिला समाज कार्यास रस असणारी दुसऱ्याच्या अडचणी सोडविण्यात धन्यता मानणारी कोणत्याही प्रकारच्या आर्थिक मोबदल्याची अपेक्षा न करणारी समाजासाठी वेळ देणाऱ्या सांमजस अशा एका महिलेची निवासी वस्ती सेविका (आर.सी.व्ही.) म्हणून निवड करताना ह्या गटास शेजार गट संबोधण्यात येते. हा अनौपचारिक गट असतो या संस्थेस समिकेने दरमहा आपल्या शेजार गटाची बैठक घेवून त्यांच्या गरजा ओळखणे त्यांचा प्राधन्य क्रम ठरविणे आपल्या गटाच्या विकासासाठी त्यांच्या वैयक्तिक आणि सार्वजनिक प्रश्नासाठी आरोग्य रक्षणासाठी नियोजन करावे उपलब्ध योजनाचा लाभ गरजू महिला बालके अपंग आजारी व्यक्तींसाठी करुन देण्याचा प्रयत्न करण्यात यईल.

<u>शेजार समिती :</u> साधारणत: दहा निवासी वस्ती स्वयंसेविकाची मिळून एक शेजार समिती अनौपचारिक पध्दतीने निवडण्यात येते. ह्या समितीत अध्यक्ष सचिव व इतर महिला सभासद असतात ही समिती २०० ते २५० कटुंबाचे प्रतिनिधीत्व करीत असते म्हणजेच दरमहा होणाऱ्या बैठकीत या कुटुंबाच्या गरजेचे संकलन ही समिती करीत असते. कोणत्याही संस्थेकडून मदत मिळविण्याचा सभेचा प्रयत्न करते.

<u>परिसर विकास समिती :</u> वसाहतीमधील निवासी वस्ती स्वयंसेविका मधून महिला मंडळाच्या धर्तीवर युबीएसपीच्या तत्वांशी सुसंगत धोरण असलेली परिसर विकास समिती स्थापन करण्यात येते. ही समिती धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत करावी लागते ह्या समितीकडे शेजारगट, शेजार समित्यामार्फत आलेल्या प्रस्तावावर चर्चा करुन प्राधान्यक्रम ठरवून अंतिम निर्णय घेतले जातात शासकीय योजना युबीएसपी अथवा अन्य संस्थाकडून अर्थसाह्य मिळण्यासही समिती पात्र असते वरील गट/समित्यांनी दिलेल्या सुविधांच्या प्राधन्यक्रमात कोणासही बदल करता येणार नाही. त्यांच्या प्रस्तावावर योजनेच्या तरतुदीतून खर्च अनुज्ञेय राहील.
<u>लाभार्थी प्राधान्य व आरक्षण :</u> या योजनेचा लाभ देताना ३ टक्के आरक्षण अपंग व्यक्तींना राहील तसेच ३० टक्के आरक्षण महिलांसाठी व लोकसंख्येच्या प्रमाणात अनु. जाती, अनु. जमातीसाठी आरक्षण असेल विशेषत: विधवा परित्यक्ता व कुटुंबात एकमेव कामवती महिला असेल तर त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

**<u>योजना :</u>**
<u>अ) स्वयंरोजगारासाठी कर्ज व अनुदान :</u> एका लाभार्थीस बँक रु. ५००००/- कमाल मर्यादेपर्यंत कर्ज रु. ७५००/- पर्यंत अनुदान उपलब्ध करुन देउ शकेल. तसेच लाभार्थीचा सहभाग ५ टक्के राहील. ही योजना दहावी अनुत्तीर्ण पर्यंतच शिक्षण झालेल्या बेरोजगार व दारिद्र्य रेषेखालील व्यकतीसाठी लागू आहे.

<u>ब) अनोपचारिक महिला गटास सहकारी तत्वावर व्यवसायासाठी कर्ज :</u> किमान दहा शहरी गरीब महिलांना किमान १ वर्षा यशस्वीरित्या चालविलेल्या सहकारी महिला मंडळास रु. १,२५,०००/- पर्यत अथवा प्रकल्प खर्चाच्या ५०% (जी कमी असेल त्याप्रमाणे) अनुदान उपलब्ध होवू शकेल. बचत गट स्थापन करुन यशस्वीरित्या चालवित असलेल्या गटास रु. २५०००/- पर्यत खेळते भांडवल उपलब्ध करुन देतायेईल ब गट सदर रक्कम खालील बाबींसाठी खर्च करु शकेल.

अ) कच्चा माल खरेदी व बाजार पेठ उपलब्धतेसाठी
ब) व्यवसायासाठी आवश्यक साहित्य व व्यवस्था करणेसाठी
क) ह्या गटास कर्मचाऱ्यांच्य पगारावर खर्च करता येणार नाही.

जर बचत गटातील महिला सदस्यांने एक वर्षासाठी रु. ५००/- फिक्स डिपॉझीट ठेवीत असेल तर त्या महिला सदस्याला रु. ३०/- अनुदान तिच्या आजार, जीवन, अपघात विमापोटी देण्यात येतील. जर अशी सदस्या रु. ७५०/- एका वर्षासाठी फिक्स डिपॉझीट ठेवीत असेल तर तीला रु. ६०/- पर्यंत वरील कारणांसाठी कुटुंबीयांचा आजार अपघात विमा स्वरुपात अनुदानास पात्र राहील. सदर रक्कम खेळते भांडवल या शिर्षाखाली टाकता येईल. परिसर विकास समितीस विविध वस्त्यांमध्ये सेवा केंद्र सुरु करण्यासाठी समाजमंदिर किवा जमीन फर्निचर स्टेशनरी विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात येइल.

<u>स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण :</u> स्थानिक दारिद्र्यरेषेखालील बेरोजगार युवक/युवतीसाठी २५ शिक्षणार्थीच्या गटास आय.टी.आय. शासकीय पॉलिटेक्निक विद्यालय अथवा श्रमिक विद्यापीठातून किंवा शासनामान्य तांत्रिक प्रशिक्षण देणाऱ्या संस्थामधून देणे आवश्यक आहे. प्रशिक्षण कालावधी किमान दोन महिने (३०० तास) तर कमाल सहा महिने असावा तांत्रिक व्यवसायाचे स्वरुप व कालावधी पाहुन किमान रु. १००/- पाठ्य वेतन देण्यात येईल ते

वाढीव सुध्दा येता येवू शकेल परंतु एका प्रशिक्षणार्थीवर संपुर्ण प्रशिक्षण कालावधी साठी रु. २०००/- (संस्थेस द्यावयाच्या खर्चासह) खर्च अनुज्ञेय असेल.

कर्मचारी वर्गाची आवश्यकता : शासनाच्या निर्देशाप्रमाणे २००० कुटुंबीयासाठी एक समुह संघटक या प्रमाणे मानधन द.म. रु. २५००/- व ७५/- प्रवास भत्ता व वार्षिक वेतनवाढ रु २५/- च्या पदासाठी देय राहील मानधनावरील पदे ही महानगरपालिका औरंगाबादच्या अस्थापनेवर असणार नाहीत व योजना जेव्हा बंद करण्यात येईल त्यावेळी त्यांना नोकरीवरुन कमी करण्यात येईल.
सध्या दोन समुह संघटक मानधनावर कार्यरत आहेत. त्यांचे मानधनासाठी शासन अनुदान देत आहेत. अशी मानधनावरील १८ समुह संघटक (महिला) व मानधनावरील (रु. ३५००/- व म. रु. १००/- वाहन भत्ता तसेच वार्षिक वेतनवाढ रु. ५०/-) ह्या प्रमाणे चार प्रकल्प अधिकाऱ्याची आवश्यकता आहे. त्यांचे मानधवनावरील १००% खर्च शासनातर्फे देण्यात येईल. योजना संपूर्ण शहरासाठी लागू करावयाची असल्याने ह्या विभागासाठी चार कनिष्ठ लिपीकांची आवश्यकता आहे.
दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाचे सर्वेक्षण करणेसाठी शासनाकडून अनुदान मागविणेयोग्य ह्या सर्वेक्षणासाठी शासन निर्देश देईल त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे केंद्र व राज्य शासनाच्या नवीन धोरणानुसार संपुर्ण देशातील नगरपालिका आणि महानगरपालिका माध्यमातून दि. १ डिसेंबर ९७ पासून सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना राबवायची आहे. प्रस्तुतचा प्रस्तवास मान्यता देण्यात येते व महानगरपालिकेने संपुर्ण योजना यशस्वीपणे राबविणे साठी दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाचे सर्वेक्षण करणे साठी शासनाकडून अनुदान मागविणे व ह्या सर्वेक्षणासाठी शासन निर्देश देईल त्याप्रमाणे कार्यवाही करण्यास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६९/५ :** प्रस्ताव सादर कण्यात येतो की, क्रांतीचौक (श्री. शिवाजी महाराज पुतळा) ते सेव्हनहिल हा मोठा रहदारीचा रस्ता सार्वजनिक बांधकाम यांच्या ताब्यात आहे. ह्या रस्त्यावर दुभाजक लावलेले आहेत. परंतु यावर जाळी बसवलेले नसल्या कारणाने बरेच अपघात होत आहे.
करीता दुभाजकांवर जाळी (ग्रील) बसवणे आवश्यक आहे. सर्वसाधारण सभेत मंजुरी होवून सार्वजनिक बांाकाम विभागाचे कळविण्यात यावे.
करिता प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

| | | |
|---|---|---|
| सुचक | - | श्री. राजकुमार बचाटे |
| अनुमोदक | - | सौ. लता दलाल. |
| दिनांक | - | २४/१२/९७ |

**संवाद**

**श्री. नरेंद्र पाटील :** दुभाजकावर ग्रील बसविण्यास आमचा विरोध नाही. परंतु येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या सभोवताली आतील जागेमध्ये सौदर्यीकरणकरणो आवश्यक आहे व नुसते ग्रील टाकून चालणार नाही. याची प्रशासनाने दखल घ्यावी.

**मा. महापौर :** छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याच्या सभेवताली जागेवर सौंदर्यीकरणकरण्यासाठी प्रशासन प्रयत्न शील राहून कार्यवाही करावी. नसता ह्या बाबत सार्वजनिक बांधकाम कार्यालयाकडून काम करावे. सदरील प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांतीचौक (छ. शिवाजी महाराज पुतळा) ते सेव्हन हिल रस्त्यावर दुभाजक लावलेले आहेत परंतु जाळी (गिल) बसविलेले नाही. सदरील दुभाजकावर ग्रील बसविण्यास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय १७०/६ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, समर्थ नगर येथील मोनालिसा ब्युटीपार्लर जवळील महानगरपालिकेच्या मोकळ्या खदान जागेत महानगरपालिकतर्फे येथील नागरीकांसाठी एक सभागृह बांधण्यात यावे.
करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक : कु. माया लाडवाणी
अनुमोदक : सौ. लता दलाल
दिनांक : २९/१२/९७

**संवाद**

**श्री. नरेंद्र पाटील :** प्रस्तावाखाली दर्शविलेल्या नावे सुचक व अनुमोदक या ठिकाणी उपस्थित आहेत. त्याची याबाबत थोडक्यात माहिती द्यावी.

**श्री. मुजीब आलमशा खान :** ऐन वेळेला कोणतेही प्रस्ताव ठेवून त्यास मंजुरी देवू नये.

**मा. महापौर:** स. सदस्य कु. माया लाडवाणी यांनी याबाबत माहिती द्यावी.

**कु. माया लाडवाणी :** समर्थनगर येथील नागरीकांना धार्मिक कार्यक्रम तसेच सार्वजनकि कार्यक्रमासाठी व योग्य त्या इतर कामासाठी या ठिकाणी सभगृहात प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे तो मंजुरीस्तव कार्यवाही करावी.

**मा. महापौर :** प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समर्थनगर येथील मोनालिसा ब्युटी पार्लर जवळील महानगरपालिकेच्या मोकळ्या खदान जागेत महानगरपालिका तर्फे नागरीकांसाठी एक सभागृह बांधण्यास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७१/७ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुकुंदवाडी येथील प्रा. शाळेच्या इमारतीमध्ये एक सांस्कृतीक हॉल व एक वर्ग खोली त्वरित महानगरपालिकेत बांधण्यात यावी. करित प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक - सौ. सुनंदा कोल्हे
अनुमोदक - सौ. मंदा काळुसे
श्री. जयवंत ओक

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुकुंदवाडी येथील प्रा. शाळेच्या इमारतीमध्ये एक सांस्कृतीक हॉल व एक वर्ग खोली त्वरित महानगरपालिका तर्फे बांधण्यास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

१७२/८

**विषय :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासन निर्णय क्र. परिपत्रक क्र. १०९४४/सीआर-१४/नावि-९ दिनांक ७/४/९४ चे नुसार मंजुर विकास योजनाची सर्व आरक्षणे समुचीत प्राधिकरण म्हणून त्या त्या नगरपालिकानी/महानगरपालिकानी/जमीन मालकांनी विकसीत करावयाची आहेत. नगर परिषदांना / महापालिकांना सर्वच आरक्षणे पैशा अभावी विकसीत करणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीत नागरिकांना बऱ्याच सार्वजनिक सुविधा पासून वंचीत रहावे लागते. विकास योजनेतील जास्तीत जास्त आरक्षणाची विकास व्हावा यासाठी जनतेचा सहभाग असणे आवश्यक आहे. त्यासाठी जमीन मालकांना आरक्षणाचा विकास करण्यासाठी प्रोत्साहीत करण्याच्या दृष्टीने वरील शासन निर्णयानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम अन्वये निदर्शीत करण्यात आले आहे.

सदर शासन निर्णयामधील निर्देशानुसार अर्चना बिल्डर्स प्रा.लि. औरंगाबाद तर्फे मॅनेजींग डायरेक्टर श्री. सुधीर तुकारामपंत देशपांडे, यांच्या मालकीचे न.भू. क्र. १५३०२/१२ व ज्याचे क्षेत्र २३६७.७० चौ. मी. पैकी १५ मी. विकास योजना रस्त्याने बाधील क्षेत्र ३८५.५० चौ.मी. वगळून निव्वळ अबाधीत क्षेत्रफळ १९८२.२० चौ.मी. आहे. त्या जमिनीचा विकास करणार आहे.

सदरील जमीन पुर्वीच्या मंजुर विकास योजना (१९७५) मध्ये निवासी भागात होती व प्रारुप विकास योजना १९९५ नुसार ही योजना जमीन आरक्षण क्रमांक २३७ दुकान केंद्र यामध्ये बाधीत होत आहे.

शासन निर्णयानुसार अर्जदार हे २५% क्षेत्राचा भूखंड (४९५.५५) वेगळा करुन तो एक चटई क्षेत्र निर्देशकांसाठी महानगरपालिकेस बांधून देणार आहे. उर्वरित ७५% भूखंडावर खालील अटीवर विकास करण्यास परवानगी देण्यात हरकत नाही. असे प्रशासनाचे मत आहे.

१) एकुण भूखंडक्षेत्राच्या २५% दुकाने महानगरपालिकेस मोफत बांधून द्यावी. त्यापेक्षा जास्तीचे बांधकाम असेल त्याचा त्याचा खर्च महानगरपालिका देईल.
२) १५% जादा रक्कम देण्याऐवजी १५% चटई निर्देशांक वाढवून देण्यात यावा.
३) महानगरपालिकेस द्यावयाची दुकाने व अर्जदार यांची दुकाने बांधण्यात एकत्र बांधकाम परवानगी देवून दोन्ही बांधकाम एकाच वेळी करावे.
४) महानगरपालिकेची दुकाने बांधून पुर्ण झाल्यानंतरच बांधकाम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र तथा भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येईल.

प्रस्ताव मान्यतेनंतर आवश्यक तो करारनामा करुन देण्यात येईल.

<u>**संवाद**</u>

**श्री. सय्यद अली मिरासलामी** : हा प्रस्ताव मला अद्यापपर्यंत मिळालेला नाही. याचे कारण काय? सभागृहात असे प्रस्ताव ऐन वेळेला देवून त्यास मंजुरी देवू नये.

**मा. महापौर :** सदरचा प्रस्ताव स्थगीत ठेवून पुढच्या बैठकीत ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रस्ताव पुढील बैठकीपर्यंत स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय १७३/८ :** नगरसचीव यांनी प्रस्ताव सादर केला की, श्रमिक विद्यापीठ औरंगाबाद यांचे पत्र क्र. ६५/९७ दिनांक १२/११/९७ अन्वये संचालक प्रौढ शिक्षण विभाग, मानव संशोधन विकास मंत्रालय भारत सरकार यांचेकडील पत्र व्यवहारानुसार श्रमिक विद्यापीठाच्या बोर्डावर

(स्थानिक स्वराज्य संस्थेतील) औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे एक सभासद नियुक्त करण्यास विनंती केली आहे.
त्यानुसार औरंगाबाद श्रमिक विद्यापीठाच्या बोर्डावर महानगरपालिका प्रतिनिधी म्हणून वॉर्ड क्र. ३० चे नगरसेवक श्री. हाजी मोहसीन अहेमद बशीर याची नियुक्ती करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रमिक विद्यापीठ औरंगाबाद यांचे पत्र क्र. ६५/९७ दि. १२/११/९७ अन्वये संचालक प्रौंढ शिक्षण विभाग मानव संशोधन विकास मंत्रालय भारत सरकार यांचेकडील पत्र व्यवहारानुसार श्रमिक विद्यापीठाच बोर्डावर (स्थानिक स्वराज्य संस्थेील) औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे एक सभासद म्हणून वार्ड क्र. ३० चे स. नगरसेवक श्री. हाजी मोहसीन अहमद यांची नियुक्ती करणेस स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७४/१०** : आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, विद्यमान सचीव श्री. पी.व्ही. मगरे हे नियम वयोमानानुसार ३१ डिसेंबर ९७ रोजी महापालिका सेवेतून निवृत्त होत आहेत. महानगरपालिकेच्या सेवा भरती नियमानुसार हे पद नाम निर्देशनाने, पदोन्नतीनेव प्रतिनियुक्तीने भरता येते. यापुर्वी हे पद पदोन्नतीने भरलेले आहे. पदोन्नतीसाठी पात्रता पुढीलप्रमाणे आहे.

१) कला, वाणिज्य अथवा विधी शाखेची मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी धारण कराणारा.
२) अधिक्षक दर्जाच्या हुद्द्याच जागेवर किंवा तत्सम संवर्ग नोकरीचा दहा वर्षापेक्षा कमी नसेल इतका अनुभव

नगरसचिव पद भरण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) अन्वये उप आयुक्त-१ मुख्य लेखा परिक्षक, विधिसल्लागार याची निवड समिती स्था ापन करण्यात आली होती. निवड समितीने अहवाल सादर केला आहे की, उपरोक्त अर्हतेनुसार कार्यालय अधिक्षक संवर्गात कार्यरत असलेले कर्मचारी आवश्यक अनुभव धारण करत नसल्यामुळे व त्या पदासाठी सक्षम वाटत नसल्यामुळे नगर सचीव या पदावर विभागीय अधिकारी संवर्गात कार्यरत अधिकाऱ्यामधून बदलीने नियुक्ती देवून नगर सचीव पद भरण्यात यावे. विभागीय अधिकारी संवर्गात कार्यरत श्री. पी.यु. तुर्कमाने प्रशासकीय अधिकारी यांची शैक्षणिक पत्रता बी.ए. असुन त्यांना त्या सदंर्भात साडेसहा वर्षाचा कामा ाचा नअुभव आहे. ते अनुसुचीत जाती ह्या संवर्गातील असून त्या संवर्गातील उमेदवारांना अनुभवाची अट सहा महिने शिथील करण्याची तरतुद सेवाभरती नियमात आहे. सबब त्यांना सात वर्षाचा अनुभव ग्राह्य धरुन निवड समितीने त्यांच्या नावाची शिफारस केली आहे.
नगर सचीव ह्या पदावर नियुक्ती व्हावी म्हणून श्री. एम.ए. पठाण शाखा अभियंता यांनी अर्ज सादर केलेला आहे. तसेच श्री. पैठणपगारे कार्यालय अधिक्षक यांनीही सचीव ह्या पदावर पदोन्नतीने नियुक्ती देण्याबाबत अर्ज सादर केलेला आहे. श्री. पठाण व श्री. पैठण पगारे हेही सेवाभरती नियमानुसार विहीत अर्हता धारण करतात.
नगर सचिव हे पद मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ मध्ये समाविष्ट असल्यामुळे ह्या पदावर नियुक्ती देण्यासाठी संपुर्ण अधिकार सर्वसाधारण सभेचे आहेत. प्रस्ताव विचारार्थ सादर.

<u>संवाद</u>

**श्री. गिरजाराम हाळनोर** : नगरसचीव ह्या पदासाठी निवड समितीने श्री. तुर्कमाने यांना १० वर्षाचा अनुभव आहे काय? समितीने परत एकदा विचार विनिमय करुन प्रस्ताव सादर करावा.

**श्री. नरेंद्र पाटील** : नगरसचीव श्री. मगरे हे दि. ३१/१२/९७ रोजी सेवानिवृत्त होणार होते हे प्रशासनाला माहित असताना प्रशासनाने वेळेवर सचीव पदासाठी निवड करणेसाठी हा प्रस्ताव ऐनवेळेला सभगृहात का ठेवला याची माहिती द्यावी.

**श्री. फैय्याज अहमद कुरैशी** : स. नगरसेवक यांनी सुचीत केल्यानुसार सभागृहात खुलासा करावा.

**श्री. गंगाधर गाडे** : समिती निवड करण्यासाठी सक्षम आहे.

**डॉ. विजय कुमार** : सदर प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवावा.

**श्री. वसंत देशमुख** : याबाबत खुलासा करावा.

**मा. आयुक्त** : ऐनेवेळेला प्रस्ताव ठेवण्याचे कारण, सभागृहाला माहित आहे की, श्री. मगरे यांच्या मुदत वाढीबाबत आपण सभागृहात प्रस्ताव ठेवला होता. सभागृहात प्रस्ताव ठेवला असता त्यास याच सभागृहात श्री. जी.व्ही. मगरे यांना सेवानिवृत्त झालेल्या तारखेपासून पुढील सहा महिन्याचा सेवा कालावधी वाढवून देण्यास मंजुरीही दिलेली आहे. व प्रस्ताव फॅक्सद्वारे शासनाकडे पाठवावा असे ठरले होते. परंतु श्री. मगरे हे कालच ३१/१२/९७ रोजी सेवानिृत्त झालेले आहेत. त्यांना मुदत वाढ देता येणार नाही. शासनाकडून श्री. मगरे यांच्या मुदतवाढीबाबत अद्यापपर्यंत महापालिकेच्या प्रशासनाला काही कळवले नाही. त्यासाठी पद भरणे आवश्यक असल्याकारणाने हा प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे.

**श्री. गौतम खरात** : सर्वसाधारण सभेत श्री. मगरे यांना सचीव पदासाठी मुदतवाढ द्यावी अशी मंजुरी मिळालेली असून प्रशासनाने त्याबाबत कार्यवाही केली याची माहिती देवून मागे मंत्रालयीन सचीव श्री. अफजल पुरकर यांना सचीव पदाची मुदत वाढ मिळाली होती ती कसे काय? याशिवाय माजी शिक्षणाधिकारी एम.ए. कुलकर्णी यांनाही प्रशासनाने मुदतवाढ दिली होती ते कोणत्या आधारे शासनाच्या नियमान्वये आहे काय? याही खुलासा करावा व शासनाकडूनच मार्गदर्शन घ्यावे व कार्यवाही करावी.

**मा. आयुक्त** : शासनातील कुणाही सक्षम अधिकारी व्यक्तीला जो मानसिक व शारीरिक रित्या योग्य आहे त्यांना ५८ वर्षाच्या पुढें मुदतवाढ देण्याचे धोरण शासनाचे होते. परंतु आता शासनाच्या नवीन धोरणानुसार तो व्यक्ती त्या पदाची अर्हता प्राप्त असेल तरीही मुदतवाढ देता येत नाही.

**श्री. गजानन बारवाल** : मा. श्री. मगरे नगर यांनी त्यांच्या सेवा काळात सर्वांनाच चांगल्या प्रकारे सहकार्य केले आहे. त्यांना मुदतवाढ मिळावयास पाहिजे होती तो भाग वेगळा परंतु प्रस्तावात श्री. पैठणेकर यांनी याची माहितीही अर्धवट सभागृहात सादर केलेली आहे. संबंधीत अधिकारी यांनी सविस्तर खुलासा करावा.

**मा. महापौर** : नगरसचीव पदासाठी गठण केलेल्या कमीटीने श्री. तुर्कमाने प्रशासकीय अधिकारी यांची निवड केली आहे. यावर सभागृहाची मंजुरी

साठीहा प्रस्ताव सभागृहात ठेवलेलो आहे. पद भरणे आवश्यक असल्याने सभागृहाने आजच निर्णय घ्यावा अशी विनंती.

**श्री. अविनाश कुमावत :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संबंधीत अधिकारी यांना साडेसहा वर्षाचा अनुभव आहे काय?

**श्री. जयवंत ओक :** सचिव पद निवडी बाबत सभागृहाचे मत घ्यावे सभागृहाला याबाबत अधिकार आहे.

**श्री. प्रफुल्ल मालानी :** सदरील पदासाठी किती अर्ज आले आहे याबाबत प्रस्तावात संपुर्ण माहिती दिलेली नाही. मा. आयुक्त यांनी तात्पुरत्या स्वरुपात एखाद्या सक्षम अधिकाऱ्यांची या पदावर नेमणूक करावी व पुढच्या बैठकीत सचीव पदाचा प्रस्ताव योग्य त्या सविस्तर माहितीसह सभागृहात ठेवावा.

**श्री. गंगाधर गाडे :** मा. आयुक्त यांनी खुलासा केला की, शासन सेवेत ५८ वर्षाच्या पुढे शासनाचे मुदत वाढ देण्याचे धोरण होते परंतु सदरील व्यक्ती मानसिक व शारिरिक रित्या पात्र असेल तर त्याला मुदतवाढ देता येत नाही. माझे मत असे की, श्री. मगरे हे मानसिक शारिरिक रित्या पात्र नाहीत काय? आपण त्यांची वैद्यकीय तपासणी केली काय? मा. आयुक्त हे प्रशासनाचे अधिकारी आहेत. त्यांनी अशा प्रकारचे उच्चारणा करणे सभागृहाला बरोबर नाही.

**मा. आयुक्त :** श्री. मगरे हे मानसिक व शारिरिक रित्या योग्य नाहीत असा माझा म्हणण्याचा उद्देश नसुन स.स. श्री. गाडे यांनी याबाबत मुद्दा लक्षात घ्यावा. श्री. मगरे यांच्या सेवाकार्यबाबत प्रशासनातर्फे खुलासा करु इच्छितो की, त्यांनी आतापर्यंत ज्या ज्या पदावर सेवा केली त्या सर्व पदावर त्यांनी चांगल्या प्रकारे कामे केलेली आहेत. परंतु शासनाचे धोरणत्मक निर्णय समोर ठेवून त्यांना सेवानिवृत्त केलेले असून त्यांचा सत्कारही करण्यात आला. याची सर्व सभागृहाने नोंद घ्यावी.

**श्री. गजानन बारवाल :** श्री. मगरे यांना ६ महिन्यासाठी मुदतवाढ देता येत असेल तर ती देण्यास हरकत नाही.

**श्री. डॉ. विजयकुमार मेहेर**

**श्री. संजय जोशी :** प्रशासकीय निवड समितीने जो निर्णय दिलेला आहे तो सभाागृहाला मान्य आहे.

**श्री. नरेंद्र पाटील :** नगर सचिव पदासाठी ३ कर्मचाऱ्यांची नावे ह्या ठिकाणी देण्यात आलेली आहे. श्री. पठाण, श्री. पैठणपगारे व श्री. तुर्कमाने या तीन व्यक्ती कितपत सचीव पदे बजावून शकतील यासाठी एक कमिटी ठेवावी व नंतरच पुन्हा अर्ज मागवून मुलाखती द्वारे हा निर्णय घेण्यात यावा.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :** नगरसचीव पदासाठी दोनच व्यक्ती पात्र ठरत होत्या. त्यात तिसऱ्या व्यक्तीचे (कर्मचाऱ्याचे) नाव टाकण्याची गरजच काय? निवड समिती काय करत आहे. याबाबत खुलासा करावा.

**मा. महापौर :** निवड समितीने श्री. तुर्कमाने (प्रशासकीय अधिकारी) याचे शिफारस केली आहे. श्री. पठाण यांची स. सदस्यांचे पत्रान्वये शिफारस पत्रे देवून प्रशासनाला अर्ज दिला आहे. तर तिसरे श्री. पैठणपगारे हे या पदास पात्र ठरत नसेल तर सभागृहास तसा निर्णय घेण्याचा अधिकार असून तसे जाहीर करावे. निवडसमितीने परत अर्जदाराचे अर्ज मागवून विचार विनिमय करुन निर्णय द्यावा तो पर्यंत श्री. पठाण यांची तात्पुरती नेमणूक करु.

(याच वेळी भाजपचे नगरसेवक व इतर काही नगर सेवक मा. महापौर यांच्या डायसजवळ जावून मोठमोठ्याने बोलतात कुण्या स. सदस्यांनी शिफारस पत्रे दिली आहे ते आम्हाला वाचून दाखवावे असे सभागृहात जोरजोराने बोलतात यावेळी काही ही ऐकु येत नाही.)

**श्री. सुदाम सोनवणे** : नगरसचीव पदासाठी ज्या उमेदवाराकडून अर्ज मागविले होते. त्यासाठी एक निवड समिती गठण केली होती निवड समितीने सदरल उमेदवाराचे अर्ज मा. आयुक्ताकडे दिलेले आहे. परंतु प्रस्तावात कोणकोणत्या अधिकारी/कर्मचारी यांनी अर्ज केले याचा संपुर्ण उल्लेख केलेला नाही. यासाठी निवड समितीने नव्याने अर्जदाराकडून अर्ज मागवून निवड समितीने निर्णय घेवून सभागृहासमोर ठेवावे.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** प्रस्तावात पुरेपुर माहिती नसल्यामुळे प्रस्ताव परत निवड समितीकडे पाठवावा. निवड समितीने १५ दिवसाच्या आत नव्याने अर्ज मागवून एका पात्र व्यक्तीचे नगर सचीव पदासाठी नाव निश्चित करुन अहवाल सादर करवा. तो पर्यंत श्री. पठाण यांना तात्पुरती नेमणूक करण्याचे आदेश मा. महापौर यांनी प्रशासनाला करावे.

**मा. महापौर :** नगर सचिव पदासाठी ज्या ज्या अधिकारी/कर्मचारी याचे अर्ज आले असतील व पुन्हा करतीत्या बाबत निवड समितीने परत एकदा फेर विचार करुन पुनहा नव्याने निवड समितीने कुणाही एका पात्र अधिकारी/कर्मचारी याचे नाव नियमाप्रमाणे सुचवून अहवाल १५ दिवसाच्या आत सभगृहाला सादर करावा. तोपर्यंत श्री. पठाण यांना नगरसचीव या पदावर तात्पुरती नेमणूक देण्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहातील चर्चेनुसार नगरसचिव हे पद भरण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) अन्वये निवड समिती स्थापन करण्यात आल होती. समितीच्या अहवाला नुसार कार्यालय अधिक्षक संवर्गात कार्यरत असलेले कर्मचारी आवश्यक अनुभव धारण करत नसल्यामुळे व त्या पदासाठी सक्षम वाटत नसल्यामुळे नगर सचीव या पदावर विभागीय अधिकारी संवर्गात कार्यरत श्री. पी.यु. तुर्कमाने प्रशासकीय अधिकारी यांची शैक्षणिक पात्रता व कामाचा अनुभव लक्षात घेता निवड समितीने त्यांच्या नावाची शिफारस केली. त्याचप्रमाणे नगर सचीव ह्या पदावर नियुक्ती द्यावी. म्हणून श्री. एम.ए. पठाण शाखा अभियंता व श्री. पैठणपगारे, कार्यालय अधिक्षक यांनी पदोन्नती नियुक्ती देण्याबाबत अर्ज सादर केलेला होता. व दोघही सेवाभरती नियमानुसार विहीत अर्हता धारण करतात.

ह्या दोघांच्या अर्जावर पुन्हा काही पात्र उमेदवारांचा अर्ज मागवून निवड समिती गठण करावी सदरील समितीने याबाबतचा पात्र अमेदवारांचा सखोल अभ्यास करुन आपला अहवाल सर्वसाधारण सभेसमोर ठेवावा तोपर्यंतचा नगर सचीव हे पद अर्जदार श्री. एम.ए. पठाण शाखा अभियंता यांना तात्पुरता कार्यभार सांभाळण्यासाठी मान्यता देण्यात येते. समितीने आपला अहवाल सादर केल्यानंतर त्यानुसार पुन्हा नगरसचीव ह्या पदासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ अन्वये नियुक्ती देण्यात येईल. यास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यता येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७५/११ :** औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुासर ५० फुट रुंद रस्ता राजाबाजार ते जिन्सी विकसीत होणे आवश्यक आहे. चेलीपुरा ते राजाबाजर (नवाबपूरा) ५०

फुट रस्ता व जिन्सी चौक ते इंदीरानगर ५० फुट रुंद रस्ता वियो. रस्त्याचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे भुसंपादनासाठी पाठविलेला आहे. प्रस्तावित रस्ता हा राजाबाजार ते जिन्सी चौकापर्यंतचा आहे. सदर रस्ता संपादीत होणे आवश्यक आहे. हा रस्ता संपादीत झाल्यास शहागंज, राजाबाजार ते इंदीरानगर पुर्ण ५० फुट रुंद विकास योजना संपादीत झाल्यास शहागंज राजाबाजार ते इंदीरानगर पुर्ण ५० फुट रुंद विकास योजना रस्ता तयार होवून वाहतुकीस मोकळा होईल मंजुर विकास योजना प्रस्तावानुसार रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक असल्याने रस्ता रुंदीकरणाने बाधीत होणारी जागा संपादित करावासाठीचा भुसंपादनाकरिता लागणाऱ्या खर्चाचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे. प्रस्ताव मान्यतेनंतर रितसर भुसंपादनाची कार्यवाही करण्यात येईल.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मंजुर विकास योजनेनुसार ५० फुट रुंद रस्ता व जिन्सी चौक ते इंदीरानगर ५० फुट रुंद विकास योजना प्रस्ताव मा. जिल्हाधिारी यांचेकडे भुसंपादनासाठी पाठविलेला आहे. प्रस्तावित रस्ता राजाबाजार ते जिन्सी चौकापर्यंत आहे. सदर स्ता संपादीत होणे आवश्यक आहे. सदर रस्ता संपादीत झाल्यास शहागंज राजाबाजार ते इंदीरानगर पुर्ण ५० फुट रुंद रस्ता विकास रस्ता तयार होईल वाहतुकीस मोकळा होईल. मंजुर विकास योजना रस्ता रुंदीकरणे आवश्यक असल्याने रसतारुंदीकरणाने बाधीत होणारी जागा संपादीत करण्यासाठीचा भुसंपादनाकरिता लागणाऱ्या खर्चास शासकीय दराने खर्च करण्यास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७६/१२ :** औरंगाबाद महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील उपआयुक्त - २ हे पद श्री. जी.एम. अंभोरे हे सेवानिवृत्त झाल्यामुळे रिक्त झाले आहे.

उप आयुक्त-२ हे पद मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४७ अंतर्गत सामाविष्ट आहे. ह्या पदावर योग्य उमेदवाराची निवड करुन सर्वाधारण सभेस ठराव ठेवण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमान्वये निवड समितीचे गठण करण्यात आले होते. ह्या निवड समितीमध्ये आयुक्त, उप आयुक्त व मुख्यलेखापरिक्षक यांचा समावेश होता. ह्या पदावर योग्य उमेदवाराची शिफारस करण्यासाठी निवड समितीने वेळोवेळी बैठका घेतल्या महानगरपालिका अधिनियमामधील तरतुद आणि सेव भरती नियमाच्या तरतुदी तसेच मागासवर्गीयासाठी आरक्षित पदाबाबत असलेल्या तरतुदीचे तसेच सबरवाल या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा अभ्यास करुन निवड समिती खालील निर्णयाप्रत आली आहे.

महानगरपालिकेने पारित केलेले सेवाभरती नियम न्यास महाराष्ट्र शासनाची मान्यता आहे. त्यानुसार उप आयुक्त-२ ह्या पदावर नियुक्ती देण्यासाठी पदोन्नती नामनिर्देशन आणि प्रतिनियुक्ती या तीन माध्यमातून करण्याबाबत विचार करण्यात आला.

पदोन्तीसाठी एकुण १३ उमेदवारांची पात्र अपात्रतेबाबत विचार विनिमय झाला. सेवाभरती नियमानुसार **प**दोन्नतीने उमेदवार भरावयाचे उप आयुक्त-२ ह्या पदावर कमीत कमी कला वाणिज्य विज्ञान किंवा विधी विषयाची पदवी व ७ वर्षाचा अनुभव अशी अट नमुद करण्यात आली आहे. निवड समितीला असे दिसून आले की, ही अट परिपूर्ण करुन ७ वर्षाचा अनुभव असलेल्या पदवीधर पात्र उमेदवार याच पदासाठी उपलब्ध नाही व पात्रही नाही.

निवड समितीने ह्या पदावर नियुक्ती करण्यासाठी महानगरपिालकेच्या अधिकाऱ्यामधून इच्छुक व सक्षम उमेदवार नामनिर्दशनाने ह्या पदावर नियुक्ती व्हावी म्हणून १३ इच्छुक

उमेदवारांच्या मुलाखती निवड समितीने घेतल्या. श्री. वाहुळ यांनी उच्च न्यायालयात सादर केलेली याचिक क्रमांक ५०४८/९७ मध्ये महानगरपालिकेतर्फे रुपये २२००-३७०० या संवर्गात कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याची सूची सादर केली होती. या सुचीतील पात्र उमेदवार उप आयुक्त-२ या पदार रुपये २२००-४००० या श्रेणीत नियुक्ती करणे बाबत समितीने विचार केला.

वरील बाबींचा विचार करता निवड समितीने एक मताने श्री. एम.वाय. कांबळे विधी सल्लागार हे या पदावर नेमणूक देण्यास पात्र उमेदवार आहे ह्या निर्णयाप्रत आली आहे.

शासनाने वेळोवेळी पारित केलेले स्थायी आदेश महानगरपालिकेचे सेवा भरती नियम,उपआयुक्त-२ ह्या पदावर नियुक्ती करण्याबाबत शिफारस समितीने केली आहे.

ह्या संदर्भात श्री. वाहुळ व इतर यांनी औरंगाबाद उच्च न्यायालयाच्या खंडपीठात याचिका क्रमांक ५०७८/९७ दाखल केली होती. सदरहु याचिका उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. परंतु ही याचिका फेटाळत असताना श्री. वाहुळ व श्री. मराठे यांचे निवेदाची प्रत सोबत सादर केली आहे. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीनंतर नियुक्ती देवून प्रस्ताव शासनाकडे मान्यतेस्तव पाठविण्यात येईल.

<u>संवाद</u>

**श्री. विजय कुमार मेहेर :** उप आयुक्त-२ ह्या पदासाठी जी जेष्ठता यादी तयारी केली आहे. त्यातील १३ पैकी श्री. एम.वाय. कांबळे यांचे आहे काय? जेष्ठतेनुसार ज्यांचे नाव असेल तर त्यांनाच घेण्यात यावे.

**श्री. मनमोहन सिंग ओबेरॉय :** निवड समितीने श्री. एम.वाय. कांबळे यांचे नाव उल्लेखीत केले आहे. याबाबत श्री. वाहुळ व श्री. मराठे यांची याबाबत काहीही तक्रार नाही. परंतु निवड समितीने योग्य तो विचार करुन निर्णय घेतलेला आहे काय? तसे नसेल तर परत फेर विचार करुन समितीने पुढच्या बैठकीत निर्णय द्यावा. मागील वेळेस जेष्ठतेनुसार श्री. अंभोरे व कुलकर्णी यांना उप आयुक्त-२ पदाचा पदभार दिलेला होता त्याप्रमाणे जेष्ठतेनुसार प्रशासनाने कार्यवाही करावी.

**मा. महापौर :** मा. आयुक्त यांनी याबाबत खुलासा करावा.

**श्री. मुजीब आलमशा खान :** याबाबतचे प्रकरण कोर्टात असेल तर, निकाल लागेपर्यंत प्रकरणी निर्णय घेण्यात येवू नये.

**श्री. वसंत देशमुख :** कोर्टाने दिलेल्या आदेशाची प्रत प्रस्तावासोबत आहे काय?

**मा. आयुक्तः** १) स.स. डॉ. मेहेर यांनी असे सुचविले की, १३ अर्जदारांच्या यादित श्री. एम.वाय. कांबळे यांचे नाव आहे काय? त्यास अनुसरुन बोलू इच्छितो की, यादीत त्यांचे नाव नाही. ३) स.स. श्री. ओबेरॉय यांच्या प्रश्नाचे उत्तर असे की, उच्च न्यायालयातील याचिका क्र. ५०७८/ श्री. वाहुळ यांची न्यायालयात सादर केली होती. त्यानुसार कोर्टाच्या अंतीम सुनावणीत श्री. वाहुळ यांची याचिक फेटाळण्यात आली व असे आदेशित कले की, उप आयुक्त-२ पदासाठी मा. आयुक्त यांनी एक कमिटी तयार करुन निर्णय घ्यावा व श्री. वाहुळ व श्री. मराठे यांचाही विचार करण्यात यावा. परंतु शासनाचे काय नियम आहेत हे प्रशासनाला पहावे लागते. श्री. वाहुळ हे ह्या पदास सक्षम आहे. तशी शिफारसही करण्यात आली.परंतु न्यायालयाचे असे आदेशित केले आहे की, ह्या पदासाठी उमेदवार हा कला, वाणिज्य, विज्ञान किंवा विधी शाखेचा पदवीधर असला पिाहजे तसेच उमेदवाराला १० वर्षाचा

अनुभव पाहिजे. त्यानुसार आलेल्या उमेदवारांच्या अर्जातून एकही पदवीधर उमेदवार नसल्यामुळे निवड समितीने श्री.एम.वाय. कांबळे विधी सल्लागार (सध्याचे) यांची निवड आर.आर. नुसार व अनुभव आणि पात्रता पाहून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार सर्व साधारण सभेची यास मंजुरी आवश्यक आहे. त्यासाठी हा प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे. यामध्ये (१) कमीत कमी १० वर्षाचा प्रशासकीय अनुभव (२) कोणत्याही शाखेचा शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे पदवीधर बाबत निवड समितीने निवड करताना १) पदोन्नती २) नामनिर्देशन ३) व प्रतिनियुक्ती चॅनल याबाबत विचार करुन श्री. एम.वाय. कांबळे यांच्या नावाची शिफारस केली आहे. व सदरील प्रस्ताव शासनाकडे पाठवावा लागेल.

**श्री. गौतम लांडगे :** न्यायालयाच्या यादीनुसार व इतर बाबी व अटी शर्ती लक्षात घेता श्री. एम.वाय. कांबळे (सध्याचे विधी सल्लागार) यांची निवड समितीने केलेली योग्य असून तसे त्यांना नेमणूकीचे आदेश द्यावेत.

**डॉ. विजय कुमार मेहेर :** यादीत १३ पैकी श्री. गिरी व अन्य उमेदवार अर्जदार या पदासाठी पदवीधर असताना निवड समितीने श्री. कांबळे यांचे नाव कसे सुचीत केले याचा खुलासा करावा.

**श्री. हमीदउद्दीन ताबा, श्री. मोहसीन अहमद :** उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णय आदेशाची प्रत सभागृहात दाखवावी. प्रशासनाने सभागृहाची दिशाभूल करु नये.

**श्री. वसंत देशमुख :** आलेल्या अर्जातील जेष्ठतेनुसार नेमणूक करावी. परंतु यापुढे कोर्टात याचिका दाखल करण्याची गरज पडणार नाही याची प्रशासनाने दखल यावी. मनपाचे ॲक्ट पेक्षा फॅक्ट महत्त्वाचे आहे.

**श्री. सै. अली मीरा सलामी :** कांबळेच्या नावास विरोध नाही. कोर्टाच्या निकालाची प्रत दाखवावी.

**श्री. भागवत कराड :** उप आयुक्त २ या पदासाठी निवड समितीने फेर विचार करावा. पैकी योग्य त्या व्यक्तीची निवड करुन नंतरच पदोन्नती द्यावी मनपातील ज्या अधिकाऱ्यांना प्रत्यक्षात पदोन्नतीचा लाभ मिळत नाही त्यांचे बाबतत प्रशासनाने विचार करणे आवश्यक आहे.

**श्री. गजानन बारवाल, श्री. गौतम खरात,**

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :** निवड समितीने एम.वाय. कांबळे यांच्या नावाचा उल्लेख करुन खुलासा केलेला असून तसेच मा. आयुक्तांनी ही कांबळे यांचा उप आयुक्त २ पदी नियुक्ती बाबत खुलासा केलेला आहे. त्यानुसार श्री. कांबळे यांचीच नियुक्ती करावी. श्री. कांबळेच्या नावास शिक्मोर्तब करावे.

**डॉ. विजयकुमार मेहेर,**

**श्री. संजय केनेकर :** श्री. एम.वाय. कांबळे यांची निवड समितीने केलेल्या शिफारशीस आमचा विरोध असून सदरील पदासाठी परत निवडसमितीने फेर विचार करावा व पुन्हा स. सदस्यांच्या सुचनेनुसर मा. आयुक्त महापौर यांनी उप आयुक्त २ पदावर कुणाचेही नाव सुचवू नये.

**मा. महापौर :** उप आयुक्त २ या पदासाठी सभागृहात चर्चा खुप झाली. उपआयुक्त-२ ह्या पदासाठी कुणाचे नाव सर्वसंमतीने व्हावे याबाबत सभागृहाने हात उंचावून निर्णय जाहिर करावा (यावेळी सभागृहात श्री.एम.वाय. कांबळे यांचे नाव घेवून हात उंचावतात) उपआयुक्त-२ या पदासाठी श्री. एम.वाय. कांबळे यांचे नावाची शिफारस सर्वासाधारण सभेने केलेली आहे. फक्त काही स.

सदस्यांचा यास विरोध आहे. ती नोंद घ्यावी व उपआयुक्त २ पदी श्री.एम.वाय. कांबळे यांना नियमाप्रमाणे व समितीने केलेल्या शिफारशीनुसार प्रशासनाने कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते.

(मा. महापौर यांनी उपआयुक्त २ ह्या पदावर श्री. कांबळे यांची नेमणूक केल्याचे घोषित केल्यानंतर स. नगरसेवक श्री. भागवत कराड श्री. भगवान घडामोडे, श्री. संजय जोशी, डॉ. विजयकुमार मेहेर श्री. संजय केनेकर यानी निषेध व्यक्त केला)

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार महानगरपालिका, औरंगाबाद अस्थापनेवरील उपआयुक्त-२ हे पद मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४५ अंतर्गत समाविष्ट आहे. ह्या पदावर पात्र उमेदवारांची निवड करण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमान्वये निवड समितीचे गठन करण्यात आले होते. महानगरपालिका अधिनियमातील तरतुद आणि सेवा भरती नियमाच्या तरतुदी तसेच मागासवर्गीयासाठी आरक्षीत पदाबाबत असलेल्या तरतुदीचे तसेच सबरवाल प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात निकालाचा अभ्यास करुन निवड समितीने महानगरपालिकेने पारित केलेले सेवाभरती नियम ज्यास महाराष्ट्र शासनाची मान्यता आहे. त्यानुसार उप आयुक्त-२ च्या पदावर नियुक्त देण्यासाठी पदोन्नती, नामनिर्देशन आणि प्रतिनियुक्त या ३ माध्यमातून करण्याबाबत विचार करण्यात आला. सेवाभरती नियमानुसार पदोन्नतीने सदरील पद भरणे बाबत १३ उमेदवारांच्या पात्र अपात्रतेबाबत विचार विनिमय झाला. यासाठी नियमानुसार पदवीधर पात्र उमेदवार व ७ वर्षाचा अनुभव ही अट प्राप्त करणारा उमेदवार ह्या पदासाठी उपलब्ध नाही व पात्रही नाही त्यामुळे निवड समितीने उप आयुक्त-२ ह्या पदावर नियुक्ती करण्यासाठी महानगरपालिकेने न्यायालयात सादर केलेल्या निवड सुचीतील रु.२२००-३७०० ह्या वेतन श्रेणीतील अधिकाऱ्यामधून निवडीसाठी पात्र उमेदवारांचा विचार करण्यात आला. महानगरपालिका सेवाभरत नियम ह्या पदासाठी आवश्यक लागणारा पात्रता तसेच राखीव जागेबाबत असलेले स्थायी आदेश यांचा एकत्रीत विचार करुन श्री.एम.वाय कांबळे सध्या विधी सल्लागार, महानगरपालिका यांची उपआयुक्त-२ या पदावर वेतनश्रेणी रु. २२००-४००० ह्या वेतनश्रेणीत नियुक्ती देणे बाबत शिफारस केली. श्री. एन. ए. वाहुळ मराठे एल.एम. यांनी सादर केलेले निवदेन सभागृहापुढे विचारार्थ सादर करण्यात आले. निवड समितीची शिफारस उक्त दोन्ही अधिकारी यांच्या निवेदनावर सहानुभूतीपुर्वक विचार करुन हे दोन्ही अधिकारी आवश्यक अर्हता धारण करीत नसल्यामुळे त्यांचे निवदेन सर्वानुमते अमान्य करण्यात येते. श्री.एम.वाय. कांबळे हे आवश्यक अर्हता धारण करीत असल्याने उप आयुक्त-२ ह्या पदावर रुपये २२००-४००० ह्या वेतनश्रेणीत नियुक्ती करण्यास बहुमताने स्विकृतीसह मान्यता देण्यात येते. नियुक्तीचे आदेश प्रशासनाने निर्गमीत करुन शासनाकडे मंजुरीस्तव सादर करावेत. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा. महापौर :** मौलाना अबुल कलाम आझाद रिसर्च सेंटर कुठे करावयाचे याबाबत वाद विवाद चालू होता याबाबत काही विरोध अविरोध मजकुर स्थानिक वर्तमान पत्रात ही छापून आलेला होता. परंतु मौलाना अबुल कलाम आझाद रिसर्च सेंटर हे मजनु हिल येथे न होता ते शिवाजी मैदानाजवळील रिकाम्या जागेवर करण्याचा निर्णय संबंधीत समितीने दिला आहे. त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी. या समितीच्या दोन-तीन वेळेस बैठका झाल्या. बैठकीत ११ पैकी दोन स. सदस्य गैरहजर होते. बाकी नऊ स. सदस्याच्या

संमतीने दिलेल्या निर्णयानुसानर शिवाजी मैदान(आमरवास) येथील जागेत मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र उभारण्यास मंजुरी देण्यात येते.

## सभागृहातील ऐनवेळचा विषय

**विषय क्र. १७७/१३ :** सभापती, स्थायी समिती, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, स्थायी समिती सभा दि. २६/१२/९७ रोजी संपन्न झालेल्या सभेमध्ये अपीलकार श्री. महेन्द्र खैरनार यांनी अधिनियमाचे कलम ५६ (४) अन्वये दाखल केलेल्या अपील ठराव क्र. ४५६ नुसार मंजुर करण्यात आलेले असून स्थायी समितीची निकट वरिष्ठ प्राधिकारी महानगरपालिका असल्याने मंजुर करण्यात आलेले अपिल कायम करणेस्तव प्रस्ताव सादर करण्यात येतो. अधिनियमाचे कलम ५६(२) नुसार व ५६ (४) नुसार मान्यतेस्तव सादर. सदरील अधिकाऱ्याने अपिल दाखल केल्यानुसार मा. आयुक्त यांचेकडून संचिका मागवून जिल्हा सरकारी वकील यांचे अभिप्राय मागविले असता, अपिलकार यांचे म्हणणे प्रशासनाचे म्हणणे व कायदेशीर मत व सभागृहाच्या भावना लक्षात घेता स्थायी समितीने खालिल प्रमाणे निर्णय घेतला आहे.

१) अपिलकार श्री. महेन्द्र खैरनार यांना पोलिसांनी ताब्यात घेवून २४ तासाचे आत न्यायालयाने जामीनावर मुक्त केले आहे. त्यांना पोलिस कस्टडीत ठेवण्यात आलेले नाही त्यामुळे त्यांचे निलंबन योग्य वाटत नाही.

२) स्थायी समितीही मा. आयुक्तांची निकट वरिष्ठ प्राधिकारी असल्याने निर्णय घेण्यास सक्षम आहेत.

अ) अपिलकार श्री. मेहंद्र खैरनार यांना पोलिस कस्टडीत ठेवण्यात आलेले नाही. (महाराष्ट्र नागरी सेवा नियम ४ (२) अनुसार विहीत कालावधीत)

ब) अपीलकार यांनी त्यांच्या अपिलात नमुद केलेले मुद्दे लक्षात घेता प्राथमिक दृष्ट्या त्यांना बदनाम करण्यासाठीच खोट्या प्रकरणात गोवण्यात आल्याचे दिसून येते.

क) जिल्हा सरकारी वकील यांनी नमुद केले आहे की, लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखालील कार्यवाही दिर्घ मुदतीची असल्याने नेमणूक प्राधिकारी स्वतः निर्णय घेवून निलंबन संपुष्टात आणु शकतात.

ड) सदर प्रकरणा तील दोषारोप सिध्द होणे व कोर्टातील प्रलंबीत प्रकरणाचा विचार करता हे प्रकरण न्यायालयात दाखल होवून सुनावणी पुर्ण होण्यास किमान तीन ते चार वर्षाचा काळ लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

इ) वरील सर्व बाबींचा विचार करता स्थायी समिती अधिनियमाचे कलम ५६ (४) नुसार खालील प्रमाणे निर्णयावर आलेली आहे.

दिनांक २४/१२/९७ च्या श्री. महेद्र खैरनार यांना बजावलेल्या नोटीसीस रद्द करण्यात येते व आयुक्तांना आदेशित करते की, ज्या संचीकेबाबत लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने सापळा रचला त्या प्रकरणाबाबत श्री. महेद्र खैरनार यांची सखोल खाते चौकशी करण्याचा आदेश देण्यात येतो. न्यायालयीन प्रकरणाचा अंतीम निकाल लागेपर्यंत श्री. महेद्र खैरनार यांना त्वरित कामावर घेण्याचे आदेश देते व न्यायालयाचे अंतीम निर्णयाअंती न्यायालयाच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्याचे आदेशीत करते. तोनिर्णय त्यांच्यावर बंधनकारक राहील.

उपरोक्त स्थायी समितीचा निर्णय कायम करणेस्तव सादर.

**<u>संवाद</u>**

**मा. महापौर :** लेखाधिकारी श्री. महेंद्र खैरनार ह्यांच्या निलंबनाच्या कार्यवाही नंतर त्यांना त्यांच्या पदावर सेवा करण्यासाठी त्यांनी सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी अपील केले आहे.त्यास मंजुरी द्यावयाची काय हे सभागृहाने ठरवावे.

**श्री. फैय्याज अहमद कुरैशी :** याबाबत चर्चा व्हावी प्रस्ताव मंजुर करु नये.

(यावेळी बहुतेक स. सदस्य हे सभागृहात श्री. खैरनार यांचे बाबतीत चर्चा करण्याची मागणी करतात व इतर स. सदस्य सदरील प्रस्ताव मंजुर म्हणून ओरडतात.)

**मा. महापौर :** लेखाधिकारी श्री. महेंद्र खैरनार यांना त्यांच्या पदावर काम करण्यासाठी स्थायी समिती सभेत मंजुरी मिळालेली असून त्या प्रमाणे सर्वसाधारण सभेकडे शिफारस केली आहे. त्यास समर्थन करुन या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. (पुन्हा यावेळी विरोध पक्ष नेते कडील स. सदस्य या प्रस्तावास विरोध म्हणून ओरडतात व निषेध व्यक्त करतात) त्यानंतर आघाडीच्या नगरसेवकानी मुख्य लेखाधिकारी श्री. महेंद्र खैरनार यांच्या प्रस्तावावर चर्चा न होवू देता निर्णय घेण्यात आला असे मोठ मोठ्याने बोलू लागले. त्यांनी मा. महापौर यांच्या निर्णयाचा निषेध केला व सभागृहात आरडा ओरड सारखी चालूच होती. काहीही ऐकु येत नव्हते.

**ठराव :** उपरोक्त प्रस्तावात दर्शविल्यानुसार प्रस्तावास मान्यता देण्यात येते. मुख्य लेखाधिकारी हे पद एकाकी असल्याने त्या पदाची कर्तव्ये लक्षात घेता व सद्य परिस्थितीत सुधारीत अंदाजपत्रक मुळ अंदाजपत्रक तयार करणे ही कामे लक्षात घेवून स्थायी समितीने घेतलेल्या ठराव क्र. ४५६ दि. २६/१२/९७ यास कायम करण्यात येते.
शासन निर्णय क्रमांक/सीडीआर/१३९६/प्र.क्र.२२/११ - अ मंत्रालय,मुंबई दि. १४ जुन १९९६ च्या परिपत्रकानुसार दिर्घ मुदतीचे निलंबन असल्यास अपवादात्मक परिस्थितीत निलंबनाचा आढावा शासनाव्यतिरिक्त अन्य शिस्त भंग विषयक प्राधिकारी घेऊ शकतात. मनपा ही शासना व्यतिरिक्त अन्य शिस्त भंग विषयक स्वतंत्र प्राधिकारी आहे. त्या अनुषंगाने जिल्हा सरकारी वकील यांचे अभिप्राय घेण्यात आले असता सदरील प्रकरणात न्यायालयीन कार्यवाही पुर्ण होईपर्यंत ३ ते ४ वर्षाचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे मुख्य लेखाधिकारी पदाचे दिर्घ मुदतीचे निलंबन ठरत असल्यामुळे अपवादात्मक बाब म्हणून स्थायी समितीने घेतलेल्या निर्णयास कायम करण्यात येवून श्री. खैरनार यांचे निलंबन रद्द करण्यात येते. या ठरावास बहुमतोन याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर जन गन मन या राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक १२/२/१९९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**गुरुवार दि. १२/२/९८ रोजी मा. महापौर श्री. अब्दुल खान (मामु) त्यांचे अध्यक्षतेखाली "कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृह येथे सकाळी ११.३० वाजता "वंदेमातरम्" या राष्ट्रगीताने औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सुरु झाली ह्या सभेस प्रशासकीय अधिकाऱ्यासह खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स. सौ. साजेदा बेगम
२) स.स. श्री. गौतम भागाजी खरात
३) स.स. सौ. रजनी रमेश जोशी
४) स.स. सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक
५) स.स. श्री. नरेंद्र यादवराव पाटील
६) स.स. श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
७) स.स. सौ. पद्मांबाई बाबुराव शिंदे
८) स.स. श्री. प्रफुल्ल लालचंद मालानी
९) स.स. श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ
१०) स.स. श्रीमती आबेदा बेगम मो. मुस्तफा
११) स.स. श्रीमती मोहसिना बिल्कीस विश्वारोद्दीन
१२) स.स. श्रीमती पुष्पाबाई सुरेशचंद्र गंगवाल
१३) स.स. सौ. मुक्ताबाई सुदाम वाघमारे
१४) स.स. सौ. लता श्रीनिवास दलाल
१५) स.स. श्रीमती अलका रमेश पाटील
१६) स.स. सौ. धांडे शकुंतला हरीदास
१७) स.स. कु. माया लिंबाजी लाडवाणी
१८) स.स. सौ. सविता संजय आव्हाड
१९) स.स. सौ. निर्मला विठ्ठल कांबळे
२०) स.स. श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे
२१) स.स. सौ. ज्योत्सना दौलत हिवराळे
२२) स.स. सौ. राधाबाई तळेकर
२३) स.स. सौ. मंदा धनंजय काळुसे
२४) स.स. सौ. सुनंदा उत्तम कोल्हे

**संवाद**

स. सभासद महापालिका अधिकारी वर्ग, तसेच कर्मचारी वर्ग यांना रमजान ईद निमित्त हार्दिक शुभेच्छा लोकसभा निवडणुक आचार संहीता लागू असल्यामुळे आजच्या सर्वसाधारण सभेत कुठल्याही विषयाबाबत चर्चा करणे योग्य होणार नाही.

याशिवाय सभेसाठी आवश्यक असलेली गणपूर्ती झालेली नाही. करीता गणपूर्ती अभावी आजची सभा तहकुब करण्यात येते असे मा. महापौर यांनी घोषित केले.

जन गन मन या राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा. महापौर ह्यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक ४/३/१९९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**बुधवार दि. ४/३/९८ रोजी मा. महापौर श्री. अब्दुल खान (मामु) त्यांचे अध्यक्षतेखाली "कै. प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृह येथे दुपारी ३ वाजता "वंदेमातरम्" या राष्ट्रगीताने औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सुरु झाली ह्या सभेस प्रशासकीय अधिकाऱ्यासह खालील स. सभासद उपस्थित होते. (उपस्थिती रजिष्टर प्रमाणे)**

१) स.स. श्री. तरवेंद्रसिंह महेंद्रसिंह धिल्लन मा. उपमहापौर
२) स.स. श्री. प्रभाकर सिताराम विधाते
३) स.स. श्री. फैय्याज अहमद कुरैशी
४) स.स. सौ. रजनी रमेश जोशी
५) स.स. सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक
६) स.स. श्री. गौतम लिंबाजी लांडगे
७) स.स. श्री. महादेव पुंडलिक सुर्यवंशी
८) स.स. श्री. नरेंद्र यादवराव पाटील
९) स.स. श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
१०) स.स. सौ. धनश्री अशोक विसपुते
११) स.स. श्री. फजल उल्लाखान अमन उल्लाखान
१२) स.स. श्रीमती आबेदा बेगम मो. मुस्तफा
१३) स.स. श्री. अहमद मुश्ताक अहमद
१४) स.स. श्री. वसंत विनायक देशमुख
१५) स.स. श्री. अ. जावेद रज्जाक
१६) स. स. श्री. किशोर बाबुलाल तुळशीबागवाले
१७) स.स. श्री. स. मो. इकबालोद्दीन स.मो. कुतुबद्दीन
१८) स.स. श्री. संजय किसन केनेकर
१९) स.स. सौ. मुक्ताबाई सुदाम वाघमारे
२०) स.स. श्रीमती अलका रमेश पाटील
२१) स.स. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२२) स.स. कु. माया लिंबाजी लाडवाणी
२३) स.स. श्री. अ. रशिद अ. सत्तार
२४) स.स. श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
२५) स.स. श्री. अविनाश लक्ष्मण कुमावत
२६) स.स. सौ. राधाबाई तळेकर
२७) स.स. श्री. गांगवे बन्सी तुळशीराम
२८) स.स. श्री. भगवान देविदास घडामोडे

<u>**संवाद**</u>

**मा. महापौरः** लोकसभा आचार संहिता लागू असल्यामुळे आजच्या सर्वसाधारण सभेत कुठल्याही विषयाबाबत चर्चा करणे योग्य होणार नाही. करिता आजची सभा स्थगित करण्यात येते. असे मा. महापौर यांनी घोषित केले.

जन गन मन या राष्ट्रगीताने आजची सभा संपल्याचे मा. महापौर यांनी जाहीर केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक २७ मार्च १९९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**मा. महापौर श्री. अब्दुल खान (मामु) त्यांचे अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभा दि. २७/३/९८ रोजी संपन्न झाली तिचे इतिवृत्त. सभेची सुरवात "वंदेमातरम्" या गीताने औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा सुरु झाली ह्या सभेस प्रशासकीय अधिकाऱ्यासह खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स. श्री. तरवेंद्रसिंह महेंद्रसिंह धिल्लन मा. उपमहापौर
२) स.स. श्री. सुदाम सोनवणे
३) स.स. श्री. फैय्याज अहेमद कुरैशी
४) स.स. श्री. प्रभाकर सिताराम विधाते
५) स.स. सौ. रुख्मनबाई खंडेराव लोखंडे
६) स.स. श्री. अफसरखाँ यासिनखाँ
७) स.स. सौ. साजेदा बेगम
८) स.स. श्री. म. सलीम म. हनीफ कुरैशी
९) स.स. श्री. गौतम भागाजी खरात
१०) स.स. सौ. रजनी रमेश जोशी
११) स.स. सौ. उषाबाई दिलीप गायकवाड
१२) स.स. सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक
१३) स.स. सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे
१४) स.स. श्री. गौतम लिंबाजी लांडगे
१५) स.स. श्री. महादेव पुंडलिक सुर्यवंशी
१६) स.स. श्री. अभिमन्यु रामभाऊ भालेराव
१७) स.स. श्री. नरेंद्र यादवराव पाटील
१८) स.स. श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
१९) स.स. श्री. इंगळे रविन्द्र बाबुराव
२०) स.स. सौ. पद्माबाई बाबुराव शिंदे
२१) स.स. श्री. सुभाष भिकाजी टाकळकर
२२) स.स. श्री. प्रफुल्ल लालचंद मालानी
२३) स.स. श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ
२४) स.स. सौ. धनश्री अशोक विसपुते
२५) स.स. सौ. फरहद बानो भ्र. नवाज
२६) स.स. श्री. फजल उल्लाखाँन अजमत उल्लखाँन
२७) स.स. श्री. अजीज खाँ गनी खाँ
२८) स.स. श्रीमती आबेदा बेगम मो. मुस्तफा
२९) स.स. श्री. महंमद मुश्ताक अहेमद
३०) स.स. सौ. नुरजहाँ बेगम अ. रहेमान खाँन
३१) स.स. श्री. वसंत विनायक देशमुख
३२) स.स. श्री. हाजी मोहसीन अहेमद हाजी बशीर अहेमद
३३) स.स. श्री. मुजीब आलमशाह खाँन

३४) स.स. सौ. मोहसिना बिल्कीस विश्वारोद्दीन
३५) स.स. श्रीमती जाहेदा बेगम म. जमीर
३६) स.स. श्री. त्रिंबक तुपे
३७) स.स. सौ. यशोदा धनंजय वाडेकर
३८) स.स. श्री. किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
३९) स.स. श्रीमती पुष्पाताई सुरेशचंद्र गंगवाल
४०) स.स. श्री. हमीदउद्दीन ताबा
४१) स.स. श्री. म.अ. रऊफ म.अ. माबुद
४२) स.स. श्री. स.मो. इकबालोद्दीन स.मो. कुतुबउद्दीन
४३) स.स. श्री. स. अली मिरासलामी
४४) स.स. श्री. रमेश दिपचंद लाहोट
४५) स.स. श्री. संजय किसनराव केनेकर
४६) स.स. सौ. मुक्ताबाई सुदाम वाघमारे
४७) स.स. सौ. लता श्रीनिवास दलाल
४८) स.स. श्री. जयवंत केशवराव ओक
४९) सस. श्रीमती अलका रमेश पाटील
५०) स.स. सौ. शकुंतला हरिदास धांडे
५१) स.स. श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
५२) स.स. कु. माया लिंबाजी लाडवाणी
५३) स.स. श्री. भागवत किसन कराड
५४) स.स. सौ. सविता संजय आव्हाड
५५) स.स. सौ. निमर्ला विठ्ठल कांबळे
५६) स.स. श्री. अ. रशीद अ. सत्तार
५७) स.स. श्री. विश्वारोद्दीन खुदबोद्दीन
५८) स.स. श्री. गंगाधर गाडे
५९) स.स. श्री मनमोहनसिंग करमसिंग ओबेरॉय
६०) स.स. श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे
६१) स.स. श्री. संजय रामदास जोशी
६२) स.स. श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
६३) स.स. श्री. अविनाश लक्ष्मण कुमावत
६४) स.स. सौ. ज्योत्सना दौलतराव हिवराळे
६५) स.स. श्री. राजकुमार सांडू बचाटे
६६) स.स. सौ. राधाबाई तळेकर
६७) स.स. श्री. नरसिंग ढगे
६८) स.स. श्री. विठ्ठल किसन जाधव
६९) स.स. सौ. मंदा धनंजय काळुसे
७०) स.स. सौ. सुनंदा उत्तम कोल्हे
७१) स.स. श्री. गांगवे बन्सी तुळशीराम
७२) स.स. श्री. भगवान देविदास घडामोडे
७३) स.स. श्री. कचरु चंद्रभान नवपुते

<u>संवाद</u>

**मा. महापौर :** कोरम अभावी सभा १५ मिनीटे तहकुब करण्यात येते. वेळ अंदाजे ३.०५ वा. सभेला सुरुवात अंदाजे ३.३० वाजता.

**विषय क्र. १७८/१ :**

**श्री. नरेंद्र पाटील :** ऐनवेळच्या प्रस्तावाचे पत्र आपल्या समोर मांडलेले आहे. गेल्या दोन महिन्यापासून लोकसभा निवडणुकीमुळे "आचारसंहिता" असल्याने स. सदस्यांच्या स्वेच्छा निधीतून नागरिकांची कामे झालेली नाहीत तरी स्वेच्छा निधीचा वापर करण्याचा कालावधी आणखी दोन महिने वाढवून द्यावा अशी विनंती आहे.

सुचक : श्री. नरेंद्र पाटील
अनुमोदक : श्री. प्रकाश निकाळजे

**मा. महापौर :** स. सदस्यांनी ऐनववेळी मांडलेल्या प्रस्तावानुसार गेल्या दोन महिन्यापासुन लोकसभा निवडणुकी बाबत आचार संहिता असल्याने स्वेच्छा निधीतील नागरिकांची कामे झालेली नाहीत. तरी सभगृहाच्या संमतीने दोन महिन्याची मुदत वाढ देण्यात येते.

**ठराव :** ऐनवेळच्या प्रस्तावात दर्शविल्यानुसार लोकसभा निवडणुकी दरम्यान आचारसंहिता असल्याने शेवटचे दोन महिने स्वेच्छनिधीचा वापर स.सदस्यांना करता आलेला नाही. त्यामुळे आर्थिक निधीचा वापर (स्वेच्छा निधीचा) पुर्ण करता यावा यासाठी आणखी दोन महिने मुदतवाढ करण्यात स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७८ १/१ :** दिनांक १/१/९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

<u>संवाद</u>

**श्री. नरसिंग ढगे** : दि. १६/१२/९७ च्या सभेतील ठराव क्र. १५९/२३ मध्ये गारखेडा येथील काबरानगर ही योजना शासनाच्या अनुदानातून म्हाडाने १९९७/९८ च्या निवारा वर्षात गोरगरीब बिडी कामगारांसाठी बांधून दिली आहे. त्यामुळे म्हाडा तिथे नागरी सुविधा पुरविणे अशक्य झाले आहे. या योजनेसाठी म्हाडाकडे रु. ९.५० लाख शासकीय अनुदान प्राप्त झाले आहे. हे वर्ग करुन योजना हस्तांतरित करुन घ्यावी व नागरी सुविधा द्याव्यात अशी इतिवृत्तात दुरुस्ती व्हावी.

**मा. महापौर** : ठिक आहे. इतिवृत्तात तशी दुरुस्ती व्हावी.

**श्री. वसंत देशमुख** : इतिवृत्तातील कोणत्या ठरावाची दुरुस्ती आहे ते सचिवांनी वाचून दाखवावे.

**श्री. नरसिंग ढगे** : प्रस्ताव मंजुर झालेला आहे. फक्त दुरुस्ती होणे आवश्यक आहे.

**मा. महापौर** : ठिक आहे. दुरुस्तीसह मंजुरी

**श्री. संजय जोशी** : दि. १/१/९८ च्या सर्वसाधारण सभेतील विषय क्र. १७२/८ मध्ये पृष्ठ क्र. ८ व ९ चा प्रस्ताव स्थगित ठेवलेला आहे. तो मंजुर करावा.

**मा. महापौर** : प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. या बरोबरच दुरुस्तीसह विषय क्र. १ यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

१) दिनांक १६/१२/९७ च्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. १५९/२३ मो. गारखेडा येथील काबरानगर ही योजना शासनाच्या अनुदानातून म्हाडा १९८७-८८ या निवारा वर्षात गोरगरीब बिडी कामगारांसाठी बांधून दिली आहे. परंतु म्हाडा तेथे नागरी सुविधा पुरविणे अशक्य झाले आहे. म्हणून शासनाकडून या योजनेसाठी म्हाडाकडे रु. ९.५० लाख शासकीय अनुदान प्राप्त झाले आहे. तरी महानगरपालिकेने ९.५० लाख रुपये आपल्याकडे वर्ग करुन घेवून योजना हस्तांतरित करुन घ्यावी. व तेथील अपुर्ण असलेल्या नागरी सुविधा करुन घ्याव्यात.

२) प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अर्चना बिल्डर्स प्रा.लि. औरंगाबाद तर्फे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. सुधीर तुकाराम पंत देशपांडे यांच्या मालकीचे न.भू. क्र. १५३०२/१२ व त्याचे क्षेत्र २३६७.०० चौ. मी. पैकी १५.०० मीटर विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्र ३८५.५० चौ.मी. वगळून निव्वळ अबाधित क्षेत्रफळ १९८२.२० चौ. मी. आहे. त्या जमिनीचा विकास करणार आहे. सदरील जमीन पुर्वीच्या मंजुर विकास योजना (१९७५) मधे्य निवासी भागात होती व प्रारुप विकास योजना १९९५ नुसार ही जमीन आरक्षण क्र. २३७ दुकान केंद्र यामध्ये बाधीत होत आहे. शासन निर्णयानुसार अर्जदार हे २५ टक्के क्षेत्राचा भुखंड (४९५.५५) चौ.मी. वेगळा करुन तो चटई क्षेत्र निर्देशंकासाठी मनपास बांधून देणार आहे. उर्वरित ७५% भूखंडावर मुळ प्रस्तावातील अटी क्र. १ ते ४ नुसार विकास करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. या व इतर दुरुस्त्यासह दि. १/१/९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७९/२ :** उप आयुक्त- २ महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ. एस.व्ही. रझवी, अधिक्षक प्राणी संग्रहालय महानगरपालिका औरंगाबाद यांची सेंट्रल थ्रू ॲथॉरिटी भारत सरकार यांचेकडून तीन आठवड्यासाठी दि. २०/७/९८ ते ७/८/९८ या कालवधीत झू प्रशिक्षणाकरिता निवड झाली आहे. सदरहू प्रशिक्षण जर्सी इंग्लंड येथे होणार आहे. सेंट्रल झू ॲथॉरिटी ऑफ इंडिया प्रशिक्षणार्थीचा जाण्याचा येण्याचा व तेथे राहण्याचा खर्च करणार आहे. यासाठी डॉ. एस.व्ही. रझवी यांना प्रशिक्षणाहून ते परत आल्यानंतर औरंगाबाद महानगरपालिकेत त्यांनी प्राणी सं्ग्रहालय साठी जाण्यास ना हरकत प्रमाणपत्र देणे व इंग्लंडहून प्रशिक्षण घेवून परत आल्यानंतर त्यांना पुढील ३ वर्ष प्राणी संग्रहालय प्रमुख म्हणून ठेवण्यासाठी ते या कालावधीत सेवानिवृत्त होत नसल्याने तसे प्रमाणपत्र देणे करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

<u>संवाद</u>

**मा. महापौर :** मंजुर

**श्री. नरेंद्र पाटील :** सदरील प्रस्तावास मंजुरी देण्यास हरकत नाही. आपल्या महानगरपालिकेतील एक अधिकारी प्रशिक्षणासाठी दुसऱ्या देशात जातात याबाबत प्रथमतः त्यांचे महानगरपालिके तर्फे अभिनंदन करावयास पाहिजे.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.एस.व्ही. रझवी अधिक्षक प्राणी संग्रहालय महानगरपालिका, औरंगाबाद यांची सेंट्रल झु ऑर्थिरिटी भारत सरकार यांचेकडून तीन आठवड्यासाठी दि. २०/७/९८ ते ७/८/९८ या कालावधीत झू प्रशिक्षणाकरिता निवड झाली आहे. सदरहु प्रशिक्षण जर्सी इंग्लंड येथे होणार आहे. सेंट्रल झू ऑथरिटी ऑफ इंडिया प्रशिक्षणार्थीचा जाण्या येण्याचा व तिथे राहण्याचा सर्व खर्च करणार आहे. यासाठी डॉ.एस.व्ही. रझवी यांना सदर प्रशिक्षणाकरिता इंग्लंडमध्ये जाण्यासाठी "ना हरकत प्रमाणपत्र" द्यावे लागेल शिवाय प्रशिक्षणाहून ते परत आल्यानंतर औरंगाबाद महानगरपालिकेत त्यांनी प्राणी संग्रहालय प्रमुख म्हणून ३ वर्ष काम करणे बंधनकारक राहिल. दरम्यानच्या काळात डॉ. रझवी सेवानिवृत्त होत नसल्याने त्यांना "ना हरकत प्रमाणपत्र" देण्यास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८०/३ :** कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, ज्या भागात नळाद्वारे पाणी पुरवठा होत नाही अशा भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो. या ाठी पाच मोठे व दोन लहान टँकर आहेत. दिवसेंदिवस शहराची वाढ होत आहे. तसेच काही कारणास्तव जायकवाडी येथून होणाऱ्या पाणी पुरवठ्यात अडथळा निर्माण झाल्यास शहरातील व सिडको भागातील जनतेस सध्या उपलब्ध टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे शक्य होत नाही. त्यासाठी दहा हजार लिटर क्षमतेचे दोन नवीन टँकर खरेदी करणे आवश्यक आहे. टँकर करिता दोन चेसिज खरेदी करण्यासाठी टाटा कंपनीचे अधिकृत विक्रते मे. सतिष मोटार्स लि. औरंगाबाद यांचे (गव्हर्नमेंट रेट) सरकारी दराप्रमाणे रु. ११,६५,८८६.०० खर्च येतो. हे दर जकात कर वगळून असून ते चेसिजचा ताबा घेताना जी किंमत असेल त्याप्रमाणे पेमेंट करावे लागेल.

दहा हजार लिटर क्षमतेची टाकी बनविणे व चेसिज वर बसविणे, किर्लोस्कर इंजिन पंप व इतर फिटींगसह एकुण दोन टाकीकरिता अंदाजे रु. ४,००,०००/- खर्च येईल. वरीलप्रमाणे एकुण दोन टँकरकरिता रु. १५,६५,८८६.०० खर्च येतो. सन ९८-९९ या आर्थिक वर्षात विशेष तरतुद म्हणून ठेवणे योग्य व या प्रस्तावास मान्यता देणे योग्य कारण येणाऱ्या उन्हाळ्यात या टँकरचा उपयोग होवू शकेल. मान्यतेस्तव सादर.

<u>संवाद</u>

**श्री. नरेंद्र पाटील :** सध्या सिडको भागात पाण्यासाठी नागरिकांचे हाल होत आहेत. यासाठी अजून किती दिवसाचा कालावधी लागेल याची माहिती द्यावी.

**मा. महापौर :** संबंधीत अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**कार्य. अभियंता (पापू) :** सध्या शहरात पाण्याचे टँकर कमी असल्याने यास मंजुरी मिळाली तर ३ दिवसात पाठवून जवळपास ७ महिन्यापर्यंत कार्यवाही करण्यात येईल. सदरल संचिकेला आचार संहितेमुळे विलंब लागलेला होता.

**श्री. मोहसीन अहमद :** पाणी पुरवठा विभागाने चांगल्या स्थितीतील टँकर खरेदी करावा.

**श्री. नरेंद्र पाटील :** टँकर खरेदी करताना २०% डिस्काउंट मिळते काय याची माहिती द्यावी.

**कार्य. अभियंता (पापू) :** या विकत घेणाऱ्या टँकरमध्ये २.५० लाख डिस्काउंट करुन देणार आहेत.

विषय क्र. ३ बाबत स. सदस्यांनी चर्चा सुरु केली त्याचवेळी सभागृहात स. सदस्य व सभापती श्री. प्रभाकर विधाते व त्यांच्यसोबत काही स.सदस्य प्रवेश करते झाले

आणि सभागृहात चर्चा चालू असतानाच मा. महापौराच्या डायस जवळ येवून आजच्या सभेतील एकही प्रस्ताव आम्ही मंजुर करुन देणार नाही. असे म्हणून सांगू लागले व सभागृहातील सर्व विरोधी सदस्यांनी याबाबत दुजोरा देवून एकच आवाज नही चलेगी नही चलेगी दादागिरी नही चलेगी अशा घोषणा देणे सुरु झाले व एकंदरीत विरोधी सदस्यांना मा. महापोरांच्या डायसवर ठेवलेला "राजदंड" पळवून नेण्याचा प्रयत्न केला. यामध्ये सुरक्षा रक्षकांनी वेळीच दखल घेतल्याने राजदंड विरोधी सदस्यांनी व सुरक्षा रक्षकांनी हातात घरल्याने ओढाताण सारखी सभागृहात चालू होती व काही वेळाने "राजदंड" सुरक्षा रक्षकांनी हिसकावून सुरक्षीतपणे आपल्या ताब्यात घेतला व मा. महापौर आपल्या स्थानावरुन उठून गेले. तरीही सभागृहात दोन्हीही पक्षाकडील सदस्यांचे जोरजोरात आवाज सारखा चालू होता. काहीही आवाज ऐकू येत नव्हता. नंतर जवळपास १५ मिनीटानंतर सभागृहातील वातावरण थोडे शांत झाले आणि मा. महापौर पुन्हा आपल्याखुर्चीवर येवून बसले व सभागृहातील सर्व सदस्यांना शांत राहून सहकार्य करण्याचे आवाहन केले. तरीही विरोधीच्या सर्व सदस्यांनी मा. महापौरांचे ऐकावयास तयार नव्हते व पुन्हा मा. महापौरांच्या विरोधात घोषणाबाजी सुरु झाली. तरीही दुसरीकडे आघाडीचेही स. सदस्यांनी प्रतिघोषणा केल्या. त्यामुळे सभागृहातील वातावरण शांत होत नसल्याने मा. महापौरांनी घोषणाबाजीतच अजेंड्यारील सर्व प्रस्ताव व ऐनवेळचे सर्व प्रस्ताव मंजुर करुन सभा संपल्याचे जाहीर केले.
(यावेळी दोन्हीही सभागृहाच्या घोषणा प्रतिघोषणाबाजी व राजदंड ओढाताणात काही फर्निचर व माईकची नुकसान झाली काय याची कल्पना नाही परंतु सभागृहात विरोधी सदस्य संतप्त होवून अजेंड्याच्या प्रति फाडून मा. महापौराच्या समोर व डोक्यावरुन फेकल्याचे दृश्य दिसून येत होते.)

**मा. महापौर :** मंजुर

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यप्रमाणे ज्या भागात नळाद्वारे पाणीपुरवठा होत नाही अशा भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जातो यासाठी पाच मोठे व दोन लहान टँकर आहेत. दिवसेंदिव शहराची वाढ होत आहे. तसेच काही कारणास्तव जायकवाडी येथून होणाऱ्या पाणी पुरवठ्यात अडथळा निर्माण झाल्यास शहरातील व सिडको भागातील सध्या उपलब्ध टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे शक्य होत नाही. त्यासाठी दहा हजार लिटर क्षमतेचे दोन नवीन टँकर खरेदी करणे आवश्यक आहे. टँकर करिता दोन चेसिज खरेदी करण्यासाठी टाटा कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. सतिष मोटर्स लि. औरंगाबाद यांचे (गव्हर्नमेंट रेट) सरकारी दराप्रमाणे रु. ११,६५,८८६/- खर्च येतो.
सदरील दर जकात कर वगळून असून चेसिजच्या ताबा घेताना जी किंमत असेल त्याप्रमाणे पेमेंट करावे लागेल.

दहा हजार लिटर क्षमतेची टाकी चेसिजवर बसविणे किलोस्कर इंजिन पंप व इतर फिटींगसह एकुण दोन टाकीकरिता अंदाजे रु. ४ लाख खर्च येईल. वरीलप्रमाणे दोन टँकर करिता रु. १५,६५,८८६/- खर्चास सन ९८-९९ म्हणून ठेवणेस स्फिृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८१/४ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत असलेल्या मुस्लीम समाजाच्या कब्रस्तानचे मालमत्ता विभाग मार्फत पत्यक्ष पाहणी करुन २७ कब्रस्तान असल्याचा अहवाल सादर केलेला आहे. सदरील कब्रस्तानात महानगरपालिकेतर्फे पाणी लाईट, रोड इत्यादीची व्यवस्था केलेली असून संरक्षाणासाठी संरक्षित भिंत किंवा

तारकुंपन करण्यात आलेले आहे. महानगरपालिकेने अशाच प्रकारे विकसीत केलेल्या ३० स्मशान भूमीत वॉचमन नियुक्त करण्यासाठी दि. १०/३/९७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत ३० स्मशान वॉचमनची पदे निर्माण करण्यास मंजुरी दिली असून प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. तसेच अस्तित्वात असलेल्या २७ कब्रस्तानची महानगरपालिकेतर्फे पुरविल्या सुविधाच्या वस्तुची देखभाल करण्यासाठी व संरक्षणासाठी २७ कब्रस्तान वॉचमनची पदे रु. ७५०-१२-८७० दशे १४-९४० मध्ये निर्माण करणे आवश्यक आहेत. तसेच सदरील पदाचा कर्मचारी आकृतीबंधात समावेश करणे आवश्यक राहील.

करिता महानगरपालिकेच्या अस्थापनेवर २७ कब्रस्तान वॉचमनची पदे वेतन रु. ७५०-१२-८७० दशे १४-९४० मध्ये निर्माण करण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**मा. महापौर** : मंजुर

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत असलेल्या मुस्लीम समाजाच्या कब्रस्तानचे मालमत्ता विभागामर्फत प्रत्यक्ष पाहणी करुन २७ कब्रस्तान असल्याचा अहवाल सादर केला आहे. मागील सर्वसाधारण सभेत जसे ३० वॉचमनचा प्रस्ताव होता त्याच धर्तीवर सदरील कब्रस्तानात मनपातर्फे पाणी लाईट शेड इ. ची व्यवस्था केलेली असून संरक्षणासाठी संरक्षण भिंत किंवा तारकुंपन करण्यात आलेले आहे. अस्तित्वात असलेल्या या २७ कब्रस्तान वॉचमनची पदे रु. ७५०-१२-८७०-दरो-१४-९४० मध्ये निर्माण करणेस स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८२/५ :** कार्यकारी अभियंता स्लम यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. इंदीरानगर बायजीपुरा वार्ड क्र. २४ (इतर भाग) येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबत कामाकरिता सा.बां. खाते यांच्या वर्ष ९६-९७ च्या दरसूची नुसार रु. १३,७१,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "डांबरी रस्ते" या शिर्षकातून सन ९८-९९ च्या बजेटमध्ये करण्यात येईल. सदरच्या अदाजपत्रकास मा.आयुक्त साहेबांनी दि. १६/३/९८ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.
तरी सदरील कामाकरिता तयार करण्यात आलेले रु. १३,७१,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यतेचाप्रस्ताव विचार तथा मंजुरीस्तव सादर.

**मा. महापोर** : मंजुर

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. इंदीरानगर बायजीपुरा वॉर्ड क. २४ (उत्तर भाग) येथील रस्त्याची डांबरीकरण करणेच्या कामाकरिता सा.बां. खाते यांच्या ९६-९७ च्या दरसूचीनुसार रु १३,७१,०००/- चे अंदाजपत्रकास "डांबरीरस्ते" या शिर्षातून सन १९९८-९९ च्या बजेटमध्ये तरतुद करुन मान्यता देण्यास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८३/६** : प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. एस.ए. ओ./३१९६/२७९८४/(३२०/९६)प्रशा-२ मंत्रालय विस्तार भवन मुंबई-३२ दिनांक १० ऑक्टोबर १९९६ नुसार श्री. एस.जी. देशमुख यांची "शिक्षणाधिकारी" औरंगाबाद महानगरपालिका या पदावर आदेश सोबतच्या अटी व शर्तीप्रमाणे प्रतिनियुक्ती करण्यात आलेला आहे.

श्री. एस.जी. देशमुख हे "शिक्षणाधिकारी" या पदावर दि. ११/२/९७ रोजी प्रथमतः रुजु झालेले आहेत. महानगरपालिका सर्वसाधारण सभ ठराव क्र. २९/२६ दिनांक ३१/५/९७ नुसार श्री. एस.जी. देशमुख यांनी दिनांक ११/२/९७ पासून प्रथमतः एक वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका येथील प्रतिनियुक्तीचा कालावधी संपलेला आहे.

करिता श्री. एस.जी. देशमुख यांना ११/२/९८ पासून पुढील एक वर्षाकरिता शासन आदेशातील अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढवून देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**मा. महापौर :** मंजुर

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. एस.ए.ओ/३१९६/२७९८४ (३२०/९६) प्रशा-२ मंत्रालय विस्तार भवन मुंबई-३२ दिनाक १० ऑक्टोबर ९६ नुसार श्री.एस.जी. देशमुख यांची "शिक्षणाधिकारी" औरंगाबाद महापालिका पदावर सोबतच्या अटी व शर्तीप्रमाणे नियुक्ती करण्यात आलेली आहे व दि. १२/९७ रोजी प्रथमतः रुजु झालेले आहेत. सर्वसाधारण सभेची ठराव क्र. २९/२६ दि. ३१/५/९७ अन्वये एक वर्षाची प्रतिनियुक्ती महानगरपालिकेने दिलेली होती. दिनांक ११/२/९८ पासून पुन्हा एकवर्षाच्या का ालवधी करिता श्री. एस.जी. देशमुख महानगरपालिका औरंगाबाद यांची महापालिका येथील प्रति नियुक्ती शासन आदेश सोबतच्या अटी शर्तीनुसार स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८४/७ :** औरंगाबाद शहराचे मंजुर विकास योजनामध्ये आरक्षण दुकान केंद्रासाठी आरक्षित असलेल्या जमीनीखालील नगर भुमापन क्रमांक १७३५२, १७३५२/३ चे जमीन क्षेत्रासाठी संबंधीत मिळकत धारक अर्जदार श्री. करीम अहेमद गुलाम अहेमद मिर्झा अन्वर अली बेग यांनी म.प्रा. व नगर अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये भुसंपादनाकरिता खरेदी सुचना दिलेली आहे. सदरील जमीन मंजुर विकास योजना सुधारित करण्यातंर्गत प्रसिध्द प्रारुप विकास योजनामध्ये आरक्षण क्रमांक ३११ ने "उद्याना" करिता आरक्षित आहे. औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद हे समुचीत प्राधीकरण असल्याने, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे तरतुदीनुसार कलम १२७ अन्वये दिलेल्या खरेदी सुचना संदर्भात सहा महिन्यात तो जमीन भुसंपादन करण्याचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे.
वर नमुद खरेदी सुचना संबंधीताने दिनांक १२/१२/९७ रोजी दिलेली असल्याने भुसंपादनाची प्रस्तावित कार्यवाही करुन मान्यतेनंतर तसा रितसर प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी औरंबाद यांचेकडे पुढील कार्याहीस्तव पाठविण्यात येईल.

**मा. महापौर :** मंजुर

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मंजुर विकास योजना मध्ये आरक्षण दुकान केंद्रासाठी आरक्षीत असलेल्या जमीनीखालील नगर भूमापन क्र. १७३५२, १७३५२/३ चे जमीन क्षेत्रासाठी संबंधीत मिळकत धारक अर्जदार श्री. करीम अहेमद गुलाम अहेमद मिर्झा अथर अलीम बेग यांनी म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये भुसंपादनाकरिता खरेदी सुचना दिलेली आहे. सदरील जमीन मंजुर विकास योजना सुधारित करण्यात अंतर्गत प्रसिध्द प्रारुप विकास योजनामध्ये आरक्षण क्र. ३११ ने उद्यानाकरिता आरक्षीत आहे. दिलेल्या खरेदी सुचना संदर्भात सहा महिन्यात ही जमीन भुसंपादन करण्याचा प्रस्ताव मा.

जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. यासाठी दि. १२/१२/९७ अन्वये खरेदी सुचना दिलेली असल्याने भुसंपादनाच्या कार्यवाहीस लागणाऱ्या नियमाप्रमाणे खर्चासह स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय १८५/८ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडको क्षेत्राचे औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतरण करण्यासाठी दिनांक ३/९/१९९७ च्या सर्वसाधारण सभा विषय क्र. ८८/१ अन्वये मा. महापैर यांच्या अध्यक्षतेखाली सर्वश्री. प्रभाकर विधाते, सुदाम सोनवणे, फैय्याज कुरैशी, गंगाधर गाडे, विजय कमार मेहेर, काशिनाथ कोकाटे, सौ. पद्मा शिंदे, सौ. रजनी जोशी, मनमोहनसिंग ओबेरॉय नरेंद्र पाटील, अशफाक सलामी, भगवान घडामोडे, महादेव सुर्यवंशी, गौतम लांडगे, यांनी उपसमिती गठीत करण्यात आलेली होती. सदर समितीने सिडको हस्तांतरणासंदर्भाने वेळावेळी बैठका घेतलेल्या आहेत. समितीचा कालावधी तीन महिन्यात निर्धारित करण्यात आला होता. तथापि लोकसभा निवडणुक आचार संहितेच्या मुळे समितीच्या बैठका होवू शकल्या नाहीत. समितीस आपले कामकाज पुर्ण करण्यासाठी २० एप्रिल १९९८ पावेतो कालावधी वाढवून देण्याच्या निर्णयार्थ सादर. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**मा. महापौर :** मंजुर
**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको क्षेत्राचे औरंगाबाद महानगरपालिकेकडे हस्तांतर करण्यासाठी दि. ३/९/९७ च्या सर्वसाधारण सभेचा विषय क्र. ८८/१ अन्वये मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने सिडको हस्तांतरणसंदर्भाने वेळोवेळी बैठका घेतल्या व समितीचा कालावधी तीन महिन्याचा निर्धारीत करण्यातआला होता. तथापि लोकसभा निवडणूक आचारसंहितेमुळे समितीच्या बैठका होवू शकल्यानाहीत. समितीस आपले कामकाज पुर्ण करण्यासाठी २० एप्रिल ९८ पावेतो कालावधी वाढवून देण्याच्या निर्णयार्थ सादर.
प्रस्ताव विचारार्थ सादर.

--सदरील प्रस्ताव पुढील पानावर पुन्हा लिहिण्यात आल्यामुळे तो टायपींग करताना वगळला आहे.--

**विषय क्र. १८६/९ :** मा. महापौर यांचे आदेशानुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरामध्ये प्रमुख रस्ते व काही प्रमुख भागातील नागरिकाच्या मागणी व सोईच्या दृष्टीने सध्या बऱ्याच टपऱ्या आहेत. ह्यामुळे शहरातील सुशिक्षित बेरोजगाराना रोजगार उपलब्ध होतो व मनपाच्या उत्पन्नातही भर पडते. मात्र यापैकी बहुतांश टपऱ्या अनधिकृत असून फरच थोड्या टपऱ्या मनपाकडून रितसर/परवानगी/अधिकृत परवाना घेवून ठेवलेले आहेत. ह्या अनधिकृत टपऱ्या अतिक्रमण हटाव पथकामर्फत हटविण्याची मोहिमच मनपाने वांरवार हाती घेवून त्या जागी पुन्हा पुन्हा टपऱ्या ठेवल्या जातात. पर्यायाने ह्रया सर्व अनधिकृत टपऱ्या हटविणे जनतेची मागणी, बेरोजगारांचा रोजगार ह्या समस्या विचारात घेता अडचणीचे होते.
ह्याचा विचार करुन महानगरपालिकेने औरंगाबाद शहरातील सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगार उपलब्ध व्हावा व एकसारख्या व्यवस्थित टपऱ्याने शहरात सौंदर्यात भर पडावी व मनपाचे आर्थिक उत्पन्न पण वाढावे ह्या अनुषंगाने सध्या टपऱ्या देता येत असतील तर त्याबाबत

धोरण निश्चित करण्यासाठी स्थायी समितीने ठराव क्र. १९ दि. ९/६/९५ अन्वये टपरी समिती गठन करुन टपरी समिती अहवाल सादर करण्यास सुचविले होते.
त्यानुसार समितीने १४/६/९५ ते ९/७/९५ ह्या कालावधीत शहरातील अधिकृत/अनधिकृत व बंद टपऱ्यांची पाहणी करुन त्याबाबतचा अहवाल दिनांक ३१/८/९५ ला स्थायी समितीला सादर केला. ह्या अहवालानुसार शहरात १९९५ च्या पाहणी नुसार खालीलप्रमाणे टपऱ्या निदर्शनास आल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत | - | २४१ |
| अनधिकृत | - | ७१५ |
| बंद असलेल्या | - | १८४ |
| **एकुण** | **-** | **११४०** |

अशा एकुण ११४० टपऱ्या विविध रस्त्यावर आहेत. ह्या अहवालामध्ये या शिवाय जेथे टपऱ्या देता येईल अशा जागा अजुनही ४X६ चे आकारल्या ६२० टपऱ्या साठी जागा गरजूंना देवून मनपाचे उत्पन्नात दरमहा रु. ६६२४०/- इतकी भर पडू शकेल अशी शिफारस केली आहे. ह्या अहवालाववर सर्वसाधारण सभेत चर्चा झालेली आहे. त्यानंतर पुन्हा एकवार १९९६ मध्ये कार्यालयातर्फे पाहणी करुन टपरी सर्वेक्षण करण्यात आले असता त्यानुसार.

३) १९९६ ची पाहणी अहवाल

| | | |
|---|---|---|
| अधिकृत | - | ४६७ |
| अनधिकृत | - | ६७३ |
| बंद असलेले | - | १६९ |
| एकुण | - | १३७९ |

अशा एकुण १३७९ टपऱ्या विविध रस्त्यावर आहेत तथापि सद्यस्थितीत टपऱ्यात वाढ झालेले पण नाकारता येणार नाही.

४) टपरी समितीने खालील बाबींची शिफारस केलेली आहे.

१) अनधिकृत टपऱ्या अधिकृत करणे.
२) टपऱ्यांना नंबर देणे.
३) जागेची उपलब्धता पाहून नवीन टपऱ्यांना
४) सर्व टपऱ्या एकसारख्या / एका आकारमानाच्या असाव्यात,
५) टपरी धारकांकडून अर्ज घेवून तथा सोबत पासपोर्ट साईजचा अर्जदाराचा फोटो घेवून तो परवानावर लावून देणे.
६) टपरी धारकांकडून अनामत रक्कम घेणे.

५) वरील प्रमाणेचा टपरी समिती अहवाल त्यात सुचविलेल्या सुचनांचा विचार होवून त्या अहवालाचे चौकटीत राहून प्रशासनाचे टपऱ्या देण्याबाबत शिफारस खालील प्रमाणे करण्यात येते.

१) सर्व अनधिकृत टपऱ्यांना रु. १०/- किंमतीचे अर्ज देवून अहवालात नमुद केल्याप्रमाणे ११ महिन्याचे अँडव्हान्स भाडे ११ महिन्याच्या करारावर परवाना देण्यात येईल व त्या टपऱ्या अधिकृत करण्यात येईल. त्यांना ११ महिन्यानंतर नुतनीकरण करुन घेणे बंधनकारक राहील. त्याचे फॉर्म मालमत्ता विभागात उपलब्ध राहतील.

२) नव्याने जेथे शक्य आहे. अशा ठिकाणी अहवालात प्र्स्ताविल्याप्रमाणे कार्यवाही करुन परवाना देण्यात येईल.

३) वरील दोन्ही कार्यवाहीमध्ये शहरातील मुख्य रस्ते ज्यांची रुंदी २४ मी. (८० फुट) ३० मी (१०० फुट) पेक्षा जास्त आहे. त्या रस्त्याचे जागेत टपरीस परवानगी देण्यात येणार नाही. मात्र उर्वरित कमी रुंदीच्या रस्त्यावर टपऱ्यांना परवाना देण्यात येईल.

६)

अ) प्रथम टपरीचे टाईप डीझायीन तयार करुन सर्व टपऱ्या एका स्वरुपाच्या आकारमानाच्या राहतील व हे टपरीधारकावर बंधनकारक राहील.
ब) कार्यालयाने ठरविल्याप्रमाणे जागेचे भाडे निश्चित करण्यात येईल.
क) वाहतुक (ट्राफीक) चे दृष्टीने पोलीस विभाग मनपाचे सहा. संचालक नगर रचना व अति. शहर अभियंता यांचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात येईल.
ड) (category) नुसार अर्ज मागविण्यात येतील व अर्ज जेष्ठतेनुसार निकाली काढण्यात येतील.
इ) या सर्व कार्यवाही मध्ये पुर्ण पारदर्शकता राहील.
फ) नेहमीच्या अटी शर्तीही कायम राहतील.

७) शहरात असलेल्या बहुतांश अनधिकृत टपऱ्या व मनपा हद्दीत नव्याने असलेल्या १८ खेड्यापैकी बऱ्याच ठिकाणी त्या त्या गावाच्या ग्रामपंचायतीने त्यावेळी दिलेल्या जागावरील टपऱ्या इ. करिता अद्यापपावेतो कसलेही भाडे आकारता येत नाही. ह्यावर प्रस्तावित कार्यवाहीस मान्यता झाल्यास सर्व अनधिकृत टपऱ्या टपरीसमितीचे अहवालाचे चौकटीत अधिकृत करुन त्यांचेकडून भाडे आकारण्यात येईल. टपरी समितीचे अहवालाचे चौकटीत अधिकृत करुन त्यांचेकडून भाडे आकारण्यात येईल. व त्या जागी नव्याने टपऱ्या देणे शक्य आहे. अशा ठिकाणी गरजुना/बेरोजगारांना टपऱ्यासाठी परवाना देवून मनपाचे उत्पन्न सध्या त्या अस्तित्वात आहेत त्या टपऱ्या नियमीत करण्यात येतील. सध्या मालमत्ता विभागातून टपरीसाठी प्राप्त झालेले अर्ज कार्यालयाचे धोरणे निश्चित झाल्याने निकाली काढून दप्तरी दाखल करण्यात आले आहे. येथुन पुढे नवीन आलेल्या अर्जाचा जेष्ठतेनुसार कार्यवाही करण्यात येईल.

८) या अनुषंगाने असेही प्रस्तावीत करण्यात येते की, अधिकृत/अनधिकृत टपरीकरिता दिलेली जागा मंजुर (टाईप डिझाईन) पेक्षा जास्त कमी रुंदीच्या रस्त्यावर अतिक्रमण इ. केल्याने आढळून आल्यास ते तात्काळ काढून घेण्यात येईल व तशी कार्यवाही करण्यात येईल. मात्र असे होवू नये म्हणून टपरी मध्ये करावयाच्या व्यवसायास त्याप्रमाणे निर्बंध घालणे आवश्यक आहे. उदा. हॉटेल गॅरेंज, इ. चा व्यवसाय टपरी ऐवजी मुख्य रस्त्यावर होतो. म्हणून टपरी व्यवसायाला पानचे दुकाने, स्टेशनरी, कटलरी दुकान, पेपर पुस्तके इ. चे दुकान अशा तत्सम व्यवसायाचा समावेश व्हावा व त्याचे (कॅटेगिरी) नुसार टपरी वाटप व्हावी. करिता सदर प्रकरण बऱ्याच दिवसापासून प्रलंबित आहे. सबब प्रकरणात सर्वसाधारण सभेसमोर धोरण निश्चितीस्तव सादर.

**मा. महापौर** : मंजुर

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यप्रमाणे शहरातील अधिकृत टपऱ्या त्याचप्रमाणे अनधिकृत टपऱ्या बाबतचे धोरण निश्चित करण्यासाठी स्थायी समितीचा ठराव क्र. १९ दिञ ९/६/९५ अन्वये टपरी समिती गठत करुन टपरी समितीचा अहवाल सादर करण्यास सुचविले होते. त्यानुसार समितीने दि. १४/६/९५ ९/७/९५ च्या कालावधीत शहरातील अधिकृत / अनधिकृत व बंद टपऱ्यांची पाहणी करुन त्याबाबत अहवाल दि. ३१/८/९५ ला स्थायी समितीला सादर केला.

टपरी समितीने पाहणी केल्याचा अहवाल.

| | | सन १९९५ | सन १९९६ |
|---|---|---|---|
| १ | अधिकृत | २४१ | ४६७ |
| २ | अनधिकृत | ७१५ | ६४३ |
| ३ | बंद असलेल्या | १८४ | १६९ |
| | | ११४० | १३७९ |

टपरी समितीने केलेल्या शिफारशीच्या अधिन राहुन प्रस्तावातील मुद्दा क्र. ६, ७ व ८ अन्वये स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८७/१० :** महानगरपालिका खुली जागा शीट क्र. ४९ सीटी सर्व्हे नंबर ९२७१ नागसेन कॉलनी ची जागा नोंदणीकृत संस्था मॉडर्न हेल्थ क्लब नोंद क्र. १९६/९१ औरंगाबाद संस्थेला योगासाठी व ज्युदो कराटे (महिला) साठी देण्यात यावी.
विषय क्र. २ महानगरपालिका शादी खान नागसेन कॉलनीचे बाजुची (पश्चिमेकडे) ७X२० फुटाची रिकामी गल्लीची जागा शादीखाना मनपाला देण्यात यावी कारण महानगरपालिका शादीखानेला जागा फार कमी आहे व सदरील गल्ली रिकामी व वापर न होणारी असल्याने त्याचा वापर गलत कामासाठी होत आहे तरी शीट नंबर ४८ सिटी सर्व्हे नंबर ९३०६ महानगरपालिका ओपन स्पेसवर बांधलेल्या शादीखानेसाठी सदरील जागा देण्यात यावी.

सुचक : श्री. मोहसीन अहेमद
अनुमोदक : श्री. हमीद ताबा
श्री. किशोर तुळशीबागवाले

**मा. महापौर** : मंजुर

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपची खाली जागा जिचा शिट क्र.९२७१ नागसेन कॉलनीमध्ये जी जागा आहे ती मॉडर्न हेल्थ क्लब ह्या नोंदणीकृत संस्थेला योगासाठी व ज्युदो करोटेसाठी (महिला) यांना देण्यात यावी जीची नोंदणीक्र. १९६/९१ असा आहे. सदरील प्रस्तावास स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.
त्याचप्रमाणे दुसरा प्रस्ताव महानगरपालिका शादीखाना नागसेन कॉलनीच्या बाजुची पश्चिमेकडे ७X२० फुटाची रिकामी गल्लीची जागा आहे. सदरील जागा शादीखान्यासाठी देण्यास यावे. जिचा सिटी एस नं. ९३०६ व शीट नं. ४८ असा आहे.
ती देण्यास स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८८/११ :** कार्यकारी अभियंता (पापु व जनि) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जायकवाडी पाणी पुरवठा योजना हस्तांतरित करुन घेण्याबाबत महाराष्ट्र शासनातर्फे सतत पाठपुरावा होत आहे. मा. सहसचीव पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांचे पत्र अ. शापक्र./संकीर्ण १०९८/प्र.क्र. १९३/पापु/२२ दि. ७ मार्च ९८ अन्वये सदरील योजना दि. १५ मार्च. ९८ अन्वये सदरल योजना दि. १५ मार्च ९८ पूर्वी ताब्यात घेण्यातयावी असे कळविले आहे. सर्व साधारण सभेचा ठराव क्र. ११२/१ दि. १०/११/९७ मध्ये चर्चा होवून प्रस्ताव मंजुरी देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे ठराव पारित झाल्याची प्रत शासनास पाठविण्यात आलेली आहे.

जायकवाडी पाणी पुरवठा योजना हस्तातरित करुन घेण्याबाबतमा. आयुकत यांच्या दालनात दि. १३/१/९८ रोजी बैठक घेण्यात आली. त्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता (पापु व जनि) उप अभियंता पापु-१ इ. अधिकारी उपस्थित होते. त्यांच्या सोबत खालील प्रमाणे चर्चा करण्यात आली.

१) योजनेवरील कार्यरत कर्मचारी वर्ग :- ह्या योजनेवर सद्यस्थितीत १३८ चतुर्थ श्रेणी कर्मचारी कार्यरत आहेत. त्यापैकी १०० कर्मचारी सेवा जेष्ठतेनुसार वर्ग करुन घेण्याचे ठरले. तसेच वर्ग-२ संवर्गात २ उप अभियंता, वर्ग-३ संवर्गात ६ कनिष्ठ अभियंता व ३ दुय्यम आवेक्षक एक वर्षासाठी प्रतिनियुक्तीवर घेण्याबाबतचे ठरले आहे.
२) योजनेवरील कर्ज :- या योजनेवरील कर्जाची परतफेड अंदाजे रक्कम रु. ३५ कोटी करावी लागणार आहे. खुल्या बाजारातून घेतलेल्या कर्जाची परतफेड रक्कम रु. ३३५.०८ लाख वार्षिक भरावी लागणार आहे. खुल्या बाजारातून घेतलेल्या कर्जाची परतफेड रक्कम रु. ३३५.०८ लाख वार्षिक भरावी लागणार आहे. तसेच विद्युत देयकाची थकबाकी सुमारे रु. ५० कोटी आहे. सदरहु योजना ही ८लाख लोकसंख्येसाठी असल्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणावर लागणाऱ्या खर्चासाठी महानगरपालिका पैसा उभा करु शकणार नाही. त्याकरिता शासनातर्फे विशेष शासकीय अनुदान मिळणे अत्यंत गरजेचे आहे.
३) पाईप लाईनवरील कनेक्शन्स :- जायकवाडी धरणापासून ते औरंगाबाद शहरापर्यंत असलेल्या पाईपलाईनवरील जी कनेक्शन देण्यात आली आहे. ती कनेक्शन ज्या तारखेपासून ही योजना मनपाकडे हस्तांतरीत होईल त्या तारखेपासून महानगरपालिकेच्या ताब्यात त्याचप्रमाणे करारनामा महानगरपालिकास म.जि. प्रा. यांनी करुन द्यावा.
४) विद्युत दर :- या योजनेसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातर्फे व्यावसायिक दराने विद्युत दर आकारण्यात येतो. त्या ऐवजी शेतीच्या दरानुसार विद्युत देयकाची आकारणी करण्यात यावी अशी विनंती करणे योग्य राहील.
५) हस्तांतरणाची प्रक्रीया पुर्ण झाली तरी पुढील एक वर्षापर्यंत योजनेमधील तांत्रिक देखभाल व दुरुस्ती याबाबत सल्ला मसलत वसहकार्य महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी मनपास करावे.

वरील सर्व अटी व शर्तीस अधीन राहुन जायकवाडी पाणी पुरवठा योजना १ एप्रिल १९९८ पासून महानगरपालिकेस हस्तांतरित करुन घेण्यास मंजुरी होणे करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार जायकवाडी पाण्ीा पुरवठा योजना हस्तांतरित करुन घेण्याबाबत महाराष्ट्र शासनातर्फे सतत पाठपुरावा होत आहे. मा. सह सचीव पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे आशा पत्र क्र. संकीर्ण १०९८/प्रक्र.१९३/एस.यू.-२२ दि. ७ मार्च अन्वये सदरील योजना दि. १५ मार्च ९८ पुर्वी ताब्यात घ्यावी असे कळविले आहे. सर्वसाधारण सभेचा ठरावक्र. ११२/१ दि. १०/११/९७ अन्वये चर्चा होवून मंजुरी मिळाली व त्याप्रमाणे शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. व दि. १३/१/९८ रोजी मा. आयुक्त यांचेकडे बैठक घेण्यात आली. बैठकीत मुद्दा क्र. १ ते ५ नुसार अटीशर्तीस अधिन राहुन १ एप्रिल ९८ पासून जायकवाडी पाणी पुरवठा योजना मनपास हस्तांतरित करण्यास स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८९/१२ :** कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजना व सिडको विसतारित भागासाठी स्वतंत्र १४०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी नक्षत्रवाडी ते सिडकोपर्यंत टाकावयाची आहे. त्यास महाराष्ट्र शासन निर्णय क्र. पा.पु. यो १०९७/१६२२/प्र.क्र. २३५/९७ पा.पु. १८ मंत्रालय, मुंबई दि. १७ जाने ९८ अन्वये शासनाची मान्यता झालेली आहे.
यापुर्वी औरंगाबाद शहरासाठी जी योजना पुर्ण करण्यात आलेली आहे. त्यामध्ये पी.एफ सी (सिमेंट) पाईपचा वापर करण्यात आलेला आहे. अनुभवावरुन असे निदर्शनास येते की, या पाईपाद्वारे गळती जास्त प्रमाणात होते व देखभाल व दुरुस्तीसाठी वेळ व खर्च जास्त प्रमाणात होतो.
त्यामुळे नवीन योजनेमध्ये एम.एस. पाईप वापर करण्याबाबत शासनाकडे आग्रह धरणेकरिता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केल्याप्रमाणे औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजना व सिडको विस्तारीत भागासाठी स्वतंत्र १४०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी नक्षत्रवाडी ते सिडको पर्यंत टकावयाची आहे. त्यास महाराष्ट्र शासन निर्णय क्र. पा.पु. मो. १०९७/१६२२/प्र.क्र./-२३५/९७ पा.पु. १८ मंत्रालय मुंबई दि. १७ जानेवारी ९८ अन्वये शासनाची मान्यता झालेली आहे. या नवीन योजनेमध्ये एम.एस. पाईप व वापर करण्याबाबत शासनाकडे आग्रह धरणे करिता प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९०/१३ :** औरंगाबाद महानगरपालिका अस्थापनेवर उप आयुक्ताची दोन पदे आहेत त्यापैकी उप आयुक्त-१ यांची बदली झाल्याने हे पद बऱ्याच दिवसापासून रिक्त आहे महानगरपालिकेचा वाढता व्याप विचारात घेता सध्या कार्यरत असलेल्या उप आयुक्तांवर कामाचा प्रचंड ताण पडत असून प्रशासकीय कामात अडथळे निर्माण होत आहे. जनतेच्या कामास विलंब व दिरंगाई होत आहे. या बाबी विचारात घेता उप आयुक्त-१ या पदावर बाहेरील अधिकारी न मागविता औरंगाबाद महानगरपालिका अस्थापनेवरील कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यामधून सेवा जेष्ठता, अनुभव या बाबी विचारात घेवून उप आयुक्त पदावर महापालिका अधिकाऱ्याची पदोन्नती देवून नेमणूक करण्यात यावी. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. सुदाम पाटील सोनवणे
अनुमोदक : श्री. फैय्याज अहेमद कुरेशी
दिनांक : २६/३/९८

**मा. महापौर** : मंजुर

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यानुसार महानगरपालिका आस्थापनेवर उप आयुकताची दोन पदे आहे. त्यापैकी उप आयुक्त-१ याची बदली झाल्याने हे पद बऱ्याच दिवसापासून रिक्त आहे. महानगरपालिकेचा वाढता व्याप लक्षात घेता सध्या कार्यरत असलेल्या उपआयुक्तांवर कामाचा प्रचंड ताण पडत असून प्रशासकीय कामात अडथळे निर्माण होत आहेत. या बाबी विचारात घेता उप आयुक्त-१ ह्या पदावर बाहेर अधिकारी न मागविता औरंगाबाद महानगरपालिका अस्थापेवरील कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांची सेवा जेष्ठता अनुभव व क्षमता या बाबी विचारात घेवून उप आयुक्त पदावर महानगरपालिकेचे सक्षम

अधिकाऱ्यामधूनच नेमणूक करण्यास स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९१/१४ :** मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, इदगाह परिसरामध्ये शहाबाद फरशी बसविणे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. ५.२५ लक्ष रुपये एवढ्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन ९७-९८ च्या तरतुदीनुसार तयार करण्यात आले आहे. परंतु ही मालमत्ता मनपाच्या मालकीची नसून वक्फ बोर्डाच्या मालकीची आहे. सदर जागेचा उपयोग सावजनिक कामासाठी होतो हजारोंच्या संख्येने लोक येथे प्रार्थनेसाठी जमा होतात व ऐकमेकास शुभेच्छा देतात सबब या ठिकाणी फरशी बसविणे बाबत मा. महापौर यांनी विनंती केली आहे. परंतु मनपाच्या निधीमधून हे काम करता येत नसल्यामुळे मनपा स्वेच्छा निधीतून हे काम करणे बाबत धोरणात्मक निर्णय घेणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

<u>**संवाद**</u>

**मा. महापौर :** टेंडर कॉल करुन काम करणे योग्य कारण जवळपास २५ स. सदस्यांनी लेखी निवेदन दिलेले आहे त्यानुसार त्यांच्या स्वेच्छा निधीतून सदरील कामाची निकड लक्षात घेता करुन घेणे बाबत मंजुरी देण्यात येते.

**मा. महापौर :** मंजुर

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्यप्रमाणे इदगाह परिसरामध्ये शहाबाद फरशी बसविणे कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. ५.२५ लक्ष एवढया सा.बां. खात्याचे सन १९९७-९८ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले आहे. परंतु ही मालमत्ता मनपाच्या मालकीची नसुन वक्फ बोर्डाच्या मालकीची आहे. सदर जागेचा उपयोग सार्वजनिक कामासाठी होतो. हजारोंच्या संख्येने लोक तेथे प्रार्थनेसाठी जमा होतात. व ऐकमेकास शुभेच्छा देतात ह्या कामासाठी मा. महापौर यांनी विनंती केली परंतु मनपाच्या निधीमधून हे काम करता येत नसल्याने मनपाच्या स. नगसेवकांच्या स्वेच्छा निधीतुन हे कामाचे टेंडर कॉल करुन कामाची निकड लक्षात घेता तातडीने काम करुनघेण्यास स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९२/१५ :** प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र. ४९ येथे एकही बहुउददेशिय हॉल नसल्याने सांस्कृतीक कार्यक्रमासाठी नागरीकांना अडचण येत आहे. तरी वार्ड क्र. ४९ मधील जैमेतुल कुरैशी ह्यांची उपलब्ध असलेली खुली जागा संपादीत करुन त्या जागेवर एक अद्यावत बहुउद्देशीय हॉल बांधण्यात यावे ज्याने नुतन कॉलनी पैठणगेट, सिल्लीखाना व इतर समस्त परिसरातील नागरिकांना यांचा फायदा होईल. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : फैय्याज कुरैशी

अनुमोदक : गौतम खरात, अफसर खान

**मा. महापौर :** मंजुर

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क. ४९ येथे एकही बहुउद्देशीय हॉल नसल्याने सांस्कृतीक कार्यक्रमासाठी नागरीकांना अडचणी येत आहे. तरी जमैतुल कुरैशी यांची उपलब्ध असलेली खुली जागा संपादीत करुन त्या जागेवर एक अद्यावत बहुउद्देशिय हॉल बांधण्यास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९३/१६ :** सर्वसाधारण सभेसाठी प्रस्ताव.

१) महानगरपालिकेतील हंगामी/फिक्सपगारावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना नौकरीत कायम करावे.
२) नियोजीत प्रगती कॉलनी व अद्यानास "भैय्यासाहेब आंबेडकर उद्यान" असे संबोधण्यात यावे.
३) गौतमनगर घाटी येथे बहुउद्देशिय हॉल बांधण्यात यावा.

सुचक : बापु घडामोडे, गौतम खरात
अनुमोदक : काशिनाथ कोकाटे, गौतम लांडगे

**मा. महापौर :** मंजुर

**ठराव :**

१) प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेतील हंगामी फिक्स पगारावर काम कारणाऱ्या कामगारांना नौकरीत कायम करावे.
२) नियोजीत प्रगती कॉलनी उद्यानास "भैय्यासाहेब आंबेडकर उद्यान" असे संबोधण्यात यावे.
३) गौतमनगर घाटी येथे बहुउद्देशीय हॉल बांधण्यास स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

याच बरोबर "जन गन मन" राष्ट्रगीताने सभा संपली.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक ३०/३/९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**मा. महापौर श्री. अब्दुल खान (मामु) त्यांचे अध्यक्षतेखाली दि. ३०/३/९८ रोजी स्थायी समितीच्या आठ सदस्यांची निवडणूक करणेच्यासाठी विशेष सर्वसाधारण सभा भरविण्यात आली. सभेची सुरवात "वंदेमातरम्" या राष्ट्रगीताने सकळी ११.३० वाजता झाली. सभेस खालील स. सदस्य तथा अधिकारी उपस्थित होते.**

१) स.स. श्री. तरवेंद्रसिंह महेंद्रसिंह धिल्लन मा. उपमहापौर
२) स.स. श्री. सुदाम सोनवणे
३) स.स. श्री. फैय्याज अहेमद कुरैशी
४) स.स. श्री. प्रभाकर सिताराम विधाते
५) स.स. सौ. रुख्मनबाई खंडेराव लोखंडे
६) स.स. श्री. अफसरखाँ यासिनखाँ
७) स.स. सौ. साजेदा बेगम
८) स.स. श्री. म. हनीफ सलीम म. हनीफ कुरैशी
९) स.स. श्री. गौतम भागाजी खरात
१०) स.स. श्री. गणेश किशनराव वानखेडे
११) स.स. सौ. रजनी रमेश जोशी
१२) स.स. सौ. उषाबाई दिलीप गायकवाड
१३) स.स. सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक
१४) स.स. सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे
१५) स.स. श्री. गौतम लिंबाजी लांडगे
१६) स.स. श्री. महादेव पुंडलिक सुर्यवंशी
१७) स.स. श्री. अभिमन्यु रामभाऊ भालेराव
१८) स.स. श्री. नरेंद्र यादवराव पाटील
१९) स.स. श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
२०) स.स. श्री. इंगळे रविन्द्र बाबुराव
२१) स.स. श्री. बैनाडे कंवरासिंग किसनसिंग
२२) स.स. सौ. पद्माबाई बाबुराव शिंदे
२३) स.स. श्री. सुभाष भिकाजी टाकळकर
२४) स.स. श्री. प्रफुल्ल लालचंद मालानी
२५) स.स. श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ
२६) स.स. सौ. धनश्री अशोक विसपुते
२७) स.स. सौ. फरहद बानो भ्र. नवाज
२८) स.स. श्री. फजल उल्लाखाँन अजमत उल्लखाँन
२९) स.स. श्री. अजीज खाँ गनी खाँ
३०) स.स. श्रीमती आबेदा बेगम मो. मुस्तफा
३१) स.स. श्री. महंमद मुश्ताक अहेमद
३२) स.स. सौ. नुरजहाँ बेगम अ. रहेमान खाँन

३३) स.स. श्री. वसंत विनायक देशमुख
३४) स.स. श्री. हाजी मोहसीन अहेमद हाजी बशीर अहेमद
३५) स.स. श्री. मुजीब आलमशाह खाँन
३६) स.स. सौ. मोहसिना बिल्कीस विश्वारोद्दीन
३७) स.स. श्री. जावेद रज्जाक
३८) स.स. श्रीमती जाहेदा बेगम म. जमीर
३९) स.स. श्री. त्रिंबक तुपे
४०) स.स. सौ. यशोदा धनंजय वाडेकर
४१) स.स. श्री. किशोर बाबुलाल तुळशीबागवाले
४२) स.स. श्रीमती पुष्पाताई सुरेशचंद्र गंगवाल
४३) स.स. श्री. हमीदउद्दीन ताबा
४४) स.स. श्री. म.अ. रऊफ म.अ. माजुद
४५) स.स. श्री. स.मो. इकबालोद्दीन स.मो. कुतुबउद्दीन
४६) स.स. श्री. खखोरडीया धिरज शांतीलाल
४७) स.स. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण
४८) स.स. श्री. स. अली मिरासलामी
४९) स.स.श्री. लहोट रमेश दिपचंद
५०) स.स. श्री. संजय किसनराव केनेकर
५१) स.स. सौ. मुक्ताबाई सुदाम वाघमारे
५२) स.स. सौ. लता श्रीनिवास दलाल
५३) स.स. श्री. जयवंत केशवराव ओक
५४) सस. श्रीमती अलका रमेश पाटील
५५) स.स. सौ. शकुंतला हरिदास धांडे
५६) स.स. श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
५७) स.स. कु. माया लिंबाजी लाडवाणी
५८) स.स. श्री. भागवत किसन कराड
५९) स.स. सौ. सविता संजय आव्हाड
६०) स.स. सौ. निर्म्ला विठ्ठल कांबळे
६१) स.स. श्री. अ. रशीद अ. सत्तार
६२) स.स. श्री. विश्वारोद्दीन खुदबोद्दीन
६३) स.स. श्री. जैन विकास रतनलाल
६४) स.स. श्री. गंगाधर गाडे
६५) स.स. श्री. बारवाल गजानन रामकिसन
६६) स.स. श्री मनमोहनसिंग करमसिंग ओबेरॉय
६७) स.स. श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे
६८) स.स. श्री. संजय रामदास जोशी
६९) स.स. श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
७०) स.स. श्री. अविनाश लक्ष्मण कुमावत
७१) स.स. सौ. ज्योत्सना दौलतराव हिवराळे
७२) स.स. श्री. राजकुमार सांडू बचाटे
७३) स.स. सौ. राधाबाई तळेकर
७४) स.स. श्री. नरसिंग ढगे

७५) स.स. श्री. विठ्ठल किसन जाधव
७६) स.स. श्री. मेहेर विजयकुमार गजानन
७७) स.स. सौ. मंदा धनंजय काळुसे
७८) स.स. सौ. सुनंदा उत्तम कोल्हे
७९) स.स. श्री. गांगवे बन्सी तुळशीराम
८०) स.स. श्री. भगवान देविदास घडामोडे
८१) स.स. श्री. कचरु चंद्रभान नवपुते

<u>**संवाद**</u>

**मा. महापौर :** कोरम अभावी सभा १५ मिनिटे तहकुब करण्यात येते. वेळ अंदाजे ११.४५ वा. सभेला सुरुवात १२ वा.

**विषय क्र. १९४/१ :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०(५) अन्वये स्थायी समितीच्या आठ सदस्यांची निवड करणे.

<u>**संवाद**</u>

**सचिव :** स्थायी समितीच्या आठ जागांसाठी एकुण ३६ उमेदवारांनी अर्ज दाखल केलेले आहेत त्याची नावे वाचून दाखविली व सर्व अर्ज वैध ठरलेले आहेत असे सांगितले.

**मा. महापौर :** उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी ३० मिनिटाचा अवधी देण्यात येतो. (वेळ १२.५ वाजता सभेला सुरुवात १२.४० वा)

**मा. महापौर :** उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अवधी संपलेला आहे. ज्यांनी अर्ज मागे घेतले त्यांची नावे सचीव वाचुन दाखवतील.

**सचिव :** स्थायी समितिच्या ८ सदस्यांच्या निवडीसाठी ज्या उमेदवारांनी अर्ज मागे घेतले त्यांची नावे वाचून दाखवली. व ज्या उमेदवारांनी अर्ज मागे घेतलेले नाही त्यांचीही नावे वाचून दाखविली. म्हणजे प्रत्यक्षात निवडणूक रिंगणात असलेल्या ३६ पैकी स.स. ची नावे खालील प्रमाणे आहे.

१) स.स. श्री. तरविंदरसिंग धिल्लन २) सौ. शकुंतला धांडे ३) विश्वारोद्दीन ४) राजकुमार बचाटे ५) किशोर तुळशीबागवाले ६) रविंद्र इंगळे ७) स.अ. इकबालोद्दीन ८) विकास जैन ९) सौ. राधाबाई तळेकर १०) नरसिंग ढगे.

आता बॅलेट पेपर तयार करण्यासाठी एक तासाचा अवधी देण्यात येतो.

(वेळ अंदाजे १२.४५ वा) सभेला सुरुवात २ वाजता

**मा. महापौर :** मतदान प्रक्रीयेची तयारी झालेली आहे. स्थायी समितीच्या ८ सदस्यांसाठी निवडणूक होणार आहे. याबाबत सचिव माहिती देतील.

**सचिव :** स्थायी समितीच्या आठ स.स. निवडण्याची मतदानाची प्रक्रीया पुर्ण करावयाची आहे. प्रत्येक सदस्यांना आठ मते प्रदान करण्याचा अधिकार आहे. आठ फुल्या मारावयाच्या असून त्यापेक्षा जास्त फुल्या मारल्यास ते मत बाद ठरविले जाईल. तसेच सचिव विभागातर्फे एक बॉलपेन दिला जाईल त्याच बॉलपेनचा मतदानासाठी वापर करावयाचा आहे. इतर पेनचा नाही. मतदान अधिकारी व मतदान पेटीजवळील अधिकारी तसेच छानणी अधिकारी यांनी आपआपली कामे करण्याबाबत सुचना दिल्या.

**मा. महापौर :** जे सदस्य निरक्षर असतील त्यांनी आगाऊ सूचना द्याव्यात म्हणजे विधी सल्लागार तर्फे मदत घेण्यात येईल. आता मतपेटी अधिकारी यांनी मतदान पेटी पुर्णपणे रिकामी असल्याचे सभागृहात दाखवावे व त्यानंतर मतदानाला सुरुवात होईल.

(यावेळी मतपेटी जवळील अधिकाऱ्यांनी मतपेटी पुर्ण रिकामी असल्याचे सभागृहात सर्वांना दाखविले व मतपेटी सिल करण्यात आली)

**सचिव :** (मतदान कशा प्रकारे करावे याची माहिती सांगीतली) आता जनसंपर्क अधिकारी वार्डनिहाय नावे पुकारतील त्यानुसार सर्व स. सदस्यांनी एक नंतर एक याप्रमाणे मतदानासाठी जावे.

**जनसंपर्क अधिकारी :** वॉर्ड क्र. १ चे स. सदस्याचे नाव पुकारले त्यांनी मतदान केले वॉर्ड क्र. २ चे स.स. साठी मा. महापौरांनी डॉ. देशपांडे आ.वे.अ. यांना मदत करण्याचे सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी मदत केली व मतदान केले. वॉर्ड क्र. ३ ते २२ पर्यंतच्या स. सदस्यांचे मतदान झाले. वॉर्ड क्र. २३ चे स.स. सदस्यांसाठी डॉ. देशपांडे यांनी मदतकरण्याचे मा. महापौर यांनी सुचविले त्याप्रमाणे मदत केली व मतदान वॉर्ड क्र. २४ ते २७ मतदान महापौरांनी सांगितले त्यांनी मदत केली व मतदान झाले.

**सचिव :** स. सदस्यांना विनंती की, आपआपले उमेदवाराचे प्रतिनिधी म्हणून ज्यांना मतमोजणीच्या ठिकाणी उपस्थित राहवयाचे आहे. त्यांनी पिठासन अधिकाऱ्याकडे अर्ज दाखल करावे (त्यानंतर प्रतिनिधींनी अर्ज दाखल केल्यानंतर मा. महापौरांनी सर्वांच्या समोर मतदान पेटी उघडविली व मतपत्रिका छानणी अधिकाऱ्यांनी छाननी करुन एक-एक करुन सर्व मतपत्रिकावर पिठासन अधिकाऱ्याच्या स्वाक्षऱ्या घेतल्या व छाननी अधिकाऱ्यानी प्रत्यक्षात माजणीच प्रतिनिधीसमोर सुरुवात केली. मतमोजणी संपल्यानंतर मा.महापौरांनी निकाल जाहीर केला.

**मा. महापौर :** स्थायी समितीच्या आठ स.स. च्या निवडीसाठी आज मतदान शांततेने पार पडले. त्या बद्दल सर्वांना धन्यवाद देवून निवडणूक आलेल्या उमेदवाराचे व पराभूत झालेल्या उमेदवाराचे आकडेवारीसह निकाल जाहिर केला तो खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) स.स. श्री. तरवेंद्रसिंह धिल्लन | ३२ मते | पराभूत |
| २) सौ. शकुंतला धांडे | ०५ मते | पराभूत |
| ३) श्री. विश्वारोद्दीन कुतुबुद्दीन | ७२ मते | विजयी |
| ४) श्री. राजकुमार बचाटे | ६८ मते | विजयी |
| ५) श्री. किशोर तुळशीबागवालें | ७१ मते | विजयी |
| ६) श्री. रविंद्र इंगळे | ८० मते | विजयी |
| ७) स. मो. इकबालोद्दीन मुजाहेद | ८० मते | विजयी |
| ८) श्री. विकास जैन | ८० मते | विजयी |
| ९) सौ. राधाबाई तळेकर | ८० मते | विजयी |
| १०) नरसिंग ढगे | ८० मते | विजयी |

अशा प्रकारे २ उमेदवार अनुक्रमे १ व २ स.स. श्री. धिल्लन व सौ. शकुंतला धांडे हे पराभुत झालेत व इतर ८ स.स. वरील प्रमाणे विजयी झाल्याचे सांगितले. सर्वांचे मन:पुर्वक आभार

व विकासाच्या कामासाठी सुयश अभिष्टचिंतन करुन "जन गन मन" राष्ट्रगीताने आजची सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.

## दिनांक ३१/३/९८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

**मा. महापौर श्री. अब्दुल खान (मामु) त्यांचे अध्यक्षतेखाली १९९७-९८ चे सुधारित अंदाजपत्रक व सन १९९८-९९ चे मुळ अंदाजपत्रकासाठी दि. ३१/३/९८ रोजी सकाळी ११.३० वा. बैठक झाली तिचे इतिवृत्त. सभेची सुरवात "वंदेमातरम्" या राष्ट्रगीताने झाली. सभेस खालील स. सदस्य तथा अधिकारी उपस्थित होते.**

१) स.स. श्री. तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग धिल्लन मा. उपमहापौर
२) स.स. श्री. सुदाम सोनवणे
३) स.स. श्री. प्रभाकर सिताराम विधाते
४) स.स. श्री. फैय्याज अहेमद कुरैशी
५) स.स. सौ. रुख्मनबाई खंडेराव लोखंडे
६) स.स. श्री. अफसरखाँ यासिनखाँ
७) स.स. सौ. साजेदा बेगम
८) स.स. श्री. गौतम भागाजी खरात
९) स.स. श्री. गणेश किशनराव वानखेडे
१०) स.स. सौ. रजनी रमेश जोशी
११) स.स. सौ. उषाबाई दिलीप गायकवाड
१२) स.स. सौ. विमलबाई नंदकुमार मुंडलिक
१३) स.स. सौ. शिलाबाई सिताराम गुंजाळे
१४) स.स. श्री. गौतम लिंबाजी लांडगे
१५) स.स. श्री. महादेव पुंडलिक सुर्यवंशी
१६) स.स. श्री. नरेंद्र यादवराव पाटील
१७) स.स. श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
१८) स.स. श्री. इंगळे रविन्द्र बाबुराव
१९) स.स. श्री. बैनाडे कंवरासिंग किसनसिंग
२०) स.स. सौ. पद्माबाई बाबुराव शिंदे
२१) स.स. श्री. सुभाष भिकाजी टाकळकर
२२) स.स. श्री. प्रफुल्ल लालचंद मालानी
२३) स.स. श्रीमती चंपाबाई विश्वनाथ पांचाळ
२४) स.स. सौ. धनश्री अशोक विसपुते
२५) स.स. सौ. फरहद बानो म. नवाज
२६) स.स. श्री. फजल उल्लाखाँन अजमत उल्लखाँन
२७) स.स. श्रीमती आबेदा बेगम मो. मुस्तफा
२८) स.स. श्री. वसंत विनायक देशमुख
२९) स.स. श्री. हाजी मोहसीन अहेमद हाजी बशीर अहेमद
३०) स.स. सौ. मोहसिना बिल्कीस विश्वारोद्दीन
३१) स.स. श्री. जावेद रज्जाक
३२) स.स. श्री. त्रिंबक तुपे

३३) स.स. सौ. यशोदा धनंजय वाडेकर
३४) स.स. श्रीमती पुष्पाताई सुरेशचंद्र गंगवाल
३५) स.स. श्री. हमीदउद्दीन ताबा
३६) स.स. श्री. म.अ. रऊफ म.अ. माजुद
३७) स.स. श्री. स.मो. इकबालोद्दीन स.मो. कुतुबउद्दीन
३८) स.स. श्री. खखोरडीया धिरज शांतीलाल
३९) स.स. श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण
४०) स.स. श्री. लाहोट रमेश दिपचंद
४१) स.स. श्री. संजय किसनराव केनेकर
४२) स.स. सौ. मुक्ताबाई सुदाम वाघमारे
४३) स.स. सौ. लता श्रीनिवास दलाल
४४) स.स. श्री. ओक जयवंत केशवराव
४५) सस. श्रीमती अलका रमेश पाटील
४६) स.स. सौ. शकुंतला हरिदास धांडे
४७) स.स. श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
४८) स.स. कु. माया लिंबाजी लाडवाणी
४९) स.स. श्री. भागवत किसन कराड
५०) स.स. सौ. सविता संजय आव्हाड
५१) स.स. सौ. निमर्ला विठ्ठल कांबळे
५२) स.स. श्री. अ. रशीद अ. सत्तार
५३) स.स. श्री. विश्वारोद्दीन खुदबोद्दीन
५४) स.स. श्री. जैन विकास रतनलाल
५५) स.स. श्री. गंगाधर गाडे
५६) स.स. श्री. बारवाल गजानन रामकिसन
५७) स.स. श्री मनमोहनसिंग करमसिंग ओबेरॉय
५८) स.स. श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे
५९) स.स. श्री. संजय रामदास जोशी
६०) स.स. श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
६१) स.स. श्री. राजकुमार सांडू बचाटे
६२) स.स. सौ. राधाबाई तळेकर
६३) स.स. श्री. नरसिंग ढगे
६४) स.स. श्री. विठ्ठल किसन जाधव
६५) स.स. श्री. मेहेर विजयकुमार गजानन
६६) स.स. सौ. मंदा धनंजय काळुसे
६७) स.स. सौ. सुनंदा उत्तम कोल्हे
६८) स.स. श्री. गांगवे बन्सी तुळशीराम
६९) स.स. श्री. भगवान देविदास घडामोडे

**विषय क्र. १९५/१ :** सन १९९८-९९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर विचार विनिमय करणे.

**मा. महापौर :** कोरम अभावी सभा १५ मिनिटे तहकुब करण्यात येते.
(अंदाजे वेळ ११.३२ वा. सभेला सुरुवात अंदाजे १२ वाजता)

**नरेंद्र पाटील :** स्थायी समितीचे सभापती यांच्या वतीने सर्वसाधारण सभेला अर्थसंकल्प सादर केला जातो. हा नियम आहे. परंतु स्थायी समिती सभापतीच सभागृहात उपस्थित नसल्याने अर्थसंकल्प सादर करता येत नाही आहे. तेव्हा नियमाप्रमाणे काम करता येईल ते पहावे.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :** स्थायी समितीचे सभापती सध्या गैरहजर असल्याने कायद्याप्रमाणे काय कार्यवाही करता येईल याची प्रशासनाने तपासावे त्या व्यतिरिक्त जेष्ठ सदस्य किंवा पदाधिकाऱ्यापैकी कुणालाही अर्थसंकल्प सभागृहात सादर करता येवू शकता येते काय याचीही पडताळणी करावी. कारण सभागृहासमोर अर्थसंकल्प मांडण्यासाठीची ही सभा असून त्यामुळे शहरातील नागरिकांची कामे व विकास कामाबाबतचे धोरण या अर्थसंकल्पाने स्पष्ट होणार आहे. आणि ह्यावर चर्चा होणे आवश्यक आहे.

**मा. महपौर :** शहरातील विकास कामे करण्यासाठी सर्व स. सदस्यांचे लक्ष असणे आवश्यक आहे. यासाठी सभागृहात अर्थसंकल्पाबबतच्या बैठकीत सर्व स.स. नी उपस्थित राहुन सहकार्य करणे आवश्यक आहे. परंतु सभापती अद्यापही गैरहजर आहेत. करिता सभा १५ मिनिटासाठी तहकुब करण्यात येते. (वेळ अंदाजे १२.५ वा सभेला सुरुवात अंदाजे १२ वा)

**सौ. अलका पाटील :** स.स. सौ. शकुंतला धांडे यांच्या मातोश्री चे नुकतेच दु:खद निधन झाले त्यांना सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**मा. महापौर :** ठिक आहे. सभागृहात १ मिनिट श्रध्दांजली वाहण्यातयावी यावेळी १ मिनिट स्तब्ध उभे राहुन सभागृहात स. नगरसेविका सौ. शकुंतला धांडे यांच्या मातोश्रीच्या निधनाने श्रध्दांजली वाहण्यात आली.

**मु. लेखापरिक्षक :** महानगरपालिकेच्या अर्थसंकल्प सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात येणार आहे. त्यापूर्वी सर्व स.पदाधिकारी आणि मा. आयुक्त यांचे स्वागत करुन मा. सभापती स्थायी समिती यांनी अर्थसंक ल्प महानगरपालिकेस सादर करावे.
(त्यानुसार मा. महापौर यांचेकडे स्थायी समिती सभापती यांनी अर्थसंकल्प सभागृहात सादर केला) मा. सभापती यांनी निवेदन वाचून दाखविले.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पावर सभागृहात स.स. नी चर्चा करावी.

**श्री.नरेंद्र पाटील :** अर्थसंकल्पावर सर्व स.स. ना चर्चा करण्याची संधी द्यावी.

**मा. महापौर :** (अर्थसंकल्पातील निवेदन सभागृहात वाचून दाखविले)

**श्री. फैय्याज कुरैशी :** ज्या अर्थसंकल्पात पाणी पट्टी वाढीचा जो प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे. ही वाढ करु नये कारण शहरातील गोरगरीब जनता एवढ्या मोठ्या प्रमाणात पाणी पट्टी वाढ सहन करु शकत नाही त्यापेक्षा मागील वर्षीप्रमाणेच रु. ७००/- वरुन रु. ४००/- चीपाणीपट्टी आकारावी.

**श्री. सुदाम सोनवणे :** शहरातील विविध प्रश्नावर व विकासाच्या कामावर चर्चा करावी त्याच बरोरब पाणीपट्टीवाढ न करता ती रु. १०००/- वरुन रु. ३००/- आकारावी.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :** मागील वेळेस माजी महापौर श्री. प्रदीप जैस्वाल हे असताना पाणी पट्टी वाढ सुचवून ती करण्यात आली होती. आता दिवसेंदिवस

शहराचा विकास लक्षात घेता मनपावर फार मोठ्या प्रमाणात वाढ जरी नाही केली तरी परंतु या ठिकाणी राजनितीचा भाग कुणीही आणू नये (यावेळी सभागृहात दोन्हीही पक्षाकडील स. स चा एकच मोठा आवाज होतो)

**श्री. प्रभाकर विधाते :** स.स. श्री मनेमोहनसिंग ओबेरॉय यांनी सभागृहात चर्चा करीत असताना व्यक्तीगत नाव घेवून कुणीही बोलू नये.

**श्री. मनेमोहनसिंग :** शिवसेना पक्ष हा शहरातील जनतेची दिशाभुल करित आहे. कारण ह्यापूर्वी सुध्दा पाणी पट्टी वाढीच्या प्रस्तावास त्यावेळचे नगरसेवक मोतीराम घडामोडे यांनी सभागृहात रु. ४००/- ची वाढ पाणीपट्टी करावी अशी एकच मागणी केली होती परंतु त्या वेळेसचे महापौरानी व सभागृहाने ऐकले नाही. तेव्हा स्थायी समिती सभेने जे अंदाजपत्रकात शिफारस केली आहे त्याप्रमाणे मंजुरी द्यावी.

(यावेळी विरोधी पक्षाच्यावतीने पाणीपट्टी संपुर्णत माफ करावी अशी जोरदार मागणी ओरड होते.)

रु. १३ कोटीची पाणीपट्टी दरवर्षी भरावे लागते आणि ती जर माफ करण्याचा विचार झाला तर मनपातर्फे शहराचा विकास होईल कायय याचा ही विचार करणे आवश्यक आहे. कारण रु. १८ कोटीचा घाटा व्याजासह मनपाला होत आहे. त्यापेक्षा जायकवाडी माफी शासनाने करावी असे धोरण स्विकारुन शासनाला कळविणे योग्य राहील व अशा प्रकारचा ठोस निर्णय घ्यावा.

**श्री. अफसरखान :** पाणीपट्टी वाढ कोणत्याही प्रकारचे करु नये कारण शहरातील गरीब जनता पाणीपट्टी भरु शकणार नाही.

**श्री. कुंवरसिंग बैनाडे,**

**श्री. विजय कुमार मेहेर**

**श्री. नरेंद्र पाटील :** सिडको भागात ३-३ दिवस पाणी पुरवठा होत नाही त्यामुळे नागरीक सारखे त्रस्त होत आहेत. असा उन्हाळा सुरु झाल्याने पाणीपुरवठा होणे आवश्यक आहे. किराडपुरा भागात त्या विटभट्ट्या आहेत ते लोक पाईपलाईन फोडून विटभट्यांना पाणी घेतात याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. सिडकोतून १०० टक्के लोकांचे पाणीपट्टी वसुली व्यवस्थित मिळते परंतु सिडकोत पाणी पुरवठा सुरळीत होत नाही याची प्रशासनाने दखल घ्यावी व पाणीपट्टी वाढ न करता रु. ३००/- करावी पाणी पट्टी वाढ रु. १४.०० कोटीची अर्थसंकल्पात दाखविलेली आहे. त्याचप्रमाणे भांडवली खर्च रु. ५ कोटीची वाढ दाखविलेली आणि दुबेरीज म्हणून रु. ५.०० कोटीचा खर्च असे मिळून रु. ९७.०० कोटीचा दाखविलेला आहे. अर्थसंकल्प हा फुगवून दाखविलेला आहे. पाणी पट्टी २५.०० कोटी खर्च दाखविलेला आहे. १ १/२ कोटी विजेच्या बिलाचे आहे. त्यावेळेस मा. मुख्यमत्री यांना शिष्टमंडळ भेटावयास गेले होते. त्यावेळेस विजेच्या बीलाचा दर शेतकी भावाने करावे असे सुचविले आहे. त्यासाठी शासनाने १ १/२ कोटी बील माफ करावे व मा. पालकमंत्री यांनी समधर्म समभावाने पाठपुरावा करावा व मनपा प्रशासनास सहकार्य करावे.

**श्रीमती आबेदा बेगम :** माझ्या वॉर्डात पाणी पुरवठा व्यवस्थित होत नाही. तरीही स.सदस्य श्री. बैनाडे यांनी सुचना केल्याप्रमाणे विटभट्टयावाले लोक चोरुन पाणी नेतात व पाईपलाईन फोडतात हे म्हणणे बरोबर नाही.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** पाणीपट्टी वाढ प्रत्येक वर्षीला सुचविल्या जाते या मध्ये रु. २४.०० कोटीचा खर्च होतो आणि रु. ७.०० कोटीची वसुली होते. आमच्या सिडको भागात किती एम.एल.डी. पाणी मिळते याची पाहणी करणे आवश्यक आहे. झोन क्र. ७ अंतर्गत ३२,३७२ नळ कनेक्शन वाले आहेत. झोन क्र. ५ आणि झोन क्र. ७ ह्या दोन्हीही भागात १८ एम.एल.डी. पाणी पुरवठा होतो. मागे मा. आयुक्त यांनी म्हटलेले होते की, सिडको भगात १/२ इंच कनेक्शन धारकांना जवळपास १ तास पाणीपुरवठा होतो. परंतु अद्यापही आलेला नाही सिडको भागात ३२ एम.एल.डी पाणी मिळणे आवश्यक आहे. तेव्हा पाणीपट्टीचा प्रस्ताव त्यामध्ये रु. ७००/- वरुन ५००/- एवढीच आहे. मागे माजी आयुक्त श्री. भोगे साहेब यांनी सिडको एन-११ येथील भारत माता नगर व सिडको रामनगर येथील काही नळ धारकांच्याकडे पाणीपुरवठा होत नसल्याचे त्यांनी पाणीपट्टी देवू नये व ज्यावेळेस पाणीपुरवठा होतो आहे. त्यावेळेस पर्यंतच घ्यावे व त्यांचे रु. २००/- चे क्रेडीट ठेवावे व त्यांना पाणीपुरवठा व्यवस्थित होत नसल्याने त्यांचे बीले त्या काळातील माफ करावे असे ठरले होते. त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**सौ. मंडलिक :** माझ्या वॉर्डात पाणी पुरवठा व्यवस्थित होत नाही तेथील पाणीपुरवठा लाईन टाकण्याची संचिकाच कार्यालयातून गहाळ झालेली आहे. माजी आयुक्त यांनी माझ्या वार्डातील काही नागरीकांच्या नळांना पाणी येत नसल्याने त्याची पाणीपट्टी माफ केलेली होती. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी व पाणीपट्टी रु. ३००/- करावी.

**श्री. प्रकाश निकाळजे :** शहरातील मोठ्या मोठ्या वस्तीतील लोकांना पाण्याची जासत आवश्यकता असते. झोपडपट्टीतील रहिवाशी सकाळीच कामाला निघून जातात. साठविणेसाठी त्यांच्याकडे काहीही नसते तेव्हा झोपडपट्टी रहिवाशांसाठी रु. ५००/- व मोठमोठ्या कॉलनी श्रीमंत नागरिकांकडून रु. २०००/- पाणीपट्टी आकारावी सभागृहात स.स. पोटतिडकीने आपली बाजू मांडतात. काही जनतेच्या हितासाठी निर्णय घ्यावयास भाग पाडतात. सिडको हस्तांतर झाल्यानंतर मनपास फार मोठ्या प्रमाणात खर्च येइ्रल काय याचा विचार करावा लागेल व पाण्ीपट्टी जवळपास २०.२५ कौटीच्या घरात जाईल याचा स.स. यांनी दखल घ्यावी व शहर आणि सिउको भागातील अधिकृत/अनधिकृत नळ कनेक्शन बाबत कठोर भूमिका प्रशासनाने घ्यावी.

**श्री. मोहसिना बिल्कीस :** पाणी पटटी वाढ न करता आहे तेच रु. ७००/- करावे.

**श्री. प्रफुल्ल मालानी :** गेल्या तीन वर्षापासून पाणीपट्टी वाढ करुन तोटा भरुन काढण्याबाबत प्रशासन प्रयत्न करित आहे. परंतु तोटा भरुन निघत नाही आहे त्या विद्युत मंडळास प्रत्येक महिन्याला रु. १ १/२ कोटी मनपा व्याजासाठीच देते याशिवाय तेथील मेंटनेन्स, विखंडीत होणे पाणी चोरी जाणे इ. बाबी विषयी उपाययोजना होणे आवश्यक आहे. सध्या पाणीपट्टीत वाढ न करता रु. ५००/- करावे.

**श्रीमती अलका पाटील :** माझ्या वार्डात ६ पाईपलाईन जवळपास ११ महिन्यापासून टाकलेली आहे आणि काही भागात जुनी पाईपलाईन आहे. काही लोक त्यामुळे प्रत्येक घरी मोटर लावून पाणी भरतात ज्यांच्याकडे मोटर नाही त्याच्याकडे पाणी येत नाही. याबाबत पाहणी करावी बारी कॉलनी आहे तेथील लोकांना २५%

विकास निधी भरलेला आहे. तो माफ करावे आणि जुन्या ठिकाणच्या पाईपलाईन काढून नवीन पाईपलाईन टाकावे.

**सौ. रुखमनबाई लोखंडे** : मनपा अस्तित्वात येण्यापुर्वी ज्या १८ खेड्याचा समावेश करण्यात आलेला आहे. त्या खेड्याचा अद्यापही विकास झालेलानाही सध्या गरीब वस्तीतील लोक पाणीपट्टी वाढीने पैसे भरु शकणार नाही. त्यापेक्षा रु. १५०/- पाणीपट्टी करावी.

**श्री. जावेद रज्जाक :** १) पाणीपट्टी वाढीस माझा विरोध आहे.

२) १९९५ मध्ये दोन वेळेस पाणी सोडण्याची आश्वासन दिलेले हेते आणि पाणीपट्टी वाढ केलेली होती. त्यावेळेस जी परिस्थिती होती त्याचेही पेक्षा आजची गंभीर परिस्थिती पाणी पुरवठ्याच्‌ी झालेली आहे.

३) जकात वाढ केल्यास आमचा विरोध नाही.

४) १९९५ ते ९७ पर्यंतचा पाणीपट्टीवाढीच्या प्रस्तावास मंजुरी दिलेली त्यास शासनाची मंजुरी आलेली आहे काय?

५) पाणीपट्टी वाढ केल्यास मी मनपाच्या गेटसमोर "आत्मदहन" करीन तेव्हा पाणी पट्टी वाढ न करता रु. ५००/- ठेवावे.

**मा. महापौर :** स.स. श्री. जावेद रज्जाक यांना विनंती की, त्यांनी "आत्मदहन" करण्याचा इशारा देवू नये. आपल्या मताशी संपुर्ण सहमत आहे.

**श्री. संजय केनेकर, सौ. वाडेकर यशोदा, सौ. रजनी जोशी, सौ. फरहद बानो**

**सौ. शिलाबाई गुंजाळे** : पाणीपट्टी वाढ करु नये रु. ३००/- ने कमी करावे.

**सौ. शकुंतला धांडे** : पाणी पट्टी वाढ न करता रु. ७००/- एवढेच ठेवावे.

**श्री. विश्वारोद्दीन** : पाणीपट्टी रु. ७००/- वरुन ५००/- करावे.

**सौ. राधाबाई तळेकर, सौ. सुनंदा कोल्हे, सौ. सविता आव्हाड, डॉ. भागवत कराड :**

माझ्या वॉर्डातील पाणीपुरवठा व्यवस्थित व सुरळीतपणे नाही. तेव्हा नागरिकांच्या सारखी ओरड लक्षात घेता पाणीपट्टी वाढ न करता रु. ३००/- ते ५००/- पर्यंत पाणीपट्टी करावी.

**श्री. फजलउल्ला खान :** माझ्या वॉर्डात पाण्याची पाईपलाईन अद्यापही टाकण्यात आलेली नाही.

**श्री. किशोर तुळशीबागवाले :** शहरात बऱ्याच भागात अनधिकृत नळ कनेक्शन आहेत ते शोधून अधिकृत करणे आवश्यक आहे. गेल्या १० ते १२ वर्षापासून याबाबत प्रशसनाने कठोर कार्यवाही करावयास पाहिजे होती ती केलेली नाही व आता जनतेकर पाणीपट्टी वाढ कोणत्याही प्रकारची लादू नये.

**डॉ. भागवत कराड :** १) महानगरपालिका क्षेत्रात शहर व सिडको भागात अधिकृत अनधिकृत नळ कनेक्शन किती आहेत.

२) बऱ्याचशा भागात पाणी रस्त्यावरुन वाहते प्रशासनाने काळजी घ्यावी.

३) पाणीपट्टी कमी केल्यास रु. ९७ कोटीचा अंदाजे पत्रक कसा असणार याची थोडक्यात माहिती द्यावी. त्यापेक्षा मालमत्ता कर वाढविण्यास हरकत नाही.

४) याशिवाय जकात वाढ करावे. मागे मी एक सुचना केलेली होती की, हर्सुल किंवा सावंगी/चौका परिसरात मनपाचा एक स्वतंत्र असा तलाव असावा जेणे करुन शहर व सिडको नागरीकांना पिण्याच्या पाण्याचा त्रास कमी होईल याबाबत प्रशासनाने दखल घेवून कार्यवाही करणे आवश्यक वाटते.

**श्री. मोहसीन अहमद :** विद्युत मंडळाने ३१/३/९८ पर्यंत विजेचे बील न दिल्यास मनपाचा पाणीपुरवठा रद्द करण्यात येईल. अशी धमकीची बातमी स्थानिक वर्तमानपत्रात दिलेली आहे. विधानसभेत दि. २४/३/९८ रोजी मा. आमदार श्री. अनील पटेल आणि श्री. अशोकराव चव्हाण यांनी विधानसभेत एक प्रश्न उपस्थित करुन औरंगाबाद महानगरपालिकेतील व विद्युत मंडळाच्या थकीत बिलाविषयी जो वाद चालू आहे आणि त्यामुळे शहरातील नागरिकांवर पिण्याच्या पाण्याविषयी चिंता वाटते. याबाबत विचारणा केली असता महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री यांनी असे आश्वासन दिले की, विद्युत मंडळ महानगरपालिकेसाठी जायकवाडीवरुन होणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या काळात किंवा पुरवठा होतो तो नागरिकांच्यासाठी असून त्यामुळे नागरिकांना त्रास होवू नये म्हणून विज पुरवठा कर केल्या जाणार नाही. तेव्हा सभगृह ने या दोन्हीही आमदाराचे अभिनंदन करावे व त्याचबरोबर मा.ना. उपमुख्यमंत्री यांचेही अभिनंदन करावे.

१) महानगरपालिकेतर्फे ६९,००० नळ कनेक्शन रेकॉर्ड नुसार आहेत.

२) मनपाची प्रापर्टी ९८,००० ची आहे व जवळपास ५००० धारकांना अद्यापही टॅक्स लागगलेला नाही.

३) तसेच ३५००० मालमत्ता धारक आहे त की, त्यांना मनपाचा नळ कनेक्शन अधिकृत नाहीत.

४) १२००० नळ कनेक्शन अनधिकृत होते ते अधिकृत करण्यात आले.

५) शहरात किती घरे आहेत त्यामध्ये हॉटेल्स बर्फ कारखाने शाळा कॉलेज दवाखाने किती आहेत. याबाबतचा सर्व्हे करुन योग्य ती कार्यवाही प्रशासनाने करणे आवश्कय आहे तसेच किराडपुरा भागात काही विटभट्यावाले आपले व्यवसाय सांभाळतात व ते यावर प्रशासनाचे बारिक नियंत्रण असणे आवश्यक आहे. राज्य शासनाकडून ६७ कोटी रु. सिडको/हडको साठीच्या विकास कामे करण्यासाठी अनुदान स्वरुपात मिळणार आहे. त्यापैकी कमीत कमी १५.०० कोटी रु. सिडकोतील पाणीपुरवठ्यासाठी दिलेला आहे. तेव्हा त्यातुनच मनपाकडे सदरील अनुदान प्राप्त करुन घ्यावे व कार्यवाही सिडकोच्या पाणीपुरवठ्यासाठी करावे. परंतु सिडकोमुळे शहरातील नागरिकांना पाणी पुरवठयासाठी त्रास होणार नाही व पाणीपट्टी वाढ होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**श्री.संजय जोशी :** स्थायी समितीमध्ये असा निर्णय केलेला होता की, पाणीपट्टी वाढ केल्यास जन आंदोलन उभारण्यात येईल परंतु त्यापेक्षा नळ कनेक्शन आणि मालमत्ता धारकाकडील टॅक्सेस पुर्णपणे वसुल होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे शहरातील बऱ्याच भागातील नागरिकांकडे घरगुती व व्यावसायिक नळ कनेक्शन अनधिकृत रित्या आहेत. त्याबाबत प्रशासनाने पुन्हा शोध मोहीम चालू ठेवून अनधिकृत नळ धारकांवर दंडात्मक कार्यवाही करुन नळ कनेक्शन कायमस्वरुपी करुन घेतल्यास मनपास आर्थिक लाभ मिळेल.

**श्री. गौतम लांडगे :** मागील वर्षी नळपट्टी रु. ७००/- ने वाढ केली होती आता ती बदलून एकदम रु. ३००/- ने सभागृहात पाणीपट्टी कमी करण्याचा प्रस्ताव ऐनवेळी मांडले योग्य नसुन त्यामुळे शहर विकास कामे करण्यासाठी सर्वांना सहकार्य करणे आवश्यक आहे.

**मा. महापौर :** स्थायी समितीमध्ये स.स. नी चर्चा करुन निर्णय घेतलेला आहे की, पाणीपट्टी वाढ रु. ७००/- वरुन रु. १०००/- करावे वास्तविक पाहता अशा प्रकारचा कमी दर वाढ सुचविण्याचा प्रस्ताव त्याचवेळी करुन सर्वसाधारण सभेस शिफारस करावयास पाहिजे होते आता ऐनवेळी हा प्रस्ताव मांडणे बाबत सर्व स. सदस्य यांनी विचार करावा ह्यापूर्वी काही स्थानिक वर्तमानपत्रातून पाणीपट्टी वाढीच प्रस्तावाबाबत नागरिकांनी जन आंदोलन उभारु असा इशारा प्रशासनाला दिलेला होता. परंतु शहर विकासाच्या दृष्टीने आणि पाणी विकत घेण्यामुळे मनपा प्रशासनावर जो बोजा पडत आहे. याचाही सर्व स.सदस्यांनी विचार करुन निणर्य घ्यावा. कारण मागील वर्षीपेक्षा या वर्षीची पाणीपट्टी कमी करुन शासनाकडे पाठविल्यास शासन परवानगी देईल काय?

**श्री. गजानन बारवाल :** पाणीपट्टी वसुली सध्या १०% होत आहे आणि खर्च मात्र २४% ही बाब योग्य नाही प्रशासनाने पाणीपट्टी वसुलीसाठी कसोशीने प्रयत्न करावे शासनाचे सध्याचे धोरण असे आहे की, इ.स. २००० सालापर्यंत संपुर्ण राज्यात टँकरमुक्त करावयाचे आहे. त्यानुसार कार्यवाही व्हावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** बऱ्याचशा स्लम भागात व इतरही काही भागात मनपातर्फे स्टँड पोस्ट दिलेले आहे. तेथील स्टॅन्ड पोस्ट बंद करुन नळ कनेक्शन देणे बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी. जेणेकरुन वसुली होत राहील.

**श्री. गौतम खरात :** पाणीपट्टी रु. ३००/- अशी कमी करणेचा प्रस्ताव सभागृहात काही जेष्ठ स.स. नी मांडलेला आहे. ही बाब हासस्पद आहे तेव्हा या बाबत विचारपुर्वक निर्णय घेणे योग्य राहील या सभागृहात मा. आयुक्त यांनी प्रशासनाच्या वतीने आपले मत मांडणे योग्य राहील जर ७००/- रुपये वरुन रु. ३००/- अशी पाणीपट्टी काम करीत असल्याचे मत सभागृहात होत असल्यास माझी आणि सर्व विरोधी पक्षाच्या तर्फे संपुर्ण पाणीपट्टीच माफ करावे असा प्रस्ताव ठेवल्या जाईल व आमची मागणी राहील आज रु. १९.०० कोटी दर वर्षाला विद्युत मंडळाला पाणी बिलापोटी द्यावे लागते तर मागील वेळेस स.स. श्री. प्रदिप जैस्वाल असे म्हणाले होते की, महानगरपालिकेची पाणीपट्टी दर वाढ न केल्यास मनपाला कुलूप लावावे लागेल. याबाबतचा विचार होणे आवश्यक आहे. आता जवळपास दिड कोटीचे बीले विद्युत मंडळास दिल्यामुळे मंडळाने वीज बंद केलेले नाही या सर्वाचा विचारपूर्वक माहिती मा. आयुक्त यांनी द्यावी आणि त्यानंतरच पदाधिकारी यांनी एकत्रीत विचार करुन सभागृहात निर्णय घ्यावा पाणीपट्टी कमी केल्यास शासन सुध्दा मंजुरी देणार नाही.

**मा. महापौर :** शहरातील पाणीपट्टीचा वाढीचा प्रश्न आहे हा ज्वलंत प्रश्न असून त्यावर सर्वांनी मिळून सभागृहात निर्णय घेणे योग्य.

**श्री. भगवान घडामोडे :** जनतेची चांगली कामे करण्यासाठी स्थायी समितीने निर्णय घेतलेला आहे. परंतु काही लाकांनी वर्तमानपत्रत जन आंदोलन उभारणाचे ठरविले आहे. त्यामुळे युतीच्या वतीने आम्ही पाणीपट्टी वाढ करु नये असे त्यांना पत्र दिलेले आहे. जवळपास ४० वर्षापासून कोणत्याही शासनाने आतापर्यंत रु. ९ कोटीची मदत केलेली आहे व विकास कामे झालेली आहेत. आता आपण असा निर्णय घेवू या की, अपण कोणत्याही प्रकारे अपग नसून स्वबळावर उभे राहण्यासाठी स्वत:चा विकास स्वत:च करावयाचा आहे येथील नागरीकांच्या अनेक समस्या आहेत अनाधिकृत नळ कनेक्शन अधिकृत

केल्यास त्यांचेकडून वसुली होवू शकेल व्यावसायिक नळ धारक आहेत. त्यांचे कडूनही नळ कायम असल्याची वसुली प्रशासनाने व्यवस्थित करावी अनेक मालमत्ता धारक आहेत त्यांचेकडून योग्यरित्या टॅक्स आकारणी केल्या जात नाही त्यामुळेही वसुली पुर्ण होत नाही ह्या बाबतचा निर्णय होणे आवश्यक आहे. सिडको भागात अनेक ठिकाणी नळ कनेक्शन आहेत. त्यांची वसुली झाल्यास मनपाला आर्थिक भार होण्यास मदत होईल काही ठिकाणी प्रशासनातील अधिकारी अनधिकृत नळ कट करीत नाही आणि वसुली साठी ही धरित नाही ह्याबाबत सर्वांना लक्ष देणे आवश्यक आहे.

**सौ. लता दलाल :** महानगरपालिकेतील बऱ्याच भागातील नागरीकांना कोणत्याही प्रकारची वाढ होणे शक्य नाही. बऱ्याच ठिकाणी शॉपिंग सेंटर दुकाने भाजीमडई हातगाड्या वगैरे यांच्याकडून वार्षिक वसुली टॅक्स केल्या जातात काय कारण माझ्या वार्डात नळपट्टी बाबतही व्यवस्थितरित्या घेतल्या जात नसल्याचे तक्रारी आहेत. पिण्याची पाणी सुध्दा बऱ्याच भागात व्यवस्थित रित्या मिळत नाही त्यामुळे नागरीक नाराज आहेत. त्यामुळे युतीतर्फे असा निर्णय घेण्यात येतो की, नळपट्टी रु. ३००/- करावे अशी लोकप्रतिनिधी या नात्याने व नागरिकांचे प्रश्न सोडविण्याठीही निर्णय घेत आहे.

**मा. महापौर :** अर्ध्या तासासाठी सभा तहकुब करण्यात येते वेळ अंदाजे ३.१० वाजता सभेला सुरुवात अंदाजे ४ वाजता.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :** मा. आयुक्त यांनी या संदर्भात विधी सल्लागारांची सल्ला घेवून निर्णय घ्यावा.

**मा. महापौर :** सभागृहाने पाणीपट्टी रु. ३००/- ने कमी करण्याचा जर निर्णय घेतला आणि शासनाकडे पाठविला याबाबत शा सनाने मंजुरी दिली नाही तर काय करणार यासाठीच या सभागृहात स.स. नी विचारपूर्वक व समजून घेणे आवश्यक आहे.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** या सभागृहात शिवसेना व भाजप पक्षातर्फे जो प्रस्ताव मांडलेला आहे रु. ७००/- वरुन रु. ३००/- पाणीपट्टी कमी करावे असे पत्र दिले आहेत याबाबत मा. आयुक्त यांनी आपले मत नोंदवावे व त्यानंतरच शासनाकडे प्रस्ताव पाठवावा सध्या सिडको भागात जवळपास २६०० नळ कनेक्शन आहेत या शहरात मंगल कर्यालये हॉटेल्स व्यावसायिक इ. २५०० पर्यंत नळ कनेक्शन आहेत परंतु अजूनही २००० च्या वर अनधिकृत व्यावसायिक नळ धारक असल्याचे दिसून येतील. यासाठी आवश्यक तो सवर्हे होणे आवश्यक आहे. ८०% लोकांचा जवळपास पाणी व्यवस्थित मिळत नाही. असे एका स.स. यांनी सांगितले माजी आयुक्त यांच्या काळात जवळपास १३०० अनधिकृत नळ कनेक्शन रेग्युलर करण्यात आले त्याप्रकारे आताही नव्याने शहरात सर्व्हे करुन शोधून अनधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करावे ज्यामुळे मनपाला तोटा होणार नाही तेव्हा माझी विनंत आहे की, सभागृहात युतीतर्फे मागणी केल्याप्रमाणे पाणीपट्टी कमी करण्यात यावे. त्यामुळे येथील नागरीक पाणीपट्टी भरतील जनतेवर जास्त प्रमाणात बोजा न टाकता रु. ३००/- प्रमाणे पाणीपट्टी करुन प्रशसनाने कार्यवाही करावी.

**मा. महापौर :** सभागृह हे जनतेचे लोकप्रतिनिधीत्व करतात या ठिकाणी निर्णय घेताना महानगरपालिकेची जबाबदारी काय आहे हे पाहूनच कार्यवाही करावे लागते जर पाणीपट्टी कमी करण्याचा निर्णय घेतल्यास शासन मंजुरी देईल काय?

यासाठी काही स.स. नी याची जबाबदारी घ्यावी त्या आधारे निर्णय घेता येईल.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :** याबाबत मा. आयुक्त यांनी प्रशासकीय मत द्यावे.

**मा. महापौर :** मी जे सभागृहात बोलत आहे. त्याप्रमाणे जे स.स. पाणीपट्टी रु. ३००/- असे कमी करण्याचे चर्चा करतात त्यांनी असे आश्वासन व हमी द्यावी की, शासनाकडून नळपट्टी कमी करुन मंजुरी आणून देतो. त्या आधारेच निर्णय घेता येईल.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :** मा. आयुक्त यांनी स्वत: चे मत द्यावे त्यानंतरच सभागृहाने निर्णय घ्यावा माझे असे मत आहे की, रु. ३००/- पाणीपट्टी कमी करुन रु. २५०/- आघाडीतर्फे करण्यास आम्ही मंजुरी देतो परंतु मनपाला ते परवडणारे आहे काय? याची शहानिशा करावी.

**मा. महापौर :** निर्णय काहीही देता येईल परंतु शासनाकडून मंजुरी आणण्याची जबाबदीर कोण घेणार यीच माहिती द्यावी.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** सन १९९२-९३ च्या वेळेस शासनाकडे अशा प्रकारचा प्रस्ताव पाठवूनही मंजुरी मिळालेली नाही मनपा अर्थसंकल्पात यावर्षीच्या तशी तरतुद करुन मुंबई प्रा. मनपा अधि. सेक्शन ४५५-४९९ प्रमाणे त्यावेळेस सांगितले की, येणाऱ्या बजेटमध्ये कमी कर ते पाहुनच कार्यवाही करता येईल.

**मा. महापौर :** या पूर्वीही २% वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला अद्यापही त्यावर मंजुरी प्राप्त झालेली नाही. स.स. श्री. जैस्वाल आपण त्या वेळेस महापौर होतात त्यावेळेस रु. ३००/- च्या प्रस्ताव शासनाकडे का पाठविला नाही आणि आता अशा प्रकारचा प्रस्ताव शासनाकडे पाठविल्यास आणि शासनाने मंजुरी न दिल्यास जनता आपल्याला कोणता जाब विचारेल याची चर्चा करावी.

**श्री. गजानन बारवाल :** पाणीपट्टी रु. ३००/- करावी.

**श्री. जावेद रज्जाक :** पाणीपट्टी वाढ न कर ता रु. ७००/- ऐवजी ३००/- करावे व शासनाकडे प्रस्ताव पाठवावे शासन काय करेल तो शासनाचा प्रश्न आहे. या ठिकाणी तीन माजी महापौर यांनी जे सुचना केल्या त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**मा. महापौर :** स.स. नियमाप्रमाणे बोलावे आता शासनाकडून जे पत्र मनपाला आलेले आहे त्याची माहितीही मा. आयुक्त यांनी द्यावी.

**मा. आयुक्त :** महानगरपालिकेतील पाणीपट्टी वाढीच्या प्रस्तावावर जवळपास तासापासूनस.स. चर्चा करीत आहेत सभागृहात सर्व स.स. नी आपआपल्या भावना व्यक्त केल्या पाणीपट्टी विभागात गलथा नपणा अनधिकृत नळ कनेक्शन बऱ्याचशा नागरिकांना मालमत्ता थकबाकी व नळपट्टीच्या नोटीसा वेळेवर बजावणे त्याप्रमाणे घरगुती व व्यावसायिक नळपट्टी धारकां बाबीचे धोरण स्पष्टपणे व प्रभाविरित्या न राबविणे इ. बाबी प्रशासनाच्या नजरेस सभागृहात आणलेल्या आहेत. सभागृहाचे असे मत आहे की, या सर्व बाबतीतत सुधारणा करुनवसुली प्रभावीपणे केल्यास पाणीपट्टी वाढ करणे शक्य नाही असे नमुद केलेले आहे. प्रशासनातर्फे पाणीपटटी अजिबात वाढविणार नव्हतो. पाणीपट्टीचे कनेक्शन व्यवस्थितपणे केलेले नाही अशा भावना सभागृहात केल्या गेल्या. प्रशासनाच्या भूमिका खालीलप्रमाणे आहेत त्यावाचून दाखविल्या कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा यांच्या कडील नोटस्

उदा.

१) मागील वर्षी रु. ५००/- व रु. ७००/- पाणीपटटी वाढ केली ज्यामुळे मुलभूत गरजा नागरीकांना पुरवावे लागते.

२) पाणीपट्टी १८ कोटीची तुट

३) मनपाला वार्षिक खर्च रुपये २७ कोटी करावा लागतो.

४) रु. ७००/- वरुन प्रशासनाने रु. १५००/- केले परंतु स्थायी समितीने रु. १५००/- वरुन रु. १०००/- ची शिफारस केली.

५) विद्युत मंडळाने वर्तमानपत्रात मनपाने रु. १०.०० कोटी दिले नाही तर दि. १/४/९८ पासून वीजपुरवठा बंद करण्यात येईल. नोटीस दिली याबाबत प्रशासनाने मा. मुख्यमंत्री/उपमुख्यमंत्री सचीव नगर विकास विभाग यांचेशी चर्चा केली आणि ना. पालकमंत्री यांनीही चर्चा करुन जनतेच्या भावनाशी न खेळता अशा प्रकारचे कार्यवाही तसेच शासनाकडून रु. ७००/- पाणीपट्टी व कमी असून यात वाढ करणेची आवश्यकता असल्याचे पत्रही शासनाने पाठविलेले आहे.

६) पाणीपट्टी वाढ करणे हा सभागृहाचा प्रश्न आहे.

७) जकात वाढ हा सभागृहाचा व लोकप्रतिनिधीचा निर्णय घ्यावयाचा आहे.

८) पाणीपट्टी वाढीबाबत विविध नागरीकांकडून तीव्र प्रतिक्रिया आणि मोर्चे काढणेच्या बाबतीत पत्रके निघालीत तरीही स्थायी समितीने जो निर्णय दिलेला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

९) बजेटमध्ये फक्त बजेट शिवाय दुसऱ्याकोणत्याही विषयावर चर्चा करता येणार नाही.

१०) स्थायी समितीने रु. १५००/- वरुन रु. १०००/- पाणीपट्टीचा निर्णय घेतलेला आहे. लोकप्रतिनिधीनी रु. १५००/- चे रु. ३००/- करावे व फेटाळण्याचे सर्व अधिकारी सभागृहात आहेत परंतु रु. ७००/- वरुन रु. ३००/- पाणीपट्टी कमी करणे बाबत कायद्याचा विचार करावा लागेल.

**मा. उप आयुक्त:** (मनपा कामकाज नियमावलीतील प्रकरण नियम (ल) सभागृहात वाचून दाखविला)

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :** सभागृहात पाणीपट्टी वाढीचा म्हणजे रु. ७००/- वरुन रु. १०००/- करण्याची चर्चा येवू शकते परंतु रु. ७००/- वरुन रु. ३००/- करता येणे शक्य नाही. त्यासाठी वेगळी नोटीस देवून नंतरच सभा घेता येवू शकते.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** पॉलिसी डिसीजन ही सर्वसाधारण सभा होवू शकते.

**मा. महापौर :** स.स.नी केलेल्या सुचनेप्रमाणे खालीलप्रमाणे कार्यवाही व्हावी.

१) सिडको भागात २-३ ठिकाणी पाणी सुरळीत मिळत नाही याबाबत पाणीपुरवठा विभाग-२ यांनी कार्यवाही करावी.

२) गेल्या २ वर्षापासून एक नळाची संचिका गायब झालेली आहे. त्यानुसार चौकशी करुन पोलीस कार्यवाही करावी.

३) पाणी काही भागात दोन वेळेस येते आणि काही भागात ३ वेळेस येते. याबाबतची चौकशी करावी आणि एक तास किंवा दोन तास अशा सर्वांना सारखीच वेळ असावी.

४) बऱ्याच भागातील नळांना तोट्या नाहीत त्या बसविण्यात याव्यात.

**श्री. जयवंत ओक** : (याच वेळेस सभागृहात जोरजोरात ओरडून) माझ्या वार्डात रात्री ३ ते ४ वा. पाणी येते यावर प्रशासनाने कार्यवाही करावी असे बोलतात.

**मा. महापौर** : स.स. श्री. जयवंत ओक आपण सभागृहात शांततेने बसावे व बोलावे नसता आपले सभासदत्व रद्द करण्यात येईल. (अशी सुचना करतात) त्यावेळी स.स. श्री. जयवंत ओक जोरजोराने बोलतात. त्यामुळे त्याचे सभासदत्व एका दिवसाचे रद्द करण्यात येते.

५) ज्या भागात व इमारती तथा व्यवसायिक नळ धारकांकडे अनधिकृत नळ कनेक्शन असतील त्याबाबत प्रशासनाने पाहणी करुन आवश्यक ती कार्यवाही करावी मालमत्ता व नळपट्टी वसुली प्रभावीपणे होईल याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे (यावेळी सभागृह नेता व विपक्ष नेता यांच्या सुचनेनुसार स.स. श्री. जयवंत ओक यांचे निलंबन रद्द करण्याची सूचना करतात)

६) ज्या भागात रात्रीच्या वेळेत पाणी येते त्या भागात संबंधीत अधिकारी यांनी सायंकाळपर्यंत पाणी सूटणार याकडे लक्ष द्यावे

७) स.स. श्री जयवंत ओक यांचे एका दिवसाचे सभासदत्व निलंबीत केले. त्याबाबत मा. सभागृह नेता व विरोधी पक्ष नेता यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे रद्द करण्यात येते.

८) सभागृहात विरोधी पक्षातर्फे रु. ४००/- नळपट्टी व सभागृह नेत्यातर्फे रु. ३००/- नळपट्टीचे पत्र दिले आहे. तेव्हा शासनातर्फे याबाबत मंजुरी मिळणार नाही. त्यापेक्षा रु. ७००/- पाणीपट्टी मागील वर्षाप्रमाणे ठेवण्यात यावे व मा. आयुक्त यांनी नियम ४५१ या प्रमाणे कार्यवाही करावी.

९) पाणीपट्टी रु. ७००/- करण्याचा प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. याबाबत स.स. श्री. प्रदीप जैस्वाल यांनी आपल्या तीन स.स. यांचे सोबत मुंबई मंत्रालयात जावून प्रस्ताव मंजुर करुन आणावा (सभा १५ मिनिटासाठी तहकुब करण्यात येते. वेळ ५.४५ वाजता सभेला सुरुवात ६.३० वाजता)

(पाणी पट्टी वाढीच्या संदर्भात सर्वानुमते निर्णय व्हावा असे सभागृहातील सदस्य जोरजोरात बोलतात.)

**मा. महापौर :** याबाबत सर्व स.स. ची आपला निर्णय घ्यावा. अशी मी विनंती करतो किंवा विरोधी पक्ष व सभागृह नेत्यांनी आपणास चर्चा करुन सांगावे.

**विपक्ष नेता :** स्थायी समितीने जो निर्णय घेतलेला आहे रु. १०००/- त्यापेक्षा थोड्या प्रमाणात कमी पाणीपट्टी करण्यात यावे.

**सभागृह नेता :** सभागृहात विपक्ष नेता आणि इ. सदस्यांशी चर्चा करुन मनपातील आर्थिक बाब लक्षात घेता शिवसेना/भाजप पक्षातर्फे दिलेले पत्र रु. ३०० पाणीपट्टी कमी करण्याचा होता ते पत्र रद्द करुन सर्वानुमते रु. ७००/- पाणीपट्टी घेण्यास हरकत नाही.

**मा. महापौर :** ठिक आहे. रु. ७००/- वार्षिक पाणीपट्टीस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**मनमोहनसिंग ओबेरॉय :** पृष्ठ क्र. २७ मध्ये कर्मचाऱ्यांना बोनससाठी सानुग्रह अनुदान रु. ८६.०० लाख मा. सभापती यांना दाखविलेले आहे व प्रशासनाने रु. ६०.०० लाख शिफारस केली होती. तेव्हा बजेट रिव्हार्जन्ड करतांना तातडीची बैठक होवून निर्णय घ्यावा. यावर्षी रु. ९९.०० लाख दर्शविलेले आहे. त्यात वाढ करु नये कारण ५ वा वेतन आयोग लागू होणार आहे. त्यानुसार बजेट मध्ये कर्मचाऱ्यांसाठी तशी तरतुद केली आहे काय? प्रशासकी खर्च ३४% पेक्षा

किती खर्च कर्मचाऱ्यांच्या पगारावर होणार याची माहिती द्यावी जर अशा प्रकारची तरतुद केलेली असल्यास ती तरतुद करणे आवश्यक आहे. व अशा प्रकारची दुरुस्ती बजेटमध्येकेल्यानंतर दुरुस्तीची प्रत सर्व स.स.ना देण्यात यावे. त्याचप्रमाणे प्रशासकीय इमारती मधील दवाखान्यासाठी रु. १.५० कोटी खर्च आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**श्री. प्रफुल्ल मालानी :** मागील वर्षी जवळपास २५ ॲटमवर दरवाढ झालेली होती व शासनाकडून मंजुरीही मिळाली होती. परंतु नजरचुकीने काही जास्त दर वाढलेले आहेत.

१) तांदुळ ५ प्रति क्विंटल
२) तेलबीया (सरकी) २ रु.
३) सिमेंट ४ रु. प्रतिबॅग
४) घड्याळ २.५% असावे

**श्री. गौतम खरात :** ५ वा वेतन आयोग कर्मचाऱ्यांना लागू होणार आहे तेव्हा मनपाची आर्थिक स्थिती सुधारली पाहिजे याचाही विचार करणे आवश्यक आहे.

**श्री. मोहसीन अहमद :** १) पृष्ठ क्र. ४ वर पुर्ण आकारणी काय काम आहे याची माहिती द्यावी मनपा मुंबई प्रा. मनपा अधि. प्रमाणे २०-२१ प्रॉपर्टीमध्ये फेरबदल होत असल्यास दुरुस्ती व्हावी व ज्यांची प्रॉपर्टी फिक्स आहे. त्यात बदल करु नये.

२) शिक्षण विभागातील ५.८३ लाख
२.८२ शासनाकडून अनुदान येणे
३.०१ हा खर्च कोणत्या प्रकारचा याची तपासणी करुन माहिती द्यावी.

**श्री. संजय जोशी :** रेल्वे क्रॉसींगसाठी रु. ३५.०० लाखाचा खर्च येणार आहे. परंतु या बजेटमध्ये तरतुद दिसून येत नाही. त्याचप्रमाणे सिडकोतील पाण्याच्या टाकीसाठी रु. ४० लाखाची जादा तरतुद करावी.

**श्री. भागवत कराड :** अर्थसंकल्पात नामदार हरिभाऊ बागडे रोजगार हमी योजना मंत्री असे आहे. त्याऐवजी अन्न नागरी पुरवठा मंत्री अशी दुरुस्ती व्हावी.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** पृष्ठ क्र. १८ वर मिनि आयुक्तालयाची आखणी सांगावी.

**श्री. वसंत देशमुख :** १) नाला ब्रेड क्रॉकीटच्या कामात जास्त तरतुद करावी.

२) विकास कामांना प्राधन्य द्यावे.
३) झोपडपट्ट्यातील रोडची कामे होताना डांबरीकरणाचे प्रस्ताव आल्यास त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.
४) सुलभ शौचालये
५) नवीन उद्याने
६) बीनतारी संदेश यंत्रणा याबाबत प्रशिक्षणाची व्यवस्था करावी.
७) पृष्ठ क्र. ३८ मध्ये आयुर्विमा महामंडळातील कर्ज फेड त्वरित करावे.
८) स्वेच्छा निधी रु. ३ लाख करावे.
९) नियोजन (नाली बांधकामे) लांबी रुंदी काढून करणे
१०) क्रिडा स्पर्धा अनुदान वाढवावे.
११) दारिद्र्य निर्मुलन आतापर्यंत किती बाकी राहिलेले आहे याबाबतची योजना काय आहे याची माहिती घ्यावी. नेहरु रोजागार योजना अंतर्गत

उरलेले फॉर्मस व त्यातील काही अनुदान हे कशा प्रकारची विल्हेवाट लागली याची सविस्तर माहिती द्यावी.

**श्री. गौतम खरात :** अर्थसंकल्पातील जमेची बाजू सांगावी आणि नंतरच खर्च दाखवावे.

**सौ. लता दलाल :** १) दूरध्वनी ध्येयके व नवीन दुरध्वनी बाबत माहिती द्यावी. माझ्या माहिती प्रमाणे सिडको आणि इतर शहरातील टपऱ्यावर दुरध्वनी प्रत्येक टाकीवर देण्याची व्यवस्था करावी. जेणेकरुन तातडीने संपर्क साधता येइल आणि तरतुद नसल्यास तरतुद करावी. शिवाय बीले भरण्यास कमी तरतुद असल्यास ती सुध्दा वाढवावी.

२) उद्याने योजना शाळा योजना, या योजना एका वर्षासाठी मनपाच्या ६५ शाळांपैकी ३ शाळांमधून प्रथमत: योजना राबविणार तर मध्यवर्ती भागातून निवडण्यात यावे आणि त्यासाठी बजेटमध्ये जादा तरतुद ठेवावी.

३) दारिद्र्य निर्मुलन कक्ष प्रकल्प विभागामार्फत प्रशिक्षण व इतर बाबी आहेत तर या योजनेचा फक्त स्लम भागासाठी आहेत काय? जर स्लम भागासाठीच असतील तर जे दारिद्र्य रेषेखालील आहेत त्यांना ही याचा लाभ होईल अशी व्यवस्था करावी.

**विश्वारोद्दीन कुतुबद्दीन :** १) पृष्ठ क्र. १६ मध्ये सुलभ शौचालयाबाबत तरतुद करावी.

२) मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन कंद्राचे काम अद्याप सुरु झालेले नाही. यामध्ये रु. ८५.०० लाखाची तरतुद केलेली आहे. तेथील काम तातडीने सुरु करणे आवश्यक आहे.

३) मालमत्ता टॅक्स ३३.०० कोटी आहे. उदिष्ट १३.०० कोटीची असूनही व्यवस्थित झालेली नाही. त्यावर भर देणे आवश्यक आहे.

४) कब्रस्तान स्मशानभुमी बाबत विकास कामांसाठी जादा तरतुद करावी.

५) अधिकारी यांना ४ चाकी वाहने कर्जे हे त्यांना तांत्रिक/अतांत्रिक अधिकारी असा भेद न करता अतांत्रिक अधिकाऱ्यांनाही चार चाकी वाहने प्राधान्याने द्यावीत.

**श्री. महादेव सुर्यवंशी :** १) शहरातील संपुर्ण मालमत्ता अबाधित ठेवण्यासाठी या विभागास खर्च करण्यास तरतुद ठेवावी.

२) मोबाईल फोनवर टॅक्स लावावे.

३) विद्युत मंडळाच्या पोलवर व डीपीवर दर रु. ५/- प्रमाणे टॅक्स लावावे व तशी तरतुद बजेटमध्ये करावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** १) सिडको भागातील पाण्याच्या टाकीनाही जादा तरतुद करावी.

२) मिनी आयुक्तालयाची अंमलबजावणी करावी.

३) सिडको आंबेडकर वसाहत व्हीआयपी रोडवर आहे. सुधारित झ ोपडपट्ट्यास येथील सुलभ शौचालय योजना व्हावी. त्या ठिकाणी लाईटची व्यवस्था व्हावी.

**श्री. नरसिंग ढगे :** चार चाकी वाहनांसाठी रु. १७.०० लाखाची तरतुद आहे. त्यात आणखी १०.०० लाखाची वाढ करावी व तांत्रिक अधिकाऱ्यांनीच या चार चाकी गाड्यातून देता अंतांत्रिक अधिकाऱ्यांनाही ज्यांचे वेतन रु. २००० ३५०० आहे त्यांना कर्जाने देण्यात यावे व तशी अर्थसंकल्पात तरतुद करावी.

**श्री. गौतम खरात :**

१) सिडकोकडे रु. ७ लक्ष दिलेले आहे त्यापैकी किती मिळणार याची माहिती द्यावी.

२) दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे मालमत्ता टॅक्स वसुली होणे आवश्यक आहे. ती होत नाही. त्यामुळे थकवाबकी बरीच राहते. याबाबत प्रशासनाने दखल घ्यावी.

३) जी पदे अपग्रेड करित असता त्या संदर्भात प्रशासनाला किती खर्चपडतो याची माहिती द्यावी व तशी तरतुद केलेली आहे काय? याची माहिती द्यावी.

४) न्यायालयीन प्रकरणाबाबत किती खर्च अपेक्षीत असतो याची माहिती द्यावी.

५) मालमत्ता कराची फेरतपासणीसाठी प्रकरणे आल्यास प्रकरणे निकाली काढावी.

६) म्हाडाकडून रु. २.०० कोटीपैकी रु. ४०.०० लाख मिळाले. बाकी काही मिळाले नाही. याची माहिती द्यावी.

७) सुलभ शौचालयाबाबत मा. खैरे साहेब मंत्री यांनी जाहीरनामा केलेला होता. त्यात त्यांनी रु. २५.०० लाख केल्याचे सांगितले होते. ते अद्यापही खर्च केलेले नाहीत.

**श्री. संजय जोशी :** झोपडपट्टी भागात ह्या प्रकल्पाअंतर्गत जे खर्च झालेले आहे. ते बजेटपेक्षा जादा खर्च झालेले आहेत.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** हडको आणि शासनाच्या माध्यमातून आंबेडकर नगर सिडको येथील सुलभ शौचालयाबाबत सांगितले होते. यात रु. २३.०० लाखाची तरतुद होती. छत टाकून काम करण्यास सांगितले होते.

**श्री. काशीनाथ कोकाटे :** स.स. श्री. प्रदीप जैस्वाल यांनी सांगितले की, हडकोच्या कामातला पैसा मनपास मिळालेला नाही. याबाबत संबंधीत अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**श्री. गौतम खरात :** १) पृष्ठ क्र. १० प्रशासकीय कामाबाबत सन ९८-९९ मध्ये २३.२७ लक्ष प्रशासनावर खर्च होणार आहे. गेली १५/२० वर्षापासून दैनिक वेतनावर बरेचसे कर्मचारी काम करीत आहेत त्याचा आकडा जवळपास ९००-१००० कर्मचारी असून त्यांचे वर्षातील २४० दिवस काम केलेल्याचे असल्याने त्यांना मनपात कायम करुन घ्यावे.

२) पाचव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी लागू झाल्यास तशी तरतुद यात ठेवावी.

३) झोपडपट्टी विकास कार्यक्रमा अन्वये जादा अनुदान व विकास करण्यासाठी आयोजन करणे.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** २०० कर्मचाऱ्यांना मनपात कायम स्वरुपी घेण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेलो आहे. परंतु शासनाकडून वेळोवेळी रिमार्कस (शेरे) मारुन यावर विलंब होत आहे. ते तपासणी करुन मंजुरी द्यावी.

**श्री. गौतम खरात :** शहरातील स्लम भागासाठी ठेवण्यात आलेला पैसा येथील विविध कामासंाठी खर्च झालेला नाही रु. ४.०० कोटी पैकी रु. २.८० कोटी खर्च झालेले आहे. कारण विचारले असता कर्मचारी अपुरे असल्याने कामे झालेले नाही. आदर्शनगर गुलाबवाडी हा भा ाग आदर्श केलेला आहे. संसारनगर हा भाग सुध्दा आदर्श मध्ये असूनही त्याची सुरुवात झालेली नाही. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राचे काम अंतिम टप्प्यात चालू आहे. तर मौलाना आझाद सेंटरचे काम तातडीने सुरु करावयाचे आहे. शिक्षण विभागात ५० शाळा मराठी व २२ शाळा उर्दुतील आहे. यासाठी रु. ५२० कोटी खर्च करते. यामध्ये मुलांसाठी गणवेश योजना, शिष्यवृत्ती, सावित्री फुले दत्तक योजना इ. साठी योजनेत खर्च करतो. उर्दु

शाळेवरील खर्च मात्र कमी होतो. हा भेदभाव मराठी व उर्दुत होवू नये. वाचनालय चालविण्यासाठी सुध्दा खर्च बराच लागतो. यासाठीही प्रयत्न व्हावेत. अर्थसंकल्पातील पृष्ठ क्र. १७ मध्ये नळ कनेक्शनचे सर्व्हे करुन कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे घरगुती व व्यावसायिक नळ कनेक्शन धारकांमध्येही बरीच तफावत दिसून येते. या शहरातील हॉटेल्स, दवाखाने,गॅरेज, दुकाने व लॉज वगैरे ठिकाणी व्यावसायिक नळ कनेक्शन आहेत. त्यावरील प्रशासनाने त्वरित कार्यवाही करावी. स्वच्छता अभियान (फेस टू फेस फरशी बसविणे) मिनि आयुक्तालय या योजनेचा स्वरुप काय आहे? झोनमध्ये उपअभियंता यांना बसविणेपेक्षा जेष्ठ कनिष्ठ अभियंता यांना बसविणे योग्य राहील. पृष्ठ क्र. २१ मध्ये कर्मचाऱ्यांना घर बांधणीसाठी रु. २५ लाख ठेवलेले आहेत ते अपुरे असून रु. ४० लाख तरतुद करावी. वर्ग-१ च्या कर्मचाऱ्यांना रु. ५ लाख वर्ग-२ अधिकाऱ्यांना रु. ३ लाख व वर्ग-३ च्या अधिकाऱ्यांना रु. २ लाख व चतुर्थ श्रेणी च्या कर्मचाऱ्यांना रु. १.५० लाख घरबांधणी अग्रीम द्यावी अशी सूचना आहे. जेणे करुन आजच्या काळात अल्पशा पैशात कोणतेही बांधकाम पूर्ण होत नाही. ह्या मागास विद्यार्थ्यांना प्रकल्प विद्यार्थ्यांना प्रकल्प विभागातून अनुदान/शिष्यवृत्ती देण्याची तरतुद करावी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याबाबत कार्यवाही करावी.

**मा. महापौर :** स.स. श्री. ह्या अर्थसंकल्पात अनेक प्रकारच्या योजनेत व विविध कामासाठीच्या खर्चात वाढ व तरतुद करण्याची सुचना केली खर्चाचे जावक दाखविले परंतु आवक कशा रितीने यईल याच्या सुचना केलेल्या नाहीत.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** मालमत्ता कर जवळपास २५% वसुल होत नाही. याबाबत झोननिहाय माहिती द्यावी मालमत्ता पाणीपट्टी वसुलीसाठी उप आयुक्त-१ यांचेकडे काम सोपवून थकबाकी दराकडील व दिलेल्या उदिष्टा पैकी वसुली करणे आवश्यक आहे व जे मालमत्ता धारक मालमत्ता टॅक्स व पाणीपट्टी भरणा लवकर करते नसतील त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही होणे् आवश्यक आहे व वसुली उदिष्टाप्रमाणे करणे प्रशासनाचे काम आहे. पृष्ठ क्र १० मध्ये स्वेच्छानिधी नगरसेवकाच्या खर्चबाबत रु. २५ लाखाची तरतुद केलेली होती ती रद्द करण्यात यावी त्याचप्रमाणे इतर काही संस्थाना द्यावयाची मदत स्वेच्छनिधी रद्द करण्यात यावी फक्त विविध रुग्णास आर्थिक मदत द्यावी.

२) मिनि आयुक्तालय करणे याबाबत प्रत्येक झोनला रु. २५.०० लाख खर्च करण्यास सुचविले तेही रद्द करण्यात यावे कारण मिनि आयुक्तालय योजना लागू केल्यास ज्या ठिकाणच्या कर्मचारी वर्गाचा पगार व इतर खर्च वाढेल त्यामुळे मुख्य कार्यालय व झोन यामुळे नफा होण्या ऐवजी तोटा होण्याची शक्यता आहे. घर बांधणीसाठी केलेली असल्यास ती अपुरी असून कमीत कमी रु. ५०.०० लाखाची तरतुद करावी व अशा प्रकारे नियमावली तयार करावी की, एकावेळेस दोनदा कर्मचाऱ्यांनी घेतलेले आहे काय? त्यास कर्ज वाटप केल्यानंतर तो खरोखरच घर बांधकाम करतो काय याची वस्तुस्थिती व नकाशा आदी सर्वाची नगर रचना विभाग व लेखा विभागाने प्रत्यक्षात पाहणी केल्याशिवाय हप्त्याहप्त्याने कर्ज यावे व अंतर्गत घर बांधणीचा रिपोर्ट व कंम्पलेशन शिवाय अंतिम टप्प्यांचे कर्ज कर्मचाऱ्यांना देवू नये.

३) जकात विभागात मा. महापौर व मा. आयुक्त यांना विनंती की, त्यांना या विभागासाठी वायरलेस द्यावा व त्याचप्रमाणे अग्निशमन विभागासाठी देणे बाबत आवश्यक कार्यवाही करावी प्रत्येक वर्षी कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण देणे बाबत प्रशासनाने बजेटमध्ये तरतुद ठेवून कार्यवाही करावी.

**श्री. सुदाम सोनवणे :** १) महानगरपालिकेची थकबाकी मालमत्ता धारकांकडे सिडको/हडको भागात बऱ्याच मोठ्या प्रमाणात आहे. तेव्हा सन १९९८ मध्ये मालमत्ता टॅक्स सिडको भागासाठी नोटीसा देवून वसुली करावे.

२) विद्युत मंडळाचे मनपाच्या हद्दीत विद्युत पोल किती आहेत त्यावर टॅक्स आकारणी करावी.

**मा. महापौर:** १) सर्व स.स. च्या भावना लक्षात घेता मी खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे. शहरातील घरांना ज्या मालमत्तांना टॅक्स आकारणी झालेला नसेल अशा प्रॉपर्टीला प्रशासनाने कर लावावा अनधिकृत नळ धारक व्यावसायिक नळ धारकांकडून अधिकृत करुन पाणीपट्टी वसुली करावी.

२) शिक्षण विभागातील किती थकबाकी शासनाकडून येणे बाकी आहे. त्याचा खुलासा व्हावा.

३) रेल्वे ओव्हर ब्रीज बाबबत रु. ३० लाख तरतुद केलेली आहे काय याची माहिती द्यावी.

४) मिनि आयुक्तालय वॉर्ड निहाय माहिती द्यावी की जेणे करुन एकंदर काम काजाचे स्वरुप व खर्चाचे अधिकार व कमिटी गठीत करणे.

५) नाल्यावरील बांधकाम वॉर्ड निहाय तरतुद करावी.

६) महापौर विविध स्पर्धा रु. १२.०० लाखावरुन रु. १५.०० लाख करावे.

७) शहरातील पाण्याचे टाकीवर दुरध्वनी बसणेची व्यवस्था करणे.

८) मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्राचे तातडीने कामास सुरुवात करावी.

९) शहरातील विविध कब्रस्तान/स्मशानभुमी कामांना गती द्यावी.

१०) केबल/मोबाईल आदींवर टॅक्स लावावे.

११) शहर हद्दीतील लाईटचे पोल व डीपीवर टॅक्स लावावे.

१२) सिडको पंप हाऊस रु. ८२.०० लाखाचे खर्च आहे. ते काम करावे.

१३) दुग्धनगरीचे काम टेंडर मागवून करावे.

१४) अधिकाऱ्यांना चार चाकी वाहन खरेदीसाठी टेक्नीकल/नॉन टेक्नीकल असा भेद न करता नॉन टेक्नीकल अधिकारी संवर्गातील कर्मचाऱ्यांना चार चाकी वाहन खरेदीसठी कर्ज द्यावे. त्यांच्यासाठी रु. १०.०० लाखाची तरतुद या बजेटमध्ये करावी.

१५) वाचनालय उर्दु/मराठी यासाठी ठेवण्यात आलेल्या तरतुदीनुसार कार्यवाही व्हावी.

१६) मालमत्ता कराचे उद्दिष्ट रु. १३.०० कोटीचे होते परंतु प्रत्यक्षात ६.५० कोटी वसुली झाली. तेव्हा या वर्षीचे उदिष्ट जास्त ठेवून प्रशसनाने कार्यवाही करावी. प्रॉपर्टी टॅक्स १३ कोटी ऐवजी १५ कोटीचे उदिष्ट ठेवावे.

१७) काही मालांचे बाबतीत जाकत कर करणे आवश्यक आहे.

१८) शिक्षण विभागा व आरोग्य विभागाकडे शासनाकडून अनुदान मिळते. ती थकीत राहीलेली असल्यास शासनाकडून तातडीने मागवावे.

१९) जकात ४६.०० कोटी ऐवजी ४८.०० कोटीचे उदिष्ट ठेवावे.

२०) स. नगरसेवकांचा स्वेच्छा निधी प्रशिक्षणासाठी रु. २५.०० लाख`वलेला आहे. तो सर्वसाधारण सभेत ठेवून नंतर मंजुरी द्यावी.

२१) स्लॉटर हाऊस बाबत ३.५० कोटी चे काम टेंडर काढून करावे.

**मा. आयुक्त :** सन १९९८-९९ च्या मुळ अंदाजपत्रकाच्या संदर्भात आणि सन १९९७-९८ च्या सुधारित अंदाजपत्रकात काही बोलावे असे मला वाटत नाही.

१) आचारसंहितेमुळे स. नगरसेवकांचे समवेत खरोखरच चर्चा झालेली नाही. (price budget meeting) अंदाजपत्रकीय बैठकीबाबत प्रशासनाने व संबंधीत अधिकाऱ्यांनी चांगले कामे केली. त्याबद्दल त्यांचे व त्यांच्या सहकार्याचे धन्यवाद.

२) मिनि आयुक्तालयाबाबत स.स. श्री. महादेव सुर्यवंशी श्र.ी प्रदीप कुमार जैस्वाल व गौतम खरात यांनी जो मुद्दे उपस्थित केले. कामाच्या संदर्भात वॉर्ड निहाय छोटे छोटे कामे बाबत स. नगरसेवक नाराज होतात. ज्या संचिका आयुक्तांकडे येतात व कामाच्या व्यापामुळे उशिर झाल्यास स. नगरसेवक व नागरीकात गैरसमज होतात. त्यासठी लोकाभिमुख प्रशासन सक्तीचे विकेन्द्रीकरण करणे महत्वाचे आहे. याबाबत सहा महिन्याने मिनि आयुक्तालयाचे कामकाज चांगले होईल यासाठी प्रयत्न करावे लागेल. याच प्रामुख्याने शहरातील नागरीकांचे वार्डनिहाय कामे असतात व वेळोवेळी मुख्य कार्यालयाकडे धाव घेतात. त्यापेक्षा आपआपल्यावॉर्डातील झोनमधून ही सर्व कामे पार पाडण्यासाठी ड्रेनेज लाईन चोकअप होणे, पाणीपुरवठासुरळीत न होणे साफसफाई नळ कनेक्शन दुरुस्ती ही सर्व कामे झोनमधून करुन घ्यावयाची असेल ही प्रशासनाची संकल्पना आहे. ज्यामुळे कार्यालयातील गर्दी कमी होईल. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांनी बैठकीत सांगितल्यानुसार "स्वच्छ शहर सुंदर शहर" आणि नागरीकांची छोट्या छोट्या तक्रारीचे दखल घेवून कार्यवाही करणे प्रशासनाचे लक्ष राहणार आहे. यासाठी यासर्व कामावर संपूर्णपणे देखरेख ठेवण्यासाठी विभागीय आयुक्त यांना पूर्ण अधिकारी देण्यात येणार आहे.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** नियम ५६ (४) (२) अन्वये रु. ३०००/- चे कामाबाबत टेंडर कॉल करावे लागेल व चॅप्टर (५) (२) अन्वये कार्यवाही करावी लागेल.

**मा. आयुक्त :** १) धोरणात्मक सहकार्य द्यावे नंतरच काद्याप्रमाणे पहावे लागेल. या ठिकाणी तांत्रिक मंजुरी. निविदा मागविणे हे सर्व पहावे लागेल या मध्ये कोणत्याही प्रकारची नियमांची पायमल्ली होणार नाही याची प्रशासनाने दखल घ्यावी लागेल.

३) पृष्ठ क्र. १८ मध्ये मिनि आयुक्तालयाची तरतुद दिलेली आहे. वर्ग-१ चे अधिकारी वभिाग आयुक्त जे राहतील त्यांनाच आर्थिक अधिकारी खर्च करण्याबाबत राहतील. यामध्ये कर्मचाऱ्यांच्या हजेऱ्या पगारपत्रके छोटीछोटी वॉर्डातील कामे स्वच्छता अभियान वगैरे यासाठी प्रत्येक झोनमध्ये रु. २५.०० लाखाचे खर्च करण्याचे कामे देण्यात येतील यात स्वच्छता आरोग्य, ड्रेनेज, पाणीपुरवठा इ. कामे करण्यात येतील.

३) प्रॉपर्टी टॅक्स व पाणीपट्टी यांची वसुली प्रशासनाने चांगली केलेली होती. तरीही २.०० कोटी कमी वसुल झाली. गेल्या वर्षी फेब्रू ९८ पर्यंत ९.४५ कोटीची वसुली झालेली आहे. प्रॉपर्टी टॅक्स थकबाकी २२.०० कोटीची येणे बाकी आहे. यासाठी प्रभवीयंत्रणा उभी करुन कार्यवाही करावी लागेल.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** झोन निहाय टॅक्सेसची माहिती द्यावी.

**श्री. जयवंत ओक :** माझ्या माहितीप्रमाणे शहरतील जवळपास ५००० घरांना अद्यापही टॅक्स लागलेला नाही.

**श्री. प्रदिप जैस्वाल :** मनपाकडून बऱ्याच मोठ्या प्रमाणात घर बांधकाम परवानगी घेतल्या जात नाही व कंम्पलेशन सर्टिफिकेट घेतल्या जात नाही व टॅक्सही लावल्या जात नाही. याबाबत प्रशसनाने कठोर कार्यवाही करावी.

**मा. आयुक्त :**

| | |
|---|---|
| झोन - १ | १.८४ |
| झोन - २ | १.०७ |
| झोन - ३ | १.०५ |
| झोन - ४ | १.८१ |
| झोन - ५ | १.१० |
| झोन - ६ | १.१५ |
| झोन - ७ | ०.१९ |

पाण्याची वसुली -१.४० झालेली आहे.

उप आयुक्त यांच्या अधिपत्याखाली असेसमेंट करुन कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्यांचे अधिपत्याखाली कर्मचारी कार्यरत राहतात. स.स. श्री. ओक यांनी सुचना केल्याप्रमाणे "झा" कमिटीने सुचना केल्याप्रमाणे कार्यवाही करावी लागेल. प्रॉपर्टी टॅक्सच्या आक्षेपाबाबत स्पेशल कोर्ट् मनपाचे असणेची मागणी आहे. आणि कोर्ट मिळो नाही तर यातीलच कर्मचाऱ्यातून कोर्टाची कामे करावी लागतील. मिळकतीचे सर्व्हे करणे घरांना नंबर देणे ही कामे करावी लागतील. विभागीय आयुक्तांना अधिकार देणे, नळ कनेक्शन अनधिकृत व वेळेवर बीले न भरणे यासाठी तोडणे आणि ड्रेनेज चोकअप होणे, जे कर चुकले आहेत. त्यांना ११% व्याज लावून कार्यवाही करण्याचा प्रस्ताव आहे. ५% रिटेबल टॅक्सबाबत ठेवलेले आहे. प्रशसनाने दिलेल्या प्रस्तावानुसार मंजुरी प्रस्तावानुसार अंमलबजावणी केली जाईल.

**श्री. गौतम खरात :** अनधिकृत नळ कनेक्शन जसे आहेत तशाच प्रकारे अनधिकृत बांधकामेही वाढत आहेत. याकडेही प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लक्ष देणे आवश्यक आहे.

**मा. महापौर :** जे अनधिकृत बांधकामे करतात त्यांच्या बाबतीत स. नगरसेवकांनी सहकार्य करु नये.

**मा. आयुक्त :** मनपातर्फे ट्रेनिंग सेंटर सुरु करणे चा प्रस्ताव आहे यामध्ये स्वेच्छानिधीतून वेगवेगळ्या सुशिक्षीत बेरोजगारांना याचा लाभ मिळेल. यासाठी स्वेच्छा निधीतून रु. २५.०० लाखाची तरतुद केलेली आहे. नेहरु रोजागर प्रशिक्षण योजना यामध्ये आहे. या व्यतिरिक्त याच योजनेतून कर्मचाऱ्यांनाही ट्रेनिंग देण्यात येईल. यासाठी कामगार फंडातील रु. ५.०० लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे.

**मा. महापौर :**

१) जकात कराबाबतचे खालील वस्तुचे दर खालीलप्रमाणे असावेत.

१) तांदुळ रु. ५ प्रति क्विटल

२) तेलबीया रु. ४ प्रति क्विंटल

२१ shedule no. ५ a

हायड्रोजनेटेड तेल, वनस्पती किंवा खाद्य तेलाच्या निर्मितीसाठी लागणारे खाद्य तेल

| | |
|---|---|
| ३) भंगार | लमसम |
| ४) स्पेअरपार्टस | रु. १ १/२ |
| ५) सिमेंट | रु. ४ प्रतिबॅग |
| ६) घडी | रु. ४ प्रतिक्विंटल |
| ७) सरकी | रु. २ प्रतिक्विंटल |
| ८) कच्चा माल | रु. १० प्रति टन |

२) अग्निशमन विभागाने मागील वर्षी वर्ष भरातील काळात व वाळुज येथील कारखान्यात लागलेल्या आगीत मुख्य अग्निशमक व त्यांचे अधिपत्याखालील कर्मचाऱ्यांनी उत्कृष्टरित्या व जोखीम सांभाळुन जिवाचे रान केले व प्राणहानी, वित्तहानी वाचविण्याचे कसोशीने प्रयत्न केले. त्या सर्वाचे अभिनंदन करावे. व अशा कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन पर एखादी वेतन वाढ देवून पुरस्कृत करावे. याबाबत सभागृहाने निर्णयघ्यावा (सभागृहात सर्व स.स. ठिक आहे. प्रोत्साहन देण्यास हरकत नाही असे संबोधतात) या बाबतचा निर्णय प्रशासनाने प्रस्ताव ठेवून कार्यवाहीची अंमलबजावणी करावी.

३) या व इतर सुधारित १९९७-९८ व मुळ अंदाजपत्रक सन १९९८-९९ मधील प्रस्तावित केलेले जकात कर नव्याने केलेले.

४) सन १९९८-९९ च्या अर्थसंकल्पातील ठळक वैशिष्टे अनु. क्र. १ ते २७ या व इतर दुरस्त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका सुधारित सन १९९७-९८ चे सन १९९८-९९ चे मुळ अंदाजपत्रकीय बैठकीत सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे दुरुस्त्यासह प्रस्तावात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. जकात कर स्थायी समितीने शिफारस केल्यानुसार खालीलप्रमाणे प्रचालित व प्रस्तावित दर वाढीस मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | जकात अनुसुची "ओ" मधील अनुक्रमांक व वस्तुचे नाव | प्रचलित दर | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** |
| १ | ११(ब) सव्रप्रकारचा सुकामेवा, बदाम, काजु, किसमीस, खारीक, पिस्ता, चारोळी, आक्रोड, अंजीर, (सुके) जेली | २% | ३% |
| २ | ३९ सर्व प्रकारचे सिमेंट, सिमेंट पाईप, पत्रे, ॲस्बेस्टॉस, सिमेंटजाळी, सॅमोठ अश मोह, जिप्सम पावडर, चुना, सनला आणि इमारतीच्या बांधकामासाठी लागणारेसाहित्य | ३% | ४% |
| ३ | ४१ (अ) ग्लेझ टाईल्स, संगमरवरी दगड व स्लॅब, शहाबादी स्टोन कोरा स्टोन, कडप्पा स्टोन, टेराकोटा टाईल्स, ग्रॅनाईट स्टोन पोखर्ड आगस्टोन, धोलपूर स्टोन इ. | २% | ३% |
| ४ | ५३(अ) सिगारेट व सिगारेट होर्ल्ड स्मोकिंग पाईप्स, सिगारेट कागद पाईपसाठी वापरली जाणारी तंबाखु, | ३.५% | ५% |

| | | | |
|---|---|---|---|
| | टोबॅको केसेस पॅकेजस, सिगार आणि सिगारेट केसेस चिस्ट आणि धुम्रपानाच्या वस्तु | | |
| ५ | ५३ (ब) सुगंधी जर्दा, सर्व प्रकारचे सुगंधी तंबाखु किमान गुटका, सर्व प्रकारचा मसाला | १.५% | ५% |
| ६ | ६३ खोंगीर, रेग्णीन पेट्या, सुटकेस शेअर बॅग, ब्रीफकेसेस, लेडीजपर्स व इतर प्रकारचे बॅग्स जोडेचपला, स्लिपर्स पट्टे आणि इतर कातड्यापासून तयार केलेली पादत्राणे | २.५% | ३% |
| ७ | ७३ (ब) रेडीओ, रेडीओग्राम, दुरदर्शन संच, ध्वनती वर्धक यंत्र, व्ही.सी.आर. सेट, ऑडीयो, कॅसेट, व्हिडीओ कॅसेट आणि त्यांचे सुट`भाग गा्रमोफोन इलेक्ट्रूनिक वसु आणि त्याचे सुटे भाग, घटक संगीताचे साधणे व त्यांचे सुटेभाग तसेच चित्र प्रक्रिया यंत्र वायरलेस आणि त्यांच्या उत्पान्नात वापरली जाणारी सुटे भाग. | ४% | ५% |
| ८ | सर्व प्रकारची घड्याळे व त्यांचे सुटे भाग | २.५% | ४% |

## "फेरबदल व दुरुस्ती"

दिनांक ३१ मार्च १९९८ रोजी संपन्न झालेल्या अर्थसंकल्पीय विशष सर्वसाधारण सभेत सन ९७-९८ सुधारित व सन ९८-९९ चे मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर चर्चा होवून त्यात निम्न निर्देशित फेरबदल करण्यात येवून खालीलप्रमाणे अंदाजपत्रकात सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

| **"जमा बाजू"** | | | | |
|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **पृष्ठ क्र.** | **लेखाशिर्ष** | **स्थायी समितीने सुचविलेली तरतुद** | **सर्वसाधारण सभेने फेरफार करुन मंजुर केलेली तरतुद** |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १ | १० | पाणीपट्टी | रु. १०००.०० प्रतिवर्ष रु. ७ कोटी वार्षिक उदिष्ट | रु. ७००.०० प्रतिवर्ष रु. ५ कोटी वार्षिक उदिष्ट |
| २ | ०१ | जकात कर | रु. ४७.०० कोटी वार्षिक उदिष्ट | रु. ४८.०० कोटी वार्षिक उदिष्ट |
| ३ | ०१ | मालमत्ता कर | रु. १३.०० कोटी वार्षिक उदिष्ट | रु. १५.०० कोटी वार्षिक उदिष्ट |
| **"खर्च बाजू"** | | | | |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १ | २२ | महापौर चषक स्पर्धा | २०.०० लाख | १५.०० लाख |
| २ | २८ | कर्मचाऱ्यांसाठी | २५.०० लाख | ४०.०० लाख |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | घरबांधणी खरेदी अग्रीम | | |
| ३ | २८ | चारचाकी वाहन खरेदी अग्रीम | -- | १०.०० लाख |
| ४ | ३३ | कर्मचारी प्रशिक्षण केंद्र बांधणे अ.क्र. ३८ | -- | २५.०० लाख |
| ५ | २७ | खोरी घमेली, झा ाडू फिनेल हातगाड्या व इतर सॅनिटेशन साहित्य खरेदी | २०.०० लाख | ३०.०० लाख |
| ६ | २७ | लिखान साहित्य | १२.००लाख | १५.०० लाख |
| ७ | २७ | आकस्मिक खर्च | ०५.०० लाख | ६.२६ लाख |

दुरुस्ती

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जकात कर दर सुची क्र. ३९ -सिमेंट | ५% | रु. ४.०० प्र.गोणी |
| २. | जकात कर दर सुची क्र. ०४ -सरकी | | रु. २.०० प्र. क्विंटल |
| ३. | जकात कर दर सुची क्र. ०५ -अ.अन रिफाइन्ड ऑईल | | रु. १०.०० प्र. क्विंटल |
| ४. | जकात कर दर सुची क्र. २१ - आ. तेलबिया | ते | रु. ०४.०० प्र. क्विंटल |
| ५. | जकात कर दर सुची क्र. १ - ब तांदुळ | | रु. ५.०० प्र.क्विंटल |
| ६. | पान क्र. ५ वरील "रोजगार हमी योजना मंत्री मा. श्री. हरिभाऊ बागडे" या ऐवजी अन्न व नागरी पुरवठा मत्री, मा. श्री. हरीभाऊ बागडे असे वाचावे. | | |

उपरोक्त फरेफारसह जमा रु. ९३३५७१ हजार व खर्च रु. ९२९४९७ हजार नुसार रु. ४०.७४ लाखाच्या शिलकी अंदाजपत्रकास मान्यता देण्यात यावी.

"जन गन मन" या राष्ट्रगीताने सभा संपली असे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
सचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.